म. ग्रं. सं. ठाणें
विषय — चारित्र
वा. नं. ३०१९

म. ग्रं. सं. ठाणें

विषय चारित्र

संग्रहालय क्रमांक ९३३

लेखक

सन १९५२

पुस्तकाचें नांव छत्रपति संभाजी महाराज

९३३

चारित्र

एके दिवशीं संभाजीरावानें आपल्या सोबत्याजवळ गोष्ट काढली कीं, गडेहो, आतांशा मावळांत वाघ उठले आहेत असें ऐकितों. तिकडे शिकार करायाला जावें असें मनांत येतें. तुमचा मनसोबा कसा आहे, बोला ?

**सोबती**–( एकदम ) आमची ना नाहीं. आमच्याकडूनही तयारी आहे. पण सगळ्यांना पुरण्यापुर्ती बसायाला घोडीं कोठें आहेत ? घोड्यांशिवाय तुमच्या बरोबर तंगड्या तोडीत इतके लांब यावें कोणी ?

**संभाजीराव**–अं:, त्याची काळजी सोडा. तुम्हाला घोड्याबिड्यांची सगळी तरतूद करून देतों. मग तर याल ?

**कान्होजी भांडवलकर**–( एक सोबती ) पण, राव, तरतूदीला पैसा पाहिजेना ? तो कुठें आहे ? सगळीं सोंगें येतात, पण पैशाचें सोंग आणितां येत नाहीं.

**संभाजीराव**–अरे वेड्या, आमच्या खजिन्यांत इतका पैका भरला आहे हा कोणाचा ? तो माझाच आहे. बापाच्या पैशावर माझी सत्ता नाहीं कीं काय ? मी तुम्हाला पैसा काढून देतों. त्याचीं घोडींबिडीं विकत घ्या. आणि मग मजबरोबर शिकारीला चला.

शिवाजीरावाचा खजिना चिरेबंदी होता. त्याचीं दारें मजबूद होतीं आणि त्यालीं दुकांटी तीन कुलपें मारलीं होतीं. ह्या शिवाय त्याजवर रात्रंदिवस विश्वासू मावळ्यांचा खडा पहारा होता. इतक्या बंदोबस्तांतला पैसा संभाजीरावाच्या हातीं लागेल कसा; ह्याचें सर्वांना गूढ वाटलें. त्याचें वय पाहिलें तर त्या वेळेस १६।१७ वर्षांचें पोरवयच होतें; तरी त्याचें धाडस जबरें होतें. एकदां एखादें साहस करण्याचें त्याचे मनांत आलें पुरे. तो एकदम त्याजवर जाऊन उडी घाली. त्याला

अवघड गोष्ट कोणतीच वाटत नसे. त्यानें मग आपल्या सर्व मित्रांस हाक मारून सांगितलें कीं, गडेहो, तुम्ही सर्वजण मजबरोबर आमच्या जामदारखान्याकडे चला. तुम्हाला त्यांतून लागेल तितका पैसा देतों. तेथें ते गेले तों पहाऱ्यावर एक शिपाई उभा होता. त्याला संभाजीराव म्हणाला, "पहारेकरी, मी येथें क्षणभर उभा रहातों. तूं पोतनिसाच्या घरीं जाऊन त्याला जरा इकडे घेऊन ये. फार निकडीचें काम आहे असें सांग." अशा युक्तीनें त्या पहारेवाल्याला त्यानें तेथून काढून लाविलें. इकडे संभाजीरावानें आपल्या दोन्हीं हातांच्या नेटाव्यानें जामदारखान्याच्या खोलीचें एक दार उचलून, जरा वांकडें करून ठेवून, आंत एक हात जाण्यासारखी वाट केली. आणि त्या फटींतून हात घालून, दोन तीन भरलेल्या थैल्या तोंडाशींच होत्या त्या त्यानें आलीकडे ओढून घेतल्या. त्यांत सोन्याच्या कांहीं लगडी व पुतळ्या होत्या. त्या सर्व त्यानें आपल्या सोबत्यांस वांटून दिल्या. मग ते सर्वजण बाजारांत जाऊन त्या सोन्याच्या [illegible] बदला घोडीं वगैरे जें जें सामान शिकारीच्या कामाला प[illegible] होतें तें सर्व ते घेऊन आले.

इकडे शिपाईबावा माघारे जामदारखान्याजवळ येऊन पहातात तों तेथें कोणी शुक् नाहीं. धाकट्या महाराजांनीं आपल्याला दगा दिला अशी त्याची खात्री झाली. शिपाई आपला पहारा सोडून दुसरीकडे गेला म्हणजे त्याचें काय होतें हें त्याला पक्कें माहीत होतें. म्हणून तो बिचारा गर्भगीळ होऊन लागलाच फरारी झाला. पोतनीस मागाहून येऊन पाहूं लागला, तों खजिन्याचें एक दार उखळलेलें, आणि पहाऱ्यावर शिपाई उभा नाहीं. निळोपंत पोतनीस लागलाच चपापला. पण पुढें थोडी पुसतपास करितांच हें कृत्य धाकट्या राव[illegible]

आहे असें त्याला समजलें. त्या स्वारीचे गुण त्याला माहितच होते. ह्यामुळें दुसऱ्या कोणाचा वहीम धरण्याचें त्याला कारणच पडलें नाहीं. मग त्यानें खुद्द संभाजीरावालाच तांत्रिक तांत्रिक विचारिलें. तेव्हां त्यानें ती गोष्ट लागलीच कबूल केली. झालेली गोष्ट दडवून ठेवण्यांत तो नामर्दपणा समजे.

ह्या गोष्टीची वर्दी जात जात शिवाजीरावापर्यंत जाऊन थडकली. कारटा असा द्वाड निघाला म्हणून त्याच्या तळव्याची आग मस्तकास गेली. जेथें असेल तेथून हुडकून काढून आतांच्या आतां संभ्याला माझ्यापुढें घेऊन ये, असें त्यांनें हिरोजी फर्जंद जामदार यास निक्षून सांगितलें. त्याप्रमाणें तो त्यास थोरल्या रावांकडे घेऊन गेला. त्यांच्या मुखचर्येवरून संभाजीरावानें ताडलें कीं, आज वडिलांपुढें आमचें प्रकरण चालू आहे.

**शिवाजीराव**—( मुलगा जवळ आला असें पाहून ) शंभू, तुला
**सं॰** ह्या वेळेस मीं इतक्या निकडीनें कां बोलाविलें, कळलें? ( तो कांहीं जबाब देत नाहीं असें पाहून ) अरे, मूर्खा, हा तुझा बाप धडधडीत जिवंत असतां, त्याच्या देखत असें पाजीपणाचें काम करायाला तुझी छाती तरी कशी झाली? आतां तुला करावें तरी काय? ( कृत्य हातून झालें खरें, बोलून उपयोग काय, म्हणून संभाजी गुपचूप उभा राहिला, पुन्हा शिवाजीराव डोळे फाडून म्हणतो. ) असलें काम करणारा प्रत्यक्ष माझ्या पोटचा असला तरी त्याचा मुलाजा मजकडून व्हावयाचा नाहीं असें माझ्या पदरच्या सर्व लोकांस जाहिर झालें पाहिजे. ह्यासाठीं मी आतां तुला कडक शिक्षा देणार. तूं माझा वडील मुलगा आहेस, तेव्हां माझ्या मागें माझी सारी संपत्ति व सगळें राज्य तुझेंच आहे. पण ह्या कृत्यावरून तूं माझ्या पश्चात् काय दि-

ग्विजय करणार हें आतांच दिसून आलें. आपल्याच घरावर आपण दरोडे घालण्याचे भिकार चाळे आमच्या कुळांमध्यें सात पिढ्यांत कोणीं केले नाहींत. तें काम तूं आरंभिलें आहेस. तेव्हां तुझी मला पुढें धडगत दिसत नाहीं. माझें नांव व माझें राज्य तूं खचित बुडविणार असें मला भविष्य दिसतें.

ह्याप्रमाणें बोलून घोड्याचा चाबूक खुंटीला टांगलेला होता तो शिवाजीरावानें खालीं काढून घेतला. संभाजीची पाठ उघडी केली. हातांत चाबूक घेऊन त्याच्यापासून तो जरा दूर उभा राहिला, आणि त्याच्या उघड्या पाठीवर त्यानें १०।१५ कोर्डे कडाकड ओढिले. पाठीचीं चामडीं निघालीं. रक्ताच्या चिळकंड्या लागल्या. पाठ येथून तेथवर तांबडी लाल झाली. इतकें झालें तरी त्याचा राग शांत झाला कीं काय ? किंवा त्याला त्यानें मोकळें सोडलें कीं काय ? छे, छे, तें कांहीं नाहीं. त्यानें हिरोजी फर्जंद जामदार ह्याला हुकूम केला कीं, याला वाड्यांतल्या एका दूरच्या खोलींत कोंडून ठेव, बाहेरून कुलूप ठोक, आणि त्याची किल्ली मजपाशीं आणून दे. ह्याप्रमाणें बापानें त्याला वाड्यांतल्या वाड्यांत आसनकैदेची शिक्षा दिली.

फटके खाण्यापेक्षां कोंडून राहणें त्याला अति दुःसह झालें. फटक्यांचें काम डोळ्याचें पातें लवतें न लवतें इतक्यांत होऊन गेलें. पण कोंडून ठेविल्यामुळें त्याचे हातपायच जखडल्यासारखे झाले. शिकारीला जाण्याचा बेत होता तो फसला म्हणून त्याला फार वाईट वाटलें. हें कृत्य सगळें जामदाराचें आहे; त्यानेंच मला ही शिक्षा देवविली; बरें आहे; त्याला कधीं तरी पाहून घेईन; असें तो म्हणाला. आणि त्या घटिकेपासून हिरोजी फर्जंदाविषयीं त्याच्या मनांत पूर्ण द्वेषबुद्धि बाणून गेली.

संभाजीची आई सईबाई. तिला ही बातमी लागली. तेव्हां तिनें खोलीची किल्ली आणवून दार उघडून ती त्याच्या समाचारास गेली. तिला पाहतांच तो दांत ओंठ खाऊन म्हणाला, आई, ही माझी पाठ पहा. हें पाठीचें धिरडें तुझ्या जामदारानें करविलें. कांहीं चिंता नाहीं; वर्षाचे ३६० दिवस आहेत; मी खऱ्या बीजाचा असलों तर या बच्चाजीचा सूड घेतल्याशिवाय कधीं रहाणार नाहीं.

**सईबाई**–बाबा संभूराया, ह्यांत हिरोजीची काय चूक आहे बरें? तो सांगितल्या कामाचा चाकर, तुला घेऊन ये म्हणून सांगितलें; नी तो तुला घेऊन गेला. तूं अमक्या तमक्या खोड्या केल्यास असें त्यानें महाराजांपाशीं मुळींच सांगितलें नाहीं. ही बातमी पहिल्यानें त्यांना पोतनिसाकडून कळली. जामदाराची ह्यांत कांहीं चूक नाहीं.

**संभाजीराव**–पण, आई, तूं असें कसें म्हणतेस बरें? जामदारखाना फोडल्याचें प्रकर्ण बाबांपुढें चाललें आहे असें तो मला अगोदर सांगता तर तुला मी लागलेंच मध्यस्थीला घालून बाबांचा राग शांत केला असता; आणि मार खाऊन शिवाय कोंडून घ्यावें लागलें तें तरी वांचलें असतें.

**सईबाई**–बरें, आतां झालें तें झालें. अझूनही मध्यें पडून महाराजांचा राग शांत करितां येईल, तूं काळजी करूं नको.

**संभाजीराव**–झालें तें आतां माघारें कसें फिरतें. आई, हे पाठीचे वण कांहीं दिवसांनीं बुजतील, पण, फटकारे खातांना माझ्या काळजाला जे घरे पडले आहेत ते कसे बुजतील? एक त्याचा किंवा माझा, दोघांतून एकाचा शेवट लागेल त्याच दिवशीं ते बुजतील. तोंपर्यंत ह्या जखमा अशाच वहात रहाणार आहेत.

**सईबाई**—आतां तुझ्याच बऱ्यासाठीं महाराजांनीं तुला मारिलें. म्हणून तूं त्यांच्याशीं सुद्धां असाच दावा धरणार कीं काय?

**संभाजीराव**--बाबांवर मी कशास रागावूं? ते मला पाहिजे ती शिक्षा देण्यास मुक्त्यार आहेत. पण ज्यानें मला त्यांच्याकडून मारविलें, त्याच्याशीं मी जो एकदां दावा धरला तो धरला. आतां खुद्द ब्रह्मदेव खालीं उतरला तरी तो फिरावयाचा नाहीं.

**सईबाई**—भलतेंच एखादें; असें कोणी करावें कीं काय? रागाची वेळ आहे म्हणून आतां तुझ्या ध्यानांत येणार नाहीं. पण, कांहीं वेळानें तुझें तुलाच कळेल कीं, यांत जामदाराची चूक कांहीं नाहीं. मग तुझी चूक तूंच कबूल करशील. असा उतावळा होऊं नको.

मग संभाजीरावाचें तोंड राहिलें. पण रागानें आंतल्या आंत तो फणफणत होता. त्याचें पित्त खवळलें होतें तें खालीं बसलें नाहीं. आठ दिवस झाल्यावर सईबाईच्या मध्यस्थीनें शिवाजीरावानें त्याला खोलींतून बाहेर काढण्याची परवानगी दिली. सुटल्यावर आपल्या पुढें आणवून त्याला त्यानें खरमरीत ताकीद दिली कीं, बघ, पुढें तरी नीट चालीनें चाललास तर तुझें कल्याण आहे. ह्याउपर असाच ब्रात्यपणा केलास आणि माझ्या सांगण्याप्रमाणें न वागलास तर बापानें सांगितलेली गोष्ट मुलानें न ऐकिली म्हणजे त्याचें काय होतें हें तुला दाखवीन. बंधमुक्त झाल्यावर आईला वाईट वाटेल म्हणून जामदाराशीं आपली द्वेषबुद्धि असल्याचें त्यानें बाहेर दिसूं दिलें नाहीं. तरी राखेंत विस्तव पुरून ठेविल्यासारखा त्याच्या पोटांत द्वेषाग्नि एकसारखा धुमसत होता. वरपंकीं तो आपल्या सोबत्यांशीं पहिल्याप्रमाणें बोले, चाले, खेळे; तरी जामदाराचा सूड घेण्यासाठीं तो दुखविलेल्या

**संभाजीराव**–आतां कोणी जर दंड ठोकून पुढें उभा राहिला तर त्याच्याशीं दोन हात करण्याची तुमची मर्जी आहे का, जामदार ?

पल्यो मनात।—माझ्या बरोबरीच्या लोकांमध्यें तर तूर्त मला
वटास न्यावा म्हणून नाहीं. अलीकडे महाराजांनीं फौ-
एकदां सोबत्यांमध्यें गोष्टीव खोगिरभरतीचे नवशिके लोक
स्त्यांची गोष्ट निघाली. गेल्या धुळ मन्याला उभें राहणें मला
पुढें तालिमखान्यांत अमक्या पैलवानानें मला तर मजकडून
कुस्ती मारिली, तींत अमका चीत झाला, अमक्याच्या अ
असे पेंचपांच आहेत, अशी आपआपसांत त्यांची चर्चा चालली. त्या वेळेस तेथें हिरोजी फर्जंद जामदार ह्याचेंही नांव निघालें. तेव्हां त्याचा मुलगा एसाजी म्हणाला कीं, माझ्या बापाच्या अंगांत जसें बळ आहे असें कोणाच्याच अंगांत नाहीं. कुस्तीच्या कामांत त्याच्यासारखा दुसरा कोणीं नाहीं. कित्येक मी मी म्हणणारे पैलवान होते त्यांना सुद्धां त्यानें कैकवेळां सहज चीत करून टाकिलें होतें.

**संभाजीराव**–एसाजी, तुझा बाप असा पटाईत कुस्तिवाज आहे हें मला आजपावेतों माहीत नव्हतें. तो कबूल असला तर माझ्या अंगांतला जोर दाखविण्यास मी तयार आहें. पण १७।१८ वर्षांच्या माझ्यासारख्या लहान पोराशीं झोंबी कशी खेळूं, असें तर तो म्हणणार नाहींना ?

**एसाजी**–आपल्या धन्याच्या छाव्याला, आपल्या अंगांतलें बळ माझा बाप मोठ्या खुषीनें दाखवील. कधीं ना म्हणणार नाहीं.

**संभाजीराव**–आमची जोडी दिसण्यांत विलग तर खरीच. मोठ्या बरोबर लहानाची कुस्ती होणार; तरी चिंता

**सईबाई**—आतां तुझ्याच वन्यासाठीं महाराजांनीं तुला मारिलें. म्हणून तूं त्यांच्याशीं सुद्धां असाच दावा धरणार कीं काय?

**संभाजीराव**--बाबांवर मी कशास रागावूं? ते मला पाहिजे ती शिक्षा देण्यास मुकूत्यार आहेत. पण ज्यानें ... त्याच्या सो-डून मारविलें, त्याच्याशीं मी जो ... काळीं जोरवान लोकांत धरला. आतां खुद्द ... वर्चीच्या कामांतही प्रवीण फिरावयाचा नाहीं. चाहून शिवाजीरावानें त्याला जा-

**सईबाई**—भलतेंच ... आपल्या सन्निध ठेविलें होतें. आमचे ...जीराव अशा अट्टल तालिमबाजाची बरोबरी करूं पहा-तात, तर त्याच्या सपाट्यांत सांपडून एकदां ह्यांची बरीचशी कणीक मऊ होईल तर बरें, असें सर्वांच्या मनांत आलें.

पुढें एक दोन दिवसांनीं जामदाराची गांठ पडली. तेव्हां संभाजीरावानें त्याचा मुजरा घेऊन त्याला हांसत हांसत पुसलें.—

**संभाजीराव**—अहो जामदार, काल तुमचा एसाजी मला सां-गत होता कीं, तुम्ही आमच्या राज्यांत नामांकित पैलवान असून तुमच्या अंगांत पांचपेंच पुष्कळ भरले आहेत. तुमच्या पीळदार दंडांना आणि तुमच्या आंगच्या जोराला भिऊन, तुमच्या पुढें दंड ठोकून उभें रहाण्यास कोणाची-ही छाती होत नाहीं. हें खरें का?

**हिरोजी फर्जंद**—आमच्या महाराजांच्या पायांच्या पुण्यप्रता-पानें माझ्या मुलानें जें सांगितलें तें खरें आहे. महाराजांच्या पदरीं हजारों स्वार व शिपाई आहेत. त्यांत बळाविषयीं जे नावाजलेले त्यांना पुष्कळ वेळां मी चीत केलें आहे. आणि देवाच्या दयेनें तसा प्रसंग आणखी येईल तर आज-ही तोच दम अंगांत शाबूद आहे. उद्यांचें मला सांग-वत नाहीं.

संभाजीराव—आतां कोणी जर दंड ठोकून पुढें उभा राहिला तर त्याच्याशीं दोन हात करण्याची तुमची मर्जी आहे का, जामदार ?

हिरोजी फर्जंद—माझ्या बरोबरीच्या लोकांमध्यें तर तूर्त मला कोणी जोडीदार दिसत नाहीं. अलीकडे महाराजांनीं फौजेंत कांहीं अलबत्ते गलबत्ते खोगिरभरतीचे नवशिके लोक भरले आहेत. त्यांच्याशीं सामन्याला उभें राहणें मला शोभत नाहीं. जोडीदार बरोबरीचा असला तर मजकडून तयारी आहे.

संभाजीराव—तुमच्या बरोबरीचाच एकादा जोडीदार तुम्हाला भेटला तर तुम्ही कुस्ती करणार हें तर खरें आहे ना ? त्याजबद्दल फिकीर नाहीं. आतां दडवून कशाला ठेवूं ? माझेंच आंगबळ तुमच्या आंगबळाशीं करून पहाण्याचा माझा इरादा आहे. कशी मर्जी आहे, बोला ? आतां मागें सराल तर खबरदार.

हिरोजी फर्जंद—असा जोडीदार सरदार मिळाल्यावर मग काय पाहिजे ? पण हात जोडून सांगणें इतकेंच आहे कीं, हें कुस्तीचें धक्काबुकीचें काम आहे. हा पोरांचा चेंडूफळीचा डाव नव्हे, कीं बायकांचा चुलीपुढचा खेळ नव्हे. ही एक लहानशी लढाई आहे. हींत क्षणभर दोन धक्के दिले पाहिजेत, आणि दोन धक्के घेतले पाहिजेत. ह्या झटापटींत कदाचित् हातपाय तुटण्याचाही संभव आहे. आपण श्रीमंताचें मूल. वेळ आहे. कदाचित् तसा कांहीं प्रकार घडला तर कोणी कोणावर चिरडीला मात्र जाऊं नये. एवढें मागणें आहे. तें देत असलां तर मजकडून तयारी आहे.

**संभाजीराव**–तें मला सगळें समजतें. दंड ठोकून जो पुढें उभा रहातो, तो त्याचा अगोदरच विचार करीत असतो. पण जामदार, एवढें मात्र लक्षांत ठेवा कीं, हा संभाजी तुम्हाला लहान बाळ दिसतो, तरी ह्याच बाळानें एकदां तुमच्या जामदारखान्याचें एक दार सहज उचलून पलीकडे ठेविलें होतें. त्याच्याशीं हा प्रसंग आहे.

इतकें बोलणें झाल्यावर दुसऱ्या दिवशींच राजवाड्यांत पुढच्या चौकांत शिवाजीरावाच्या समक्ष या दोघांची कुस्ती व्हावी असें ठरलें. चौकांत बारीक रेती पसरून तालिमखाना तयार केला. त्या दिवशीं मौज पहाण्यास पुष्कळ लोकांची गर्दी झाली. कुस्तीच्या वेळेस दोघांनीं अंगावरचीं वस्त्रें एका बाजूस काढून ठेवून, चड्ड्या चढवून, अंगाला तांबडी माती चोळून, ते कुस्तीच्या जागीं येऊन उभे राहिले. एका बाजूला, उंच, बळकट, अंगानें रोडका, चाळिशीच्या घराला पोहोंच-लेला आणि तालिमबाजींत फार वर्षें घस्मटलेला, असा हिरोजी दंड ठोकीत उभा राहिला. दुसऱ्या बाजूला, नुकती मिश्रू फुटलेला, ठेंगणा, बाटोळ्या अंगाचा आणि भर उमरींत मुसमुसणारा, असा संभाजीराव त्याच्या सामन्यास उभा राहिला. कसरतीनें त्याचे दोर्दंड पीळ भरल्यासारखे फिरून गेले होते. पहिले पवित्रे झाल्यावर पहिल्याच सपाट्याला जामदारानें संभाजीरावाचे खवाटे धरून त्याला वरच्यावर उचलून धरिलें; आणि त्याला तो खालीं जमिनीवर आतां आदळणार इतक्यांत संभाजीरावानें आपलें आंग सांवरून आपली तंगडी मोठ्या शिताफीनें हिरोजीच्या गुडघ्याच्या मागच्या बाजूनें पुढें आणून एक मोठा हिसडा दिला. त्याबरोबर हिरोजी भुईकडे तोंड करून पालथा पडला. त्याच्या अंगावर

मोठ्या जोरानें पडला. हा चमत्कार पाहून पाहणारे लोकांस फार आश्चर्य वाटलें. पण ही कुस्ती कुस्तीच्या रिवाजावर-हुकूम झाली नाहीं, असें कित्येकांचें ह्मणणें पडलें; म्हणून पुन्हां दोघांनीं कुस्ती धरावी असें ठरलें. ही दुसऱ्या वेळची कुस्ती तर फारच लौकर निकालास लागली. प्रथम नमनादाखल दोघांचे थोडे पवित्रे झाले. मग थोडी धरसोड झाली. नंतर संभाजीरावानें हिरोजीच्या कंवरेचा कांचा एकाएकीं गच्च आंवळून धरिला व सगळा जोर देऊन त्याला थोडें वर उचलल्यासारखें केलें. आणि त्याच्या उरांत जोरानें एक मुष्टिप्रहार केला. त्याबरोबर तो उताणा पडून भडाभड रक्त ओकला आणि त्याबरोबर त्याला जी एकदां मूर्छा आली, तींतून तो शुद्धीवर आला नाहीं. लोक जामदाराजवळ येऊन पाहूं लागले तों त्याचा प्राण निघून गेलेला होता. मानेचा कांटाच मोडून गेला. या लहानशा गोष्टीपासून पुढें कित्येक कृष्णकारस्थानें कशीं कशीं घडत गेलीं; तें क्रमाक्रमानें पुढें पाहण्यांत येईलच.

---

## भाग २.

"नास्ति कामसमो व्याधिः"*

सगळ्या पुणें प्रांतांत, किंबहुना सगळ्या महाराष्ट्रांत जामदाराच्या मृत्यूच्या गोष्टी महिना पंधरा दिवस जेथें तेथें चालत होत्या. ज्याला त्याला वाटे कीं हें असें झालें कसें? १७ वर्षांच्या पोरानें एवढ्या नावाजलेल्या पैलवानाबरोबर कुस्ती धरली कशी? आणि कुस्तींत पडण्याबरोबर त्याचा सामनेवाला एकाएकीं मेला कसा? असा लोकांना मोठा अचंबा वाटला. त्या दिवसापासून संभाजीरावाच्या अंगसामर्थ्याची जिकडे तिकडे

* कटिशूळासारखा दुसरा रोग नाहीं.

वाहवा झाली. पण जामदार मेला त्या घटिकेपासून, माझा बाप संभाजीनें मुद्दाम मारिला असा त्याचा पुत्र एसाजी ह्याच्या मनांत पक्का वहीम येऊन चुकला. त्याच्या मनांत राजपुत्राविषयीं द्वेषबुद्धि उत्पन्न झाली. ती त्यानें कधीं बोलून किंवा कृतीनें बाहेर दाखविली नाहीं. आंतल्या आंत त्याचा द्वेषाग्नि धुमसत होता. राजपुत्राच्या अंगबळाची लोक तारीफ करीत तेव्हां ती मुकाट्यानें ऐकून घेऊन, त्यांच्या सारख्याच तो माना डोलवी. पण मनांत अतिशय चरफडे. ह्याचा मी कधीं सूड घेईन असें त्याला झालें होतें.

संभाजीरावाची व त्याची गट्टी असे. त्याच्यावर त्याचा भरंवसाही पूर्ण असे. ह्याशिवाय संभाजीराव मूळचा मोकळ्या मनाचा आणि निष्कपटी असे, ह्यामुळें एसाजीच्या मनांत बापाच्या मरणाच्या कारणानें कांहीं कुडा भाव असेल असें त्याला वाटलें नाहीं. एसाजी फर्जंद मनांतल्या मनांत नेहमीं जळत होता, तरी बाहेर कधीं राजपुत्रावर रागावला नाहीं, किंवा त्यानें आपली द्वेषबुद्धि लवलेश दर्शविली नाहीं.

संभाजीराव जसजसा मोठा होत चालला, तसतसा तो आसपासचे जहागिरदार व सरंजामी ह्यांस काळासारखा वाटूं लागला. आपल्या बापाची फौज घेऊन त्यांच्या मुलूखांत तो वरचेवर स्वाऱ्या करूं लागला. त्यांत त्यांची फत्ते झाली म्हणजे एसाजीच्या मनाला अतिशय विषाद वाटे. हा कोठें तरी शत्रूकडून मारला जावा अशी तो वाट पहात होता. त्याचे [illegible] शी या नांवाची एक धाकटी बहीण होती. ती ऐन १[illegible] वर्षांच्या तारुण्याच्या भरांत आली होती. तिच्याही म[illegible]नांत त्यानें बिंबवून दिलें होतें कीं, राजपुत्रानें आपल्या बापाला [illegible] स्तीच्या वेळेस मुद्दाम चुरसीनें मारिलें. तिच्याही पोटांत म[illegible]

त्याजविषयीं तिरस्कारबुद्धि उत्पन्न झाली. ती स्वरूपानें साधारणच होती, तरी ती नखरेबाज, कुर्रेबाज, चतुर आणि खुनशी स्वभावाची होती. ती दोन तीन वर्षें नाहात होती. तिची आई तिच्या पांचव्या वर्षीं मेली. आईनें मरतांना हिरोजी (नवऱ्या) कडून वचन घेतलें होतें कीं, "मी पुन्हां लग्न करणार नाहीं आणि दोघां मुलांचा चांगला प्रतिपाळ करीन." ह्या कारणानें हीं दोन्हीं मुलें जामदाराला जीव कीं प्राण होतीं. तुळशी लग्नाला उपवर होत चालली, तेव्हां हिरोजीच्या उरावर ही एक कट्यार ठेवल्यासारखी झाली. तिला पुष्कळ लोकांनीं मागण्या घातल्या, पण त्यांतून कबूल करण्यासारखें एकही स्थळ त्याला दिसेना. आपल्या बरोबरीचें वतनदार घराणें असावें, अन्नवस्त्राची ददात नसावी, मुलीच्या अंगावर दागदागिना पुष्कळ असावा, घरीं नोकरचाकर असावे, मुलगा अल्पवयी, शहाणा, सुरता आणि मुलीच्या हौसेजोगा असावा, सासू गरीब असावी, अशा अनेक सोई त्याला पाहिजे होत्या. त्या सर्व एका ठिकाणीं कशा सांपडतील? सारांश, अनेक अडचणींमुळें जामदाराला तिचें लग्न लांबणीवर टाकावें लागलें. शेवटीं तानाजीराव शिर्के ह्मणून एक घराणदार मराठा होता त्याचा मुलगा दौलतराव वीस वर्षांचा होता; तो मुलगा हिरोजीच्या बराच मनास येऊन त्याची मागणी त्यानें कबूल केली. पुढें दौलतरावाच्या व तिच्या एकांतीं गांठी पडल्या. दोघांची एकमेकांवर प्रीति असल्याचें हिरोजीला दिसून आलें. तिचा व त्याचा गांधर्वविवाह होऊन चुकला. फक्त दोघांचें लौकिक रीतीचें लग्न लागावयाचें राहिलें होतें. मध्यंतरीं तुळशीबाईचा बाप मेला; त्यामुळें विधिपूर्वक लग्न लागलें नव्हतें.

मुली लहानपणीं खूपसुरत नसल्या तरी त्या वयांत आल्या

ह्मणजे चांगल्या दिसूं लागतात. तुळशी मूळची निमगोरी होती, तरी तिच्या तारुण्यविकासांत ती सुंदर दिसूं लागली. बापाच्या मागें घरांत कोणी वडील माणूस नव्हतें, ह्यामुळें ती जरा स्वच्छंदानें वागूं लागली. त्या घरीं संभाजीरावाचें वरचेवर जाणें येणें असे. तो आला ह्मणजे नेहमींप्रमाणें एसाजी व त्याची वहीण हीं त्याची वरकांती शुश्रूषा ठेवीत. बोलण्याचालण्यांत कधीं पोटांतलें किल्मिष त्याला त्यांनीं दिसूं दिलें नाहीं. पण भावानें तिच्या मनांत बापाविषयीं द्वेषभाव बिंबवून दिल्यापासून राजपुत्राचा सूड घेण्यासाठीं तिचेंही मन फार उतावीळ झालें होतें.

संभाजीरावाची एसाजीबरोबर पुष्कळ सलगी होती, तरी तुळशीबरोबर त्याचें फारसें संघट्टण नसे. भाषणही कामापुरतें जितक्यास तितकेंच असे. पण तिचा यौवनभर पाहून त्याला तिच्याविषयीं कामवासना उत्पन्न झाली. तिच्याशीं तो अधिक लगट करूं लागला. तिच्यावर त्याचें पुरें मन बसलें. कांहीं तरी कारण काढून वरचेवर तो तिच्या घरीं घिरट्या घालूं लागला. पुढें त्यानें तिला एकदा उघड पुसलें सुद्धां; पण तिनें तें ऐकल्या न ऐकल्यासारखें केलें. तिची खात्री झाली कीं ह्याचा मजवर पुरा डोळा आहे; यासाठीं याला असाच लाळ घोंटीत ठेविला तर माझ्या बापाला मारल्याबद्दल मनांत द्वेष आहे तो एखादे वेळेस उगवून घेतां येईल. असा विचार करून तिनें त्याला झिडकारून टाकिलें नाहीं. प्रथम त्याचें भाषण व कृति पाहून ती लाजल्यासारखें करी. पुढें तो कांहीं बोलला तरी त्याचें भाषण चित्त देऊन ऐके. केव्हां केव्हां त्याजकडे पाहून खुसकर गालांतल्या गालांत हांसे. मग तो जों जों हिची ज्यास्ती ज्यास्ती विनवणी करूं लागला तों तों हिनेंही आपल्या मनाची चलबिचल

होत चालली आहे असें दर्शविलें. आतां ही मजवर खरी फिदा होऊन माझ्या तोंडाकडे सकामबुद्धीनें पाहूं लागली आहे असे तो मनांत मांडे खाऊं लागला. आपली इच्छा तृप्त होण्याचा समय जवळ येत चालला आहे; आतां उद्योगांत कसर कामाची नाहीं; असा विचार करून तो तिचें अधिकाधिक आर्जव करूं लागला. फार काय सांगावें ? हा कामांध तिच्या पायां पडण्याच्या सुद्धां बेतांत आला. तीही आपल्या प्रेमाचें कपटजाल त्याच्यावर ज्यास्ती ज्यास्ती पसरीत चालली. आपलें लज्जावसन एकीकडे ठेवून ती त्याच्याबरोबर अगदीं दिगंबर मनानें बोलूं लागली; तेव्हां त्याच्या तोंडाला अधिकच पाणी सुटलें. आतां माझा मनोरथ लौकरच परिपूर्ण होईल असें त्याला वाटलें. पण तिचे दाखवायाचे दांत वेगळे व खाण्याचे वेगळे, हें त्याला कळलें नाहीं. त्याच्या कामवासनेला ती एकसारखी उत्तेजनच देत गेली. तरी तिनें त्याला साक्षात् अंगस्पर्श कधीं करूं दिला नाहीं. हे राव जागच्याजागींच लाळ घोंटीत राहिले.

‘ वाचकहो—स्त्रिया स्वभावतः भित्र्या व अशक्त खऱ्या, तथापि प्रसंगोपात्त त्यांच्या अंगीं केवढें धारिष्ट, किती स्फुरण, आणि कशी समयसूचकता असते हें वरच्या प्रकारावरून तुमच्या ध्यानांत येऊन चुकलेंच असेल. तेव्हां त्यांच्या ‘ अबला ’ या विशेषणाला हरताळ लावावा कीं, प्रसंगविशेषीं त्यांचें अबलत्व जाऊन त्यांना सबलत्व येतें असें ह्मणावें ? यौवन, सौंदर्य, चातुर्य, मधुर भाषण आणि स्वभावकापट्य ह्या शस्त्रांचा त्यांनीं कामांध पुरुषावर एकदम मारा सुरू केला ह्मणजे तो बिचारा निःशस्त्रवीराप्रमाणें अगदीं भांभावून जाऊन त्याला कांहीं सुचेनासें होतें. प्रेमलेनें अर्जुनाला ह्मटलें आहे कीं,

"आह्मांसि अबला ह्मणती सर्व लोक।
परी ते विचारितां सर्व मूर्ख।
दृष्टिमात्रें जिंकिले ब्रह्मादिक।
त्या अबला कीं सबला॥
अधरामृताची वाटी।
बळेंची लावोनि वोठीं।
मोह्योनी सोडिल्या वीरकोटी।
तेथें तूं किरिटी केवढा॥"

'श्रीधर.'

मृच्छकटिक नाटकांतही ह्मटलें आहे कीं,

"स्त्रियो हि नाम खल्वेता निसर्गादेव पंडिताः।
पुरुषाणां तु पांडित्यं शास्त्रैरेवोपदिश्यते॥"

ह्मणजे पुरुष शिकून पंडित होतात आणि बायका उपजतच पंडित असतात. या ह्मणण्याची सत्यता पुष्कळ वेळां दिसून येते. असो.

आपल्या दुस्मानाचा सूड उगविण्याचें काम बहिणीनें चांगलें मनावर धरिलें आहे असें पाहून एसाजीला मोठी खुषी झाली. आमचा बाप कुस्तीच्या धक्काबुक्कीमध्यें सहज वर्मी लागून मेला, त्याला संभाजीरावानें मुद्दाम मारिलें नाहीं, असा त्या बहीणभावंडांचा पक्का समज असेल असें संभाजीरावाला वाटत होतें. मजबद्दल त्यांच्या मनांत काडीइतका सुद्धां वहीम असण्याचा संभव नाहीं, मग ते माझा द्वेष उगीच्या उगीच कशाला करतील, अशीं तो खुषींतल्या खुषींत गाजरें खात होता. तुळशीबाई त्याच्यावर वरवर अतिशय प्रेम दाखवी; ह्यामुळें त्याच्या

समजुतीला अधिकच बळकटी आली होती. त्या दोघांवर त्याचा अतोनात भरंवसा होता. ह्याच्या दिलांतल्या अंतस्थ गोष्टी असत त्या सर्व त्यांना माहित असावयाच्या. तो प्रियसखा आणि ती प्राणसखी सांगेल तें प्रमाण, ह्याप्रमाणें त्याची स्थिति झाली होती.

संभाजीरावाला कामवासना अनावर होऊन तो तिच्याशीं अतिशय लगट करूं लागला. तेव्हां त्यानें हातझोंबीला येऊं नये ह्मणून तुळशीबाईला अनेक युक्ति योजाव्या लागल्या. "मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदि हालाहलं विषं" हा बेत तिनें त्याच्याशीं टेविला. आजचा दिवस जाऊंद्या; उद्यां खचीत आपला मनोरथ पूर्ण करीन; असे गोड गोड शब्द बोलून एकदां टाळाटाळी करावी. पुन्हां दुसरा दिवस उजाडला ह्मणजे दुसरी कांहीं शकल काढून पार पडावें. अशी तिनें कांहीं दिवस घुलकावणी चालविली. शेवटीं इतक्या थराला गोष्ट येऊन पोहोंचली कीं ही जर त्याला वश न झाली तर तो तिच्यावर बलात्कार केल्याशिवाय रहाणार नाहीं. ह्मणून कोणत्या तरी युक्तीनें त्याला दूर नेऊन दुसऱ्या एकाद्या कामांत त्याचें मन गुंतवावें अशी त्या दोघांची मसलत ठरली.

तुळशीला मोहित होऊन संभाजीराव जरी इतका लंपट झाला होता तरी विषयोपभोगापेक्षां त्याच्या मनाचा मूळचा ओढा शिकारीकडे अधिक आहे असें एसाजीला माहित होतें; ह्मणून तो त्याला ह्मणाला, "महाराज, एकाच ठिकाणीं राहून आतां कंटाळा आला आहे. कांहीं दिवस थारेपालट केला पाहिजे. जंगलांत आलीकडे सावजें फार उठलीं आहेत अशी व्रातमी कळते. हे दिवस शिकार करण्याला फार चांगले आहेत. ह्यासाटीं आपण कांहीं दिवस रायगडच्या जंगलांत फिरून येऊं." ही गोष्ट त्याला लागलीच मानवली. आणि कांहीं

सोबती बरोबर घेऊन तो रायगडाकडे निघाला. तिकडे एखाद्या अजस्त्र वाघाशीं गांठ पडून संभाजीरावाची इतिश्री झाली तर एक पंथ दो काज होतील. ह्मणजे त्याला जिवें मारण्याचा हेतु होता तो सिद्धीस जाऊन तुळशीच्या मागें लचांड लागलें होतें तेंही सुटेल असें त्याला वाटलें.

जंगलांत शिरल्यावर संभाजीरावानें खुद्द एकट्यानेंच पुष्कळ हिंस्त्र जनावरें मारिलीं. अशी दररोज शिकार करीत फिरत असतां एके दिवशीं शिकारी लोकांनीं अशी खबर आणिली कीं, येथून जवळच एक पटाईत वाघ उठला आहे. त्याच्या जाळीच्या आसपास गेलेल्या कैक मनुष्यांचे त्यानें बळी घेतले. त्याच्या भीतीनें तिकडे सध्या कोणीही फिरकेनासें झालें आहे. ही खबर ऐकून त्याला अति हर्ष झाला. ज्या वाघानें इतका प्रलय मांडला आहे त्याचा समाचार अलबत अगोदर घेतला पाहिजे. असें ह्मणून तो लागलाच उठला आणि त्या पठ्याच्या जाळीपुढें जाऊन उभा राहिला. पण तो त्या वेळेस आपल्या जाळींत नव्हता. तेथून पलीकडे कांहीं अंतरावर बरीच दाट झाडी होती तींत तो शिरला होता. मनुष्यांची चाऊल ऐकून त्या वाघानें एक मोठी गुरकी फोडली, आणि त्यांच्या अंगावर तो धांवून आला. इकडे राजपुत्र तयारच होता. त्यानें लागलेंच शरसंधान बांधून, आकर्ण धनुष्य ओढून, एक खरमरीत तीर वाघाच्या आंगावर सोडिला. तो सूं सूं करीत निघाला आणि नेमका त्याच्या आ पसरलेल्या जबड्यांत जाऊन रुपला. मर्मस्थानीं जखम लागण्याबरोबर तो प्रथम भडाभड रक्त ओकला. आणि लागलाच तेथच्या तेथें मरून पडला.

त्याच्या तिराचा असा जोर पाहून बरोबरच्या सोबत्यांस

मोठें आश्चर्य वाटलें. सर्वांनीं वाघाच्या जवळ जाऊन तीर कोठें कसा लागला हें तपासलें. तेव्हां त्यांनीं संभाजीरावाची भारी वाहवा केली. असा ह्याचा जयजयकार पाहून एसाजीच्या अंगाचा तिळपापड झाला. बरोबरच्या मंडळींत एसाजीनें दौलतराव शिरकाही घेतला होता. त्यानें तुळशीबाईला मागणी घातल्याचें वर्तमान पूर्वीं आह्मी सांगितलेंच आहे. त्याचें व तिचें मागेंच मन मिळालें होतें. त्याच्याशींच आपलें लग्न व्हावें अशी तिची पूर्ण इच्छा होती. आणि तोही तिच्यावर अषक होता. माझ्या प्रिय भार्येवर राजपुत्राचा डोळा असून ती वश होण्यासाठीं त्याचे प्रयत्न चालले आहेत असें त्याला कळलें होतें. एकाच स्त्रीवर दोघांची नजर असली ह्मणजे ते दोघे एकमेकांचे सहज वैरी होतात. जमलें तर तें वैर इकडे साधून घ्यावें अशा उद्देशानें दौलतराव शिकारीच्या निमित्तानें बरोबर आला होता. राजपुत्राला कोठेंतरी अडचणींत गांठून ठार मारावें आणि उभयतांचा हा हाडवैरी नाहींसा करावा असा त्याचा हेतु होता. हा त्याचा हेतु फक्त एसाजीला माहित होता. दौलतराव मोठा हट्टी, खुनशी आणि बेपर्वा मुलगा आहे असेंही त्याला ठाऊक होतें. इकडे राजपुत्र सर्वांशीं पूर्ण विश्वास ठेवून वागत होता. त्याच्या मनांत कोणाविषयीं किंतु नव्हता. त्या दोघांच्या मनांतलें कृत्रिम त्याच्या नजरेस कधीं आलें नाहीं. हा समय त्याला जिवें मारण्यास ठीक आहे असें एसाजीला वाटलें. मग त्यानें शिरक्याला एकीकडे नेऊन सल्ला दिली कीं, "उद्यां संभाजी शिकारीला गेला ह्मणजे तो एकटाच आहे अशी पाळत राखून तूं त्याला ठार मारून टाक." त्यानें ती गोष्ट कबूल केली.

हल्ला दुसऱ्या दिवशीं सकाळीं राजपुत्राला शिकार रगड सांपडली. त्यानें सावजें पुष्कळ मारून आणिलीं. शिकार करून

दोनप्रहरच्या सुमारास परत फिरला, तेव्हां तो अतिशय श्रमून गेला होता. ऊन, तहान आणि भूक ह्यांनीं तो व्याकुल झाला होता. पुढें एक लहानसा वहाता ओढा लागला. त्याच्या कांठीं घोडा उभा करून, खालीं उतरून, लगाम जोत्याजी केसकराच्या हातीं देऊन, तो एका झाडाच्या शीतळ छायेखालीं बसून आंघोळ करूं लागला. ओढ्याच्या दुथडीला खडकाळ व उंच सखल जमीन फार होती. तेथून वांकडा तिकडा घोडा चालवीत दौलतराव शिरका, जेथें राजपुत्र उतरला होता तिकडे, घाईनें येत होता. त्याचा रोंख आणि मुद्रा पाहून, पलीकडे कांहीं अंतरावर दुसरे राजपुत्राचे सोबती होते ते ओरडून म्हणाले, संभाजीराव, संभाजीराव, सावध असा. तो तुम्हांकडे कोण येत आहे पहा. हे शब्द कानीं पडतांच संभाजीराव चपापून आंघोळ करतां करतांच उभा राहिला आणि वर डोकें करून पाहूं लागला तों दौलतराव शिरका त्याच्या दृष्टीस पडला. त्यानें घोडा जलदीनें चालविला होता, हातांतली नंगी तलवार उभी धरली होती, आणि मोठ्या आवेशानें भिवया चढवून येत होता, त्याचा सगळा रोंख मजकडे आहे अशी संभाजीरावाची खात्री झाली. मग लगेच रिकबीला पाय देऊन तो आपल्या घोड्यावर स्वार झाला. जोत्याजीला त्यानें सांगितलें कीं, तूं मागेंच रहा. पण त्या इमानी चाकराला आपल्या धन्याला टाकून मागें रहावेना. त्यानें आपल्या घोड्याला टांच देऊन तो अगोदरच दौलतरावाच्या अंगावर सोडिला. पण ओढ्याच्या कांठची जागा साफ नसून समविषम होती. तेथून चालतांना त्याचा घोडा अडखळून खालीं पडला. या-प्रमाणें नाइलाज होऊन जोत्याजीला आपल्या धन्याच्या रहावें लागलें. इकडे दौलतराव नजीक येऊन भिड- त्यांस

ठाणे.

भाजीराव घोड्यावर चढून तयारच होता. त्यांनें आपल्या घोड्याला टांच देऊन तो एका बाजूनें काढ[illegible] तों दौलतरावानें त्याला गांठून त्याच्या डोक्यावर एक वार केला. त्या समयीं संभाजीराव जरा गाफिल होता. यामुळें तलवारीचा वार त्याच्या पागोट्यावर बसला. पागोटें घट्ट बांधलें होतें व वरून बारिक पिळांचे पेंच होते. ह्यामुळें वार फार खोल गेला नाहीं. कांहीं पीळ कापले गेले आणि पागोटें जरा एका बाजूला सरकलें. तशा प्रसंगीं दौलतराव शिरका पुन्हां दुसरा हात मारता तर मात्र संभाजीरावाची कठीण अवस्था होती. पण तितक्यांतल्या तितक्यांत पागोटें नीट बसवून, मांड सांवरून आणि घोडा फिरवून त्यानें दौलतरावाच्या खांद्यावर एक सफैदार वार केला. तो वार जानव्यासारखा तिरपा लागून दौलतराव घोड्यावरून खालीं पडला, आणि बेशुद्ध होऊन मरण पावला. मग संभाजीराव व जोत्याजी आपल्या सोबत्यांत येऊन मिळाले. जे खरे मित्र होते ते आपल्या सोबत्यावरचें हें मोठें अरिष्ट टळलें म्हणून त्याला आनंदानें कडकडून भेटले. इकडे एसाजीला त्या वेळेस मनांतून अतिशय संताप झाला. तरी बाहेरून त्यानें मी फार खूष झालों असें दर्शविलें. दौलतराव शिरक्याचा असा अंत झाल्यामुळें एसाजी फर्जंदाचा द्वेष कमी न होतां उलटा तो दुणावला. त्याला राजपुत्राच्या सूडाची एकपट इच्छा होती ती दुप्पट झाली.

इकडे तुळशीबाईकडे काय वृत्तांत झाला तो ऐका. ज्यानें तिला मागणी घातली होती आणि ज्याच्यावर तिचें अकृत्रिम प्रेम होतें तो तिचा प्राणवल्लभ राजपुत्राच्या हातून मारला गेला असें तिला कळलें तेव्हां तिला जें दुःख जाहलें तें सांगतां पुरवत नाहीं. ज्यानें माझा प्रिय बाप मारला त्यानेंच मा-

प्राणवल्लभही मारून टाकला; काय चिंता आहे? ह्या चांडाळाचा मी सूड घेईन तरच हिरोजी फर्जंदाची मुलगी खरी; असा तिनें पण केला. पोटांत दुःखाचा भडका झाला होता तो तसाच गिळून पुढें याला युक्ति काय करावी ह्याचा ती विचार करीत स्तब्ध बसली. ह्या चांडाळाच्या उरांत साखरेची सुरी भोंसकून कैंसानेंच मान कापिली पाहिजे असा तिचा निश्चय झाला.

वाचकहो—कांहीं स्त्रिया किती कावेबाज, धीट आणि खोल मनाच्या असतात तें पहा! पुरुष किती जरी धूर्त व चतुर असला तरी त्यांचें खरें स्वरूप ओळखतांना त्याची अक्कल गुंग होऊन जाते. त्यांचें बाहेरून प्रेम असतें एकावर, परंतु त्या प्रेमाचें खरें स्थान असतें दुसरेंच. त्या एकाबरोबर गोड बोलतील, मनांत प्रेम असेल दुसऱ्याविषयीं, आणि पाहतील तिसऱ्याकडे. असे एका रंगांत त्या चार रंग दाखवितात. अशा स्त्रियांचें अधरोष्ठचुंबन स्त्रीलंपटाला अमृतपानासमान वाटतें. परंतु इकडे त्यांना त्याचें चुंबन विषपानासमान असतें. पण कसें झालें तरी तें कपटजाल. तें आंतल्या आंत किती दिवस छपून राहील? त्यांची ती लप्पं छप्पं कधीं तरी उजेडांत आल्याखेरीज रहात नाहीं. आणि शेवटीं तसेंच घडून येतें. पण एवढें बरें आहे कीं अशा स्त्रियांची संख्या थोडी आढळते. नाहीं तर अनर्थ होता. असो.

पुढें योगायोग असा आला कीं संभाजीरावाला ह्या दोन्हीं दुस्मानांच्या समागमापासून कांहीं दिवस आपोआप दूर रहावें लागलें. कोंकणांत पोर्तुगीज व जंजिऱ्याचा शिद्दी ह्यांनीं शिवाजीरावाच्या राज्याच्या सरहद्दीवर मोठी धामधूम चालविली. त्यांनीं त्याच्या राज्यांतले कांहीं किल्ले सर केले. हिंदु लोकांस धरून त्यांच्यावर जुलूम जबरदस्ती करूं लागले. हिंदूंचीं

रहावें

कांहीं देवालयें पाडून टाकिलीं; त्यांतील देवांच्या मूर्ति फोडून टाकिल्या; आणि कांहीं लोकांच्या बायका धरून नेल्या. अशा भयंकर रीतीच्या बातम्यांवर बातम्या येऊं लागल्या. त्या वेळेस शिवाजीरावाची प्रकृति नीट नव्हती, ह्मणून शत्रूचें पारिपत्य करून बंदोबस्त करून येण्यासाठीं त्या कामगिरीवर त्यानें आपल्या पुत्राची योजना केली. त्याप्रमाणें बरोबर मोठी फौज घेऊन संभाजीराव कोंकणच्या स्वारीवर गेला. ह्यामुळें इकडे एसाजी व त्याची वहीण ह्यांचा सूड घेण्याचा बेत लांबणीवर पडला; तरी तो त्यांनीं समूळ सोडून दिला असें नाहीं.

आतां सृष्टींतील अद्भुत चमत्कारदर्शनाचे व वीररसाचे भोक्ते असतील त्यांनीं पुढें वाढलेल्या पानावर लागलेंच बसावें; आणि इतरांनीं दुसरें वाढप येईपर्यंत जरा विसांवा खावा अशी प्रार्थना आहे.

---

# भाग ३.

“अनन्यगामिनी पुंसां कीर्तिरेका पतिव्रता.”

प्रथम जंजिऱ्याच्या शिद्दीवर राजपुत्रानें आपल्या ढाला फिरविल्या. त्याच्या राज्यांत फितूर करण्यासाठीं खंडूजी ह्मणून एक त्याचा मर्जीतला हुजऱ्या होता त्याला त्यानें पुढें पाठविलें. तिकडे त्यानें शिद्दीच्या दारूखान्याला आग लावून द्यावी आणि इकडून आपण किल्ल्यावर हल्ला करावा, असें त्यानें योजिलें होतें. स्वार, पायदळ, मिळून त्याची एकंदर बारा, चवदा हजार फौज होती. फौजेवरचा मुख्य अधिकार त्यानें दादाजी रघुनाथ देशपांडे ह्यांस दिला. त्याला संभाजीरावानें वचन दिलें कीं, मोठ्या स्वारींत मर्दुमकी करून जय मिळवून येशील तर तुला त्या प्रधानांपैकीं एका प्रधानाचीं महाराजांकडून वस्त्रें देववीन.

इकडे खंडूजी कांहीं लोक बरोबर घेऊन गुप्त वेषानें किल्ल्यांत शिरला; आणि त्यानें तेथें कांहीं ढवळाढवळ चालविली. ही बातमी शिद्द्याला कळून त्यानें त्याचा व त्याच्या सोबत्यांचा शिरच्छेद केला. इतक्यांत संभाजीराव दंडाराजपुरीपर्यंत जाऊन पोहोंचला. दादाजी रघुनाथ मोठ्या नेटानें जंजिरा किल्ल्याला वेढा देऊन बसला. तोफांच्या माऱ्यानें किल्ल्याची तटबंदी बरीच जायबंदी झाली. खुषकीच्या बाजूनें असा बंदोबस्त झाल्यावर जाहाजांत बसून पाण्याच्या बाजूनेंही एकदम हल्ला करावा असें ठरलें. पण समुद्रांत त्याचा कांहीं इलाज चालेना. तिकडे शिद्दीचा एक सरदार होता तो फौजेसह महाडापर्यंत चालून गेला, आणि तेथें दादाजी रघुनाथाची बायको होती तिला त्यानें धरून नेलें. ही बातमी ऐकून संभाजीराव फारच चवताळला, आणि खुषकी व जलमार्ग दोहींकडून शिद्दीवर मारा चालवून त्यानें त्याला जर्जर केलें. तेव्हां तो दांतीं तृण धरून शरण आला.

मग शिद्दीला सोडून त्यानें पोर्तुगीज लोकांवर आपला मोहरा फिरविला. त्यानें त्यांचे कित्येक गांव लुटून फस्त केले. जातां जातां इंग्रज लोकांनाही थोडासा हात दाखविला. पुढें औरंगजेबाचा सरदार रणमस्तखान त्याच्यावर चालून आला. त्याच्याशींही एक दोन निकराच्या लढाया करून त्यानें त्याला मागें हटविलें. तो मग त्याच्याशीं सामन्यास उभा न राहतां अहमदनगराकडे निघून गेला. पुढें संभाजीरावानें चौलावर स्वारी केली. तेथें पोर्तुगीज लोकांचा मुख्य गव्हरनर, बरोबर मोठी फौज घेऊन त्याजवर चालून आला. त्याच्या फौजेंत १,२०० निवळ युरोपिअन गोरे शिपाई होते. त्या समयीं पोर्तुगीज लोकां आंगावर शहारे येण्यासारखीं कित्येक क्रूर कृत्यें ... अर्ध

त्यांच्या तावडींत सांपडले ते त्यांनीं जाळून पोळून फस्त केले. कांहीं हिंदु देवालयें पाडून टाकिलीं व मूर्ति फोडल्या. पाडाव झालेल्या लोकांस जुलुमानें बाटविलें. शिवाजीरावाच्या ताब्यां-तला फोंडा किल्ला होता तो सर करण्याचा त्यांनीं इलाज चाल-विला. त्याला ते गराडा देऊन बसले. वेढ्याचें काम गोंव्याच्या खुद्द गव्हरनरानें स्वतः हजर राहून चालविलें होतें. त्या ठि-काणीं संभाजीराव एकदम चालून गेला. संभाजीरावाच्या आंगीं धूर्तता, दक्षता, दूरवर विचार, बुद्धिचातुर्य, कल्पकता, व सो-शिकपणा, हे बापाचे गुण जरी कमी होते तरी, शौर्याच्या का-मांत तो तंतोतंत बापासारखाच होता; किंबहुना बापाहून कांक-णभर ज्यास्तीच होता असें ह्मटलें तरी चालेल. त्याची फौज पोर्तुगीज फौजेपेक्षां जरी कमी होती तरी, फोंडा किल्ला दृष्टीस पडण्याबरोबर त्यानें शत्रूच्या पाठीमागच्या बाजूनें एकदम हल्ला सुरू केला. त्याचे शिपाई लोक पोर्तुगीज लोकांबरोबर पुढें झूज करीत असतां मागून तो त्यांस एकसारखें उत्तेजन देत होता. दोहींकडचे शिपाई अंगाशीं अंग भिडवून निकरानें लढूं लागले. कांहीं वेळ बरोबरीचा सामना चालला. दोहों पक्षांचे पांचपांचशें लोक ठार झाले. पण मग मग पोर्तुगीज लोकांची सरशी होत चालल्याचें दिसूं लागलें. संभाजीरा-वाच्या बाजूचा जरा धीर सुटल्यासारखा झाला. त्याचे लोक मागें हटत चालले, आणि पोर्तुगीज लोक एकेक कदम पुढें सरत चालले. तेव्हां त्यांनीं मराठे लोकांची बकऱ्यासारखी कत्तल चालविली. संभाजीरावाचा भगवा झेंडा मध्यभागीं फड-कत होता. तोही जरा मागें सरला. त्या समयीं त्याचा मोठा हि-मोड झाला. त्याच्या शेजारीं त्याचा अत्यंत विश्वासू हुजऱ्या त्यारबंद होऊन उभा होता. त्याला तो ह्मणाला, "जोत्याजी,

इकडे खंडूजी कांहीं लोक बरोबर घेऊन गुप्त वेषानें किल्ल्यांत शिरला; आणि त्यानें तेथें कांहीं ढवळाढवळ चालविली. ही बातमी शिद्द्याला कळून त्यानें त्याचा व त्याच्या सोबत्यांचा शिरच्छेद केला. इतक्यांत संभाजीराव दंडाराजपुरीपर्यंत जाऊन पोहोंचला. दादाजी रघुनाथ मोठ्या नेटानें जंजिरा किल्ल्याला वेढा देऊन बसला. तोफांच्या माऱ्यानें किल्ल्याची तटबंदी बरीच जायबंदी झाली. खुषकीच्या बाजूनें असा बंदोबस्त झाल्यावर जाहाजांत बसून पाण्याच्या बाजूनेंही एकदम हल्ला करावा असें ठरलें. पण समुद्रांत त्याचा कांहीं इलाज चालेना. तिकडे शिद्दीचा एक सरदार होता तो फौजेसह महाडापर्यंत चालून गेला, आणि तेथें दादाजी रघुनाथाची बायको होती तिला त्यानें धरून नेलें. ही बातमी ऐकून संभाजीराव फारच चवताळला, आणि खुषकी व जलमार्ग दोहींकडून शिद्दीवर मारा चालवून त्यानें त्याला जर्जर केलें. तेव्हां तो दांतीं तृण धरून शरण आला.

मग शिद्दीला सोडून त्यानें पोर्तुगीज लोकांवर आपला मोहरा फिरविला. त्यानें त्यांचे कित्येक गांव लुटून फस्त केले. जातां जातां इंग्रज लोकांनाही थोडासा हात दाखविला. पुढें औरंगजेबाचा सरदार रणमस्तखान त्याच्यावर चालून आला. त्याच्याशींही एक दोन निकराच्या लढाया करून त्यानें त्याला मागें हटविलें. तो मग त्याच्याशीं सामन्यास उभा न राहतां अहमदनगराकडे निघून गेला. पुढें संभाजीरावानें चौलावर स्वारी केली. तेथें पोर्तुगीज लोकांचा मुख्य गव्हरनर, बरोबर मोठी फौज घेऊन त्याजवर चालून आला. त्याच्या फौजेंत १,२०० निवळ युरोपिअन गोरे शिपाई होते. त्या समयीं पोर्तुगीज लोकांनीं आंगावर शहारे येण्यासारखीं कित्येक क्रूर कृत्यें केलीं. जे गांव

त्यांच्या तावडींत सांपडले ते त्यांनीं जाळून पोळून फस्त केले. कांहीं हिंदु देवालयें पाडून टाकिलीं व मूर्ति फोडल्या. पाडाव झालेल्या लोकांस जुलमानें बाटविलें. शिवाजीरावाच्या ताब्यांतला फोंडा किल्ला होता तो सर करण्याचा त्यांनीं इलाज चालविला. त्याला ते गराडा देऊन बसले. वेढ्याचें काम गोंव्याच्या खुद्द गव्हरनरानें स्वतः हजर राहून चालविलें होतें. त्या ठिकाणीं संभाजीराव एकदम चालून गेला. संभाजीरावाच्या आंगीं धूर्तता, दक्षता, दूरवर विचार, बुद्धिचातुर्य, कल्पकता, व सोशिकपणा, हे बापाचे गुण जरी कमी होते तरी, शौर्याच्या कामांत तो तंतोतंत बापासारखाच होता; किंबहुना बापाहून कांकणभर ज्यास्तीच होता असें ह्मटलें तरी चालेल. त्याची फौज पोर्तुगीज फौजेपेक्षां जरी कमी होती तरी, फोंडा किल्ला दृष्टीस पडण्याबरोबर त्यानें शत्रूच्या पाठीमागच्या बाजूनें एकदम हल्ला सुरू केला. त्याचे शिपाई लोक पोर्तुगीज लोकांबरोबर पुढें झूज करीत असतां मागून तो त्यांस एकसारखें उत्तेजन देत होता. दोहींकडचे शिपाई अंगाशीं अंग भिडवून निकरानें लढूं लागले. कांहीं वेळ बरोबरीचा सामना चालला. दोहों पक्षांचे पांचपांचशें लोक ठार झाले. पण मग मग पोर्तुगीज लोकांची सरशी होत चालल्याचें दिसूं लागलें. संभाजीरावाच्या बाजूचा जरा धीर सुटल्यासारखा झाला. त्याचे लोक मागें हटत चालले, आणि पोर्तुगीज लोक एकेक कदम पुढें सरत चालले. तेव्हां त्यांनीं मराठे लोकांची बकऱ्यासारखी कत्तल चालविली. संभाजीरावाचा भगवा झेंडा मध्यभागीं फडकत होता. तोही जरा मागें सरला. त्या समयीं त्याचा मोठा हिरमोड झाला. त्याच्या शेजारीं त्याचा अत्यंत विश्वासू हुजऱ्या हत्यारबंद होऊन उभा होता. त्याला तो ह्मणाला, "जोत्याजी,

आजच्या लढाईचा रंग मला ठीक दिसत नाहीं. आमचे लोक मेले फार. हे पहा आपलेही लोकही मागें मागें हटत चालले आहेत. आतां जय मिळण्याची आशा दिसत नाहीं. गलिमाचा मार खाऊन असें काळें तोंड घेऊन महाराजांना दाखवावें, त्यापेक्षां येथल्या येथें तलवारीनें मान कापून घेऊन देहत्याग करावा किंवा वाट फुटेल तिकडे प्राण घेऊन निघून जावें, असें माझ्या मनांत येतें. तुला कसें वाटतें तें बोल, म्हणजे तसें करूं ?'' हे शब्द जोत्याजीच्या कानाला फारच वाईट लागले. तो म्हणाला, ''महाराज, हें काय ? आपण असें कसें बोलतां ? देशत्याग, ब्राह्मण, संन्याशी, गोसावी ह्यांनीं करावा, आणि प्राणत्याग बायकांनीं करावा ! आपण शिपाई बच्चे, त्यांत हाडाचे मराठे, त्यांनीं मारतां मारतां मरावें हेंच त्यांचें खरें बिरीद. गलिमाला भ्यालों असें शेवटपर्यंत दाखवूं नये. असल्या खापरतोंडानें माघारें गेलां किंवा देशत्याग करून प्राण वांचविला तरी कितीशा पन्नाशा जगणार आहां ?'' हें जोत्याजीचें शौर्योत्तेजक भाषण ऐकून संभाजीरावाच्या अंगांत लागलाच पुन्हां वीरश्रीचा संचार झाला. अस्तन्या मागें सारून आणि मिशींत पीळ भरून तो मग आपल्या लोकांस दम देत देत पुढें चालला. त्याला पाहून दादाजी रघुनाथ जिवावर उदार होऊन पुढें लढत होता त्यालाही नवा दम आला. रानडुकर रानांत खळीस येतो त्याप्रमाणें इरेस पडून संभाजीराव पुढें सरकण्याबरोबर त्याच्या गतधैर्यफौजेस पुन्हां नवी ईर्ष्या उत्पन्न झाली. आज उष्ट्या झुंझास शिवावयाचेंच नाहीं असा पण करून प्रत्येक सरदार पुढें पुढें धांव घेऊं लागला. भाल्यांची आणि तलवारींची खणाखणी सुरू झाली. ह्या टिपऱ्याईत संभाजीरावानें पोर्तुगीजलोकांचे सुमारें १,२०० शिपाई लवे केले. त्याच्याही बाजूला सुमारें ६०० करगोट्यांची सफे-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

जंगी उडाली. त्या लढाईच्या आवेशामध्यें कित्येकांचे शिरच्छेद झाले तरी त्यांचीं कबंधेंच रणभूमीवर नाचूं लागलीं. पोर्तुगीज फौजेवरचे कित्येक धुरीचे सरदार मरून पडतांच त्यांच्या फौजेचा धीर सुटला, आणि धरण फुटल्याप्रमाणें जिकडे वाटेल तिकडे त्यांचें सर्व लष्कर धूम पळत सुटलें. ह्याप्रमाणें अखेरीस पोर्तुगीज लोकांचा पराजय झाला आणि संभाजीरावाला जय मिळाला. पोर्तुगीज गव्हरनर गोव्याकडे माघारा परतला. त्यांचा पाठलाग करीत संभाजीराव त्यांच्या मागून चालला. त्या वेळेस त्याला शत्रूंचें, दारू, गोळा, बंदूक वगैरे लढाईचें सामान पुष्कळ सांपडलें, त्यानें थेट गोव्यापर्यंत त्यांचा पाठलाग करून तो चौल आणि कारंजा इकडे वळला. कारंजा, वसई व दमण ह्यांच्या आसपासचे कित्येक किल्ले व ठाणीं हल्ले करून त्यानें सर केलीं. पोर्तुगीज लोक भांभावल्यासारखे इकडून तिकडे व तिकडून इकडे चकऱ्या घेऊं लागले. त्यांना प्रथम वाटलें होतें कीं, त्या देशची हवा पाणी लागून कांहीं दिवसांनीं संभाजीराव आपल्या राज्यांतून आपोआप निघून जाईल; पण, "जें इच्छी परा, तें येई घरा" अशी त्यांची अवस्था झाली. संभाजीरावाची प्रकृति इतकी सुदृढ होती कीं त्याला कोठचेंच हवा पाणी बाधलें नाहीं. शेवटीं फिरंगी फौजेवरचा मुख्य सरदार होता तोच अजारी पडला व त्याच्या कुटुंबांतलीं कांहीं माणसें लागोपाठ पटापट मेलीं. संभाजीरावानें त्याची पाठ सोडिली नाहीं. फिरंग्यांचीं व शिद्दीचीं जीं जीं देवळें व मशिदी वाटेंत आढळल्या त्या त्या त्यानें जमीनदोस्त करून टाकिल्या. याप्रमाणें फिरंग्यांचीं बरीच चांगली रग जिरली. अखेरीस त्यानें संभाजीरावाबरोबर तहाचें बोलणें लाविलें. शेवटीं ५ कोट होन खंडणी देण्याचें त्यांच्या गव्हरनरानें कबूल केलें, तेव्हां त्यानें

आपल्या फत्तेनगारजीला कुचाची नोबत करण्याचा हुकूम दिला. अशा रीतीनें विजयी होत्साता आपलीं भगवीं निशाणें व भगवा झेंडा फडकावीत तो पुण्यास जाऊन दाखल झाला. ह्या स्वारींत त्याची जिकडे तिकडे मोठी वाहवा झाली, त्याच्या शौर्याच्या गोष्टी ऐकून शिवाजीरावासही बराच आनंद झाला. संभाजी आतां कांहींसा निवळत चालला असें त्याला वाटलें. ह्या स्वारींत ज्यांनीं ज्यांनीं तलवारा मारल्या आणि जोखमीचीं कामें केलीं होतीं त्या सर्वांना शिवाजीरावानें जवळ बोलावून, दोन गोड शब्द बोलून, कोणाला पोषाख, कोणाला घोडा, कोणाला मोत्यांची कंठी, अशीं बक्षिसें दिलीं. कित्येकांचे हुद्दे वाढवून तैनातीही चढविल्या.

संभाजीराव पोर्तुगीज लोकांचा पाठलाग करीत गोव्यापर्यंत पोहोंचला म्हणून मागें सांगितलेंच आहे. त्या धांदलींत एक १४।१५ वर्षांची ब्राह्मणाची मुलगी त्याच्या हाताला लागली. ती कुलीन घराण्यांतील असून लावण्याची केवळ खाण होती. तिला तो येतांना बरोबर घेऊन आला. तिला त्यानें पुण्यास आल्यावर तेथें एका हिंदुस्थानी कनोजाच्या घरीं लपवून ठेविलें. ती सामदामानें त्याला वश होईना; म्हणून तिच्यावर शेवटीं तो बलात्कार करण्याच्या विचारांत होता. ही इत्थंभूत बातमी शिवाजीरावाला कळली. तेव्हां त्याला फार वाईट वाटलें. त्यानें लागलेच दोन कारकून व शिपाई प्यादे पाठवून तिला आपल्यासमोर आणविलें. ती खूपसुरत मुलगी राजापुढें येतांच खालीं मान घालून मुळमुळू रडूं लागली. तिचें तें केतकीच्या पानासारखें गोरेपण, तिची सुंदर अवयवरचना आणि तिची नम्रवृत्ति पाहून ही कोणी कुलीन गृहस्थाची सून आणि कन्या असावी अशी राजाच्या दिलाची लागलीच खात्री झाली. मग तो तिला

आश्वासन देऊन ह्मणाला, "मुली, तूं काळजी करूं नको बरें ? तूं आमच्या मुलीसारखी आहेस. तुझें सासर माहेर कोणत्या गांवीं आहे तें सांग, ह्मणजे तुझ्या घरीं तुला सुखरूप पोंहोंचती करितों." तिनें मग त्याला आपली सर्व हकीकत निवेदन केली. ती ऐकून घेऊन त्यानें तिला वस्त्रालंकारांनीं गौरवून, बरोबर मेणा व १०।१५ विश्वासू माणसें देऊन तिच्या सासरीं तिला पोंचतें केलें. संभाजीरावाला तिच्या देखत भरकचेरींत आणवून शिवाजीरावानें त्याची पुष्कळ फजिती केली. "तूं माझ्या मागें गोब्राह्मणांचा असाच प्रतिपाल करणार कीं काय ? ह्या वेळेस तुला क्षमा करितों, पण पुन्हा असलें दुराचरण माझ्या नजरेस पडल्यास मला तुझा पक्का बंदोबस्त करावा लागेल, हें खूप ध्यानांत ठेव;" असें सांगून त्याला त्यानें निरोप दिला. ज्या कनोजाच्या घरीं त्या मुलीला ठेविलें होतें त्या कनोजाला शिवाजीरावानें बायकामुलांसुद्धां गांवांतून हाकून लाविलें. हें हिंदुस्थानचें रत्न कोणच्या प्रकारचें होतें; पुढें संभाजीराव त्याच्या नादीं किती लागला होता; आणि त्याच्या पायीं त्याची केवढी हानि झाली; हें वाचकांस हळूहळू कळेलच. आतां एसाजी फर्जंद व तुळशीबाई ह्यांजकडे पुन्हां वळूं.

संभाजीराव तिकडे लढाईंत मारला न जातां जय मिळवून माघारा आला असें वर्तमान ऐकून एसाजी व त्याची बहीण ह्यांस परम दुःख वाटलें. हा जिकडे जाईल तिकडे फत्तेच मिळवून येतो. तेव्हां आमच्याच कपाळीं ब्रह्मदेवानें दुःख लिहून ठेविलें आहे कीं काय नकळे. असो, होणार असेल तें होईल, पण शेवटपर्यंत प्रयत्नांत कमी करावयाचें नाहीं, असा त्यांचा निश्चय झाला.

संभाजीराव स्वारी करून परत आल्यावर पुन्हां तुळशीबाईच्या घरीं येरझारे घालूं लागला. आंतून तिनें त्याच्याशीं हाडवैर

धरिलें होतें, तरी त्याची भेट होण्याबरोबर तिला खोट्या प्रेमाचा उमाळा आला. तिनें आपले मंदस्मित, प्रेमकटाक्ष, हावभाव आणि वाग्विलास, ह्यांनीं त्याला मोहित करून टाकिलें. त्याच्या कामानलावर तें एक तेलच ओतल्यासारखें झालें, आणि एकाएकीं तो बेहद्द उल्लू झाला. हा एकाएकीं येऊन कदाचित् आपला हात धरील आणि त्या वेळेस त्याला झिडकारून दिलें तर आपल्या पुढच्या कामाला व्यत्यय येईल असें जाणून तिनें दुखण्याचा बहाणा केला. "ताईची प्रकृति बिघडली आहे, तिला बरें होण्यास आठ पंधरा दिवस लागतील, तोंपर्यंत आपण आणखीं एकदां इकडे तिकडे फिरून शिकार साधली तर पाहूं;" असें एसाजीनें पुन्हां त्याच्या मनांत भरून दिलें. तें त्याला रुचलें. प्रतापगडाच्या माचीला एक मोठी दरी आहे; तींत वाघ, अस्वल, डुकर, चित्ता वगैरे शिकारीजोगीं भयंकर जनावरें जाऊन बसतात; अशी एसाजीला एकानें गुप्त बातमी दिली होती. त्या दरींत एखादा पटाईत वाघ असला तर त्याची ह्याची गांठ घालून द्यावी, ह्मणजे संभाजीची गठडी वळन आपल्या मनांतला हेतु सहज सिद्धीस जाईल, ही संधि ठीक आहे, असा विचार करून त्याला तो घेऊन तिकडे निघाला. बरोबर, जोत्याजी, एसाजी, वगैरे दोनचार असामी होते. एसाजीच्या मनांत आपल्याविषयीं कांहीं काळेंबेरें आहे असें बिचाऱ्या राजपुत्राला अद्यापही वाटलें नव्हतें. प्रतापगडच्या झाडींत शिरण्याबरोबर वाघ कोठें आहेत ह्मणून राजपुत्र त्याला वरचेवर पुसूं लागला. कांहीं धाडसाचें काम असलें म्हणजे त्याचा दील फार खूष असे. जोत्याजी हुजऱ्या, आपल्या नेहमींच्या खाक्याप्रमाणें, कंबरेला तलवार, कांखेला तिरकमटा आणि एका हातांत बर्ची, ह्याप्रमाणें हत्यारबंद

होऊन आपल्या धन्याच्या पाठोपाठ रहात असे. लढाईचें काम असो, ख्यालीखुशालीचें काम असो, शिकारीचें काम असो, किंवा दुसरें कांहीं असो, तो कधीं आपल्या धन्याची पाठ सोडून रहात नसे. एक तीरांनीं भरलेला भाता हमेषा त्याच्याजवळ असे. त्याच्या आवडत्या तलवारीला कैक वेळां त्याच्या शत्रूंच्या रक्ताचें त्याच्या हातून माखण मिळालें होतें. तिनें कैक दुस्मानांस धारातीर्थही दाखविलें होतें.

संभाजीरावाचा एसाजीवर पूर्ण विश्वास, अर्थात्, पूर्ण लोभही असे. एसाजीनें आपल्या काळजांत त्याला मारण्यासाठीं कालकूट विषाची कुपी भरून ठेविली होती, ती त्याच्या वहिणीला मात्र ठाऊक होती. तिसऱ्याच्या कानाला तिची गंधवार्ताही नव्हती. असें दोघांचें गुपचुप काम चाललें होतें. तो राजपुत्राला कपटी आर्जवानें खूष ठेवी, ह्यामुळें त्याची मर्जी बहाल राहून त्याला तो, कधीं कंठी, कधीं सोन्याचें कडें, कधीं डोक्याचें पागोटें, अशीं बक्षिसें देई. असो.

ती सर्व शिकारी मंडळी बोलत चालत प्रतापगडच्या पायथ्याशीं जाऊन पोंहोंचली. ते आषोटीचे दिवस होते. पर्जन्याचे दिवस नजीक आले ह्मणजे कधीं कधीं प्रतापगड व महाबळेश्वर येथें मोठमोठीं वादळें सुटतात. ते अर्धासा डोंगर चढले त्या वेळेस दोन प्रहर उलटून तिसऱ्या प्रहरचा अंमल होता. इतक्यांत एकाएकीं आभाळांत ढग येऊं लागले; मोठा ह्मसासूर वारा सुटला; काळोख कुट्ट पडला; आणि वळींव पाऊस पडण्याचें चिन्ह दिसूं लागलें. हें काहुर शांत होईपर्यंत ते कोठेंतरी निच्या श्रयाची जागा हुडकूं लागले. कांहीं मंडळी संभाजीरावाला सोडून दूर मागेंच राहिली. त्याच्या बरोबर, तेवढा जोत्याजी, एसाजी आणि घोड्याचा मोतद्दार पिलाजी, अशीं तीनच माणसें

राहिलीं. मागें लोक राहिले, त्यांचें मन राजपुत्राविषयीं अगदीं निष्कपट होतें, परंतु एसाजीनें त्यांना मुद्दाम कापट्यभावानें मागें राहविलें.

डोंगरावर घोडीं चढून जाण्यासारखी वाट नव्हती, ह्मणून प्रतापगडाच्या पायथ्याशीं एक मोठी दरी होती आणि त्या दरीच्या आसपास मोठमोठीं वडपिंपळांचीं झाडें होतीं, त्या झाडांशीं त्यांनीं आपलीं घोडीं बांधून ठेविलीं आणि ते पायीं-पायींच डोंगर चढूं लागले. सरासरी अर्धी घटिकापर्यंत वर चढून गेल्यावर एक डोंगराचा कडा तुटला होता त्या जागीं मोठ्या श्रमानें ते जाऊन पोंहोंचले.

त्या वेळेस पाण्यानें डबडबलेल्या काळ्याभोर ढगांनीं आभाळ व्याप्त झालें होतें. त्यांनीं सूर्य अगदीं झांकून गेला होता. चोंहीकडून एकदम काहुर उठलें. त्यांतून क्षणोक्षणीं विजा चमकूं लागल्या. झाडांच्या पानावर सुपारी एवढाले टपाटप पावसाचे थेंब व गारा पडूं लागल्या. पक्षी भराऱ्या मारीत वृक्षांच्या आश्रयास जाऊन बसले. त्यांच्या आंगावर पाण्याचे थेंब टपाटप पडूं लागले. तेव्हां ते करुणास्वरानें चिंव, चिंव, चिंव, करूं लागले. सर्प, सरड, पाली वगैरे लहानसान जीवजंतु रानांत व झाडाझुडुपांत यथेच्छ फिरत होते, ते आसपास उगवलेल्या गवतांत सरासर पळून गेले. ढगांनीं आकाश चौफेर आच्छादून गेल्यामुळें संध्याकाळासारखा अंधकार पडला; त्यामुळें वाट काढण्याला मोठी मुष्किल पडली. जंगलांत रहाणारे लोक दुरून एकामेकांस कर्कश आरोळ्या मारूं लागले. त्याच्या योगानें तो सर्व प्रदेश भयाण वाटूं लागला. तुफान ए[illegible]रखें वाढतच चाललें. आतां उभें राहण्यास क्षणभर आश्रय कोठें मिळेल ह्याची त्यांना मोठी फिकीर लागली. एसाजी सर्वांच्या

पुढें, त्याच्या मागें संभाजीराव, आणि त्याच्या मागून त्याचे दोघे चाकर, अशा क्रमानें ते वाट चालत होते. ज्या गुहेपाशीं तो नेणार होता त्या गुहेचा ठावठिकाणा त्यानें चांगला पुसून घेतला होता, ह्मणून मध्यें न थांबतां तो नीट वाट चालत होता. चढण अगदीं उभी होती. तेथें पाऊलवाट सुद्धां चांगली पडलेली नव्हती, ह्यामुळें वर चढून जातांना सर्वांच्या नाकीं नव आले. त्या तुफानांतून लौकर सुटका होण्याकडे सर्वांचें लक्ष्य लागलें होतें; ह्यामुळें मार्गांतलीं दुसरीं संकटें होतीं तीं त्यांस भारी वाटलीं नाहींत. वरचे वर पाय निसरत, पडत, झडत, तरी पुन्हां उठून रांगत, फरपटत चालले होते. इतक्यांत ज्या गुहेच्या सुगाव्यावर एसाजी घेऊन चालला होता ती त्यांच्या नजरेस पडली. मोठ्या कष्टानें एका मनुष्याचें आंग आंत शिरेल एवढेंच त्या गुहेचें तोंड होतें. तिची उंची सरासरी दोन हात आणि रुंदी पुरी एक हातही नव्हती. आंत काळोख कुट्ट इतका पडला होता कीं तिच्या आंतल्या बाजूला कोठें काय आहे हें मुळींच दिसत नव्हतें. आंत जेमतेम सर्वजण घुसले मात्र, इतक्यांत बाहेर मुसळधार पाऊस सुरू झाला. उंच उंच पर्वतशिखरांवरून पाणी, धो, धो, धो, वाहूं लागलें; त्याचे धबधबे होऊन ते १०।१०।१२।१२ हात खोल कड्यांखालीं उड्या घेऊं लागले; विजांचे कडकडाट तोफेच्या आवाजासारखे वरचेवर गुहेंत व तिच्या आसमंताद्भागीं घुमूं लागले; झाडांखालीं सांचलेला वाळलेला पाला व पाचोळा वाऱ्यानें आणि पावसानें सळासळ वाजूं लागला; वृक्षांच्या आश्रयास दडून बसलेल्या पक्ष्यांचा नीचसुराचा किलकिलाट होऊं लागला; रानांत फिरणाऱ्या अनेक जीवजिवाणूंचे विचित्र तऱ्हेचे शब्द होऊं लागले; देवनळ, वेळु इत्यादि झाडांचें

वाऱ्यानें एकमेकांशीं घर्षण होऊन, त्यांतून, मधून, मधून, अल-
गुजासारखा मंजुळ आवाज निघूं लागला; आणि त्यांतच
उथळ पाण्याचा खळखळाट मिसळला. सारांश, त्या समयीं
तेथें अनेक ध्वनींचें मिश्रण व संमीलन होऊन तो एक नाद-
ब्रह्माचा आपोआप स्वरमेळच बनला होता. शेंकडों झाडें व
झोंपडीं धडाधड मोडून खालीं पडलीं. ज्या ज्या वेळेस सोसा-
ट्याचा वारा उंच शिखरांना आदळून तेथून भयंकर आवाज
निघे आणि त्यांतच मेघगर्जना होत, त्या त्या वेळेस कान-
ठळ्या बसून कर्णांतील ज्ञानतंतूंची गति कुंठीत होत असे.
वीज इतक्या वेगानें चमके कीं, मध्यें खंड पडत ते मुळींच ल-
क्षांत न येतां पृथ्वीवर, पर्जन्याबरोबर अग्नीचीही वृष्टि होत
आहे असा भास होई. आप, तेज, वायु आणि आकाश ह्या
चार महाभूतांनीं बिचाऱ्या एकाकी पृथ्वीवर आपल्या शस्त्रांचा
अखंड मारा चालविला. गुहेच्या समोर एक मोठें प्रचंड वडाचें
झाड होतें त्याजवर विजेचा एक लोळ येऊन कोसळला. तेव्हां
तें बुंधासकट दुभंग होऊन कड्याखालीं घसरलें, आणि को-
लमडे खात खात शेवटीं तळाला जाऊन आदळलें. सर्प इत्यादि
जीवजंतूंच्या बिळांत व वारुळांत पाणी शिरून ते भराभर बा-
हेर पडले, आणि कावरेबावरे होऊन आपल्या जिवाच्या भी-
तीनें ते एकदम त्याच गुहेंत शिरले. हे प्राणी कधीं मनुष्याच्या
वाऱ्यासही उभे रहावयाचे नव्हत; पण मोठ्या संकटापुढें
लहान संकट पत्करून ते त्याच्या सान्निध्यास बेधडक जा-
ऊन बसले. दाहांच्या आंकड्याचे मोठमोठे नागराज आपल्या
फणा नम्र करून गुहेच्या कोनाकोपऱ्यांत मुकाट्यानें वेटाळीं
घालून बसले. तेथें जाऊन बसल्यावर त्यांस जरा धीर
ल्यासारखा झाला.

मग कांहीं वेळानें विजांचें चमकणें कमी झालें; गडगडा-ऱ्हही थांबून थांबून होऊं लागला; तुफानाचा जोर कमी झाला; ःग विरळ विरळ होत चालले; आणि मधून मधून मंद सूर्य-ःर्शन होऊं लागलें. आणखी कांहीं वेळानें अभ्रपटल अगदीं ाहींसें होऊन डोंगरांवरचें सर्व आकाशमंडल अगदीं स्वच्छ ालें. गुहेंतील कोनेकोपरे जरी स्वच्छ दिसत नव्हते तरी, पहिल्या इतका आंत अंधार राहिला नाहीं. बाहेर ह्याप्रमाणें स्थीर स्थावर होत आहे तों मांजर मोठ्यानें म्यांव, म्यांव असा शब्द करतें, तशा मासल्याचा आवाज गुहेच्या एका कोपऱ्यांतून ऐकूं आला. ह्या ठिकाणीं मांजरें कोठचीं आलीं, रानमांजरें तर नव्हतना? म्हणून पहाण्यासाठीं अंधारांतून चांचपडत, चांच-पडत जोत्याजी केसकर आणि पिलाजी मोहिता शेवटच्या त्या कोपऱ्याशीं गेले, आणि हाताला जें लागलें तें बगलेंत घेऊन गु-हेच्या तोंडाशीं पुढें उजेडांत आले. उजेडांत आणून बगलेंतला जिन्नस पहातात तों तीं वाघाचीं सुकुमार पिल्लें! त्यांचीं आई-बापें त्यांना तेथें ठेवून आपण बाहेर फिरावयास गेलीं होतीं. हें एक मोठेंच अरिष्ट आलें अशी तिघांस धास्ती पडली.

**पिलाजी मोतद्दार**—कां जोत्याजीराव, विचार कसला क-रतां? आतां ह्या क्षणीं येथून चालतें व्हावें ह्यासारखें सुख नाहीं. नाहीं तर ह्या ऐरांच्या आईबापांची गांठ पडली म्ह-णजे सुटून जाण्याची आशाच नको. पाऊस थांबला आहे, तेव्हां तीं आतां इकडे येण्यासाठींच निघालीं असतील. त्यांना येथें येऊन पोंचण्यास अगदीं उशीर लागणार नाहीं.

**संभाजीराव**—वाहवारे शेंदाडा शिपाई! वाघाला इतका भि-तीर सु मग तूं शिकार रे कसली करणार? ही शिकार मात्र च्या ! भित्र्या, आपण वाघाची शिकार करावयाची कीं,

तूंच आमची शिकार कर असें वाघाला सांगावयाचें ! ( मग क्षणभर विचार करून ) पण आमची आधीं तयारी असल्यावर ते आपल्या अंगावर आले तर बरें. ह्या ठिकाणीं असेच बसून राहिलों तर आपला कोंडमारा होणार आहे. आडवे तिडवे हात मारण्यासारखी जागा प्रशस्त पाहिजे. आम्ही येथें आहों तोंच जर कां वाघ आंत शिरले तर मग प्राणाशींच बेतली असें समजा.

**एसाजी फर्जंद**—महाराज, मला ह्या वेळेस एक छानदार युक्ति सुचली आहे. तें पलीकडे एक मोठें पिंपरीचें झाड आहे. त्याजवर मी पुढें जाऊन चढून बसतों. तेथून डोंगराकडची सगळी बाजू मला दिसण्यासारखी आहे. कोणी वाघबीघ तुमच्याकडे येत असल्याचें माझे नजरेस पडलें कीं मी तुम्हांला खुणेनें कळवीन. नंतर तो पलीकडे एक उंच खडक दिसतो त्याजवर चढून जाण्यास तुम्हांस वेळही पुष्कळ सांपडेल. त्या उंचवट्यावर उभें राहून आमचे महाराज त्यांजवर नेहमीं सारखे अचुक निशाण मारतील तर वाघ वाघ म्हणजे बिशाद काय ? त्यांची हां हां म्हणतां ते चटणी करून टाकतील.

**जोत्याजी केसकर**—छे, छे, एसाजी, हा तुझा अगदीं बायकी सल्ला आहे. ह्यानें बचाव तर व्हावयाचाच नाहीं. उलट आम्हीं ज्यास्ती गोत्यांत मात्र सांपडूं. अगोदर ही जागा सोडून बाहेर पडा. मग वाघ आपल्या आंगावर चालून आले तरी मैदानांतली गोष्ट निराळी आहे. त्यांच्याबरोबर दोन हात करण्यास तेथें चांगली सवड मिळेल. शिवाय जेथें आपलीं बचडीं ठेविलेलीं असतात त्या ठिकाणच्या

त्यांना उपद्रव दिला कीं ते फारच खवळतात ह्यासाठीं आम्ही आतां फार हुषार राहिलें पाहिजे.

**संभाजीराव**–जोत्याजी, तुझेंच म्हणणें मला बरें दिसतें. वाघ जितका खवळेल तितका आपल्याला हवाच आहे. चला, आपण आतां येथून निघून त्यांच्याच आंगावर आधीं चालून जाऊं.

असा ठराव होतांच जो तो आपआपलीं हत्यारें उचलून घेण्याच्या तयारीस लागला.

या पुढची विकट प्रसंगाची कथा आतां पुढच्या भागांत सविस्तर सांगूं.

---

## भाग ४.

**"क्रियासिद्धिः सत्वे भवति महतां नोपकरणे."**

पावसाच्या झडींत राजपुत्र व जोत्याजी केसकर ह्यांनीं आपआपले तिरकमटे व तिरांचे भाते खालीं जमीनीवर उतरून ठेविले होते. निघतांना जोत्याजी आपला तिरकमटा उचलून घेऊं लागला तों वाघांचीं पोरें त्या तीरांशीं खेळत होतीं. त्यांनीं भात्यांतले सारे तीर उसपून दांतांनीं कुरतुडून टाकिले होते. त्यांत दोनच तीर कायते सबंध मिळाले. काय विलक्षण प्रसंग! केवढी कमनशिबाची गोष्ट! हत्याराशिवाय नुसत्या हातांनीं वाघाबरोबर सामना करण्याचा प्रसंग येऊन गुदरला! हत्यारांशिवाय त्यांला आपल्या आंगावर घेणें हा वेडेपणा होय. डोंगर लौकर उतरून परत जावें, तीर वगैरे शिकारीचें नवीन सामान् हूं होवर घ्यावें, आणि फिरून दुसऱ्या दिवशीं ह्या तीर सुटतें, असें सर्वानुमतें ठरलें. इकडे ह्यांची अशी त्रेधा च्य। डो० अत्यंत खुष होऊन एसाजीनें त्यांना न सांगतां

सूं वाल्या हांकला, आणि त्याचा प्रथम बेत झाला होता त्याप्रमाणें तो झाडावर चढून बसला. इकडे संभाजीराव व त्याचे दोघे सोबती गुहेंतून निघण्याच्या तयारींत आहेत, इतक्यांत त्याच गुहेच्या रोंखानें एक भला अगडबंब वाघ शेंपटी हालवीत हळूहळू डुलत येत आहे असें दृष्टीस पडलें.

**संभाजीराव**—गडे हो, बेतली खरी. आतां ह्या पठ्याबरोबर, हत्यार नसतां लढण्याचा प्रसंग आला आहे. सुटका नाहीं. शत्रूनें आपल्याला एकाएकीं गांठलें खरें. आतां आपल्याजवळ जें मोडकें तोडकें सामान उरलें आहे त्यानेंच होईल तेवढा आपला बचाव बघितला पाहिजे. पण, बचाजी, आमच्यावर एकाएकीं चालून येशील तर तुझा परिणाम ठीक नाहीं, आमच्याशीं गांठ आहे; अशी वाघाला पहिल्याच रामरामीला आपण चुणुक दाखविली पाहिजे.

असें बोलून त्यानें आपल्या कमानीला एक तीर लावून, नेम धरून तो वाघाच्या आंगावर सोडला. तीर सुटला तो नेमका वाघाच्या खांद्यांत जाऊन घुसला. त्याचें पोलादी शल्य त्याच्या हाडांत रुपून बसलें. जखम लागण्याबरोबर वाघानें मोठ्यानें एक किंकाळी फोडली, आणि आंगांत घुसलेला बाण त्यानें आपल्या पंजानें उपसून काढला. फिरून त्यानें मोठी गर्जना केली आणि तीर जिकडून आला त्या दिशेकडे तो धांवत निघाला. त्याच्या भयंकर गर्जनेनें आसपासचे लहान मोठे पहाड दणाणून गेले. मग गुहेच्या आंतल्या आंगास एक मोठी थोरली शिळा पडली होती ती तिघांनीं हातानें ढकलीत ढकलीत गुहेच्या तोंडाशीं आणून बसविली. ह्याप्रमाणें त्या [illegible] आंत येण्याची वाट त्यांनीं बंद करून टाकली. गुहेशीं [illegible] धी[illegible] भिडतांच तिच्या तोंडाशीं शिळा असलेली पाहून [illegible] [illegible]च्या

स्तब्ध उभा राहिला. फिरून गर्जना करून शिळेशीं वरचेवर झोंब्या घेऊं लागला, त्यामुळें शिळा इकडे तिकडे डळमळे. परंतु संभाजीरावाच्या आंगांत जोर फार होता. तो आंतल्या बाजूनें शिळेला पाठ लावून बसल्यामुळें वाघाचा आंत येण्यास निरुपाय झाला. शिळेच्या वरच्या बाजूस एक मोठी फट होती. वाघानें शिळेवर पाय देऊन आपलें नाक त्या फटींत घालून तो आंत डोकावून पाहूं लागला. त्या समयीं त्याची खात्री झाली कीं आपलीं पोरें शत्रूच्या हातीं लागलीं. मग रागानें डोळे गरगरां फिरवून आंत जाण्याला मार्ग मिळावा म्हणून शिळेला मोठ्यानें धक्के देऊं लागला. तरी नाइलाज झाला. तेव्हां दांत ओंठ खात तेथेंच उभा राहिला. त्याचा जबडा रागानें फेसाळून गेला होता. त्या समयीं संभाजीराव जोत्याजीला म्हणाला, "जोत्याजी, कमान हातीं घेऊन एक तीर राहिला आहे तो नेमका ह्याच्या डोळ्यांत मार. तूं अगदीं नजीक आहेस ह्यामुळें तुझा नेम चुकावयाचाच नाहीं. तीर जरा खेंचून मात्र सोड. तो वर्मी लागून वाघ जखमी झाला तरच आपली येथून सुटका आहे."

जोत्याजीनें त्याप्रमाणें कमान हातीं घेऊन शरसंधान बांधलें. तेव्हां त्याचा हात थरथरा कांपूं लागला. हात वाघाच्या भीतीनें कांपला असें नाहीं. पण, तीर एकच शिल्लक होता आणि तोही जर कामीं न येतां फुकट गेला तर प्रसंग वाईट आहे, म्हणून त्याच्या हाताला कांपरें भरलें. वाघाची दृष्टि त्याच्या हाताकडे गेली, तेव्हां तो डोळे हिरवे पिंवळे करून त्याजकडे रागानें पाहूं लागला. त्याचक्षणीं नेम धरून त्यानें तीर सोडिला.

तीर सुटण्याबरोबर वाघानेंही आपलें डोकें जरा वर उचललें, त्य। डोळ्यांत न शिरता जिभेंत शिरला. जिभेला जखम

होतांच तो क्षणभर इकडे तिकडे वाटोळया उड्या मारून भुई-वर गडबडां लोळूं लागला. तीर आपल्या पंजानें त्यानें जिभेंतून काढून टाकला, तरी त्याची अणकुची जिभेंत तशीच अडकून राहिली ती निघाली नाहीं. म्हणून पुन्हां संतापून तो पहिल्या ठिकाणीं जाऊन उभा राहिला. तोंडाचा फेंस आणि जिभेचें रक्त एकत्र होऊन तें जमीनीवर थबथबा गळत होतें. जीभ बाहेर लोंबत राहून तींतून रक्ताची संतत धार लागली.

इकडे तिघांची दशा गुहेमध्यें क्षणोक्षणीं अधिक बिकट होत चालली. बाहेर वाघ गुहा सोडून पलीकडे जाईना. तिच्या तोंडाशीं तो धरणें धरून बसला. कांहीं होवो येथून हालावयाचेंच नाहीं, असा तो कृतनिश्चय दिसला. बरें, शिळा एकीकडे सारून त्याला आंत घ्यावें तर तिघांचीं शंभर वर्षे त्याचक्षणीं भरलीं अशी भीति. शेवटीं संभाजीरावानें आपल्या ठिकाणीं निश्चय केला कीं, शिळा एकीकडे सारून या खवळलेल्या पठ्याबरोबर दोन हात करावयाचेच; मग पुढें जें होणें असेल तें होवो. तिघांच्या हातीं तलवारी होत्याच. पण डोळ्यांत बोट घातलें तरी दिसावयाचें नाहीं असा त्या वेळेस आंत अंधार होता. शिवाय, आंतली जागा ठेंगणी होती, ह्यामुळें तेथें तलवारीचे हात बरोबर मारतां येण्यासारखे नव्हते. म्हणून बाहेर पडले तर तिघांपैकीं निदान एक असामी तरी जिवानिशी पार पडण्याचा संभव होता.

एसाजी फर्जंद आधींच झाडाच्या शेंड्यावर बसून तेथून गुहेजवळचा तमाशा पहात होता. त्याचे तिघे सोबती आंत अडकून राहिले आहेत आणि वाघ बाहेरून त्यांना जेर करीत आहे, या संधींत तो हळूच झाडावरून खालीं उतरून डोंगराच्या उतरावयास लागला. डोंगराच्या पायथ्याशीं पोहोंचल्याच्या

घोडें झाडाला बांधलेलें होतें, त्याजवर बसून बाकीचे असामी मागें राहिले होते त्यांचा शोध करीत करीत तो निघाला. आतां इकडे हीं तिघेंजणें वाघोबाच्या तडाक्यांतून कसचीं पार पडतात अशी त्यानें शकुनगांठ बांधून ठेविली. तसें झालें म्हणजे आमच्या दोघांच्या मनांत जो हेतु आहे तो सहजीं सिद्धीस गेला; असें तो मनोराज्य करीत चालला.

इकडे गुहेच्या तोंडाशीं शिळा होती ती संभाजीराव काढूं लागला तेव्हां जोत्याजीराव म्हणाला, "महाराज, मला एक नवी युक्ति सुचली आहे. माझ्याजवळ एक बारीक रेशमी काढणी आहे. तिचा फांस करून तो फांस वाघाच्या मानेवर हळूच टाकून पाहूं. गळफांस लागून वाघ कदाचित् मेला तर मरेल. फांस टाकण्याचें काम मला माहीत आहे. मी अशा रीतीनें पुष्कळ वेळां सावजें धरलीं आहेत. हा एक उपाय आहे. तो करून पाहूं. साधला तर साधला.

**संभाजीराव**—छे, छे, हा बेत तर मला अगदीं पसंत नाहीं. अरे, वाघ हा सर्व जनावरांचा राजा आहे, आणि त्याचा असा कपटानें घात करणें हें अगदीं नामर्दपणाचें आणि अधमपणाचें काम होय. थोरानें थोराला थोर उपायांनींच जेरीस आणावें. त्याला मारण्यासाठीं असल्या कपटाच्या युक्ति क्षुद्र कुत्र्यांनींच योजाव्या. आमच्या सारख्यांनीं योजणें शोभत नाहीं. शिवाय, ही गोष्ट घडणेंही अशक्य आहे. वाघाच्या मानेवर नेमका फांस टाकणें तुझ्याकडून करें होऊं शकेल ?

**ीराव**—महाराज, आपल्यासारख्या थोर लोकांना तसें न साजो. पण मी एक आपला जोडा उचलणारा च्य। ।सा माणूस आहें. मला यासाठीं कोणी नांवें ठेवणार

नाहीं. आपला हुकूम मात्र व्हावा म्हणजे हें काम मी एक वेळ करून पहातों. गाजराची पुंगी, वाजली तर वाजली, नाहीं तर मोडून खाल्ली. घुशीला सांपळ्यांत धरतात तसें या क्षणीं वाघाला गळफांस लावून दाखवितों, पाहा.

वाघ हा जंगलांतला राजा आहे; त्याला अशा नीच उपायांनीं मारण्याचा यत्न करणें हें अति निंद्य कर्म होय; अशा कृतीनें आपल्या राजकुलोत्पत्तीस बट्टा लागणार आहे; असे थोर विचार प्रथम संभाजीरावाच्या मनांत उभे राहिले. पण जोत्याजीच्या विनवणीपुढें त्याला ना म्हणवेना. त्यानें शेवटीं परवानगी देतांच शिळेच्या वरच्या आंगास मोठी फट होती, तींतून काढणी बाहेर टाकून वाघाच्या मानेला फांस लावावयाचा त्यानें इलाज केला. ती काढणी बाहेर पडतांच वाघानें एक मोठी गर्जना केली. आणि बाहेर पडलेली काढणी दाढेंत धरून एक उड्डाण करून तो पलीकडे सरला. एक हिसडा देण्याबरोबर त्याच्या हातांतली सर्व काढणी बाहेर निसटून गेली. ह्याप्रमाणें एखादे वेळेस उपयोगीं पडण्याजोगें जोत्याजीजवळ एक बचावाचें साधन होतें तेंही नाहींसें झालें !

**संभाजीराव**—बस झालें. आतां आपल्याला सोक्षमोक्षाचे दोनच मार्ग उरले. एक; त्यानें बाहेर पहारा करितां करितां उपासमर होऊन मरावें किंवा आम्हीं आंतल्या आंत उपासानें मरावें. दुसरा; त्याला आंत येऊं देऊन आपल्या आंगांत जेवढें बळ असेल तेवढें त्यास दाखवावें. पण या दुसऱ्या पक्षीं आपण एकाला तिघे आहोंत, ही एक गोष्ट बरी आहे.

**दोघे चाकर**—पण आम्हाला आंत दोन गोष्टी घातक आहेत. एक, अंधार, आणि दुसरी, जागा बसकी. आमच्यागेर [illegible] वाल्याला आंतल्या बाजूस ह्या दोन्ही गोष्टी पथ्यावर [illegible]ांच्या ण्यासारख्या आहेत.

**संभाजीराव**--तर मग आपण बाहेर पडून मैदानांतच जाऊन दंड ठोकून त्याच्याशीं सामना करावा, हें मला बरें वाटतें.

**दोघे चाकर**--मग तर खासेंच. ह्या घुशीच्या बिळांतून आम्हीं बाहेर पडतों न पडतों इतक्यांत तो उडी मारून आमच्या मानगुटीवर बसेल. त्याच्या पंजाची एकेकच थप्पड आम्हांला पाणी सुद्धां पिऊं देणार नाहीं. लागलीच आम्हांला स्वर्गाचीच वाट धरावी लागेल.

मग जोत्याजीनें आणखी एक शक्कल काढली. 'वाघाचीं आंत दोन पोरें आहेत. त्यांना गळफांसानें मारून तीं वाघापुढें टाकूं; म्हणजे पोरांची आशा सोडून तो मग रानांत कोठें तरी निघून जाईल. हा एक निदानचा उपाय आहे.' हें करणें तरी साहसाचेंच होतें. तरी राजपुत्राचें त्याला अनुमोदन मिळाल्यावर जोत्याजीनें आपल्या डोकीचें पागोटें उलगडून त्याला बारीक पीळ घालून त्याची त्यानें सुंभासारखी घट्ट दोरी वळली. वाघाचीं दोन्हीं पोरें कोपऱ्यांत झोंपीं गेलीं होतीं. तीं लहानच होतीं, तरी कशीं झालीं तरी तीं वाघाचीं बचडीं. जागेपणीं एकाएकीं आंगाला हात लावूं देण्यासारखीं नव्हत, मग गळफांस लावण्याची गोष्ट कशाला पाहिजे? धक्काबुक्की करून वाघ शिळा पलीकडे सारील म्हणून तिला आंतल्या बाजूनें पाठीचा जोर देऊन संभाजीराव शिळेपाशीं उभा राहिला. इकडे जोत्याजी आणि पिलाजी हे त्या बच्चांची विल्हेवाट लावण्याच्या उद्योगास लागले. पीळ घातलेल्या पागोट्याला मधोमध एक ... भोंक ठेविलें होतें. तें एका पोराच्या मा-
... वा दोहींकडे उभे राहून दोघांनीं दोहींकडून
आंगाच्या मानेला फांस लागून तें पोर धड-
च्य। ... येथें यांनीं दुसऱ्या पोरासही यमसदनास पाठ-

विलें. आणि तीं मेलेलीं पोरें शिळेच्या फटींतून त्यांच्या बापापुढें त्यांनीं टाकिलीं. पोरांना पाहतांक्षणींच वाघ शिळेशीं बसला होता, ती जागा सोडून तो जरा पलीकडे जाऊन त्यांना आपल्या पोटाखालीं घेऊन बसला. बापाचेंच अंतःकरण तें! त्यांना पाहून त्याची तबेत खुष झाली. आनंदाचा गुरगुर शब्द करून मोठ्या ममतेनें तो त्यांचीं डोकीं आपल्या जिभेनें कांहीं वेळ चाटीत बसला. पण तीं जिवंत आहेत कीं मेलेलीं आहेत ह्याचें त्याला ज्ञान झालें नव्हतें. थोड्या वेळानें तीं कांहींच हाल चाल करीत नाहींत असें पाहून त्यानें आपल्या पंजानें त्यांना पालथें उलथें करून पाहिलें. तरी तीं हूं, चूं, कांहीं करीनात. मग क्षणभर तो त्यांजकडे नजर लावून बसला. तेव्हां त्याच्या लक्षांत आलें कीं पोरें जिवंत नसून, मेलेलीं आहेत. मग वर आभाळाकडे तोंड करून त्यानें रुदनस्वराची एक मोठी किंकाळी फोडली. जीभ जबड्याच्या बाहेर लळलळा लोंबत होती व तींतून रक्ताचे थेंब गळतच होते. पुन्हां खालीं मान करून तो आपल्या लेंकरांकडे पाहूं लागला. तेव्हां त्याचे डोळे आसवांनीं डबडबून गेले होते.

मग त्याचें दुःख कमी होऊन त्याला अतिशय संताप चढला. क्रोधाच्या आवेशांत तो शिळेला धडाधड धडक्या देऊं लागला. मध्यें खळच नाहीं अशी त्यानें एकसारखी गर्जना चालविली. वरचेवर शिळेशीं तो आदळूं लागला. तेव्हां एका बाजूला ती सरूं नये म्हणून आंतल्या बाजूनें तिघेही तिला आपल्या आंगांचा जोर देऊन बसले. मग कांहीं वेळ तो श्रमल्यासारखा होऊन शिळेपासून कांहीं कदम [illegible] घातक [illegible] आणि मेलेल्या पोरांच्या शेजारीं जमीनीला पोट [illegible]. आमच्या[illegible]र [illegible] केविलवाणें तोंड करून तो आकाशाकडे [illegible]गोष्टी पथ्यावर [illegible] [illegible]च्या

देवाला करुणाच भाकूं लागला कीं, "हे प्रभो, ज्यांनीं माझीं पोरें मारून टाकिलीं त्यांचा सत्यनाश कर." त्याच्या त्या किंकाळ्याच्या प्रतिध्वनीनें तो सर्व प्रदेश दणाणून गेला. मग ओरडणें बंद करून तो शेंपूट हालवीत स्तब्ध राहिला. तो जिकडे पहात होता तिकडेच संभाजीरावाची आंतून नजर गेली, तों दुसरा एक वाघ गुहेकडे धांवत येत आहे असें त्याच्या नजरेस पडलें.

**जोत्याजी**—महाराज, ही ह्या पोरांची खचीत आई आहे, वाघापेक्षां वाघिणीचा राग फार कठीण असतो. ही आतां काय करील कोण जाणे. हीं दोघें माघारीं जाईपर्यंत आपल्याला येथें स्वस्थ रामराम म्हणत बसलें पाहिजे. दुसरा इलाज नाहीं. पोरें मेलेलीं पाहून तिला येथें येण्याबरोबर दुःखाचा हुंदका येईल. तो स्थीर झाल्यावर तीं दोघें फार करून आपलीं पोरें दूर ओढून नेतील. मग आपण बाहेर पडण्याचा विचार करूं.

**संभाजीराव**—मला ह्या बंदीखान्याचा बोवा आतां तिटकारा येऊन गेला आहे. फार झालें तर आणखी एक घटिकाभर कळ सोसवेल. त्याच्या पलीकडे आपल्याच्यानें हा त्रास सोसवणार नाहीं. आंगांत त्राण आहे तोंपावेतों बाहेर पडण्याचा एकदां यत्न करून पाहावयाचाच असा माझा निश्चय झाला आहे.

**जोत्याजी**—ही वाघीण इकडे धांवत येत आहे. ती येऊन पोहोंचल्यावर तिचा कसा काय रागरंग आहे तो पाहून मग त्यासारखा पुढचा विचार करितां येईल. आतांच बाहेर पडून त्यांच्या आंगावर चालून जाऊं तर आमच्या तिघांच्याही येथच्या येथें गठड्या वळतील.

संभाजीराव जात्या हूड आणि उतावळा होता, पण जोत्याजीनें एखादी चांगली मसलत सांगितली म्हणजे ती तो कधीं कधीं घेत असे. तो चतुर आणि इमानी चाकर आहे अशी त्याची पुष्कळ वेळां खात्री झालेली होती. जोत्याजीनें वर सांगितल्याप्रमाणें मोडतें घातलें तेव्हां तो क्षणभर उगीच बसला.

आपल्या बचड्यांना भेटण्यासाठीं वाघीण झेंपावर झेंपा टाकीतच आली. पोरें तेथें पडलेलीं पाहून तिला मातृप्रेम उत्पन्न झालें. त्यांना तिनें आपल्या पंजानें इकडून तिकडे फिरवून पाहिलें, पण तीं नेहमींसारखीं धांवत येऊन हुंगीनात कीं, स्तनपान करीनात. तेव्हां तिची खात्री झाली कीं, तीं जिवंत नसून प्रेतें होऊन पडलीं आहेत.

मग तिचा शोकसंताप काय विचारावा? जवळच एक मोठें झाड होतें त्याजवर तिनें एकदम झांप घातली. त्याच्या बुंधाला पंजे मारमारून त्याजवरची सगळी साल तिनें नखांनीं ओरबडून काढिली. वाघाच्या गुरकण्याबरोबर तीही मोठ्यानें ओरडूं लागली. मग ज्या दरींत तिचीं पोरें होतीं तिकडे तिची नजर गेली. लागलीच तिकडे तिनें धांव मारली. तिचा सर्व अवडा फेंसाळून गेला होता. दरीची वाट आंतून बंद केलेली आहे असें पाहून ती अधिकच चवताळली. आणि तिच्या समीप जाऊन ती मागें पुढें घिरट्या घालूं लागली. पुढें दुसऱ्या एका झाडाशीं झोंबी खेळून त्याजवरची सालना साल तिनें ओरबडून काढिली. ह्याप्रमाणें वड्याचें तेल वांग्यावर काढून पुन्हां आंत जाण्याच्या रस्त्यावर शिळा बसविली होती. तिच्याशीं ती टकरा देऊं लागली.

हिचे इकडे असे चाळे चालत होते, त्या वेळेस मेलेल्या पोरांच्या मध्यभागीं वाघ आडवा पडला. आपले पुढचे दोन्ही

पाय त्यानें त्यांच्या आंगावर ठेविले, आणि कपाळ भुईला टें- कून हलक्या सुरानें तो विलाप करीत पडला. ज्यांनीं आपलीं बाळकें मारिलीं त्यांचा आपल्या हातून सूड घेणें होत नाहीं ह्मणून ती वाघीण अतिशय बेफाम झाली. मग थोडी शुद्धीवर येऊन ती पुन्हां वाघाजवळ गेली. पुन्हा तिनें तीं प्रेतें खालीं वर फिरवून पाहिलीं. मग त्यांची कांहीं आशा नाहीं असें पाहून तिनें एक पोर आपल्या तोंडांत धरून पलीकडच्या दाट जंग- लांत निघून गेली. लागलेंच दुसरें पोर होतें तें वाघानें आ- पल्या तोंडांत धरून तोही तिच्या पाठोपाठ निघून गेला. कांहीं वेळानें दूर गर्जना झालेली त्यांच्या कानावर आली. मग ही संधि बाहेर पडण्याला उत्तम आहे असा ते एकमेकांत विचार करूं लागले. ती त्यांचीं भवति न भवति व राजावरचें प्राण- संकट हीं आतां पुढच्या भागांत सांगूं.

---

## भाग ५.

"अति सर्वत्र वर्जयेत्."

दोन्हीं वाघ आपलीं मेलेलीं पोरें तोंडांत धरून रानांत नि- घून गेले. येथपर्यंत मागच्या भागांत सांगितलें ? पुढें.

जोत्याजी—आपल्यावर आलेलें संकट येथेंच संपलें असें समजूं नका. अझून मोठी भीति ती पुढेंच आहे. हें जनावर आपल्या मनांतला द्वेष कधीं विसरायाचें नाहीं. त्यांना पक्कें समजून चुकलें आहे कीं, आपल्या पोरांचे प्राण घेणारे ह्दे तोंडथें, ह्या दरींत बसलेले आहेत. ह्यासाठीं ही जागा तो सर्वांच्ते फार दूर जातील असें कधीं घडावयाचें नाहीं. आणि —हुशारीपुढें आमची माणसांची हुशारी रद्द आहे.

आह्मीं होऊन त्यांना आर्धीं डवचलें आहे खरें. आतां जें होणें असेल तें होईल.

**पिलाजी**–पण, जोत्याजीराव, त्यांच्या शब्दावरून ते फार दूर आहेत असें वाटतें. मग बाहेर निघून जाण्याला असे भिता कां ?

**जोत्याजी**–शब्दावरून ते दूर गेले आहेत असें वाटतें खरें, तरी मनांत आणतील तर ते आतां, ह्या पावलीं, ह्या ठिकाणीं, टेविले आहेत असें समजा. ह्या घातकी जनावराच्या काय काय खोडी आहेत त्या मला पक्या माहीत आहेत. त्यांनीं आतां तिकडे जाऊन काय केलें असेल तें सांगतों, ऐका. पोरें उचलून नेलीं तीं त्यांनीं एखाद्या झुडुपांत किंवा गवतांत ठेवून त्यांजवर त्यांनीं वाळलेल्या पानांचा ढीग करून ठेविला असेल आणि ते आतां आमचा वाटेनें तपास करीतच येत असतील. त्यांना दोन दोन कोसांवरून माणसाचा वास कळतो. त्या वासाच्या धोरणानें अमका मनुष्य अमकीकडे चालला आहे असें त्यांस टाम कळतें. त्यांना धुलकावणी देऊन आपण निसटून जाण्याची तर गोष्टच बोलावयास नको.

**संभाजीराव**–( उठून उभा राहून, हात पाय आंखडून गेले होते ते ताणून, झाडून साफ करून ) ते आमच्या आंगावर चालून येतील तर ह्या तलवारीची करामत मी आतांचे आतां त्यांस दाखवीन. ह्या कोंडमाऱ्यांत मात्र आतां बसून उपयोगी नाहीं. येथें धड उजेड नाहीं कीं, त्यांच्यावर दोन हात करूं ह्मटलें तर ऐसपैस जागाही नाहीं. येथें असेच बसून राहिलों तर कुजून कुजून मरण्याची मात्र पाळी येईल. बाहेर एकदां पडलों कीं, चोंहींकडे छानदार उजेड आणि

ऐसंपस खुली जागा आहे. आपल्या जिवाच्या बचावाला बाहेर ह्या दोन सोयी उत्तम आहेत. कां पिलाजी ? खरेंना ?

**पिलाजी मोतदार**—महाराज ह्मणतात तेंच उजू आहे. येथें बसून कांहीं आपला परिणाम ठीक दिसत नाहीं. दोन संकटें एकदम पुढें येऊन उभीं राहिलीं तर त्यांत थाकटें असेल तें पत्करावें; यांतच शहाणपण आहे. ह्या घटिकेला दोन्हीं वाघ पुष्कळ दूर गेले आहेत. हीं जनावरें मोठीं मात्रागमनी असतात, अशी त्यांची कीर्ति आहे खरी; तथापि आपलें नशीब बरें असेल तर अशांतूनही त्यांना झुकांडी देऊन आपण पार निघून जाऊं. आपण बाहेर पडावें हें चांगलें, महाराज.

**जोत्याजी**—ठीक आहे, माझीही ना नाहीं. बाहेर पडलों कीं भराभर डोंगर उतरून खालीं जाऊं. पण ज्या बाजूला ते वाघ गेले आहेत तो रस्ता सोडून दुसऱ्या रस्त्यानें आपण गेलें पाहिजे नाहीं तर आयतेच त्यांच्या तोंडांत ..र जाऊन पडूं.

**संभाजीराव**—पण आपणास जाण्याला मुद्दल दुसरा रस्ताच नाहीं. आणि जरी कदाचित् दुसरा रस्ता असला, आणि त्या रस्त्यानें आपण गेलों, तरी तूंच नुकतीच वाघाच्या सावधगिरीची गोष्ट सांगितलीस, ती खरी असली तर आपण कोणत्याही वाटेनें गेलों तरी फलश्रुति एकच होणार.

ह्याप्रमाणें बोलणें झाल्यावर दरीच्या तोंडाशीं जी शिळा होती ती त्यांनीं एकीकडे ढकलून दिली. आणि तिच्या अरुंद तोंडांतून संभाजीरावानें आपलें आंग जोरानें काढून घेऊन तो सर्वांच्या अगोदर बाहेर पडला. त्याच्या मागून जोत्याजी, आणि जोत्याजीच्या मागून पिलाजी, ह्याप्रमाणें तिघेही एका-

मागें एक बाहेर पडले. बाहेर येऊन पाहिलें तों कोणच्याच बाजूला वाघ नजरेस पडले नाहींत. तसेंच थोड्या वेळापूर्वी त्यांच्या गर्जनेचा प्रतिध्वनि सर्व डोंगरभर घुमत होता, तोही त्या वेळेस बंद पडला होता. मग ज्या झाडावर एसाजी दडून बसला होता त्या झाडापाशीं आल्यावर संभाजीराव म्हणाला, एसाजी, आतां खालीं उतर. पण तो झाडावर दिसेना. तेव्हां संभाजीराव हांसत हांसत ह्मणाला, "हा शेंदाडा शिपाई गांडीला पाय लावून केव्हांच पळून गेलासें वाटतें. त्याच्या रस्त्यावर वाघ आडवे येऊन त्यांनीं त्याला गांठलें असलें तर बहुधा त्यांनीं आपला सूड उगवून घेतलाच असेल. आणि त्यांची ह्याची भेट झाली नसली तर तीच पाळी आतां आह्मांस फेडावी लागेल. कांहीं चिंता नाहीं, आपल्या तलवारी नीट सांवरून धरा, आणि माझ्या मागोमाग चला."

**जोत्याजी**–एसाजी खचीत पार पडला. यांत अगदीं अंदेशा नाहीं. दरीच्या तोंडाशीं आह्मीं शिळा बसविली. पुढें पहिला वाघ येऊन तो तिच्याशीं झोंब्या खेळूं लागला. त्याच वेळेस त्याला झाडावरून खालीं उतरतांना मी आपल्या पळ्यांनीं पाहिलें. एसाजी लुच्चा खरा. त्याच्यासारखा भित्रा आणि त्याच्यासारखा वेळ प्रसंग ओळखणारा मी कधीं पाहिला नाहीं.

**संभाजीराव**–( हांसत हांसत ) वाघाची बुद्धि आणि वाघाचें शील कांहीं असें नसतें पण.

**जोत्याजी**–वाघाला असें शहाणपण नसेल. पण शहाण्या मनुष्याच्या बुद्धीची चतुराई मी सांगितली.

**संभाजीराव**–तर मग जोत्याजी, तुझ्या ह्या बोलण्यावरून तुझा धनी मूर्ख ठरतो. कारण एखादें संकट आलें तर

त्याला भिऊन आपला जीव वांचविण्याकरितां पळून जाण्याची हिकमत त्याच्या आंगीं नाहीं.

**जोत्याजी**--( अगदीं लवून मुजरा करून, हात जोडून, उभा रहातो ) पण महाराज, शिपाईगिरी आणि शहाणपण ह्या दोन गोष्टी अगदीं न्याऱ्या आहेत. शिपायाला शिपाईगिरी शोभते. तीच शहाण्याला साजत नाहीं.

**संभाजीराव**—तर मग जोत्याजी, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें आपले जीव वांचविण्यासाठीं आमच्यासारखे हूड शिपाई आहेत त्यांनीं वाघांच्या गर्दना खुशाल माराव्या. अगदीं मागें पुढें पाहूं नये. आणि शहाण्या लोकांना शिपाईगिरीची गरजच नाहीं, ह्मणून त्यांनीं आपल्या माना वाघांच्या जवड्यांत मुकाट्यानें द्याव्या आणि तुझ्या या वेदांतांत शिरून त्यांनीं आपल्या प्राणास मुकावें. हाच कीं नाहीं तुझ्या ह्मणण्याचा भाव.

ह्याजवर जोत्याजीनें थोडेसें हांसल्यासारखें करून अदबशीर रीतीनें मुजरा करून तो गप्प बसला. ह्यांत त्यानें असें दर्शविलें कीं आपण ह्मणतां तेंच खरें आहे. माझी आपल्या पुढें बोलण्याची ताकद नाहीं.

पुढें ज्या वाटेनें ते निघाले ती वाट अगदीं अरुंद आणि खचरट होती. दोन माणसें जोडीनें एकमेकांचा हात धरून जाण्यासारखीही नव्हती; ह्मणून तिघेही आंधळ्यांच्या माळकेसारखे चांचपडत चांचपडत एकामागें एक चालले. फार अवघड उतरण होती ती लवकरच संपली. तोंपर्यंत वाघांचा मागमूस नव्हता. बरें झालें, आपण येथपर्यंत तर पार पडलों, आतां पुढची बात पुढें, असें एकमेकांत बोलत आहेत इतक्यांत पाटीमागून पिलाजी मोतद्दारानें मोठ्यानें शीळ घालून

इशारा दिला. प्रथम संभाजीराव, त्याच्या मागून जोत्याजी, आणि सगळ्यांच्या पाठीमागें कांहीं अंतरावर पिलाजी, असा त्यांचा मार्गक्रम होता. पिलाजीची शीळ कानावर पडतांच दोघे जागच्या जागीं थबकून मागें वळून पाहूं लागले, तों त्यानें इशारा देण्याचें कारण लागलेंच त्यांच्या दृष्टीस पडलें. वाघोबा आणि त्यांची पट्टराणी हीं दोघें मोठ्या वेगानें डोंगराच्या बाजू बाजूनें खालीं उतरत होतीं. त्यांनीं आपले कान मागें पाडले होते, शेपट्या पिंजारल्या होत्या, आणि मधून मधून गर्जना करीत होतीं. ह्या सर्व निशाण्या धुस्शाच्या असून त्या स्पष्ट दिसत होत्या. पण करतात काय ? अझून खचरट वाट सरली नव्हती. ह्यामुळें त्यांना चुकवून दुसऱ्या रस्त्यानें जाण्याची तर मुळींच सवड नव्हती.

इकडे संभाजीरावानें म्यानांतून तलवार उपसली. त्यानें आपल्या दोघां सोबत्यांस मागें सारिलें. आणि सगळ्यांच्या पुढें होऊन वाघांच्या सामन्याची मोठ्या धैर्यानें वाट पहात उभा राहिला. वाघोबा कांहीं कदम पुढें होता आणि वाघीण त्याच्या मागें होती. उड्या मारीत मारीत वाघ सुमारें १५ हातांवर एकाएकीं येऊन थडकला. मग क्षणभर त्यानें थबकल्यासारखें केलें, नंतर खालीं बसल्यासारखें केलें, पुढें ५।४ हात जमीन पोटानेंच चालला, आणि पुन्हां किरण साधून विजली चमकल्यासारखें संभाजीरावाकडे त्यानें अकस्मात् उड्डाण केलें. इकडे तोही तयारच होता. त्यानें पाहिलें कीं ह्या स्वारीचा रोख विशेषेंकरून आपल्याकडे आहे. मग वीज कडाडल्यावेळीं जसें मनुष्य किंचित् बाजूला सरकतें, त्याप्रमाणें झट् उडी मारून एका बाजूला तो उभा राहिला. तलवारीचा हात वर उगारिलेला होताच. वाघाची उडी खालीं पडतांच, एक छान सफाईदार हात मोठ्या

जोरानें त्यानें त्याच्या थोबाडावर मारला. ज्या हातानें कैकवेळां कैक मस्त रेड्यांच्या गर्दना उडविल्या होत्या तो हात त्यानें ह्या वेळेस बाहेर काढला. त्या घायानें वाघाचा जबडा फुटून गळ्यालाही मोठी जखम झाली. तेव्हां वाघ घाबरा होऊन पुढें तोंडघशीं पडला, आणि कांहीं वेळ अंगाला अळोखे पिळोखे देऊन व गडबडा लोळून मरण पावला.

वाघाच्या मागच्या बाजूस कांहीं अंतरावर वाघीण बसली होती. संभाजीरावाची व त्याची झटापट चालली होती; तिचा परिणाम काय झाला तो पाहून ती मोठ्यानें गर्जना करून पुढें धांवली. वाघाच्या सामर्थ्यांतून संभाजीराव सावध झाला नाहीं तोंच ती त्याच्यापाशीं येऊन भिडली. त्याच्या छातीवर आपले पंजे ठेवून त्याची मानगुटी दांतांनीं फोडण्याचा तिचा विचार होता. पण संभाजीरावानें लागलाच तिचा गळा दाबून तिचा श्वासोच्छ्वास बंद केला, तिला त्यानें एका हाताच्या अंतरावर दूर राखून तिच्या मनांत जो बेत होता तो सिद्धीस जाऊं दिला नाहीं. तिनें आपल्या नखांनीं त्याची छाती ओरबडून रक्तबंबाळ केली. तरी तिचें डोकें त्यानें आपल्या अंगापासून दूर राखिलें होतें. हें धन्यावर जिवावरचें संकट आलेलें पाहतांच जोत्याजीनें वाघिणीच्या पाठीवर आपल्या तलवारीचा एक सडकून वार केला. त्याच्या तलवारीचें पान मुळचेंच पाणीदार, त्यांत तें नुकतेंच शिकल केलेलें, त्यांत आणखी आमच्या जोत्याजीसारख्या जोरदार मावळ्याचा तो सफाईदार हात ! मग काय पुसावें ? ‘ चमडा जाने कुत्ता जाने ’ अशी त्या वाघिणीची अवस्था झाली. पाठीला वार होताचि, संभाजीरावाला सोडून वार करणाराकडे ती रागानें वळूं लागली, तों तिला पाठमोरेंच वळतां येईना. वारानें पाठीचा कणाच तुटला. ह्यामुळें मागें वळून पुढें सरण्याचें

सामर्थ्यच तिच्या आंगीं राहिलें नाहीं. पुन्हां लागलाच तिच्या मस्तकावर जोत्याजीनें आणखी एक वार केला. त्याच्या मागोमाग पिलाजीनेंही त्याच ठिकाणीं एक वार केला. असे एकामागें एक घाव पडतांच ती घावरी होऊन खालीं पडली. मग आणखी कांहीं ठिकाणीं वार करून तिला त्यांनीं ठार मारून टाकलें. पण इकडे संभाजीरावाचा तिनें खरपुस समाचार घेतला होता. त्याच्या छातींत तिचीं नखें दोन दोन बोटें खोल रुपलीं होतीं. हाताला मोठी जखम झाली होती. त्याच्या छातींतून आणि हातांतून रक्त थबथबा गळत होतें. तरी तो मेलेल्या वाघांना पहात उभा राहिला. त्याच्या जखमा फार भयंकर होत्या. त्यांतून दोन तीन शेर रक्त गेलें असेल. ह्यांतून संभाजीराव पार पडतो कीं नाहीं अशी त्याच्या चाकरांना धास्ती वाटली.

पहाडांत रहाणाऱ्या मावळ्यांना झाडपाल्याच्या औषधांची चांगली माहिती असते. जरा इकडे तिकडे फिरून जोत्याजीनें दोन चार प्रकारचा पाला ओरवडून आणिला. तो एका चपटाळ्या शिळेवर त्यानें बारीक वाटला. आणि त्याचा त्यानें सर्व जखमांवर लेप बसविला. त्यानें रक्त वाहत होतें तें लागलेंच बंद पडलें. आग होत होती व वेदना होत होत्या, त्याही कांहीं कमी झाल्या. मग त्याला उन्हाचा त्रास होऊं नये ह्मणून त्या दोघांनीं त्याच्या डोक्यावर धरण्यासाठीं एक छत्र तयार केलें. तें असें. त्यांनीं एका वाघाचें चामडें सोलून काढिलें, जंगलांतले चार कळक आणून त्यांजवर तें बांधलें, व तें छत्रीसारखें त्याच्या डोक्यावर त्यांनीं धरलें. मग दोहींकडे दोघांचा हात धरून तो फरफटत फरफटत डोंगर उतरून खालीं आला.

डोंगराच्या पायथ्याशीं जाऊन पोहोंचल्यावर घोडे जेथें टा-

गबंदी केले होते तेथेंच ते उभे होते. घोड्यावर बसून जाण्याचें संभाजीरावाला सामर्थ्य नव्हतें; ह्मणून मागें राहिलेल्या सोबत्यांचा शोध काढीत काढीत पिलाजी मोतद्दार घोड्यावर बसून पुढें निघाला. एक दोन कोसांवर ते शिकार करीत होते. तेथें त्यांची व ह्याची गांठ पडली. त्या मंडळींत एसाजी फर्जंदही होता. पण इकडे डोंगरावर आपले सोबती मोठ्या संकटांत पडले होते, ही गोष्ट त्यानें दुसऱ्या सोबत्यांस बिलकूल कळूं दिली नव्हती. ती त्यानें अगदीं लपवून ठेविली होती. पिलाजीनें संभाजीरावाची अवस्था ह्या मंडळीस कळविली. तेव्हां एसाजीला केवळ हर्षवायु झाला. आतां आमचा हेतु लौकर पूर्ण होईल अशी त्याला आशा वाटली. त्याचा चेहेरा आनंदानें तजेलदार दिसूं लागला, आणि छाति भरून आली. पण तितक्यांत तो सावध होऊन पोटांत हर्ष उचंबळत होता तो त्यानें तेथच्या तेथें दाबून धरला. मग संभाजीरावाबद्दल थोडेंसें कळवळल्यासारखें करून तो इतर सोबत्यांबरोबर त्याजकडे येण्यास निघाला. तेथें ताज्या व्याघ्रचर्मावर राजपुत्राची स्वारी कण्हत कुंथत पडली होती. तरी एसाजी नजरेस पडतांच थोडेंसें हांसल्यासारखें करून,

**संभाजीराव**—एसाजी, हे माझ्या आंगावर ओरखडे कसले आहेत पाहिलेस का? तूं मजपेक्षां अक्कलवान खरा. तुझ्याप्रमाणें मीही एखाद्या झाडाच्या शेंड्यावर चढून बसतों तर आजचा हा माझा प्रसंग टळता. आतां ह्या जखमा बऱ्या होण्याला निदान महिना पंधरा दिवस तरी लागतील. तोंपर्यंत आपली शिकार बंद पडली. तरी त्याचेंही इतकें वाईट वाटत नाहीं. पण तुझ्या बहिणीच्या भेटीला अंतर पडेल. ह्याचें मला फार वाईट वाटतें. पण मी भेटल्याशिवाय कां रा-

हिलों याचें कारण तिला कळलें म्हणजे ती मजवर रागाव-णार नाहीं, अशी माझी खात्री आहे.

**एसाजी**–महाराज, जेथें सुख तेथें दुःख आहेच आहे. आपली अशी अवस्था झालेली ऐकून आपलीं जीं खऱ्या कळवळ्याचीं माणसें आहेत त्यांना वाईट वाटल्यावांचून कसें राहील?

**संभाजीराव**–तर मग तीं माणसें महामूर्ख आहेत असें मी समजतों. शिकारीच्या कामांत अशीं विघ्नें यावयाचींच. पण त्यांतून मी वांचलों हें तुम्ही सर्वांनीं सुख मानावें. वाघाच्या शिकारींत असलीं फुसकीं अरिष्टें आलीं. तथापि मी ह्यांतून बरा झालों म्हणजे शिकारीला मागें हटेन असें समजूं नका. पुन्हां कमर बांधून शिकारीला माझी तयारी आहेच.

मग तेथच्या तेथेंच त्यांनीं एक डोलीवजा वाहन तयार केलें. त्यांत त्यांनीं संभाजीरावाला निजविलें आणि आपण खांदा देऊन हळूहळू त्याला ते बापाकडे पुण्यास घेऊन गेले. त्याचा विश्वासु हुजऱ्या जोत्याजी केसकर डोलीबरोबर चालत होता. धन्याला तहान लागली कीं पाणी पुढें करावें, भूक म्हटली कीं खायाचें पुढें करावें, अशी त्यानें त्याची वाटेंत घरच्या माणसां-पेक्षांही ज्यास्ती बरदास्त ठेविली होती. इमानी चाकर आप-ल्या धन्याच्या जिवाला कसे काळजीनें जपतात ह्याचें हें एक ठळक उदाहरण आहे. झाडपाल्याच्या औषधानें संभाजीरा-वाला कांहींसा आराम वाटला होता खरा, तथापि जखमांतून रक्तस्राव फार झाला होता, ह्यामुळें मुक्कामाला येऊन पोंचला तेव्हां त्याला अगदीं थकल्यासारखें झालें होतें. आठपंधरा दिवस, घटिकेंत गुंज, घटिकेंत मासा, अशी त्याची नाजुक हालत झाली होती. ह्यामुळें सर्व लोक चिंताग्रस्त होते. परंतु पुढें हळूहळू दुखण्याचा जोर कमी होऊन त्याची प्रकृति दुरुस्त

होत चालली. शेवटीं त्यांतून तो निखालस बरा झाला. असो.

कामांधांना यापुढचें आख्यान अंजनरूपी होऊन ते आपली दृष्टि साफ करून घेतील तर आणखी काय पाहिजे?

---

## भाग ६.

"अधरेष्वमृतं हि योषितां हृदि हालाहलमेव केवलम्."

संभाजीराव शिकारीच्या दुखण्यांतून चांगला खडखडीत बरा झाल्यावर पुन्हा एसाजीच्या घरीं त्याच्या वहिणीसाठीं तो पूर्वींप्रमाणें खेपा घालूं लागला. तिची मूर्ति वारंवार त्याच्या मनांत घोळूं लागली. ती केव्हां वश होईल ह्याचा त्याला निजध्यास लागला. तिला पाहीन केव्हां, तिच्याशीं बोलेन केव्हां, तिच्याशीं हांसेन केव्हां, तिची एकांतांत गांठ घेईन केव्हां, हा रात्रंदिवस त्याला चाळा लागला.

तुळशीबाई पूर्वींच्या खेपेला त्याला वचन देऊन चुकली होती कीं, पुढच्या खेपेस मी तुमचा मनोरथ खचीत पुरवीन. तें वचन पुरें करून घेतल्याखेरीज हा आतां ऐकणार नाहीं असें तिला पक्कें दिसलें. दिलेलें वचन ह्यापुढें लांवणीवरही टाकतां येत नाहीं. कारण त्यांत आपली दगाबाजी दिसते. असा विचार करून तिचा पक्का निश्चय झाला कीं, आतां हें प्रकरण भिजत न ठेवितां कसें तरी लवकर निकालास लावावयाचें. ती वश होण्यासाठीं त्यानें जे जे प्रयत्न केले त्यांना ती उत्तेजनच देत गेली. कधीं आडफांटा आणिला नाहीं. ही तिची कृति आपला पुढचा हेतु सिद्धीस नेण्यासाठींच होती. ह्यानें माझ्या नवऱ्याला मारिलें आहे, तसेंच ज्यानें मला वरिलें होतें त्याचाही खुन केला आहे, ह्या गोष्टी माझ्या डोळ्यांपुढें रात्रंदिवस दिसत आहेत. अशा चांडाळाला देहांत प्रायश्चित्त

झाल्याचें हे डोळे कधीं पाहतील, अशी तिला उत्कट इच्छा झाली होती. ती तिनें कधीं सोडली नाहीं. ज्या व्रतासाठीं साध्वी स्त्रिया आपले प्राणही देण्यास तयार होतात, त्या व्रताव-रही पाणी सोडण्यास ती तयार झाली.

दौलतराव शिर्क्याचें व तिचें फार दिवसांपासून खरें प्रेम जडलें होतें. त्याच प्रीतीच्या कारणानें संभाजीरावाचा आकस धरून त्यानें आपला जीव धोक्यांत घालून घेतला. संभाजी-रावाच्या अंगसामर्थ्याची व शौर्याची ख्याति सर्व राज्यांत अ-गोदरच पसरली होती. बाहुबलांत त्याच्यासारखा तोच एक आहे असें झालें होतें. तेव्हां दौलतरावाच्या मनांत संभाजी-रावाविषयीं विशेष चुरस नसती तर तो हट्टानें त्याच्या वाटेस जाताना. परंतु तिच्या प्रेमाखातर त्यानें आपला प्राण धो-क्यांत घालून घेतला. ह्याप्रमाणें संभाजीरावानें तिच्या एका ज-खमेवर आणखीही एक दुसरी जखम केली. मग तिचा द्वेषा-ग्नि अधिकच पेटला. लौकिकांत अब्रू गेली तरी चिंता नाहीं. ह्याला मजविषयीं कामवासना उत्पन्न झाली आहे, ही त्याची इच्छा पूर्ण करून त्याच मार्गानें भावाचा व माझा फार दिव-सांचा सूड उगवीन. एक हेतु तडीस जाण्यासाठीं कितीही नुक-सान झालें तरी हरकत नाहीं, असा तिचा निश्चय झाला. पुढें तिची व तिच्या भावाची गांठ पडून दोघांचा संवाद झाला तो असा:—

**तुळशीबाई**—दादा, आपल्या दुस्मानाच्या दंडाला किंवा ग-ळ्यांत कोणी भारलेली पेटी किंवा ताईत तर बांधला नसे-लना ? त्याच्या आंगावर नाहीं तलवार चालत, कीं नाहीं वाघाचें बळ चालत. त्याच्यावर कितीही अरिष्टें आलीं तरी तीं प्रल्हादासारखीं आपोआप नाहींशीं होतात. कां-हीं उपाय चालत नाहीं. कसें करावें ?

**एसाजी**—ताई, अशी उतावळी होऊं नको. वेळ सर्वांना आहेच. त्याचीही वेळ केव्हां तरी येईल. चिंता करूं नको.

**तुळशीबाई**—हा तुझा पाढा वर्षोनवर्ष चाललाच आहे. तरी त्याच्या केंसाला सुद्धां धक्का लागत नाहीं. सारे लोक त्याच्यापुढें दंडवत घालतात. आतां ह्या धूड राक्षसाला मारून टाकण्याला उपाय तरी कोणता योजावा? हा बाहेरच्या बाहेर उलथून जावा ह्मणून देवांला मी कैक नवस सुद्धां केले. पण अजून एकही देव पावत नाहीं. ह्या कलियुगांत देवांतला देवपणा देखील नाहींसा झाला!

**एसाजी**—ताई, उतावळीनें असलीं कामें होत नसतात. पाण्याचा एक एक थेंब रोज पडत असला तर मोठा गगनाला पोहोंचलेला पहाड देखील झिजून कांहीं दिवसांनीं तेथें खड्डे पडतात. मग हा तर हाडामासाचा गोळा आहे. ह्याचा चोळामोळा करण्याला उशीर किती लागणार आहे?

**तुळशीबाई**—पण दादा, आपण आतां अशा माशा मारीत किती दिवस बसावें? ह्या चांडाळाचा लवकर निकाल लागण्यासारखा कांहीं उपाय असेल तर सांग. मला तो दुष्ट चांडाळ दृष्टीसमोर नकोसा झाला आहे.

**एसाजी**—एक उपाय मला सुचतो. ताई, तुझ्यावर त्यानें वाईट नजर ठेविली आहे, तूं त्याला फार आवडली—(हें बोलणें पुरें झालें नाहीं तोंच).

**तुळशीबाई**—ह्मणून त्यानें तो नाहींसा होतो कीं काय?

**एसाजी**—त्यामुळें तो मरत नाहीं हें खरें. पण त्यांत एक खुबी आहे. तुला तो आवडत नसला तरी बाहेरून त्याच्याशीं तूं सख्य ठेव. तुझें त्याच्यावर वरकांती प्रेम आणि

त्याची तुझ्यावरची खरी प्रीति ह्यांतच आपलें काम फत्ते होणार आहे, समजलीस? पण ह्या कामासाठीं तुला आपलें सर्वस्व अर्पण करण्यास तयार झालें पाहिजे. ही गोष्ट तुला कबूल असली तर या कामांत हात घाल. नाहीं तर पुन्हां त्याचें नांवसुद्धां घेऊं नको आणि मीही असाच चालता होतों.

**तुळशीबाई**—दादा, मी मनांतून त्याचा हवा तितका तिटकारा केला, तरी माझ्या नुसत्या पुळपुळीत द्वेषानें त्याचें काय होणार आहे? मी मात्र जन्मभर आपल्या तोंडाला काजळ फांसून घेतल्यासारखें होईल, तो डाग मग कधीं निघावयाचा नाहीं. परीटघडीला बिब्याची फुली मारल्यासारखें होईल.

**एसाजी**—असें कां म्हणतेस, ताई? तोच द्वेषभाव उरांत जंबिया भोसकतांना हाताला पाहिजे तेवढा जोर आणितो. हा कां त्या द्वेषाचा लहान प्रताप आहे?

**तुळशीबाई**—तर मग तुझ्या विचारास असें येतें म्हणेनास कीं, मी त्याला सर्वस्वीं वश होऊन त्याची कामवासना देखील तृप्त करावी. पण दादा, तूंच पहा. मनलज्जा व जनलज्जा एकीकडे ठेवून त्याच्याशीं असलें पापकर्म करण्याला धाडस तरी कसें करावें?

**एसाजी**—ताई, हें काय म्हणतेस? ह्या चांडाळाला नाहींसा करण्यासाठीं हवा तो उद्योग केला पाहिजे. ह्या कामासाठीं अब्रूचें, पैशाचें, जिवाचें, किंवा कसलेंही नुकसान असो, तें आम्ही सोसलेंच पाहिजे. माझी लाखो, कोट्यवधि रुपयांची अब्रू असली तरी ज्यानें आमच्या बापाचा अंत केला आणि तुझ्या आवडत्या नवऱ्याला मारून टाकि-

लें, त्या दुष्टाचा घात होण्यासाठीं माझ्या सगळ्या अब्रूवर लाथ मारण्यास मी आज तयार आहें. तूं हिरोजीची खरी लेंक असलीस तर तूंही ह्या वेळेस मागें हटणार नाहींस.

**तुळशीबाई**—दादा, तर मग माझ्या नांवाचा जगभर डंका वाजला तरी तुला ती गोष्ट कबुल आहे असें म्हणेनास? मध्यें पडदा कशाला ठेवतोस?

**एसाजी**—अब्रू किंवा बेअब्रू ह्या ज्याच्या त्याच्या समजुतीच्या गोष्टी आहेत. एखाद्याजवळ संपत्ति पुष्कळ असली म्हणजे तो कसा वागत असला तरी त्याला लोकांत लोडाशीं जागा मिळते! आणि जो अगदीं शास्त्राप्रमाणें वागत असतो त्याला कोणी पायपोसाजवळ सुद्धां उभें राहूं देत नाहीं! त्याला दरोडेखोरापेक्षांही नीच समजतात! त्याला कोणी मूठभर भिक्षा सुद्धां घालीत नाहीं! हीच रीत बायकांमध्येंही आढळते. असल्या अब्रूला उराशीं धरून ही काय आपल्या कामीं पडणार आहे? ज्याच्या पोटीं आपण जन्म घेतला त्याचा आत्मा तिकडे सदा तळमळत असेल. त्याच्यासाठीं आपण झटलों तर जन्माचें सार्थक्य तरी झालें. ज्यानें आमच्या बाबाचा विनाकारण प्राण घेतला त्याचें तुझ्या हातून टाळकें फुटलें तर तूं बापाच्या ऋणांतून तरी मुक्त होशील, आणि मागें तुझी अखंड कीर्ति राहील. ही अब्रू काय थोडी आहे?

**तुळशीबाई**--ठीक आहे, दादा. ह्या कृत्यासाठीं माझें सर्वस्व दान करण्यास मी आपलें मन घट्ट केलें. आतां निकाल मात्र लवकर लागला पाहिजे. तरी, दादा, ज्या माणसावर आपलें खरें प्रेम नसतें, त्याच्यावर प्रीति आहे असें दाख-

विणें मोठें जिवावर येतें. असल्या माणसानें गळ्यांत हात घातला म्हणजे तो सहन तरी कसा करावा ?

**एसाजी**–एखादा असाध्य रोग झाला म्हणजे तो बरा होण्यासाठीं आपण कडुजहर व घाणेरडीं औषधें घेतों कीं नाहीं बरें ? तसेंच ह्या जालीम उपायानें आपल्या मनांतला रोग नाहींसा झाला म्हणजे ह्यापरता दुसरा लाभ तो आपल्याला कोणता पाहिजे ? त्यांत सर्व कांहीं पोंचल्यासारखें झालें.

**तुळशीबाई**–पण दादा, वाटेंत रसरशीत निखारे पसरून त्यांजवरून एखाद्याला स्वर्गलोकचें सुख दाखविण्यासाठीं चालावयास लावावें. त्यासारखें हें काम अवघड आहे.

**एसाजी**–पण, ह्या दिव्यांतून पार पडून एकदां स्वर्गलोकचें सुख हातीं लागलें म्हणजे पुढें दुःखच नाहीं. तेथें आनंदाशिवाय दुसरा पदार्थच नाहीं. आणखी ह्याहून अधिक तें काय पाहिजे ?

**तुळशीबाई**–तें सगळें राहूं दे. आतां आपण जो खेळ मांडणार आहों त्यांत तूं कोणत्या सोंगाची वतावणी करणार, तें सांग ?

**एसाजी**–( मिशीवर हात ठेवून ) ताई, तशी खाशी संधि मात्र तूं जुळवून आण. त्याच्या काळजाच्या गड्यामध्यें जंबिया खुपसण्याचें काम मग मजकडे लागलें. पण ह्या कानाची गोष्ट ह्या कानाला कळणार नाहीं, अशा गुप्त ठिकाणीं मात्र हें कृत्य झालें पाहिजे

**तुळशीबाई**–कबूल. तें माझ्याकडे लागलें. ह्या चांडाळाचा आम्हीं सूड घेतों कीं नाहीं हें पाहत आमचे बाबा वर उभे राहिले असतील. त्यांची वासना पूर्ण झाल्याखेरीज त्यांना तिकडे गति नाहीं. त्यांच्या उद्धारापेक्षां माझी अब्रू ती

काय ? अजपावेतों जी अब्रू जिवाच्या पलीकडे जतन क-रून ठेविली होती, तिजवर माझ्या बापासाठीं मीं आज पाणी सोडिलें असें समज.

ह्याप्रमाणें एसाजी व तुळशीबाई ह्यांचा बेत ठरला. त्यांच्या त्या दुष्ट कटाला दोन मुसलमान असामी साथिदार मिळाले. त्यांची कथा अगोदर थोडक्यांत येथें सांगतों. ह्मणजे पुढचा कथासंदर्भ नीट लागेल.

दिल्लीचा बादशाहा औरंगजेब ह्यानें शिवाजीराव व त्याचें राज्य ह्यांचा नाश करण्याचा पुष्कळ दिवसांपासून उद्योग चालविला होता. परंतु त्या कामांत त्याला यश आलें नव्हतें. त्यानें त्याजवर जे जे सरदार पाठविले त्या सर्वांचा पराभव होऊन ते रडगाणें गात त्याजकडे परत गेले. शिवाजीराव दिवसानुदिवस बळावत चालला. ह्यामुळें औरंगजेबास मोठी चिंता लागली. त्यानें मग त्याच्या राज्यांत आंतून फंद फितूर करण्याची मसलत केली. त्याच्या पदरीं तकरीबखान ह्मणून एक पठाण सरदार होता. त्याला बोलावून त्याजकडे हें काम त्यानें सोंपविलें. शिवाजीरावाच्या राज्यांत, दरबारांत, व कुटुंबांत जीं गृहच्छिद्रें असतील तीं शोधून काढावीं; त्याचे दुस्मान असतील त्यांस सामील करून घ्यावें; आणि त्यांच्या द्वारें त्यांच्या कुटुंबाचा नाश करावा अगर साधल्यास जे हातीं लागतील त्यांस जिवंत धरून आणावें; ह्या कामासाठीं जो खर्च लागेल तो सरकारांतून मिळेल, पण यश घेऊन परत या॰ वायकं॰ फत्ते झाल्यास तुम्हांस वंशपरंपरेची एक जहागीर

पण त्याअसें आश्वासन देऊन व त्याला मोठमोठ्या आशा समजलें होतें.दक्षणेकडे खानाची रवानगी केली. ' तकरीब-लुच्चेगिरीचें अ॰बरोबर कांहीं हुशार हुशार लोक घेतले.

त्याचा मुलगा इखलासखान ह्या नांवाचा होता. तोही त्यानें आपल्याबरोबर घेतला. मग वेषांतरानें शिवाजीरावाच्या राज्यांत ते पितापुत्र फिरत होते. ह्याप्रमाणें बरेच दिवस लोटले तरी तो ज्या कामासाठीं विडा उचलून निघाला होता त्याचा कांहींच लाग बसेना. शिवाजीरावाच्या राज्यांत बंदोबस्त उत्तम प्रकारचा. त्याच्या लोकांमध्यें एकी मोठी. त्याचे लष्करी लोक इमानी व शूर. राज्यांत रयतेला त्रास कोणत्याही प्रकारचा नाहीं. न्याय मनसुबा उत्तम. कामगार लोक आपआपल्या कामीं दक्ष व हुशार. अशा स्थितींत त्याच्या सर्व प्रजेला आम्हीं केवळ रामराज्यांत आहों असें वाटत होतें. अशा राज्यांत शत्रूचा रिगाव कसा होणार ? तकरीबखान व त्याचे सोबती नाना वेषांनीं त्याचे राज्यांत हिंडत होते. तरी त्यांला लभ्यांश तिळप्राय झाला नव्हता. विडा उचलून निघाल्यासारखी कांहीं तरी शिकार साधली पाहिजे, नाहीं तर बादशाहाची मर्जी खप्पा राहील, ह्मणून तकरीबखानानें शिवाजीरावाच्या कुटुंबांत कांहीं गृहछिद्रें पाडण्याचा उद्योग चालविला. संभाजीरावाच्या अप्रयोजक वागणुकीमुळें त्या उद्योगांत त्याला थोडेंसें यश येईल असें वाटलें. तरी शिवाजीराव जिवंत होता तोंपर्यंत त्याचा हात साधला नाहीं. असें पुढच्या हकीकतीवरून वाचकांच्या सहज ध्यानांत येईल.

एसाजी संभाजीरावाचा हितशत्रु आहे व तो त्याचा आंतून द्वेष करितो, अशी तकरीबखानाला बातमी लागली. तेव्हां एसाजीशीं त्यानें परिचय केला. दोघांचा पुढचा हे चांडाळच-सल्यामुळें त्या उभयतांमध्यें लागलीच मैत्री जडली. याबा वर उभे प्रसंग गुजरला तरी कोणी कोणास सोडूं नये. खेरीज त्यांना आणा शपथा झाल्या. शेवटीं संभाजीरावाला ' माझी अब्रू ती

मांत भाऊबहिणींचा कट झाला होता त्यांत तेही सामील झाले. एकाचे दोघे वैरी असले ह्मणजे त्या दोघांची जातपात निराळी असली तरी ते सहज मित्र होतात. अशी जगांत चालच आहे. तीस अनुसरून दादीशेंडीची ह्या वेळेस अशा रीतीनें एकी झाली.

इकडे आंतून असा आपल्याला दगा करण्याचा घाट चालल्याचें वर्तमान संभाजीरावाला मुळींच कळलें नव्हतें. तो नेहमीं सारखा सर्वांशीं निष्कपटपणानें वागत होता. तो दुखण्यांतून बरा झाल्यावर त्याच्या मनाला स्वारीशिकारीचा दुसरा वेध नाहींसा झाला, ह्मणून पुन्हां त्याचें मन तुळशीबाईकडे वळलें. जसें माझें प्रेम तिच्यावर आहे तशीच तिचीही मजवर खरी प्रीति आहे, अशा समजुतीनें त्यानें वरचेवर तिच्या घरीं जाणें येणें ठेविलें. तिच्या दिमतीला त्यानें पहिल्यापेक्षां ज्यास्ती माणसें ठेविलीं. मग त्याचा बहुतेक वेळ तिच्याच घरीं जाऊं लागला. तिच्याशिवाय त्याला क्षणभर गमेनासें झालें. तिनें त्याला ह्यापुढें दारूची अधिकच चट लावून दिली. दारूच्या अमलांत तो हमेषा धुंद असे. त्याला वाटे कीं मी हिच्या जिवाचा केवळ कलिजा आहें. मी इचा देव आहें. ती जितकी मला भजते इतकी खऱ्या देवाला देखील भजत नसेल. याप्रमाणें तिनें आपल्या मोहनास्त्रानें त्या शंभूला किंवा शंभूच्या पुढच्याला अगदीं मारून टाकिलें. तो चार चार आठ आठ दिवस तिच्याच घरीं राहूं लागला. त्याला आपल्या आईबापांचें व बायकोचें स्मरणही नाहींसें होत चाललें.

पण त्यांतलें सगळें वर्मकर्म जोत्याजी केसकराला मात्र पुरें समजलें होतें. ही त्याच्यावर जें प्रेम दाखविते तें खरें नसून लुच्चेगिरीचें आहे, असा त्याच्या पोटांत पुरा वहीम येऊन च-

केला होता. त्याच्या धन्याच्या जिवाला खचित घात करण्याचा हिचा घाट आहे अशी जरी त्याला खात्रीलायक कुणकुण लागली नव्हती, तरी तो त्याला वारंवार जागा करूं लागला कीं, "महाराज, ही फार वाईट चालीची बायको आहे. हिची आपण संगत सोडा. हिचें लाघवी प्रेम पाहून आपल्याला भुरळ पडली आहे. पण पुढें ह्याचा आपल्याला पस्तावा होईल. आपण खचीत फसाल असा माझा होरा आहे. हा माझा बोल फोल आहे असें समजून टाकूं नका. हुशारीनें रहा." हें त्या इमानी चाकराचें सांगणें त्याला विषासमान कडू लागलें. त्यानें तें बोलणें उलटें हशावारी नेलें, आणि उगीच बसला. तरी जोत्याजीची स्वामिनिष्ठा एक तिळभरही ढळली नाहीं. तो इतकेंच समजला कीं ह्या कावेबाज सटवीनें ह्या भोळ्या सांभाला पक्की भुरळ घातली आहे. मग तो आपल्या धन्याच्या जिवाला अतिशय जपूं लागला. ह्यांत त्यानें असें दर्शविलें कीं धन्याचा जीव आणि माझा जीव दोन नाहींत, एकच आहेत. ह्याचें नांव खरी स्वामिनिष्ठा! नाहीं तर "शितें जंवर तीं भुतें भोंवतीं कोण कुणाचा सखा जिवा" हा स्वहिताचा सवदा दुनयेमध्यें नेहमीं चाललाच आहे! त्यांत आपण लक्ष देऊन पाहण्यासारखें कांहींच नाहीं! असो. हा स्त्रीपुरुषांचा जोडा नित्याप्रमाणें क्रीडामंदिरांमध्यें रतिसंग्रामांत निमग्न असतां एक दिवस संभाजीरावानें तिला पुसलें.—

**संभाजी**–( गळ्यांत हात घालून व हनुवटीला हात लावून ) लाडके, तुला आज एक नाजुक गोष्ट पुसावयाची आहे. रागाऊं नको. तुझी माझ्यावर खरी प्रीति आहे असें माझ्या दिलाला वाटतें, तें खरें कीं खोटें? एवढ्याचा मला जबाब दे.

**तुळशीबाई**–हा काय बाई चमत्कार. आजपावेतों मला असें

कधीं वेडेंवांकडें विचारिल्याचें आठवत नाहीं. नी, आजच मेलें अशी कांक्षा घेऊन पुसतां कां? ह्याचें मला अगोदर गूढ वाटतें.

**संभाजी**—इकडे बघ. हा कांहीं विचारिल्या प्रश्नाचा सरळ जबाब झाला नाहीं. खरें कीं खोटें ह्या दोहोंतून एक काय तें मला उत्तर दे.

**तुळशीबाई**—( थोडीशी क्रुद्ध मुद्रा करून ) पण माझ्या प्रीतीची आपल्या मनांत कांक्षा कां आली तें मलाही समजून घेणें भाग आहे. खरेंच पुसतें. आपल्याला माझ्या गळ्याची शपथ आहे. असा वहीम धरायाला मजकडून कोणतें वांकडें पाऊल पडलें, हें मला खुलें मन करून सांगायाला पाहिजे.

**संभाजीराव**—छे, ग, तसें कांहीं नाहीं. आपलें उगीच पुसावेंसें वाटलें ह्मणून पुसलें. इतकेंच. दुसरें कारणाविरण कांहीं नाहीं.

**तुळशीबाई**—( पुन्हां रागावल्यासारखें करून ) तर मग भलभलतेच वहीम मनांत धरून, पुरुषांनीं बायकांची हेटाळणी करावी हें बरें दिसतें का? खचीत कोणी तरी माझ्या दुष्टाव्यावर आहे. त्या मेल्याला आमची दोघांची प्रीति देखूं सकत नाहीं. म्हणून त्यानें आम्हां दोघांमध्यें ही वितुष्ट पाडण्याची खटपट केली आहे. असा कोण मेला चांडाळ असेल त्याचें नांव मला कळलेंच पाहिजे. नाहीं तर मी येथच्या येथें प्राण देईन.

**संभाजीराव**—( पोटाशीं धरून ) लाडके, हें काय बरें? असा भलताच छंद घेतला म्हणजे ह्याला काय म्हणावें. तुला दुस्मान कोण असणार आहे? तुझ्याविषयीं कोणी कांहीं

मला सांगितलें तरी मी खरें मानीन असें तुला तरी वाटतें का ?

तुळशीबाई–( डोळ्यांला पाणी आणून स्फुंदत स्फुंदत ) शेळी जाते जिवानिशी, नी, खाणार म्हणतो वातड. असें आमचें बायकांचें निलाजरें जिणें आहे. त्यांनीं पुरुषांसाठीं आपले जीव पाखड पाखड पाखडावे. तरी त्यांच्या कंबरेंत पुरुषांच्या लाथा आहेतच. अशा जिण्यानें जगण्यापेक्षां, देवा, मरण देशील तर बरें. असें झालें तर सोन्यापेक्षां पिंवळें होईल. ज्याच्यासाठीं मी लोकांमध्यें आपल्या जन्माचा इतका धिंडवडा करून घेतला, सर्वस्वीं नागवून घेतलें, आणि आपल्या कुळागोतास मुकलें, त्याच्याच कडून जर असा माझा पाणउतारा होऊं लागला, तर जगून तरी काय सुख आहे ? सुकुमार फूल उन्हाच्या तिरपीनें कोमेजून जातें, मग तें वाऱ्यापावसाच्या लहानशा धक्यानेंही गळून पटतें. अशीच प्रीतीची गोष्ट आहे. ती कुड्याभावानें कमी होते. आणि मनांत संशय खात असला म्हणजे त्यानें ती सहज करपून जाते. जेथें दोघांचें मन एक आणि एकमेकांचा एकमेकांवर पुरा भरंवसा तेथेंच ती चांगली नांदून दोघांनाही सुख देते. असें तिनें पुष्कळ मानभावी टीका करून सांगितलें. तेव्हां माझ्यावर हिची प्रीति खरी आहे अशी त्याची खात्री झाली. त्याच्या मनांत तिच्या प्रीतीविषयीं जरा किंतु आला होता तो दूर झाला. आणि तिचें त्याचें पहिल्यासारखें मेतकूट जमलें. तें इतकें कीं तिच्या संगतीनें तो अधिकच बेहोष होत चालला.

वाचकहो, आमच्या संभाजीरावाचा अधःपात करणारें दुसरें एक पात्र आतां रंगभूमीवर येणार आहे, तिकडे अवधान असूं द्या.

---

# भाग ७.

" अनुकूलेऽपि कलत्रे नीचः परदारलंपटो भवति.

पुण्यांत एक कलिपुरुष येऊन राहिला. तो मथुरावृंदावनाकडचा रहाणारा असून जातीचा कनोजा ब्राह्मण होता. त्याचें नांव कलुषा कवजी. तो शाक्त ह्मणजे शक्तिउपासक होता. अवघी मंत्रशास्त्रविद्या मला अवगत आहे, तिच्या सामर्थ्यानें मी पाहिजे ती करामत करूं शकतों, असें त्यानें पुण्यांत ढोंग माजविलें, त्याची स्त्री होती, तीही लोकांची मनधरणी करण्यांत मोठी चतुर असे. त्याच्या घरीं मद्यमांसाचा यथेच्छ आहारविहार चालत होता. वशीकरण, यशःप्राप्ति, राज्यवृद्धि, विपुलसंपत्ति, इत्यादि सौख्यें कवजी आपल्या मंत्रसामर्थ्यानें देतात अशा कंड्या संभाजीरावाचे कानीं आल्या. राव ते काय रावच! 'आधींच तारें आणि त्यांत शिरलें वारें' अशी त्यांची अवस्था झाली. संभाजीराव त्याच्या नादीं लागला. कवजीच्या घरीं रोज मद्यमांसाचीं हवनें चालली होतीं. ताजे रेडे मारून त्यांच्या ओल्या कातड्यावर बसून तो अनुष्ठानें करीत असे. त्याच्या घरीं मनमुराद मद्यपान करून संभाजीराव तुळशीबाईच्या घरीं जाऊन पडे. कोणी हितबुद्धि शिकविली असतां त्याला तो मारावयास धांवे. शेवटीं सुज्ञ लोकांनीं त्याला सांगण्याचेंच सोडून दिलें.

संभाजीरावाची पत्नी येसुबाई. तिची व त्याची एकांतीं गांठ पडली ह्मणजे तिचा तो नाहक छळ करी. त्यानें तिच्याशीं कधीं मोकळ्यामनानें बोलूं नये, तिला शिव्या द्यावा, व सदा तिच्यावर रागानें फणफणत असावें. तिनें एखादी युक्तीची किंवा सोईची गोष्ट सांगितली असतां त्याचा भलताच

अर्थ करून नाहीं नाहीं ते तिच्यावर आरोप घ्यावे. ह्यामुळें ती साध्वी नेहमीं मनांतल्या मनांत खजील असे. संभाजीराव तिच्याशीं अशा रीतीनें वागण्याचें कारण इतकेंच कीं, तुळशीचें आचरण जसें शुद्ध नव्हतें, तसें हिचेंही आंतलें आचरण शुद्ध नसेल, ही आंतून दुसऱ्याकडे पापदृष्टीनें पाहत असेल, अशा संशयानें त्याचें मन गढूळ होऊन गेलें होतें. तें हिच्याविषयीं शुद्ध नव्हतें. म्हणच आहे कीं, 'फराळानें जेवणाचें मातेरें, आणि नवऱ्याच्या बाहेरख्यालीनें बायकोचें मातेरें.' तसें झालें होतें.

प्रिय वाचकहो, इतर स्त्रीपुरुषांची गोष्ट कशीही असो, पण विवाहरज्जूनें बद्ध झालेल्या दंपत्यामध्यें निष्कपट प्रेम, ऐक्यभाव, सौजन्य, इत्यादि सद्गुण अवश्य असले पाहिजेत. ह्या परस्परांचा संबंध एकमेकांच्या सुखवृद्धीस व दुःखनिवृत्तीस साह्यभूत होतो. एकाचें सुख किंवा दुःख दुसऱ्याच्या सुखावर किंवा दुःखावर अवलंबून असतें. ह्यासाठीं विवाहित स्त्रीपुरुषांनीं एकमेकांशीं संसारांत गोडीगुलाबीनें रहावें. पण तसा प्रकार पुष्कळ ठिकाणीं आढळत नाहीं. प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव भिन्न असल्यामुळें ह्या जगांत अनंत तऱ्हा आणि अनंत मासले दृष्टीस पडतात. दोघांचे स्वभाव एकमेकांशीं मिळते नसतात; ह्यामुळें ह्यांच्यामध्यें विळ्याभोपळ्या इतकें सरळ असतें. बहुतेक कुटुंबामध्यें, कज्जा, कफावती, फंद, फितूर, दरोडे, ,वंचकपणा, लूट, लाट, हे प्रकार आढळतात. आतां नेहेमीं एकाच पक्षाचा वांक असतो आणि दुसऱ्याचा नसतो, असें ह्मणतां येत नाहीं. कधीं त्याची आगळीक असते, आणि कधीं तिच्याकडून मर्यादोल्लंघन झालेलें असतें. एवंच, ही उभयतांतली फुटाफूट संसारसुखाला

पुष्कळ हरकत करते. ही गोष्ट तर निर्विवाद आहे. संस्कृतांत एक वाक्य आहे कीं, 'न भार्यायाः परं सुखं' म्हणजे भार्येपरतें दुसरें सुख नाहीं. खरोखर, सुदैवानें सुख लागण्यासारखेंच एकाद्याला उत्तम स्त्रीरत्न मिळालेलें असतें; परंतु कांहीं स्त्रियांचें साहस व पापाचरण पाहून त्याला आपल्या स्त्रीचाही अंदेशा उत्पन्न होतो. आणि तारुण्याच्या भरांत बायका काय करतील ह्याचा नेम नाहीं, अशा वहिमानें त्याचें मन कलुषित होऊन जातें. मग तिचें आचरण परिटघडीसारखें अगदीं स्वच्छ असलें तरी तो तिचा विनाकारण छल करूं लागतो. तो आपल्या मनाला नसतें दुःख लावून घेतो. जिला सुखाचें भांडार असें ह्मटलें आहे तीच स्त्री दुःखाला मूळ आहेशी त्याला भासते. ती तरुणी, बाहेरून जशी सुंदर, सुशील व निर्दोष दिसते तशी अंतर्यामीं असेल का? ह्या प्रश्नाच्या उलगड्यांत त्याचें मन भ्रमण करीत असतें. या त्याच्या मूर्खपणास काय ह्मणावें? ती, शहाणी, मर्यादशील, समजुतदार आणि पापभीरु असली ह्मणजे बस आहे. ह्याहून तिनें अधिक चांगलें तें कसें असावें? हिरा तेजदार, वजनदार, आणि कठीण असला म्हणजे बस नाहीं का? त्याची खरी परीक्षा पाड्यावरवंट्याशिवाय होतच नाहीं कीं काय? तो जरी त्या दिव्यांतून पार पडला तरी त्याची मूळ किंमत वाढते असें नाहीं. पण तो जर कदाचित् भंगला तर त्याला त्याचा मालक मात्र मुकतो. त्याचप्रमाणें स्त्रीचा व्यर्थ छल केला असतां ती ज्यास्ती कसोटीला लागते असा अर्थ नाहीं; परंतु ह्याच्या मूर्खपणानें ती जर कदाचित् आपल्या पातिव्रत्यापासून च्युत झाली तर ह्यानें मात्र आपल्या पायांवर आपणच दगड मारून घेतल्यासारखा परिणाम होतो. त्याला मग लोकांत तोंड दाखविण्यासही जागा उरत नाहीं.

तिची लौकिकी वर्तणूक चांगली असतां दुराग्रहानें त्यानें तिच्याविषयीं व्यर्थ विपरीत कल्पना कां बरें करावी ?

विवाहित स्त्रीपुरुषांचा असा कांहीं संबंध आहे कीं, दोघांतून एकाची मानहानि झाली असतां किंवा एकाला सुखदुःख झालें असतां त्यांत दुसऱ्याला वांटेकरी व्हावें लागतें. दोघांचे देह भिन्न असले तरी त्यांच्या सुखदुःखांचीं सूत्रें एकमेकांत गुरफटलेलीं असतात. पायांच्या तळव्याला कांटा बोंचतो, आणि तेथून साडेतीन हात उंचीवर मस्तक असतें, तरी त्याला लागलीच तिडीक पोहोंचते. तशी दंपत्यांपैकीं एकाच्या दुष्कर्मानें दुसऱ्याच्या देहांत व्यथा होते; व झाली पाहिजे. एकाचें मन खुषींत असलें म्हणजे दुसऱ्याला आनंद व सुख होतें; व झालेंच पाहिजे. हें मनांत ठेवून आपल्या जन्माच्या जोडीदारास आपल्या दुष्कृतीनें दुःख न होई असें स्वतःचें शुद्ध आचरण ठेवणें, हें दोघांचेंही काम आहे. प्रपंचांत एकदां एकाकडून अविचाराचा पाय शिरकला म्हणजे त्याचीं फळें दोघांसही सारखीं भोगावीं लागतात. जेथें स्त्रीपुरुष एकमेकांवर विश्वास ठेवून एकमेकांच्या विचारानें चालतात तेथें परस्परांच्या सहवासानें दोघांसही चांगल्या गोष्टी करण्याविषयीं उत्तेजन येतें, वाईट गोष्टींत मन घालण्यास लाज वाटते, दुःख उणावतें, आनंद दुणावतो, आणि अहित सहसा होत नाहीं. देह भिन्न असले तरी मन एक असलें पाहिजे. एकाच्या पायाला कांटा बोंचला तर दुसऱ्याच्या डोळ्याला पाणी आलें पाहिजे. असें उभयतांमधलें स्वपरत्व नाहींसें झालें पाहिजे. अशी ज्या कुटुंबाची रचना व स्थिति असेल त्यांतील गृहस्थाश्रमाची धन्यता जितकी वर्णन करावी तितकी थोडीच आहे. असो.

संभाजीरावाचें दुर्वर्तन शिवाजीराव आणि त्याची पत्नी स-

ईबाई ह्यांच्या नजरेस वारंवार पडूं लागलें. तेव्हां त्यांच्या काळजानें ठाव सोडला. संभाजी अगदीं बिघडला. तो लोकांतून उठल्यासारखा झाला. तो आपल्या पश्चात् राज्य चालविण्यास योग्य नाहीं अशी शिवाजीरावाची खात्री होऊन त्याच्या मनाला अतिशय दुःख झालें, मुलाच्या काळजीनें सईबाईचें अन्नपाणी तुटत चाललें. ती दिवसानुदिवस खंगत चालली. मन आणि शरीर ह्यांच्यामध्यें अति निकट संबंध आहेच. एकाला इजा झाली कीं दुसऱ्यावर त्याचा लागलाच संस्कार घडतो. तो तिच्या शरीरावर घडूं लागल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. पुरुषांपेक्षां बायकांचा स्वभाव हयवान असतो. तिनें संभाजीला पुष्कळदां धमकी देऊन पाहिलें. बाबा, पुता, करून पाहिलें. तरी त्याच्या वर्तनांत काडीइतका फरक दृष्टीस पडेना. आतां हा मुलगा शुद्धीवर कसा येईल ह्या विवंचनेंत ती पडली. तिचें चित्त अहोरात्र उदास असे. तिच्या डोळ्यांना झोंप नाहींशी झाली. जेवण तुटलें. आणि ती एकसारखी झुरणीस लागली. आपला मुलगा चांगला निपजावा, त्याला लोकांनीं चांगलें ह्मणावें, आणि त्याचें बरें असावें, अशी आईबापांची मुलाविषयीं स्वाभाविक उत्कंठा असते. आणि तो जर कां वाईट चालीचा निघाला तर त्याच्या मातापितरांस जें दुःख होतें तें आपत्यवानासच पुसावें, इतरांस कळावयाचें नाहीं. इतर लोकांची प्रीति व भक्ति कामनिक असते, ह्मणजे त्यांचा त्यांत कांहींतरी हेतु साधून घेण्याचा मतलब असतो. परंतु मातापितरांची आपल्या लेंकरांवरची ममता पुष्कळ अंशांनीं निष्काम असते. त्यानें आपल्याला कांहीं दिलें नाहीं तरी चिंता नाहीं, परंतु लोकांनीं त्याला चांगलें म्हणावें, त्याची लोकांत कीर्ति व्हावी, त्याला धन पुष्कळ मिळावें, त्याला मुलेंबाळें व्हावीं

तिची लौकिकी वर्तणूक चांगली असतां दुराग्रहानें त्यानें तिच्याविषयीं व्यर्थ विपरीत कल्पना कां बरें करावी ?

विवाहित स्त्रीपुरुषांचा असा कांहीं संबंध आहे कीं, दोघांतून एकाची मानहानि झाली असतां किंवा एकाला सुखदुःख झालें असतां त्यांत दुसऱ्याला वांटेकरी व्हावें लागतें. दोघांचे देह भिन्न असले तरी त्यांच्या सुखदुःखांचीं सूत्रें एकमेकांत गुरफटलेलीं असतात. पायांच्या तळव्याला कांटा बोंचतो, आणि तेथून साडेतीन हात उंचीवर मस्तक असतें, तरी त्याला लागलीच तिडीक पोहोंचते. तशी दंपत्यांपैकीं एकाच्या दुष्कर्मानें दुसऱ्याच्या देहांत व्यथा होते; व झाली पाहिजे. एकाचें मन खुषींत असलें म्हणजे दुसऱ्याला आनंद व सुख होतें; व झालेंच पाहिजे. हें मनांत ठेवून आपल्या जन्माच्या जोडीदारास आपल्या दुष्कृतीनें दुःख न होई असें स्वतःचें शुद्ध आचरण ठेवणें, हें दोघांचेंही काम आहे. प्रपंचांत एकदां एकाकडून अविचाराचा पाय शिरकला म्हणजे त्याचीं फळें दोघांसही सारखीं भोगावीं लागतात. जेथें स्त्रीपुरुष एकमेकांवर विश्वास ठेवून एकमेकांच्या विचारानें चालतात तेथें परस्परांच्या सहवासानें दोघांसही चांगल्या गोष्टी करण्याविषयीं उत्तेजन येतें, वाईट गोष्टींत मन घालण्यास लाज वाटते, दुःख उणावतें, आनंद दुणावतो, आणि अहित सहसा होत नाहीं. देह भिन्न असले तरी मन एक असलें पाहिजे. एकाच्या पायाला कांटा बोंचला तर दुसऱ्याच्या डोळ्याला पाणी आलें पाहिजे. असें उभयतांमधलें स्वपरत्व नाहींसें झालें पाहिजे. अशी ज्या कुटुंबाची रचना व स्थिति असेल त्यांतील गृहस्थाश्रमाची धन्यता जितकी वर्णन करावी तितकी थोडीच आहे. असो.

संभाजीरावाचें दुर्वर्तन शिवाजीराव आणि त्याची पत्नी स-

ईबाई ह्यांच्या नजरेस वारंवार पडूं लागलें. तेव्हां त्यांच्या काळजानें ठाव सोडला. संभाजी अगदीं बिघडला. तो लोकांतून उठल्यासारखा झाला. तो आपल्या पश्चात् राज्य चालविण्यास योग्य नाहीं अशी शिवाजीरावाची खात्री होऊन त्याच्या मनाला अतिशय दुःख झालें, मुलाच्या काळजीनें सईबाईचें अन्नपाणी तुटत चाललें. ती दिवसानुदिवस खंगत चालली. मन आणि शरीर ह्यांच्यामध्यें अति निकट संबंध आहेच. एकाला इजा झाली कीं दुसऱ्यावर त्याचा लागलाच संस्कार घडतो. तो तिच्या शरीरावर घडूं लागल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. पुरुषांपेक्षां बायकांचा स्वभाव ह्यवान असतो. तिनें संभाजीला पुष्कळदां धमकी देऊन पाहिलें. बाबा, पुता, करून पाहिलें. तरी त्याच्या वर्तनांत काडीइतका फरक दृष्टीस पडेना. आतां हा मुलगा शुद्धीवर कसा येईल ह्या विवंचनेंत ती पडली. तिचें चित्त अहोरात्र उदास असे. तिच्या डोळ्यांना झोंप नाहींशी झाली. जेवण तुटलें. आणि ती एकसारखी झुरणीस लागली. आपला मुलगा चांगला निपजावा, त्याला लोकांनीं चांगलें ह्मणावें, आणि त्याचें बरें असावें, अशी आईबापांची मुलाविषयीं स्वाभाविक उत्कंठा असते. आणि तो जर कां वाईट चालीचा निघाला तर त्याच्या मातापितरांस जें दुःख होतें तें आपल्यबानासच पुसावें, इतरांस कळावयाचें नाहीं. इतर लोकांची प्रीति व भक्ति कामनिक असते, ह्मणजे त्यांचा त्यांत कांहींतरी हेतु साधून घेण्याचा मतलब असतो. परंतु मातापितरांची आपल्या लेंकरांवरची ममता पुष्कळ अंशांनीं निष्काम असते. त्यानें आपल्याला कांहीं दिलें नाहीं तरी चिंता नाहीं, परंतु लोकांनीं त्याला चांगलें म्हणावें, त्याची लोकांत कीर्ति व्हावी, त्याला धन पुष्कळ मिळावें, त्याला मुलेंबाळें व्हावीं

आणि तो सुखसोहळा आपण आपल्या डोळ्यांनीं पहावा, अशी त्यांची निर्मळ इच्छा असते. पण ही इच्छा तृप्त करणारे माईचे लाल या जगांत फार थोडे आढळतात. संभाजीरावासारखा दुर्वृत्त मुलगा निघाला म्हणजे आईचा जीव किती कळवळत असेल तें जी माय व्याली असेल तिलाच पुसावें, इतरांना कळावयाचें नाहीं; कारण श्रद्धाग्राह्य ज्ञान आणि अनुभवजन्य ज्ञान ह्यामध्यें महदंतर आहे. असो.

संभाजीराव शुद्धीवर यावा म्हणून सईबाईनें त्या वेळच्या तिच्या समजुतीप्रमाणें अनेक उपाय केले. तिनें गांवोगांवचे पंचाक्षरी बोलाविले. देवऋषि जमा केले. मोठमोठे नामांकित वैद्य आणविले. ज्योतिषी बोलावूं पाठविले. आणि जादुगीर आणून ठेविले. मग जो तो आपआपल्यापरी सांगूं लागला. पंचाक्षरी ह्मणत याला पिशाचबाधा आहे. देवऋषि ह्मणत, देवाची बाधा आहे. वैद्य ह्मणत, उन्माद वायु आहे. ज्योतिषी म्हणत, ग्रहपीडा आहे. आणि जादुगीर ह्मणत, करणी आहे. असा ज्याचा जो धंदा तो त्याजकडे थांगदोरा आणून लावी. मग बाहेरचा झपाटा असेल ह्मणून त्याजवरून तिनें, लिंबें, नारळ, कोंबडीं, शेळ्या, बकरीं, शेंदूर, भात, वगैरे जिन्नस ओंवाळून टाकविले. देवाची बाधा असेल म्हणून नारळ उतरून ठेविले. आंगरोग असेल म्हणून रामबाण औषधें दिलीं. ग्रहपीडा असेल म्हणून अनुष्ठानासाठीं वेदपाठी ब्राह्मण बसविले. करणी असेल म्हणून मंतरलेले काळे दोरे व ताईत बांधले. ह्याप्रमाणें, अंगारे धुपारे, तीर्थे वगैरे सर्व उपचार करून पाहिले. तरी गुणाचें नांव नाहीं. सईबाई मोठी धैर्यवान् व खंबीर मनाची बायको खरी, तरी पुत्राच्या काळजीनें ती हळू हळू पिचत जाऊन शेवटीं मरण पावली.

संभाजीरावाच्या वृत्तीमध्यें कांहीं पालट होत नाहीं, असें पाहून शिवाजीरावाला बहुत दुःख झालें. बाहेरख्यालीपणा आणि मद्यपान ह्या दोन दुर्व्यसनांचा त्याच्यावर जबरदस्त अंमल बसला. शिवाजीरावानें त्याला जवळ बसवून पुष्कळ वेळां बहुत उपदेश केला. मोरोपंत, निळोपंत, अण्णाजी दत्तो, हंबिरराव मोहिते, वगैरे पदरच्या मोठमोठ्या मुत्सद्यांनींही त्याला पुष्कळ समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. पण त्यांपासून कांहीं एक फलादेश झाला नाहीं. सामदानानें कांहीं होईना, तेव्हां त्यांनीं दंडाचा उपाय करून पाहिला. त्याला कांहीं दिवस प्रतिबंधांत ठेवून बघावें असें सर्वांच्या विचारास आलें. रायगडावर राजवाड्यापासून कांहीं अंतरावर एक उंच चिरेबंदी हवेली होती तींत त्याला कोंडून ठेविलें, आणि त्याजवर एक मजबुत पाहरा ठेविला. हुकुमाशिवाय त्याला कधीं बाहेर काढूं नये असा सक्त बंदोबस्त केला. विठ्ठल त्रिंबक महाडकर देशपांड्या ह्याची त्याजवर देखरेख ठेविली. त्याच्या खाण्यापिण्याचा बंदोबस्त राखण्याचें, तसेंच कधीं कधीं आंत जाऊन त्याला बोध करण्याचें काम त्याजकडेच सांगितलें. ह्याप्रमाणें त्या कारागृहांत त्याचे सहा महिने लोटले. त्याचा बाहेरच्या लोकांशीं संबंध अगदीं तोडून टाकिला होता.

पुढें शिवाजीरावाला गुडघीची व्यथा होऊन तो सुमारें पंधरा दिवस अगदीं निजून राहिला. तो बिछाना सोडून पलीकडे हालला नाहीं. ह्या दुखण्यांतून पार पडेन असा त्याला भरंवसा वाटेना. तिकडे त्याचें राज्य घेण्यासाठीं अवरंगजेब टपून बसला होता. वडील चिरंजीव अशा प्रकारचे, मागें आपलें राज्य कसें चालेल, ह्याची त्याला फिकीर लागली. शेवटीं अष्ट प्रधानांच्या विचारास असें आलें कीं, संभाजीराव ह्यास एक

वेळ समक्ष बोलावून, महाराजांनीं त्यांस दोन हितोपदेशाच्या गोष्टी सांगून पहाव्या. पुढें ते नीट वागतील असें लक्षण दिसेल तर ठीकच आहे. नाहींतर राज्याचा योग्य बंदोबस्त महाराजांनीं आपल्या देखत करून ठेविला असतां बरें. ही मसलत शिवाजीरावाच्या मनास आली. तो पेशव्यास ह्मणाला, मोरोपंत, माझ्या पश्चात् राज्याची मला धडगत दिसत नाहीं. आतां तुम्हीं म्हणतां त्यापक्षीं तुम्हांसमक्ष त्याला दोन बोधाच्या व धमकीच्या गोष्टी सांगून बघतों. निवळला तर त्याचें हित आहे, आणि राज्याचेंही कल्याण आहे. तो शुद्धीवर यावयाचा नाहीं असें खास ठरलें तर तो जरी माझा वडील पुत्र आहे तरी माझ्या मागें त्याला राज्याधिकार मिळूं नये असा मी आपल्या देखत पक्का बंदोबस्त करून टाकणार. असें म्हणून त्यानें संभाजीरावास बोलावून आणविलें आणि त्याजबरोबर भाषण केलें तें येणेंप्रमाणें:—

**शिवाजीराव**–शंभू, असा माझ्याजवळ येऊन बस. तुला मी कां बोलावूं पाठविलें समजलास ? भलभलत्या छंदाला लागून तूं आपलें नांव घालविलेंस. तूं आपल्या शरीराचेही हाल करून घेतलेस. जिच्या पोटीं जन्म घेतलास तिला तूं एक दिवसही सुख दिलें नाहींस. तुझ्या काळजीनेंच ती झुरणीस लागून मेली. आतां तुझ्या खऱ्या कळवळ्याचा काय तो मी एकटा उरलों आहें. मीही ह्या दुखण्यांतून पार पडेन असा मला भरंवसा लागत नाहीं. सबब आतां तुला शेवटच्या दोन गोष्टी सांगून पहाव्या ह्मणून येथें बोलाविलें आहे. माझें व तुझें देवाच्या घरचें नातें असें आहे कीं, मी तुला सांगावें आणि तूं माझें निमूटपणें ऐकावें. पण 'मानला तर देव नाहीं तर धोंडा.' पुढें जसें

तुला गोड वाटेल तसें तूं कर. आईबापांनीं जन्म दिलें तरी ते तुझ्या कर्माचे सोबती नाहींत.

शंभू, आजपावेतों तूं खेळ केलेस ते केलेस. आतां तरी ते सोडून दे, आणि शुद्धीवर ये. इतक्याउपर तुझे डोळे न उघडले तर मी तुला राज्याचा मालक करणार नाहीं. हें मी तुला उगीच भय घालण्याकरितां बोलतों असें तूं समजूं नको. मी बोलतों तसें करण्याला कदापि चुकणार नाहीं. तुला कदाचित् वाटत असेल कीं, मी वडील मुलगा आहें. राज्य माझ्याशिवाय दुसऱ्या कोणाला मिळणार आहे? पण, बाबा, ह्या भ्रमांत तूं राहूं नको. अरे, ज्या शिवाजीनें आपल्या लोकांसाठीं आणि मुलुखासाठीं कैकवेळां स्वतःच्या जिवाकडेही पाहिलें नाहीं, तो शिवाजी तुझ्यासारख्या द्वाड पोराच्या हातीं राज्य देईल कीं काय? माझें राज्य व माझे लोक तुझ्यासारख्या अप्रयोजक पोराच्या हातीं न देतां तें मी एखाद्या शहाण्या व हिंदूच्या खऱ्या कैवाऱ्याच्या हवालीं करीन. मग तो मनुष्य माझ्या कुटुंबांतला नसून अगदीं तिऱ्हाईत असला तरी चिंता नाहीं, हें खूप लक्षांत ठेव. मुसलमान लोक किती झाले तरी परके. अरे, ते माझ्या मरणाची वाट पहात असतां त्यांच्यावर तुझा ज्यास्ती भरंवसा! तुझ्या हातीं राज्य गेलें कीं ते तुला भलभलत्या थापा देतील, खोट्या मसलती सांगतील, तुझी बुद्धि फिरवितील, आणि शेवटीं तुला राज्यभ्रष्ट करून ते आपणच राज्य बळकावून बसतील. तुझा स्वभाव पडला भोंबडा. त्यांचें कृत्रिम तुझ्या लक्षांत येणार नाहीं. अरे, ज्याच्या पोटीं तूं जन्मलास त्याला सोडून एकदां त्या दुस्मानांस जाऊन मिळाला होतास, आणि आमच्या बरोबर लढण्यास सुद्धां तयार झाला

होतास. ह्या तुझ्या पालथ्या शहाणपणाला म्हणावें तरी काय ? तूं मला मदत द्यावी, तें एकीकडेच राहिलें. उलटें मी आपल्या लोकांच्या बऱ्याकरितां ह्मणून जें जें करितों त्याचा तूं तिरस्कार करितोस, आणि माझी निंदा करितोस. ह्यावरून तुला राज्याधिकार मिळतांच आजपर्यंत मीं जें जें केलें आहे त्याचा तूं विध्वंस करून टाकणार. अझून तरी शुद्धीवर ये, आणि आपली वागणूक सुधारून माझ्या पाठी-मागें राज्य करण्याजोगा हो. तसें करण्याला तुझी बुद्धि होत नसली तर, लंगोटी नेस, अंगाला राख फांस, आणि बैरागी बनून एकदाचें काळें कर. पुन्हा माझ्या नजरेस-मोर येऊं नको.

असा शिवाजीनें नरम आणि गरम, दोन्हीं प्रकारचा त्याला उपदेश केला. पण 'पालथ्या घागरीवर पाणी' असा त्याचा परिणाम झाला. संभाजीरावाला त्यापासून बालाग्र उपरती झाली नाहीं. त्यानें शेवटीं आपल्या पित्याला सडकून जबाब दिला कीं, आपल्या मनांत मला राज्य मिळूं नये असें असेल तर लंगोटी नेसून, अंगाला राख फांसून, देशांतरावर बैरागी हो-ऊन जाण्याची माझी खुषी आहे. माझा एवढा बंदीखाना सोडवा ह्मणजे झालें. हें उत्तर ऐकून शिवाजीराव खूप संताप-ला, आणि त्यानें आपल्या कपाळावर हात मारून घेतला. तरी आलेला राग आंतल्या आंत गिळून पुन्हां तो त्याला ह्मणाला, बाबारे, 'बैरागी होईन' हीं अक्षरें तोंडांतून काढतांना फार सोपीं वाटतात, पण बैराग्याचें खरें सोंग साधण्याचें काम फार कठिण आहे. गांज्याच्या चिलमी फुंकून भटकत फिरणारे बै-रागी पुष्कळ आहेत. तसल्या बैराग्यापेक्षां संसारांत राहणारा पुष्कळ बरा. मी दिल्लीहून सुटून आलों त्या वेळेस ह्या सों-

गाच्या सुखदुःखाचा मला पुरा अनुभव आला आहे. असा भलताच हट्ट धरूं नको. तशानें तुझी तड लागणार नाहीं. अजून पुरता विचार कर. मग तुझा काय निश्चय होईल तो मला कळीव. पुढें तुझ्या कपाळी जसें असेल तसें होईल. इतकें बोलून त्याला पुन्हां कारागृहांत घेऊन जा ह्मणून त्यानें सांगितलें.

संभाजीरावाला घेऊन गेल्यावर जवळ मुत्सद्दी मंडळी बसली होती, त्यांला उद्देशून शिवाजीराव ह्मणतोः—

**शिवाजीराव**—कारभारीलोकहो, संभाजी काय सांगून गेला हें तुह्मी नुकतें ऐकलेंच. काय करावें? ह्या कारट्याचे 'एक घाव दोन तुकडे' करावे असा संताप होतो. ह्याच्या अंगांत एकही गुण धड नाहीं. जितके द्वाडगुण तितके त्याच्यांत भरले आहेत. पण कसा झाला तरी पोटचा गोळा. यामुळें पुन्हां ममता उत्पन्न होते. आतां त्याच्या निवळण्याची तर आशाच राहिली नाहीं. ह्या कामांत आतां मी आपला तुह्माला शेवटचा निकाल सांगतों. माझ्या मागें तो राज्याचा मालक व्हावा अशी माझी इच्छा नाहीं. जोडायाला फार दिवस लागतात पण मोडायाला एक घटिका लागत नाहीं. जर हें राज्य त्याच्या हातीं गेलें तर आह्मीं सर्वांनीं एवढ्या श्रमानें जें यश मिळविलें तें तो एका दिवसांत गमावील. त्यांतून हें राज्य कांहीं वडिलोपार्जित नाहीं. ही आमची नवीन कमाई आहे. ह्याजवर धर्मशास्त्राप्रमाणें मुलाचा वारसा पोंचत नाहीं. स्वसंपादित जिनगी पाहिजे त्या मुलास देऊन टाकण्यास बाप मुकत्यार आहे. ह्यासाठीं मी असें ठरवितों कीं, माझ्या पाठीमागें माझ्या गादीवर माझा दुसरा पुत्र राजाराम ह्यानें बसावें. ह्या राज्यांतला संभाजीला कांहीं एक वांटा मिळूं नये.

आणि जीवमानपर्यंत त्याला असेंच प्रतिबंधांत ठेवावें.

हा ठराव अमलांत आणण्यासाठीं त्यानें चिटणिसाक-डून एक लेख करविला, आणि आपल्या देखत त्याजवर शिक्का मोर्तब करून तो कागद मोरो तिरमल पिंगळे, मुख्य प्रधान, ह्याच्या हातीं दिला. हा सर्व प्रकार शिवाजी-रावाची धाकटी राणी सोयराबाई साहेब इच्या देखत झाला. राजाराम हा तिचाच पुत्र होय.

वाचकहो, संभाजीराव हा शिवाजीरावाचा औरस आणि ज्येष्ठ पुत्र होय. त्याच्याशीं बाप फार कडकपणानें वागला असें कित्येकांस वाटेल ह्यांत संशय नाहीं. पण तो तरी करील काय ? ह्या अवघड प्रकरणांत त्याला एकीकडे आड आणि एकीकडे विहीर झाली होती. कोट्यवधि प्रजेच्या सुखावर पाणी ओतून पुत्रलोभाच्या मोहपाशांत गुंतून त्याला गादीचा मालक करावें, किंवा पुत्राचें नुकसान करून व राजधर्मास अ-नुसरून प्रजेच्या हिताकडे लक्ष्य द्यावें. ह्या दोन मार्गांवांचून तिसरा मार्गच राहिला नव्हता. पुत्राला राज्य देऊन प्रजेचें अकल्याण करावें ही एक गोष्ट; अथवा प्रजेच्या कल्याणाक-रितां राज्य कोणा शहाण्या व चतुर मनुष्याचे स्वाधीन करून संभाजीचा वारसा अजीबाद रद्द करावा ही दुसरी; ह्या दोन गोष्टी त्याच्या जिवाची कांहीं वेळ ओढाताण करूं लागल्या. स्वपुत्र-प्रीति आणि स्वदेशप्रीति ह्यांचें त्याच्या अंतःकरणांत घोर युद्ध चाललें होतें. शेवटीं एकाच्या हितासाठीं हजारों जणांचें नुकसान करण्याला त्याचें मन घेईना. सारांश, स्वदेशप्रीतीला जय मिळून पुत्रप्रीतीचा पराभव झाला. ही गोष्ट शिवाजीरावाकडून सोन्याच्या अक्षरांनीं इतिहासांत लिहून ठेवण्यासारखी झाली. हें त्यास अत्यंत भूषणप्रद होय असें कोण ह्मणणार नाहीं ?

येथें या भागाची मर्यादा संपली. आतां क्षणभर पडदा पडेल. तेवढ्या वेळांत जरा विश्रांति घेऊन संभाजीनें पुढें महा दारुण कृत्यें करण्यास आरंभ केला, तीं ऐकण्यास दगडासारखें मन घट्ट करून तयार असा.

---

## भाग ८.

"उपदेशो हि मूर्खाणां प्रकोपाय न शांतये."

मागच्या भागांत सांगितल्याप्रमाणें राजारामास आपल्या गादीचा वारस केल्यावर पुढें शिवाजीराव थोड्याच दिवसांनीं रायगडावर मरण पावला. त्यामुळें पदरचे सर्व लोक बहुत शोकाकुल झाले. राज्यांतले लहान थोर सर्व खिन्न झाले. असा प्रभु मागें झाला नाहीं व पुढें होणार नाहीं असे लोकांच्या तोंडून उद्गार निघाले. शिवाजीरावाचे गुरु श्री० रामदासस्वामी त्या वेळीं सज्जनगडीं होते. शिवबा कैलासवाशी झाल्याचा वर्तमान ऐकून त्यांसही वाईट वाटलें. ते लागलेच उठून मठाच्या आंतल्या खोलींत एकांतस्थलीं जाऊन बसले.

शिवाजीराव मरण पावतांच संभाजीराव स्वतंत्र झाला. शिवाजीरावानें व्यवस्था करून ठेविली होती ती जागच्या जागीं राहिली. लागलीच कलुषा कबजीची आणि संभाजीरावाची गांठ पडली. मग ज्यांच्या मसलतीनें त्याला बापाची गादी मिळूं नये असें ठरलें होतें त्या सर्वांवर त्यानें कडक नृसिंहावतार धारण केला. कबजीला हाताशीं घेऊन त्यानें एकदम यमाजी भास्कराचें दरबार सुरू केलें. कळसूत्री बाहुलीप्रमाणें तो कबजीच्या हातांत नाचूं लागला. पाण्यानें तुडुंब भरलेलें कारंजें असतें, त्याजवर कांहीं वेळ हात दाबून ठेवावा आणि तो कांहीं वेळानें काढला ह्मणजे जसें तें दुप्पट जोरानें वर उडतें तशी संभाजी-

रावाची अवस्था झाली. तो कारागृहवासांत होता तोंपर्यंत त्याच्या सर्व दुर्व्यसनांवर दाब बसल्यासारखें झालें होतें. पुढें तो बंदींतून सुटतांच त्यांनीं एकदम उचल खाल्ली. तो मद्यपान अतिशय करूं लागला. बापाच्या वेळचे जुने, विश्वासू व हुशार कामगार होते त्यांवर त्यानें अगोदर गदा चालविली. सोमाजी नाईक व सूर्याजी कंक ह्यांचा शिरच्छेद केला. जनार्दनपंत सुमंत ह्याच्या पायांत बिडी ठोकली. सोमाजी नाइकाच्या मुलाचा एकनाकीवरून कडेलोट केला. मालसावंत वगैरे १०-१२ असामींचे पटापट जीव घेतले. बापुजी भाऊराव व सूर्याजी काळे ह्यांचीं डोकीं उडविलीं. मोरोपंत पिंगळे, मुख्य प्रधान, व अण्णाजी दत्तो, सचीव, ह्यांचे वाडे लुटून त्यांच्या पायांत बिड्या घातल्या. सावत्रभाऊ राजाराम ह्यास कैदेंत टाकिलें. सापत्न मातुश्री सोयराबाई इजला भरकचेरींत ओढून आणून तिला हवीं तशीं गालिप्रदानें केलीं, आणि शेवटीं तिला भिंतींत चिणून ठार मारिलें. ह्याप्रमाणें सुमारें २०० ... ग श्रेलक्या माणसांचा त्यानें फशा उडविला. मग बाळाजी आवजी चिटणीस ... चा मुलगा आवजीबोवा ह्यास जिवें मारावें ... रतां हुकूम केला. तेव्हां चिटणिसानें हात जोडून विनंती ...ली कीं 'महाराज, अगोदर मला मारावें मग माझ्या मुलाला मारावें, ह्मणजे रीतीचें होईल.' असा त्यानें आग्रह धरला तेव्हां त्या दोघांही बापलेकांस मारून टाकावें असा त्यानें हुकूम केला. त्याप्रमाणें त्या पितापुत्रांस एकदम हत्तीच्या पायीं देऊन चिरडून टाकिलें. अण्णाजी दत्तो, सचीव, ह्याला चुन्याच्या भट्टींत टाकून जाळलें. ह्याप्रमाणें बहुतेक ठळक ठळक लोकांची कत्तल उडविल्यावर त्यानें, थट्टी, कोठी, पागा, वगैरे अठरा कारखान्यांच्या मोजदादी करविल्या. तेव्हां तो

संपत्तीचा थाट पाहून त्याला मोठी धन्यता वाटली कीं, बस, मी आहें आणि माझें राज्य आहे. शाबास माझी. असें ह्मणून त्यानें आपल्या हातानें आपली पाठ थोपटून घेतली. मग नवे विशीपंचविशीच्या आंतले उमेदवार होते त्यांस त्यानें राज्यांतलीं जडजोखमीचीं कामें दिलीं. बापाच्या वेळचा दाढी मिशा पिकलेला बुजरूक चाकरमनुष्य एकही जवळ ठेविला नाहीं. बाहेरख्याली, दारूबाज आणि खुशालचंद, अशा लोकांचा त्याच्या भोंवतीं मेळा जमला. डोईतल्या उवा मारणें आणि मनुष्य प्राणी मारणें हीं दोन्ही कर्मे त्याच्या नीतिशास्त्रांत सारख्याच योग्यतेचीं झालीं होतीं.

सर्व राज्याची अनीन त्याच्या हातीं आली. त्याला कोणाचा बचक राहिला नाहीं. 'करील तें कारण आणि बांधील तें तोरण' असें त्यास स्वातंत्र्य मिळालें. पैशानें गच्च भरलेली गंगाजळी ( खजिना ) हातीं लागली. हांजी, हांजी, करणारे लोकांचा सभोंवतीं वेढा पडला. 'अबादी अबाद आहे' असें ह्मणणारे तोंडपूजे लोक त्याच्यापुढें पुढें नाचूं लागले. दारूचा पेला हातीं घेऊन दिवाणजी त्याच्यापुढें खडे उभे. कबजींच्या हुकूमाशिवाय राज्यांत काडी हालेनाशी झाली. खुद्द राजेसाहेबांचा बहुतेक वेळ तुळशीबाईच्या रंगमहालांत खर्च होऊं लागला. तिचा भाऊ एसाजी फर्जंद राजाच्या नाकचा बाल बनला होता. त्या दोघांची त्याला मारण्याचीं आंतून कारस्थानें चाललींच होतीं. मध्यंतरीं एकामागें एक विघ्नें आल्यामुळें त्यांचा तो बेत लांबणीवर पडत गेला. प्रथम संभाजीरावाला शिवाजीरावानें कांहीं दिवस कारागृहांत ठेविलें. ह्यामुळें परस्परांच्या भेटीच बंद पडल्या. पुढें शिवाजीराव मरण पावला. नंतर संभाजीरावाचा महा प्रचंड नरमेध सुरू झाला. तो संपतो

न संपतो इतक्यांत त्याला राज्याभिषेक करण्याचा बूट निघाला. अशा एकामागें एक धांदलींत धांदली उपस्थित झाल्यामुळें भाऊबहिणीचें कृष्णकारस्थान मागें पडत गेलें. तरी तें अगदीं बंद पडलें असें झालें नाहीं.

राज्य निष्कंटक झालें. आतां आपल्या महाराजांना विधिपूर्वक राज्याभिषेक करावा असें कलुषानें ठरविलें. ज्योतिषांनीं मुहूर्त काढून दिला. राज्याभिषेकोत्सवाचें साहित्य करण्याचे हुकूम झाले. रायगडावर जिकडे तिकडे मोठमोठे मंडप घालविले. नेमलेल्या दिवशीं विधिपूर्वक राज्याभिषेक होऊन संभाजीराव सिंहासनारूढ झाले. किल्ल्यावरून तोफांची सरबत्ती झाली. होमहवनें झालीं. सोनें, रुपें, तांबें, पितळ, लोखंड, इत्यादि धातूंच्या तुळा केल्या. तेल, तूप, कापूस, मीठ, सुपारी, नारळ, गूळ, साखर, वगैरे किराणे जिन्नस व अठरा धान्यें ह्यांच्याही तुळा झाल्या. अष्टप्रधानांच्या नवीन नेमणुका केल्या. त्या सर्वांमध्यें सर्वगुणसंपन्न कायते कलुषा कबजी साहेब. त्यांस मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें दिलीं. चांगले चांगले वृक्ष उपटून टाकिले ह्मणजे मागें उरलेलें एरंडाचें झाडच मोठ्या वृक्षांत गणलें जातें. कबजीची वाहवा करून त्याला 'छंदोगामात्यकविकलश पंडितराव' असा एक लांबलचक मोठा किताब दिला. गुळाचाच गणपति आणि गुळाचाच नैवेद्य! हुद्दे देणारे आपणच आणि घेणारेही आपणच! त्यांला नको ह्मणणार कोण ?

या समारंभाला तीस चाळीस हजार ब्राह्मण जमला होता. त्यांना पंचपक्वान्नी जेवण १५ दिवसपर्यंत चालू होतें. पुढें त्यांना दक्षणा देण्यासाठीं एक दिवस जंगी रमणा केला. त्या गर्दींत चिरडून कांहीं जण मेले सुद्धां! वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण होते त्यांच्यासाठीं निराळीच शिष्टसंभावना केली. राज्या-

भिषेकाच्या समारंभाचें वर्तमान ऐकून गुणिजनांचाही मोठा समुदाय जमला होता. कित्येक दूरदूरच्या देशाहून गवय्ये, वजवय्ये आणि कलावंतिणीचे नामांकित ताफे आले होते. त्यांच्या गुणाप्रमाणें त्यांस बिदाग्या झाल्या. कित्येकांस वस्त्रालंकारही देण्यांत आले. त्यांमध्यें एक कलावंतीण आली होती. ती केवळ लावण्याची खाण होती. त्या परीनें तर ह्या परिसाला कांहीं दिवस तुळशीचाही विसर पडला. अगोदर ती स्त्रीजात, त्यांत ती वारांगना, त्यांत ती ऐन १६ वर्षांच्या भरांत आलेली, त्यांत तिचें अनुपम सौंदर्य, त्यांत तिची वस्त्रालंकाराची जेथच्या तेथें टापटीप, त्यांत तिचे नखरे, त्यांत तिचें कंठमाधुर्य, त्यांत तिचें गायनकलेमध्यें प्रावीण्य, त्यांत तिचें रसाळ आणि चतुर भाषण, आणि त्यांत तिची मन आकर्षण करण्याची उत्तम शैली. इतके मोहक गुण ज्या स्त्रीमध्यें एकत्र वास करतात त्या स्त्रीला प्रतिशुकाचार्य असला तर तोही मोहून जाईल. मग संभाजीरावासारख्या रंगेल राजबिंड्याची कथा ती काय ? त्याला एखाद्या स्त्रीचा नुसता केतकीच्या गाभ्यासारखा गौरवर्ण भुलवून टाकण्यास बस आहे. मग ही तर केवळ सौंदर्यसरिता असून, गीत, नृत्य आणि वाद्य, या तीन्हीं कामांत निष्णात होती. ती हातीं तंबुरा घेऊन संभाजीरावापुढें गायनाला बसली तेव्हां तो दारूचा घुटका घेऊन धुंद झाला होता. तो बैठकीच्या जागीं येऊन बसला त्या वेळेस डावी उजवीकडे त्याच्या भेलकांड्या जात होत्या. भिवया वर चढल्या होत्या. डोळे गुंजेसारखे तांबडे लाल झाले होते. एका अस्तनींत हात घातला होता व दुसरी हातामागें तशीच लोंबत होती. पागोट्याचे कांहीं पीळ गळ्यांत आले होते. नेसावयाचें धोतर अस्ताव्यस्त झालें होतें. घसा कोरडा पडला होता. आणि त्या कलावं-

तिणीकडे पाहून तो तोंडांतल्या तोंडांत कांहीं पुटपुटत होता.

वाचकहो, हा प्रताप कोणाचा समजलां? राजाच्या आंगावर वारुणी चढली होती तिचे हे चाळे होत, बरें. असो. तिनें धृपद, ख्याल, टप्पा, ठुंबरी, लावणी, तराणा, दादरा, गजल, इत्यादि अनेक मनोहर चिजा गाइल्या. तिला, खमाज, भैरव, छायानट, ब्याहाग, बागेश्री, मेघमल्हार, कानडा, भूप, हिंदोल, परज, कालंगडा, पिलू, मालकंस, ललत, इत्यादि सर्व रागांचें चांगलें ज्ञान होतें. ज्या ज्या वेळेस जे जे राग गावयाचे त्या त्या वेळेस त्या रागांचे ती आलाप घेऊं लागली ह्मणजे शृंगार, वीर, करुण, इत्यादि नवरस तिच्यापुढें खडे उभे रहात. सतार हातीं घेऊन ती वाजवूं लागली ह्मणजे ही इंद्रलोकाहून प्रत्यक्ष रंभाच खालीं उतरली आहे कीं काय अशी दिसे, तिच्यावर राजेसाहेबांची सोळा आणे मर्जी बसली ! तिला रोख एक लाख रुपये बिदागी मिळाली ! शिवाय दहा वीस उंची उंची पैठण्या व दुपेटे मिळाले ते निराळेच!!

संभाजीरावाला राज्याभिषेक झाला, त्या वेळीं शिवाजीरावाचे हितकर्ते गुरु श्रीरामदासस्वामी सज्जनगडावर होते. त्यांना राजाकडून समारंभास येण्याविषयीं पाचारण झालें होतें. परंतु राजा दुराचारी निघाला ह्मणून ते राज्याभिषेकोत्सवास गेले नाहींत. मागाहून पूर्वापारपद्धतीप्रमाणें समर्थांकडे राजाकडून बहुमानाचीं वस्त्रें गेलीं. त्या वेळेस स्वामींचा दासबोध ग्रंथ संपत आला होता. जवळची मंडळी होती, त्यांनीं स्वामींना विनंती केली कीं, महाराज, संभाजीराजाचें दुराचरण वाढत जाऊन मराठी राज्य लयाचे पंथास लागलें. ह्यासाठीं राजाला कांहीं बोध लिहून पाठवावा. स्वामी ह्मणाले—'दासबोध ग्रंथ संपत आला आहे; तोच त्याजकडेस मी पाहण्यास पाठविणार आहें;

त्यांत सर्व कांहीं आहे. तथापि तुमचा आग्रहच आहे तर एक पत्र लिहून देतों.' असें ह्मणून त्यांनीं एक उपदेशपर पत्र लिहून आलेल्या कारकुनाच्या हवालीं केलें. तें त्या कारकुनानें संभाजीरावाच्या हातीं दिलें. तें फोडून जवळच्या सर्व मंडळीच्या देखत त्यानें त्यास वाचावयास सांगितलें. कारकून पत्र हातीं धरून वाचतोः—

## श्री.

अखंड सावधान असावें। दुश्चित्त कदापि नसावें।
तजविजा करीत बसावें। एकांत स्थळीं ॥ १ ॥
मागील अपराध क्षमावे। कारभारी हातीं धरावे।
सुखी करून सोडावे। कामाकडे ॥ २ ॥
श्रेष्ठीं जें मेळविलें। त्यासाठीं भांडत बैसले।
मग जाणावें फावलें। गलीमासीं ॥ ३ ॥
ऐसें सहसा करूं नये। दोघे भांडतां तिसरा जाये।
धीर धरोन महत्त्व पावे। समजोन करावें ॥ ४ ॥
आधींच पडलिया धास्ती। ह्मणजे कार्यभाग होय नास्ती।
ह्याकारणें समस्तीं। बुद्धी शोधावी ॥ ५ ॥
राजी राखितां जग। मग कार्यभागाची लगबग।
ऐसें जाणोनियां सांग। समाधान राखावें ॥ ६ ॥
सकळ लोक एक करावे। गलीम लोटोन काढावे।
ऐसें करितां कीर्ती धांवे। दिगंतरीं ॥ ७ ॥
आधीं गाजवावे तडाके। मग भूमंडळ धाके।
ऐसें न होतां धक्के। राज्यास होती ॥ ८ ॥
समय प्रसंग ओळखावा। राग निपटून सांडावा।
आला तरी कळों न द्यावा। जनामध्यें ॥ ९ ॥
बहुत लोक मिळवावे। विचारें लोक भरावे।

कष्टें करोनी वसरावें । म्लेंछ राज्य ॥ १० ॥
आहे तितुकें जतन करावें । पुढें आणीक मिळवावें ।
महाराज्य करावें । जिकडे तिकडे ॥ ११ ॥
लोकीं हिंमत धरावी । शर्तीची तरवार करावी ।
चढती वाढती पदवी । पावाल येणें ॥ १२ ॥
शिवराजास आठवावें । जीवित तृणासमान करावें ।
इहलोकीं परलोकीं तरावें । कीर्तीरूपें ॥ १३ ॥
शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा
प्रताप । शिवराजाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं १४
शिवराजाचें कैसें चालणें । शिवराजाचें कैसें बोलणें ।
शिवराजाची सलगी देणें । कैशी असे ॥ १५ ॥
सकळ सुखाचा त्याग । करूनि साधी जो तो योग ।
राज्यसाधनाची लगबग । कैशी असे ॥ १६ ॥
त्याहूनि करावें विशेष । तरीच ह्मणावे पुरुष ।
ह्या उपरी आतां विशेष । काय ल्याहावें ॥ १७ ॥

"रामदास"

पत्र वाचून झाल्यावर सर्व मंडळी एकदम खो, खो, खो, हांसली, कचेरीचे सर्व सभासद एका माळिकेचे मणि आणि त्या सर्वांचा मेरू, संभाजीराव. मग त्या टोळभैरवांचे तारे तुटण्यास आरंभ झाला तो असा:—

एक ह्मणतो–कायहो, या थेरड्याला आतां ह्या नसत्या उठाठेवी कशाला पाहिजेत ? दस गेले पांच उरले. आजपावेतों राजकारणांत ढवळाढवळ केली तेवढी बस झाली. आतां ह्यानें जपमाळ हातीं घेऊन, राम, राम, ह्मणत स्वस्थ राहिलेले दिवस काढावे.

दुसरा ह्मणतो–स्वामींचें वय झालें, पण अझून हव्यास

कोठें कमी झाला आहे ? त्यांच्या मनांत असेल कीं थोरल्या महाराजांवर जशी आपली जादुगिरीची विद्या चालली, तशीच आमच्या नव्या महाराजांवरही चालवावी. पण तें मागचें गाणें मागेंच विसरा म्हणावें. असले पोकळ उपदेश अज्ञान पोरें, व बाया बापड्या ह्यांच्यापुढें करावे. आम्हाला ते नकोत. आमचे थोरले महाराज आपले भोळे सांब, ह्मणून ते फसले. आम्हीं आलीकडचीं माणसें आतां तशीं फसावयाचीं नाहींत. उपदेश दुसऱ्यासाठीं केला आहे, स्वतःसाठीं नाहीं. तुकारामानें कवन केलें आहे कीं, "लोकां सांगे ब्रह्मज्ञान। आपण कोरडा पाषाण." तो जसा बोले तसा वागत तरी होता. पण ह्या स्वामींचीं जीं एकेक कुलंगडीं आहेत तीं बाहेर काढूं लागलों तर सांगायाला एक वर्ष पुरणार नाहीं. त्यांचा एक भारत ग्रंथच होईल.

**संभाजी**—( कलुषाकडे वळून ) काय हो प्रधानजी ? बरी आठवण झाली. तुम्हाला विचारीन विचारीन म्हणतों पण वेळच आली नव्हती. असें म्हणतात कीं, समर्थांनीं एकदां एक मेलेली घार उठविली. एकदां टाकळीच्या एका बाईचा मेलेला नवरा जिवंत केला. एकदां रामघळींत एका दगडाखालून दाहा हजार पात्रांस पुरण्याइतकी शिधासामग्री काढून दिली. कित्येक वेळां ते एके ठिकाणीं गुप्त होऊन दुसरे ठिकाणीं प्रकट झाले. हजारों कोसांवरच्या गोष्टी बसल्या ठिकाणीं सांगत असे. त्यांच्याविषयीं पुष्कळ अद्भुत चमत्कार ऐकतों, हे खरे असतील का ? तुम्हांला कसें वाटतें ?

**कलुषा**—महाराज, ह्यांत नवल तें काय आहे ? ज्याला मंत्रविद्या साध्य असतात तो ह्याहीपेक्षां नजरबंद चमत्कार करून दाखवितो. त्या विद्येच्या सामर्थ्यानें जारण, मारण, मो-

हन, उच्चाटन, वगैरे हव्या त्या क्रिया हातून होतात. त्याच्या पुढें ऋद्धि सिद्धि हात जोडून उभ्या असतात. मीं खुद्द त्या विद्येचा चांगला अभ्यास केला होता. पण ज्या नेमानें मांत्रिकानें राहिलें पाहिजे तो नेम मजकडून पाळला गेला नाहीं. ह्यामुळें म्हटल्या वेळीं हटकून त्याचा प्रत्यय येत नाहीं. ह्या मांत्रिकविद्येनें पाहिजे तें करतां येतें. किमया करतां येते. वशीकरणानें पाहिजे ती स्त्री वश होते. वांझेला पोरें होतात. मातीची साखर होते, आणि साखरेचें मीठ होतें. ढेंकळाचा गूळ होतो. धोत्र्याच्या बोंडांचीं वाळकें होतात. मुठीच्या प्रयोगानें एकाएकीं पोटांत तिडीक उठून किंवा रक्त ओकून मनुष्य मरतें. मनुष्याचें घोडें, गाढव, किंवा वासरूं बनवितां येतें. गर्भीर बायकोला मुलगा होईल कीं मुलगी होईल हें सांगतां येतें. मेलेलीं माणसें व जनावरें उठवितां येतात. पुरुषाची बायको आणि बायकोचा पुरुष करितां येतो. आसनमांडी घालून पाण्यावरून तरून जातां येतें. कोणाच्या मनांत काय आहे आणि कोठें काय चाललें आहे तें सांगतां येतें. येथें गुप्त होऊन पाहिजे त्या ठिकाणीं पुन्हां प्रकट होतां येतें. परांची खबुतरें करून नाचवितां येतात. वाळूच्या लाह्या होतात. एका प्रकारचें नेत्रांजन केलें ह्मणजे आपल्याला दुसरे दिसतात, पण दुसऱ्याला आपण दिसत नाहीं. असें मांत्रिकविद्येनें हजारों हुन्नेर व करामती करतां येतात. तशा रामदासस्वामीनें केल्या असतील ह्मणून तुमच्या तीर्थरूपांनीं त्याचें इतकें देव्हारें माजविलें असेल. दुसरें कांहीं नाहीं. साधुपणाचें उगीच त्याचें ढोंग आहे. साधूला, मठ, शिष्ये, शिष्यिणी, देवालयें, कथा, कीर्तनें, अनुग्रह, राज्यांतल्या उलाढाली, हे खटाटोप कशाला पाहिजेत?

तिसरा ह्मणतो—मागें काय झालें असेल तें नकळे, स्वामींचें तें गौडबंगाल आतां बरेच दिवस बंद पडल्यासारखें झालें आहे. अलीकडे त्यांनीं मेलेले जीव उठविल्याचें कोठें ऐकण्यांत नाहीं. आमचे थोरले महाराज तर त्यांचे अगदीं दासानुदास झाले होते. त्यांनीं सांगितलें, 'शिवबा, ह्यापुढें कोणीं कोणास जोहार करूं नये, 'रामराम' करावा, केला रामराम सुरु. स्वामी ह्मणाले, 'शिवबा, तुमच्या झेंड्याला आमची लंगोटी लावा,' लागली झेंड्याला भगवी लंगोटी फडकायाला. स्वामी ह्मणाले, 'शिवबा, आज बगलेला झोळी लावून तुह्मी आमच्याबरोबर दहा घरें भिक्षा मागा,' लागले दारोदार भिक्षा मागायाला. अशी त्या गोसावड्यावर महाराजांची अतोनात निष्ठा बसली होती. इकडे स्वामी. स्वामीच्या वेषानें तरुणपणीं हव्या तशा मठांत मजा मारीत होते. लोकांमध्यें डौल काय, आह्मी बाळब्रह्मचारी. पण इकडे, आकाबाई, वेणुबाई, सतीबाई, वगैरे पांच सात बाळविधवा व विठ्ठलसुवाशिनी ब्रह्मचारीबोवांच्या उशाशीं पायथ्याशीं रात्रंदिवस फिरल्या पाहिजेत. रोज चमचमीत मिष्टान्नभोजन झालें कीं, बोवांना आकाबाईच्या हातचा मसालेदार गोविंदविडा पाहिजे. निजायाला छपर पलंग त्याजवर गुडघ्याइतका उंच मऊ बिछाना. मधल्या वेळेस गोमांतकाकडचे उत्तम उत्तम, मासलेदार आंबे. गळ्यांत व हातांत सुगंधी पुष्पांचे हार व गजरे. असे सज्जनगडावर नित्य स्वामींचे राजोपचार व सोहळे चालू आहेत. असें असून लोक ह्यांना साधु, साधु ह्मणतात. तेव्हां ह्या जनरीतीला हंसावें कीं वंदावें तें कळत नाहीं. लहानपणीं त्याचे आईबाप चांगले समारंभानें लग्न करून देत होते. तेव्हां मला लग्न नको ह्मणाला, अंतरपाट धरला असतां तेथून पळून गेला. त्या वेळेस

त्याचें पोरवय होतें. बायकोचें सुख माहीत कोठें होतें ? पण पुढें मकरध्वजाचें वारें आंगांत शिरतांच बायका आंगाशीं आंग लावून जवळ येऊन बसल्या तरी त्यास त्या खपूं लागल्या. ब्रह्मचर्यव्रतानें रहाणें फार कठीण काम आहे. फुकाचें नाहीं.

चौथा ह्मणतो—स्वामींच्या आंगीं एक तरी स्वामीचा गुण असावयाचा होता. आपल्या शहाणपणाचा ठेंवा पाजळण्यासाठीं तो एक दासबोध कीं, ठासबोध ग्रंथ करीत आहे. त्यांत संस्कृताचें नांव नाहीं. त्या निवळ प्राकृत ओंव्या आहेत. तो नीट वाचतां सुद्धां येत नाहीं कीं, त्यांतला अर्थ कळत नाहीं. भलें एक मोठें थोरलें लांबलचक चऱ्हाट त्यांत वळून ठेविलें आहे. त्यांत देव असा आहे, प्रपंच असा करावा, अक्षर असें वळवावें, राजानें असें वर्तावें, किल्ले असे बांधावे, क्षत्रियांनीं अशी तलवार मारावी, अशा त्यानें एक घडना भाराभर चिंध्या भरून ठेविल्या आहेत. ह्या गोंसावड्यानें कधीं कोठें संसार केला होता ? कधीं कोठें तलवार मारली होती ? कधीं कोठें किल्ले बांधले होते ? कीं, राज्यें हांकलीं होतीं ? अशा बसून गप्पा पाहिजे त्याला मारतां येतील. माझ्यासारखा ठोंब्र असेल तो देखील असले गाबाळ ग्रंथ लिहून ठेवील. अशीं ग्रंथ वाचून किंवा करून राज्यें मिळतीं किंवा चालवितां येतीं तर मग काय पाहिजे होतें ? ह्या अधाऱ्याला एकदां गव्हल्याची खीर आवडली ह्मणून ती त्यानें खा, खा, खाल्ली. मग पोटांतून उमळून येऊन तो, ओक, ओक, ओकला. असें त्यानें दोन तिनदां केलें. ह्या अमंगळपणाला काय ह्मणावें ? कोणीं असें कां केलें ह्मणून विचारलें, तेव्हां तो ह्मणाला, जिभेला खिरीची वासना झाली होती, ती तिची मागण्या-

ची खोड मोडण्यासाठीं मीं असें केलें. अशा असंगळपणानें कोठें वासनाक्षय होतो कीं काय ?

पुन्हा तिसरा ह्मणतो—तुह्मांला ऐकून ठाऊक असेलचें कीं, ह्या स्वामींनीं एकदां चोरी सुद्धां केली होती. वाटेनें जातां जातां एकदां एका शेतकऱ्याच्या ऊंसाच्या फडांत शिरून ऊंस चोरून खात होते. तोच ऊंस त्यांच्या हातांतून हिसकावून घेऊन शेतकऱ्यानें त्यांच्या पाठीवर त्याचे १०।५ रट्टे ओढले. पाठीवर मोठमोठे वळ उठले. इतकें झाल्यावर साधूच्या सोंगाची पुरी बतावणी करण्यासाठीं त्यांनीं आपल्या थोरल्या महाराजांकडून त्या शेतकऱ्याला त्याच शेताची वंशपरंपरेची सनद करून देवविली. इकडे स्वामींनीं मार खाल्ला खरा पण त्या बिचाऱ्या शेतकऱ्याचें निरंतरचें कल्याण तरी झालें. स्वामींनीं जिकडे तिकडे रामदासी मठ स्थापले. शिष्यशाखा वाढविली. मारुतीच्या स्थापना केल्या. अशीं एकीकडून खुप साधुपणाचीं ढंगें दाखविलीं ! दुसऱ्या बाजूनें पाहिलें तर ह्यांना डफ तुणतुण्यावरचीं गाणीं सुद्धां येत होतीं ! एकदां कलगीतुरेवाले शाइर लोकांत आपआपसांत 'तूं अधिक कीं मी अधिक' असा तंटा लागला होता. तेव्हां स्वामींनीं स्वतः डफावर थाप देऊन, कांहीं वेळ गाणें गाऊन त्या दोघां फडवाल्या लोकांवर आपली कडी चढविली ! केव्हां केव्हां तर हे स्वामी शुद्ध माकडचेष्टा करितात ! माकडाला आणि त्यांला अंतर तें काय आहे ? माकडाला शेंपूट असतें तसें ह्यांनाही पाठीमागें वीतभर शेंपूट आहे असें ह्मणतात. मग खरें खोटें ईश्वर जाणे. हा रामावतारांतला कोणी वानर तर जन्मास आला नसेल ना ? कारण हे मारुतीला फार भजतात. आणि कृति सगळी त्यासारखीच आहे.

**संभाजीराव**—स्वामी पूर्वीं कसे असले तरी आतां ह्या पत्रा-

वरून त्यांना खचीत ह्मातारचळ झाला आहे असें दिसतें. 'साठी बुद्धि नाठी' व्हावयाचीच. कांहीं नाहीं ह्मटलें तरी त्यांच्या वयाला आतां सत्तर वर्षें होऊन गेलीं असतील. अशा वयांत बुद्धीला भ्रंश होतच असतो. असो. ते आतां कसे असले तरी थोरल्या महाराजांचे गुरु आहेत. त्यापेक्षां ते आह्मांस वंद्यच आहेत. त्यांच्या उपदेशाकडे लक्ष न देतां पत्र आलें तसें ठेवून घ्यावें ह्मणजे झालें. उगीच रिकामी वाच्यता कशाला करावी? (असें ह्मणून पत्र कलुशाच्या हातीं दिलें.)

ह्याप्रमाणें त्या टारग्या मंडळीनें घटकाभर हवें तसें तोंडसुख घेतलें. एकादा मूर्ख मनुष्य सूर्याकडे पाहून थुंकतो आणि त्याची थुंकी त्याच्याच तोंडावर माघारी येऊन पडते. तशी ह्या टोळभैरवांनीं कृति केली. जो सत्पुरुष शिवाजीरावाला राज्यसाधनाच्या कामीं एवढा उपयोगीं पडला, ज्यानें आपल्या लोकांच्या कल्याणासाठीं सगळा देह झिजविला, ज्यानें जनहितार्थ चांगले चांगले प्राकृत ग्रंथ लिहून ठेविले, त्याच्या निस्पृहतेची सर्व महाराष्ट्रभर वाखाणणी झाली होती, ज्याची साधूपंचायतनांत पहिली गणना होती, ज्याला शिवाजीराव व इतर सुज्ञ लोक वसिष्ठऋषीसारखा मान देत होते, ज्यानें ह्मणत असावें कीं, आमची गोसांव्याची दौलत ती काय? आमची दौलत हीच कीं अंगाला राख फांसावी आणि उपास्याची सेवा करावी, त्या वैराग्यसंपन्न समर्थांची योग्यता कोणीकडे आणि ह्या भकलेल्या तरुण मंडळीची अवहेलना कोणीकडे? ज्या वस्तूचें ज्याला ज्ञान नाहीं त्या वस्तूचें त्याला मोल कसें कळेल? कुत्र्याला कस्तुरीचा वास किंवा गाढवाला गुळाची चव काय होय?

---

# भाग ९.

"दुर्मंत्री राज्यनाशाय."

राज्याभिषेकाचा समारंभ आटपल्यावर संभाजीरावाचे ऐ-श्वआराम अधिकच वाढत चालले. तिकडे आंतून त्याच्या प्रीतिपात्राचा त्याला जिवें मारण्याचा उद्योग चालूच होता. राज्याभिषेकोत्सवाच्या गर्दींत तो उद्योग जरा मागें पडला होता, इतकेंच. तुळशीबाईप्रीत्यर्थ संभाजीरावाचा अर्धा अधिक खजिना रिता झाला. डागडागिने, वस्त्रप्रावर्ण व खाणें-पिणें, ह्यांची ती चंगळ भोगीत होती. तिच्या सारखी बरदास्त राजाची खुद्द पट्टराणी येसूबाई हिचीही रहात नव्हती. जोत्याजी हुजऱ्या त्याला मधून मधून इशारा देतच होता कीं, "महाराज, ही तुळशी मानकापी आहे. हिच्यावर आपण इतका विश्वास ठेवूं नका. हिचा नाद सोडा. ही आपल्यावर वरकांती प्रीति दाखविते ती सारी खोटी आहे. ही अवदसा कोणत्या वेळेस आपल्या जिवाला दगा करील ह्याचा नेम नाहीं." पण त्या निमकहलाल चाकराच्या विनवणीकडे त्यानें बिलकुल लक्ष दिलें नाहीं. त्याच्या सांगण्याकडे तो ऐकिलें न ऐकिल्यासारखें करी. तरी त्यानें आपलें कर्तव्य करण्याचें सोडलें नाहीं. वरचेवर राजाच्या मागें त्याची टुमणी असेच.

एसाजीचा कावेबाजपणा वाढत चालला. राजाचा मी हितचिंतक आहें असें तो वाहेरून दाखवी, आणि तें संभाजीरावाला सगळें खरें वाटे. पण जोत्याजीनें एसाजीरावाचें खरें स्वरूप ओळखून ठेविलें होतें. राजाच्या हिताची जों जों तो अतिशय कळकळ दाखवी तों तों एसाजीच्या दगाबाजीची त्याला अधिक अधिक भीति वाटूं लागली. एक दिवस हीं व-

हीणभावंडें एका खोलींत जाऊन एकमेकांशीं खलवत करीत बसलीं होतीं. त्या बोलण्यांतले कांहीं तुटक तुटक शब्द त्याच्या कानीं आले. त्यांजवरून तर त्याची बालंबाल खात्री झाली कीं ह्या दगेखोरांच्या हातून आपल्या धन्याच्या जिवाला एक दिवस खचित दगा आहे. मागच्या खेपेस संभाजीरावानें त्याला खरमरीत ताकीद दिली होती कीं, पुन्हा त्या दोघांची गोष्ट मजपुढें बोललास तर खबरदार, तुझें नाकच कापीन. तरी त्याच्यानें फिरून बोलल्यावांचून राहवेना. माझें एकट्याचें नाक गेलें तरी चिंता नाहीं, दहांचीं तर नाकें वांचतील, असें मनांत आणून पुन्हा त्यानें राजापुढें गोष्ट काढण्याचा हिय्या केलाच.

संभाजीरावाला मुसलमानांसारखी सकाळच्या प्रहरीं हुक्का पिण्याची संवय लागली होती. तो एक दिवस रोजच्या सारखा एकटाच हुक्का पीत बसला आहे, असें पाहून जोत्याजी केसकर भीत भीत त्याच्या पुढें गेला, आणि लवून, मुजरा करून, पागोटें हातांत काढून घेऊन म्हणाला, " महाराज, ह्या गरीब चाकराचा एक अर्ज आहे. आपल्या धन्यावर एकादें संकट येत असलें आणि तें जाहीर केल्यानें दूर होण्यासारखें असलें तर आपले मायबाप धनी आपल्यावर रागावतील म्हणून इमानी चाकरानें भिऊन मागें सरूं नये असें वाडवडील पूर्वीपासून सांगत आले आहेत ह्यासाठीं—"

**संभाजीराव**–( त्याचें बोलणें पुरतें न ऐकतां मध्येंच ) जोत्याजी, आज माझ्यापुढें पुन्हां ही कसली बडबड लावली आहेस ? गाढवाच्या लेंका, चल, येथून चालता हो. मला उगीच त्रास देऊं नकोस. त्या दोघांच्या संबंधाचें कांहीं असलें तर मी तुला मागेंच ताकीद दिली आहे कीं,

त्यांच्या बाबतींत माझ्यापुढें तूं एक अक्षरही कधीं काढूं नये. तिची तुला आठवण आहे कीं नाहीं ?

**जोत्याजी**—सरकारची ताकीद झाली ती मी विसरलों नाहीं. पण, धनीसाहेब, आपण आमचे गोरगरीबांचे मायबाप. आपण आमचें सर्वस्वीं चालविणारे. ह्मणून आपल्या पायांची आम्हाला आस्था. त्या पायांपाशीं जर एखादा फड्या नाग फडा पसरून चावण्यासाठीं टपून बसलेला पाहिला तर आपल्याला हुशार केल्यावांचून आमच्यानें उगीच कसें बसवेल ? ह्याचा धनीसाहेबांनींच विचार करावा.

**संभाजीराव**—जोत्याजी, हें बघ. ह्या वेळेस माझी तब्येत ठीक नाहीं. उगीच असलें चऱ्हांट वळीत बसूं नको. तुला काय सांगावयाचें असेल तें थोडक्यांत झट्दिशीं सांग. पाल्हाळ लावलास तर खबरदार.

**जोत्याजी**—( हात जोडून ) महाराज, एसाजी आणि त्याची बहीण हीं एकांतांत बसून वरचेवर आपल्याविषयीं कांहीं खलबतें करीत असतात. त्यांचें नेहमीं नेहमीं काय बोलणें चालतें तें ऐकण्यासाठीं काल मीं कान देऊन बसलों होतों. त्या वेळेस, आमचें सूड घेण्याचें काम फार दिवस भिजत पडलें होतें, पण आतां मात्र तें फत्ते होण्याची वेळ जवळ येत चालली आहे, असें एसाजी तुळशीबाईला म्हणाला. तेवढे शब्द मीं उचलले.

**संभाजीराव**—मग हे शब्द तूं माझ्याकडेच कां लावतोस ? ते दुसऱ्या कोणाला लागू नसतील म्हणून कशावरून ? एसाजीवर माझा पक्का भरंवसा आहे, आणि तुळशीची माझ्यावर खरी प्रीति आहे. ह्याविषयीं तर मला मुद्लीं शंकाच नाहीं. आतां याजवर पुढें तुझें काय म्हणणें आहे, बोल ?

**जोत्याजी**–महाराजांच्या मनाची तशी खातरी असेल खरी, पण कोणाचें काळीज कसें आहे ह्याची खरी परीक्षा राजेलोकांना नसते. वरून कोणी छानछोक दिसला कीं आंतही तो तसाच असेल अशी त्यांची हमेषा नजरभूल होते.

**संभाजीराव**–(मंदहास्य करून ) जोत्याजी, तर मग तूं अगदीं वेडा आहेस असें म्हटलें पाहिजे. लोकांच्या मनांत काय काय आहे हें सांगण्याची विद्या तूं कोणापाशीं, कधीं, कोठें, शिकलास तें सांग बरें, पाहूं ? दुसऱ्या लोकांचीं जशीं अनुमानें चुकतात, तसाच तूं पण चुकला असशील असें तुला वाटत नाहीं का ?

**जोत्याजी**–जी सरकार, आपण म्हणतां तें खरें आहे. मी चुकावयाचा नाहीं असें म्हणत नाहीं. पण वरून किती जरी कडेकोट बंदोबस्त असला तरी ज्यानें त्यानें आपआपल्यापरी सावधगिरीनें रहावें अशी चाल चालत आली आहे. ती खोटी कशी म्हणवेल ? जेथें अगदीं सामसूम असतें तेथूनच कधीं कधीं एकाएकीं कडाका उसळतो, असें आपल्या पाहाण्यांत येतें.

**संभाजीराव**–जोत्याजी, म्यां स्वतः दुःखी, कष्टी, दुर्मुखलेला, आणि कुरठा असावें, पोटांत वहीम बाळगून ठेवावा, व कधीं आनंदांत असूंच नये, असें तुझ्या मनांत आहे कीं काय ? अरे, एकमेकांवर एकमेकांचा भरंवसा ही एक अजब चीज आहे. ती जर नसली तर त्यासारखी मनाला दुसरी कोणतीच खराब कांचणी नाहीं. त्या माणसांचें जिणें फुकट आहे असें समजावें.

**जोत्याजी**–तें तर खरेंच, सरकार. आपण कोणाचा कधींच भरंवसा धरूं नये असें माझें म्हणणें नाहीं. भरंवशाशिवाय

कोणाचेंच एक दिवसही चालावयाचें नाहीं. पण माझा अर्ज इतकाच कीं उतावळीचा कारभार नसावा. जे लोक आपल्याकडे येतात किंवा आपल्या सभोंवतीं फिरतात त्यांची चाल, रीत पुरी कसोटीला लागल्याखेरीज त्यांच्यावर कोणीही भरंवसा ठेवूंच नये. असें माझें एकदां नाहीं, दहादां पदर पसरून मागणें आहे. अर्ज मिळून इतकाच.

**संभाजीराव**–मग मीं तसेंच नाहीं का करीत ? आतां तूंच सांग कीं तुझ्यावर माझा पुरा भरंवसा आहे असें तुला वाटतें कीं नाहीं ? जर आहे असें तुला वाटतें, तर तो ठेविल्याबद्दल मला कधीं तरी वाईट वाटण्याला कारण झालें आहे का ?

येथें जोत्याजी जरा कचरल्यासारखा झाला. महाराजांनीं बोलतां बोलतां मला पकडींत धरलें, असें त्याला वाटलें. तरी त्याचें 'येरे माझ्या मागल्या' संपलें नाहीं. त्याचा एकच संकल्प कीं, राजाला बेसावध होऊं द्यावयाचें नाहीं. होतां होई तोंपर्यंत त्याला वरचेवर हालवून हालवून जागा ठेवावयाचा. तो मग म्हणाला, "कोण कसा आहे हें त्याच्या कृतीवरून ओळखावें लागतें. नुसत्या नजरेनें पाहून खरी परीक्षा होत नाहीं."

**संभाजीराव**–आतां मात्र खरें बोललास. असा जरा ताळ्यावर ये. एसाजीवरचा माझा भरंवसा डळमळीत होण्याजोगी त्याची कृति जर कधीं माझ्या नजरेस आली नाहीं, तर त्याजवरचा भरंवसा मी तरी कमी कसा करावा ?

**जोत्याजी**–पण त्याच्यावर सरकारचा एवढा मोठा भरंवसा बसण्यासारखी त्यानें सरकारची एवढी मोठी कामगिरी तरी कोणती बजाविली आहे, हें मला कळत नाहीं.

**संभाजीराव**–खरें आहे. तरी पण निदान भरंवसा उडण्या-

सारखें त्याच्या हातून ह्या घटिकेपर्यंत कांहीं कृत्य घडलें नाहीं. हें तर खरें आहेना ?

जोत्याजी–( जरा गोंधळल्यासारखा होऊन ) महाराजांबरोबर वाद घालण्याची माझी खुदरत नाहीं. पण उगीच एखाद्यावर नसतें बालंट घेऊन मजला काय करावयाचें आहे ? हीं दोघेंजणें पुष्कळ वेळां एकांतांत बसून महाराजांविषयीं खलबतें करीत असतांना मीं खुद्द आपल्या डोळ्यांनीं पाहिलें. त्यांत कांहीं असे शब्द माझ्या कानीं पडले कीं, त्यांजवरून त्यांचा आपल्याला दगा करण्याचा घाट खचीत चालला आहे अशी माझ्या दिलाची पक्की खात्री झाली आहे. मी सरकारच्या पायांवर हात ठेवून सांगतों कीं, ह्यांत एक अक्षर खोटें ठरलें तर सरकारांनीं माझे कान उपटावे, दहा मारून एक ह्मणावें, किंवा वेलाशक माझें डोकें मारावें. सरकाराजवळ पुन्हां माफी मागून विनंती करितों कीं, दोघांच्या आंतून गुप्त मसलती चालल्या आहेत. त्यांचा वेळेवर बंदोबस्त झाला पाहिजे. नाहीं,तर सरकारच्या जिवाला खचीत, खचीत, अपाय आहे. ज्या धन्याचा आजपावेतों मी शेर खाल्ला त्या धन्याला वेळेवर सावध करावें, एवढेंच या हलाल चाकराचें काम आहे. तें मीं केलें आहे. ह्याउपर सरकारची मर्जी.

जोत्याजी हा खरा, निष्कपटी, प्रामाणिक आणि जिवास जीव देणारा माणूस आहे अशी संभाजीरावाच्या दिलाची खात्री होती. जोत्याजीवर त्याचा पूर्ण भरंवसा होता आणि राजावर त्याची पूर्ण निष्ठा होती. तो राजाला मनापासून आवडत असे. पण त्याला असें वाटलें होतें कीं, एसाजी आणि त्याची बहीण हीं लबाड आहेत, असा वहीम जोत्याजीच्या डोक्यांत उगी-

चच्या उगीच शिरला आहे. त्यांत कांहीं अर्थ नाहीं. अशा समजुतीमुळें जी सावधगिरी त्यानें ठेवावयास पाहिजे होती, ती त्यानें ठेविली नाहीं. त्या समयीं त्याच्या जिवाला अपाय करण्यासाठीं दोघांच्या ज्या गुप्त मसलती चालल्या होत्या, त्या उलटविण्याचा त्यानें कांहींच इलाज केला नाहीं. रात्रंदिवस त्याला तुळशीचा निजध्यास लागला होता. ती जें मागेल तें तयार. अशी तिची एकनिष्ठ सेवा चालली होती. कां न चालेल ? सुरतरसाचा कैफच तसा आहे. सोलापूरकर प्रसिद्ध रामजोशीतात्यांनीं एका लावणींत ह्मटलें आहे कीं:—

सुरतिचा लागला चुटका ।
घेउं घोट घ्यावा वाटतो अमृतरसाचा घुटका ।
खुप रसाची निघुन जातसे घटका ।
बैसला मनामध्यें झटका ।
मदनाची समशेर सुटली ।
देखणी रति तशी नटली ॥

असा कामविकारानें राजा अगदीं वेडा होऊन गेला होता. त्याला तिच्याशिवाय कांहीं दिसेनासें झालें, व ऐकूं येईनासें झालें होतें. ह्या कामप्रताप श्रीधरकवींनेंही असा वर्णन केला आहे:—

जाती कुल विद्या वय । ह्यांचा कांहीं न करी निर्णय ।
एकदांच सुकृताचा क्षय । करीत काम नेटका ॥ १ ॥
ऐकिली धनुर्धरांची ख्याती । ते शरें करूनि द्विधा करिती ।
परी ह्या कामबाणाची स्थिती । लागतां ऐक्य करी उभयतां
मी झालों असें वयातीत । आंग झालें शक्तिरहित ।
आतां मज काय करील रतीकांत । ऐसें कदापि न ह्मणावें २

**जोंवरी होय शरीर भस्म। तोंवरी छळी हा काम।
माझा प्राणांत चालेल नेम। ऐसा पण न करावा ॥ ४ ॥**

ज्यांनीं आपल्या मनाला विवेकाचें दावें घट्ट लाविलें होतें त्यांचे हे उद्गार! मग संभाजीरावासारखे निरर्गल, चैनी व विषयी राजे असतात ते कामाच्या तडाक्यांत सांपडल्यावर त्यांची अवस्था काय होईल आणि कोठपर्यंत त्यांच्या अविवेकाची मजल जाऊन पोहोंचेल, हें सांगावयासच नको. असो.

संभाजीराव विषयसुखांत निमग्न झाला होता. राज्यकारभाराचा विचार त्याच्या गांवींही नव्हता. त्यानें राज्यव्यवस्थेचीं सर्व सूत्रें आपल्या कनोजा प्रधानजीच्या हातीं दिलीं होतीं. अशीं कांहीं वर्षे लोटलीं. ज्या राज्यांत प्रजेच्या दुर्दैवानें राजा लंबकर्ण असतो तेथें प्रधान तरी सुशील, नीतिमान् व हुशार असावा लागतो; ह्मणजे राजाच्या मूर्खपणाचा परिणाम प्रजेला सोसावा लागत नाहीं. पण चांगल्या आणि वाईट ह्या दोन गोष्टी एकत्र कधीं नांदावयाच्या नाहींत. सृष्टीच्या उत्पत्तीपासून त्या दोघांचा उभा दावा, ह्यामुळें वाईट राजाचें वाईट प्रधानाशींच सख्य जमतें. अशा राज्यांत प्रधानजीची दोन दिवस पोळी चांगली पिकते. सोंगट्यांच्या खेळांत फांसा पडेल त्याप्रमाणें नरद उचलून ठेवावी, मारावी, किंवा जुगवून द्यावी, असा प्रकार चालतो. तोच प्रकार बेबंदशाई राज्यांत चालतो; ह्मणजे राजा आणि प्रधान दोघे मिळून इच्छेस येईल तशी प्रजेची धुळधाण करितात. पण सोंगट्यांच्या पटावरच्या निर्जीव नरदा आणि राज्यपटावरच्या सचेतन नरदा ह्यांच्यामध्यें महदंतर आहे. हाल होऊं लागले ह्मणजे सचेतन नरदांनीं आपले हातपाय हालवावे हें खरें. राजा अविचारी निघाला तर प्रजासमूहांत चार सुज्ञ पुरुष

असतील, त्यांनीं तशा राजाला पदच्युत करून त्याच्या जागीं एखादा सुज्ञ पुरुष गादीचा मालक करावा हें विहित आहे. पण, हिंदुस्थानांत राजसत्ताक राज्यांत "ना विष्णुः पृथिवीपतिः" हें वाक्य सर्वांच्या डोक्यांस पक्कें बिंबून गेलेलें, ह्यामुळें राजा कितीही शतमूर्ख असला आणि त्याच्याकडून कितीही त्रास होत असला तरी तो सर्व लोक खालीं मान घालून मुकाट्यानें सोशीत. राजाकडून राजधर्माचें कितीही उल्लंघन झालें तरी त्याचें पक्कें पारिपत्य करण्याची कोणाचीही छाती होत नसे, इतकेंच नव्हे पण राजावर कोणी किंचित् अंगुली उचलली तर तो पंचमहापातक्यांमध्यें गणला जाई. अशी त्या वेळची हिंदुस्थानची स्थिति होती. प्रधानजी देवीचा प्रसाद प्रसाद ह्मणून दिवसांतून चार, चार, पांच, पांच, वेळां मद्याचे घुटके घेत, आणि त्या प्रसादानें भरलेल्या कळशांच्या कळशा आपल्या यजमानाकडे पाठवीत. त्याचे वरचेवर घुटके घेऊन यजमान आपल्या प्रधानजीची तारीफ करीत, आणि प्रधानजी आपल्या यजमानाचा वाहवा करीत. असा 'अहोरूपमहो ध्वनिः' चा तेथें प्रकार चालू होता. रयतेची हवाल पहाणारा कोणीही नव्हता.

जोडायास वर्षांचीं वर्षें लागतात, पण मोडायास एक घटिकाही लागत नाहीं. मराठ्यांचें राज्य उभें करण्यास व राज्याच्या शिस्ती आणि बंधारणें बांधून देण्यास शिवाजीराव एकसारखा ३५ वर्षें खपत होता. तरी त्यांत पुष्कळ उणीवा राहिल्या होत्या. त्या काढून टाकतां टाकतांच त्याचा अंतकाळ झाला. पुढें हे दिवे बापाच्या गादीवर बसल्यावर थोड्याच दिवसांत राज्याची सर्व इमारत ढांसळण्याच्या पंथास लागली. जुने, इभ्रतदार व घराणदार लोक होते त्यांनीं आपला मुलूख सोडून संभाजीरावाच्या शत्रूची ह्मणजे मोंगलाची चाकरी धर-

ली. राज्याच्या सरहद्दीवर, मोंगल, शिद्दी, पोर्तुगीज, वगैरे शत्रु होते, त्यांनीं आपलीं डोकीं वर उचललीं. ते ह्याच्या राज्यांत येऊन वरचेवर स्वाऱ्या करूं लागले. त्यांनीं कित्येक गांव लुटले व जाळले. कित्येक गांवांतल्या चांगल्या चांगल्या बायका धरून नेल्या. शेंकडों हिंदूंना जुलूमानें बाटविलें. शेंकडों देवळांतल्या देवांच्या मूर्ति फोडून त्यांचे त्यांनीं पाटे वरवंटे केले. त्यांना अडविणारा किंवा तुह्मीं असें कां करतां असें ह्मणणारा कोणी राहिला नाहीं. शिवाजीराव जिवंत असतांना व त्याच्या मागूनही कांहीं दिवस संभाजीरावानें आपल्या आंगचें शौर्य दाखवून शिपाईगिरी गाजविली होती, पण तो पुढें ऐषआरामांत पडल्यावर त्याची शौर्यश्री मावळत चालली. प्रधानजीच्या टरावबंदांतलें पहिलें कलम हें होतें कीं, आपल्या मध्यस्थीशिवाय राजेसाहेबांची कोणीही भेट घेऊं नये. बरें, यदाकदाचित् एखादा खमक्या राज्यांतली हवाल जाहीर करण्यासाठीं आंगधिटाईनें राजापर्यंत जाऊन पोहोंचला तर राजेसाहेब त्याच्यावर डोळे पिंजारून आंगावर येत. आणि त्या बिचाऱ्याला त्यांचा खरपुस मार खाऊन परत जावें लागे. शिवाजीरावाच्या वेळेस ज्या ज्या शिस्ती बांधून दिल्या होत्या त्या सर्व ढिल्या पडल्या. राजसत्ताक राज्याला मुख्य मजबुदी काय ती फौजेची. तिचा बंध सुटला. तींत चांगलें शूर व कसलेलें माणूस राहिलें नाहीं. स्वार व शिबंदीमध्यें नवे खोगिरभरतीचे लोक भरले. परमुलूखांतला लुटीचा पैसा मिळेल तो फौजेनें सरकारपोत्यास जमा करावा अशी पहिली कैद होती, ती सुटली. ज्याला जी लूट मिळेल ती तो आपल्याच घरीं ठेवूं लागला. स्वारीमध्यें बायकांना बरोबर घेऊन जाणारांस शिरच्छेदाची शिक्षा होत होती, ती रद्द पडली. फौजेंतल्या लोकांनीं बायकांवर जुलूम जबरदस्ती

करूं नये व त्यांना धरून आणूं नये असा सक्त कायदा असतां तो न जुमानतां शिपाईलोक परमुलूखांतल्या बायका आणून त्यांचा गाईम्हशींसारखा विक्रय करूं लागले. नोकरलोकांना वेळच्या वेळेस तनखा मिळेनासा झाला. संभाजीरावाच्या खासगी खर्चाकडेसच दौलतीचा पैसा उडूं लागला. त्यानें आपल्या तुळा करविल्या. त्यांजकडे कोट्यवधि रुपये फंना झाले. ख्यालीखुशालींत तोडेचे तोडे गर्द होऊं लागले. त्यानें आपल्या बापाचा खजिना बहुतेक रिकामा करून टाकला. त्याला असें वाटलें होतें कीं, माझा खजिना ही एक माझी कामधेनु आहे. तिच्या आंचळांतून कितीही पैसा ओढला तरी ती आटावयाची नाहीं. पण ती कामधेनु शेवटीं आटली. तिच्या कासेंत नवीन भर पडेनाशी झाली, आणि वरचेवर तिचीं आंचळें ओढूं लागले, तेव्हां तिच्या अंगांतल्या रक्तमांसाचें शोषण होऊन ती अस्थि आणि चर्म या रूपानें मात्र अवशिष्ट राहिली. राज्यांतला काळीचा वसूल येईनासा झाला. कुळांकडे बाक्या थकल्या. जेथचा पैसा तेथेंच मुरूं लागला. मग दिवाणजींनीं खजिना वाढविण्याची एक मासलेदार नवीन युक्ति काढली. जमिनीचे धारे वाढविले, शिवाय कराच्या कांहीं नवीन बाबी बसविल्या, तरी शिलक सांखळी पाहतांना ह्या मार्गानें जी भर पडेल असें वाटलें होतें तितकीच खजिन्यांत खुट आली. पुष्कळ जमिनी ओसाड पडल्या. कुळें नित्राण होऊन परागंदा झालीं. मग खर्च कमी करण्यासाठीं कांहीं कामगार कामावरून दूर केले. मामलती मक्तयानें देण्याची वहिवाट सुरू केली. मक्तेदार लोक आपली व सरकारची तुंबडी भरण्यासाठीं रयतेच्या अबादानीकडे लक्ष देतनासे झाले. शेवटीं ती ह्या राज्यांतून उठून परराज्यांत जाऊं लागली. गांवचे

गांव ओसाड पडले. राज्यक्षयाचीं सर्व लक्षणें पूर्ण दिसूं लागलीं. महालानिहायच्या सुभेदारांकडून लिहिणीं येत. त्यांना जबाब देतां देतां कवजीसाहेब थकले. त्यांच्याकडे सुनावणीसाठीं कारकुनांनीं कागदपत्र आणिले म्हणजे त्यांच्या कपाळाला सत्रा आठ्या पडत. ते म्हणत, इतकी दगदग कोणी करावी ? कारकुनांनीं जाब लिहून पुरे करण्यासाठीं आणिले म्हणजे म्हणत, हे कागद एकदां पाहिलेच आहेत. पुढें, लिहिणारे इतके फुगवून काय लिहितात ? इतकें भारूड कशाला वाढवावें ? हांशील हांशील कलमें लिहावीं. असें चऱ्हाटीं लिहिणें आम्हाला नको. चंदीचंदावराकडे शत्रु चढाव करून आले तेव्हां तिकडच्या अधिकाऱ्यांनीं कुमकेस कांहीं फौज पाठवा ह्मणोन लिहिलें. तेव्हां प्रधानजी म्हणाले, चंदीचंदावराकडचे किल्ले घेऊन इतकें लांबपर्यंत राज्य वाढविलें कशाला ? त्या किल्ल्यांना गलिमानें वेढे घालावे, येथपर्यंत त्याचा बोभाटा यावा, व येथून कुमक पाठविण्याच्या तयारीस लागावें तों तिकडचे किल्ले हातांतून जाऊन आपले लोक मारले जावे. एवढ्या पंचाइतीवांचून काय खोळंबलें आहे ? राज्य कसें आंगठीवरच्या खड्यासारखें लहानसें सुरेख असावें. त्याजवर पाहिजे तिकडून आपली नजर पोहोंचावी. ह्मणजे बंदोबस्त चांगला रहातो, आणि नोकरचाकरही आपआपल्या मर्यादेनें चालतो. पूर्वींच्या कारभाऱ्यांनीं एवढा उगीच फापट पसारा पसरून ठेविला आहे. ह्यांत कांहीं अर्थ नाहीं. फौजफांटा वाढवून गलीमाबरोबर वारंवार हंबरीतुंबरी करीत बसावें त्यापेक्षां जें गेलें तें त्याजकडेच कां राहीना ? राज्य जितकें कमी होईल तितकी दगदग कमी.

ह्या भाषणावरून कलुषाचा नाकर्तेपणा स्पष्ट दिसून येतो. एवढ्या मोठ्या हुद्द्याला तो अगदीं नालायक होता. अस

बेअक्कल, अजागळ आणि पाजी मनुष्याच्या हातीं संभाजीरावानें राज्यसूत्रें दिलीं होतीं, तेव्हां प्रजेला सुख कोठून होणार ? राजघराण्यांत संभाजीरावाची राणी येसूबाई पोक्त विचाराची, चतुर आणि शहाणी बायको होती. तिच्या आंगीं मुत्सदगिरीही होती. तिच्या हातीं राजसत्ता असती तर तिनें देखील कारभार चांगला पाहिला असता. पण, संभाजीरावाच्या हेकड व मानी स्वभावापुढें त्या विचारीचें कांहीं चालत नव्हतें. हिची व त्याची दोन दोन महिन्यांत भेट होत नसे. कधीं काळीं लहर फिरली तर एखादे दिवशीं स्वारी तिच्या महालांत घटिकाभर जावयाची. त्या घटिकेच्या अवकाशांतच ती स्त्रीजातीच्या अधिकारानुरूप युक्तिप्रयुक्तींनीं त्याची पुष्कळ कानउघाडणी करी. तेवढ्या वेळापुरता तो शुद्धीवर येऊन मी आतां चांगला चालेन, राज्यकारभार स्वतः पाहीन, वाईट लोकांच्या छंदानें चालणार नाहीं, असें कबूल करी. पण, तेथून उठून पुन्हां तो आपल्या चांडाळचौकडींत गेला कीं, पूर्वीचा क्रम चालू. शिवाय हा बदफैली राजा केवळ त्या तुळशीशींच रममाण होऊन संतुष्ट राहिला नाहीं. औरंगजेबाची कन्या रोषनार हिच्या सौंदर्याची कीर्ति ऐकून कोणत्या तरी युक्तीनें तिला फसवून वश करावी याविषयीं तो मसलती करूं लागला. "विनाशकाले विपरीतबुद्धिः" या म्हणीप्रमाणें भावीविपत्तिसूचक विचार त्याच्या मनांत घोळूं लागले. आतां या साहसाच्या आणि मूर्खपणाच्या कृत्यांत तो गुंतला असतां त्याजवर कसकसे प्रसंग गुदरले व त्यांचा परिणाम कसा झाला याचें निरूपण पुढें करूं.

---

# भाग १०.

" विपयिणः कस्यापदोऽस्तं गताः."

म्हैसुराकडे जाण्यासाठीं सैन्याची एक टोळी पन्हाळगडाचे बाजूनें एक दिवस चालली होती. त्या वेळेस अस्तमान होत आला होता. गडाची पडछाया जाण्याच्या रस्त्यावर पडली होती. उन्हाच्या वेळेस पहाड तापून त्याच्या झळ्यांनीं आंगें पोळतात ह्मणून उन्हाची तिरीप कमी झाल्यावर टोळीचे लोक वाट चालावयास लागले. ही वेळ प्रवाशीलोकांस अत्यंत सुखकारक असते. रात्र जसजशी पडत चालली तसतसा त्यांस अधिकच आनंद होत चालला. दोन्हीं अंगांला उंच उंच सुळखे असून; त्यांतून रस्ता गेला होता. रात्र पडण्याबरोबर आकाशांत चांदण्या चमकूं लागल्या, व सुळख्यांची पडछाया वाटेवर पडली.

टोळीच्या पुढच्या बाजूस एक मेणा चालविला होता. त्याला चार भोई लागले होते. मेण्याचीं दारें झांकलेलीं होतीं. त्या उंच सखल वाटेंतून झराझर चालतां येईना, ह्मणून भोईलोक खांद्यावर मेणा मोठ्या हुशारीनें घेऊन हळू हळू चालले होते. भोईलोक मेणा वाहतांना तोंडानें एक प्रकारचा सूर काढतात, त्याच्या नादांत ते आस्ते आस्ते मार्गक्रमण करीत होते. मेण्याचे पाठीमागें सुमारें २०० पायदळ शिपाई एका रांगेनें एकामागें एक चालले होते. वाटेनें जातां जातां ते एकमेकांशीं शिळोप्याच्या गोष्टी करीत होते. त्या बोलण्याचा प्रतिध्वनि पहाडांतून उठून एका आवाजाचे दोन आवाज होऊन त्या खिंडीमध्यें बराच गजबजाट झाला होता.

पुढें एक रस्ता इतका चिंचोळा लागला कीं तेथून मेणा वा-

हून नेण्यास भोईलोकांस फारच अडचण पडली. दोन मनुष्यें एकमेकांचा हात धरून जोडीनें चालतील इतकी सुद्धां त्या वाटेची रुंदी नव्हती. ह्या बिकट जाग्यांतून मेणा बाहेर पडतो न पडतो इतक्यांत समोरून एका हत्यारबंद टोळीनें भोयांना अडवून धरिलें. ती मेणा पुढें जाऊं देईना. हत्यारबंद लोक नजरेस पडतांच भोयांची अगदीं गाळण झाली. दुसरीकडून जाण्यास रस्ता असता तर मेणा टाकून त्यांनीं लागलाच सूं बाल्या हांकला असता. पण करतात काय बिचारे ! त्यांना मागें सरतां व पुढेंही जातां येईना. मग तसेच जागच्या जागीं मेटेकुटीस येऊन ते मट्दिशीं खालीं बसले, आणि समूरच्या लोकांच्या पायां पडूं लागले.

पण त्या लोकांनीं त्यांच्या विनवणीकडे बिलकूल लक्ष दिलें नाहीं. त्यांच्या खांद्यावरचा मेणा त्यांनीं अगोदर मुकाट्यानें अलग काढून घेतला, आणि सांगितलें कीं, " माघारे फिराल तर ठीक आहे, नाहीं तर फुकट मेले जाल. " इतक्या अवधींत मागचे लोकही अगदीं मेण्याशीं येऊन भिडले. ह्यामुळें भोयांना मागें सरण्यास एक वितीचीही फट राहिली नाहीं. तरी आपल्या कोंपरांनीं तशीच रेटारेटी करून ते जरा मागें हटले. पण पुढें कांहीं हल्ला हरकत आहे अशी मागच्या लोकांना वर्दी लागतांच तेही घाईघाईनें पुढें सरले. त्या वेळेस त्या खिंडींत एकच भाऊगर्दी झाली. तरी सगळ्यांच्या पुढें एक शिपाई आंगरेटाईनें चालून गेला. इतक्यांत त्याच्या उरांत समोरून कोणी भस्दिशीं भाला मारला आणि रागानें बोलला कीं, "खबरदार, आणखी एक पाऊल पुढें टाकलेंस कीं मेलास असेंच समज. आमच्यापाशीं लोकांचा एवढा मोठा भरणा आहे कीं, ते तुम्हां सगळ्यांना एका क्षणांत कोंकरांसारखे कापून टाकतील.

तुम्हीं आहा तेथेंच जरा दम धरून उभे रहाल तर कांहीं हरकत न करितां आम्हीं तुम्हांला जिवानिशीं पुढें जाऊं देऊं."

नंतर आमचा मेणा कोठें आहे असें त्या टोळींतील लोकांनीं विचारिलें, तेव्हां त्यांस जबाब मिळाला कीं, "तुमचा मेणा आणि तुमची मेण्यांत बसलेली सुकुमार शहाजादी सुस्थळीं आहेत असें समजा. आम्हीं डोंगरांत रहाणारे लोक आहोंत तरी तिच्या योग्यतेप्रमाणें तिचा पाहुणचार करण्याचा आम्हीं चांगला बंदोबस्त ठेविला आहे. त्याविषयीं अगदीं बेफिकीर असा." पुन्हां त्यांनीं विचारिलें कीं, "हा पाहुणचार करणारा कोण माणुस आहे व त्याचें नांव काय, तें सांगा." तेव्हां त्यांस जबाब मिळाला कीं, "त्याला संभाजीराजा असें ह्मणतात. शहाजादीला त्याच्या हातून अगदीं पीडा व्हावयाची नाहीं. तुम्हीं आपल्या बादशहाला खुशाल जाऊन कळवा कीं, तुमची मुलगी मराठ्यांच्या राजापाशीं सुरक्षित आहे. ती त्याच्याजवळ असली तरी तुमच्या मोठेपणास कांहीं लांछन लागण्यासारखें नाहीं."

ह्याप्रमाणें इकडे बोलणें चाललें असतां सगेरच्या टोळींतील कांहीं लोक मेणा पन्हाळगडावर घेऊन गेले. मागें त्या टोळींतले कांहीं शिपाई व त्यांच्यावरचा मुख्य अंमलदार इतकीं जणें मात्र राहिलीं होतीं. पन्हाळगडाला गुहा व दऱ्या पुष्कळ आहेत. त्यांत प्राचीनकाळीं, साधु, संत, संन्याशी, ऋषि, इत्यादि महंत तपश्चर्या करीत असत, अशा दंतकथा अद्यापि चालू आहेत. गडाच्या बाजूला पांडवलेण्यासारखीं लेणींही पुष्कळ आहेत. त्यांमध्यें पराशरऋषीची तपश्चर्येची एक गुहा आणि पांडवदरा हीं खोदलेलीं दोन लेणीं भव्य असून लोकप्रसिद्ध आहेत. मेणा गडावर जाऊन पोंचतांच वरून एक तोफेचा बार झाला. ती, मेणा गडावर जाऊन सुरक्षित

पोंचल्याची खूण होती. मग तो मुख्य सरदार व त्याचे अनुयायी एकाएकीं मागें सरून अंधारांत नाहींसे झाले. ते तेथून निघोन पांडवदऱ्यांत लपून बसले. गडाच्या चोरवाटा व सर्व खांचाखोंचा त्यांस माहीतच होत्या. इकडेच हे समूरचे लोक नाहींसे होतांच अवरंगजेबाच्या टोळीचे लोक आपआपले जीव घेऊन मागें न पाहतां तडक समूरचा रस्ता धरून निघाले. बादशहाची मुलगी आपल्या ताब्यांतून जुलूमानें काढून नेली ह्मणून ते मनांतल्या मनांत अतिशय संतापले होते. पहाडी रस्त्यांतून बाहेर पडण्याबरोबर त्यांनीं अगोदर रागाच्या सपाट्यांत सगळ्या भोयांचे प्राण घेतले. भोईलोक जातीचे मराठे असल्यामुळें संभाजीराजाला सामील होऊन त्यांनीं दगाबाजीनें आम्हांला आडवाटेनें नेऊन आमचा मेणा त्याच्या स्वाधीन केला असें बादशहास जाहीर करण्याची त्यांनीं मसलत ठरविली. तरी बादशहाचा उग्र स्वभाव व राग त्यांस पुरा माहीत होता. प्रत्यक्ष त्याची मुलगीच आमच्या ताब्यांतून गेली, तेव्हां आतां आमचीं डोकीं उडविल्याशिवाय तो रहाणार नाहीं अशी त्यांस धास्ती पडली. तिकडे कर्नाटकांत पाळेगार लोकांनीं बंडावा केला होता, त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं अवरंगजेबाची स्वारी त्या वेळेस हैसुराजवळ जाऊन राहिली होती. त्याची मुलगी दक्षिणेंतून तेथें येऊन त्यास मिळणार होती. तिकडे जाण्याच्या उद्देशानें ती पन्हाळगडाच्या बाजूनें जात असतां वरील प्रमाणें गोष्ट घडून आली. अस्तु.

सुमारें ६००।७०० वर्षांपूर्वीं दक्षिणेंत प्रसिद्ध भोजराजा राज्य करीत होता. त्याची पन्हाळगड ही मुख्य गादीची जागा होती. पुढें कालांतरानें हिंदूंचें राज्य मोडून दक्षिणेंत मुसलमान लोक राज्य करूं लागले. तेव्हां बरींच वर्षें हा पन्हाळगड मुसलमानांच्या ताब्यांत होता. ह्यामुळें तेथें त्यांचीं बरींच पीरस्थानें-

ही झालीं होतीं. पुढें संभाजीरावाचा बाप शिवाजीराव ह्याच्या ताब्यांत हा गड गेल्यावर त्याच्या कारकीर्दींत तेथें आणखी कांहीं हिंदूंचीं देवालयें झालीं. शिवाजीरावानें गडावर एक टोलेजंग राजवाडा बांधला. त्याच्या आसपास धान्य सांठविण्यासाठीं त्यानें चार चिरेबंदी इमारती बांधल्या. त्यांना गंगा, यमुना, सरस्वती आणि धर्मकोटी अशीं निरनिराळीं नांवें दिलीं. ह्या सर्व इमारती व मुसलमानांचीं पीरस्थानें अद्याप तेथें दृष्टीस पडतात. गडावर एक जिवंत गोड पाण्याचा झरा आहे. त्याला नागझरी असें म्हणतात. त्याचें पाणी स्वच्छ असून विपुल आहे. असो.

शहाजादी रोषनार इला संभाजीरावाचे लोक गडावर घेऊन गेले त्या समयीं मध्यरात्रीचा अम्मल झाला होता. गड फार उंच असून हवा थंड गार सुटली होती. तेथें शिबंदी बेताचीच होती. मेणा वर नेल्यावर तिला राजवाड्यांत घेऊन गेले व त्यांतील एका दिवाणखान्यांत तिला ठेविलें. तिच्या करमणुकीसाठीं व तिच्या जेवणखाणाची आणि नाहाणमाखणाची बरदास्त राखण्यासाठीं तिच्याजवळ दोन कुळंबिणी ठेविल्या. त्यांपैकीं एकीचें नांव अहिल्या व दुसरीचें नांव मंजुळा. अहिल्या वयानें जरा पोक्त होती, आणि मंजुळा वयानें लहानच पण चतुर होती. शहाजादी रोषनार त्या वेळेस ऐन तारुण्याच्या भरांत होती. तिला सोळा सरून नुकतेंच सत्रावें वर्ष लागलें असेल नसेल, इतकेंच तिचें कोंवळें वय होतें. तिच्या एकंदर स्वरूपावरून ती जरी अप्रतिम सुंदर होती असें म्हणतां येणार नाहीं, तथापि सुरेख होती असें ह्मणतां येईल. तिचा बांधा एटदार होता, व ती प्रकृतीनें निकोप असून तिची आंगकांति तेजस्वी होती. ती आपल्या बापाची फारच लाडकी होती. ती नेहमीं त्याच्या

स्वारीबरोबर फिरत असे. ह्याच खेपेस पुढें जाण्याची त्वरा असल्यामुळें तिला मागें ठेवून अवरंगजेबास पुढें जावें लागलें होतें. तिला पक्का भरंवसा होता कीं, मला धरून नेल्याची बादशहाला बातमी लागली पुरे, तो मला लागलाच सोडवून नेईल. गडावर कोणी धरून आणिलें आणि मी कोणाच्या कबज्यांत आहें, हें तिला पुरतें कळलें नाहीं. तिला इतकाच वहीम आला कीं, डोंगरांत रहाणाऱ्या चोरटे लोकांनीं पैशाच्या लालचीनें मला पकडून आणिलें असेल. त्या लोकांच्या पदरांत पैसा पडला ह्मणजे ते मला सोडून देतील. पण पैशाच्याच लोभानें त्यांनीं हें काम केलें असल्यास ती त्यांची आशा व्यर्थ आहे, कारण, माझ्या बापाला हें वर्तमान कळलें कीं पैसा न देतां तो फौज पाठवून त्यांचें पारिपत्य करून मला खचीत सोडवून नेईल. याप्रमाणें तिच्या मनांत विचार घोळूं लागले.

तिला गडावर नेऊन दोन दिवस झाले. तेवढ्या वेळांत दोन कुळंबिणींशिवाय तिसरें कोणीही मनुष्य तिच्या दृष्टीस पडलें नाहीं. मुसलमान लोकांच्या बायकांना जनानखान्यांत एकलकोंडेपणानें राहण्याची संवय असतेच. ह्यामुळें तिला तेथें दोनच बायकांमध्यें वेळ घालविण्यास फारसें कठीण वाटलें नाहीं. बापाच्या स्वारींत मराठ्यांशीं बोलण्या चालण्याचा तिला पुष्कळदां प्रसंग येत असे; ह्यामुळें तिला जरी मराठी भाषा शुद्ध व अस्खलित बोलतां येत नव्हती, तरी लोकांनीं बोललेलें तिला सर्व कळे. मंजुळेपेक्षां अहिल्येला, भारत, भागवत व रामायण ह्यांतल्या कथा पुष्कळ माहित होत्या. शहाजादीला करमेनासें झालें ह्मणजे ती तिला, उखा, उलूपी, सीता, द्रौपदी, ह्यांच्या स्वयंवराच्या वगैरे गोष्टी सांगून तिचें चित्त-

रंजन करी. तिच्या गोष्टींनीं रोपनारेचें मन शृंगारपर विषया-कडे फार वळत चाललें. अशा रीतीनें तिचा वेळ बरा जात असे. पण मधून मधून, मला येथें आणिलें कोणीं, कशासाठीं आणिलें, व अशा स्थितींत मी रहाणार किती दिवस, असे तिच्या मनांत तरंग येत. त्यांचें समर्पक उत्तर देऊन तिची जिज्ञासा कोणीही तृप्त करीना. ह्यामुळें ती मनांतल्या मनांत झुरूं लागली. दोघी कुळंबिणींशिवाय आणखी एक तिसरी बायको येत असे. ती फक्त तिचें जेवणाचें ताट नित्य तिच्यापुढें आणून ठेवी, आणि रोज नवे नवे पदार्थ करून तिला खाऊं घाली. पण तिला कधीं प्रश्न केला असतां जबाब न देतां आपलें काम मुक्यासारखें आटपून ती तेथून बाहेर निघून जात असे. सारांश, आपली स्थिति तिला समजून घेण्याची इच्छा झाली होती ती कोणीही पूर्ण करीना.

ती ज्या वाड्यांत होती त्या वाड्याच्या दुसऱ्या बाजूला कधीं कधीं रोजच्यापेक्षां अधिक गडबड असे. पण त्या तिघी बायांपैकीं एकीनेंही तिला कांहींएक कळूं दिलें नाहीं. तिनें कित्येक वेळां त्यांना पैशाचीही लालुच दाखविली, तरी त्यांचीं तोंडें शिवल्यासारखीं बंद होतीं तीं त्यांनीं कधीं उघडलीं नाहींत. मी विचारलेल्या प्रश्नांचा कोणी जबाब देत नाहींत, हा काय चमत्कार आहे, ह्मणून तिला वारंवार आश्चर्य वाटे, तरी तिनें तसाच कांहीं दिवस दम खाल्ला. पण मग मग तिला अगदीं धीर निघेनासा झाला. ती रोजच्यासारखी पोटभर जेवीनाशी झाली. तिच्या दासी 'अहिल्या व मंजुळा ह्या नेहमींप्रमाणें तिच्याजवळ गोष्टी सांगत बसत, पण त्यांजकडेही तिचें चित्त लागेनासें झालें. ती केव्हां केव्हां एकाएकीं मुळुमुळू रडूं लागे. वाड्यांत कोंडून ठेविल्याचें तिला

इतकें वाईट वाटत नसे, पण कोणी खरी हकीकत सांगेना म्हणून तिचें चित्त सदा उदास असे. एके दिवशीं ती आपल्या ठिकाणीं आपल्या स्थितीचा एकांतीं विचार करीत बसली असतां दिवाणखान्याचें दार उघडून एकाएकीं एक अनोळखी पुरुष आंत आला. त्याला पाहून ती प्रथम थोडीशी दचकल्यासारखी झाली. पण त्याची आपादमस्तक मूर्ति पाहून तिला लागलाच हर्षही झाला. त्याचा बांधा लहानच पण गुटगुटीत होता. वय तिशीच्या आंतच होतें. चेहेरा गुलजार व डोळे मोठे असून पाणीदार होते. कपाळाची पट्टी रुंद होती. रंग काळा सांवळाच होता, तरी मुखचर्येवरून तो मोठा गुलहौशी दिसला. मिशा पिळदार असून दोन्ही गालांवर त्यानें गोल कल्ले राखले होते. मान मासांत रुपून गेली होती. छाती विशाळ होती. डोक्याला बसंती रंगाचें लहानसें कंगणीदार शिपाईगिरी पागोटें, आंगांत पायघोळ शिलेदारी अंगरखा, आणि कंबरेच्या खालीं गुडघ्यांपर्यंत तंग मांडचोळणा, हा त्याचा मराठेशाही पोषाख होता. हातांत एक वेताची बारिकशी छडी होती. ती खालीं टेंकून तिच्या पुढें तो ऐटीनें उभा राहिला. त्याला पाहतांच तिचा चेहेरा प्रथम कांहीं कावराबावरा झाला. परंतु लागलाच क्षणाभरानें तो पूर्वस्थितीवर येऊन हळू हळू खुलत चालला. प्रथम त्यानेंच आपल्याला कांहीं विचारावें असें तिच्या मनांत होतें, म्हणून ती त्याजवळ कांहीं बोलली नाहीं. तिनें आपल्याशीं अगोदर कांहीं बोलावें म्हणून तोही तिच्याकडे पाहत उभा राहिला. त्याची हर्षभरित मुद्रा पाहून तिला बराच दिलभरंवसा आला. शेवटीं आपल्या मंजुळ वाणीनें तिनेंच त्याच्या बरोबर प्रथम बोलण्यास आरंभ केला, तो असा:—

**शहाजादी**—महाराज, हुजूरके चेहरेपरसे मैं ऐसा समजती हुं के, आप बडे खानदानी षख्स् है. इस् जगहपर मेरी मेहमानदारी किस्के तरफ्से हो रही है. यह मुझे आप मेहरबानीके साथ फरमावेंगे तो मुझपर निहायत् एहसान होगा.

[ महाराज, आपल्या मुखचर्येवरून आपण कोणी थोर कुलीन गृहस्थ आहां असें मला वाटतें. तर मला ह्या ठिकाणीं हा पाहुणचार कोणाचा होत आहे, हें कृपा करून जर आपल्याकडून कळेल तर मजवर आपले बहुत उपकार होतील. ]

**पुरुष**—मरह्टोका राजा, जिस्को संभाजीराव कहते है, उस्के महलमें आपकी मेहमानदारी होती है. और वह मेहमानदारी करनेवाला खुद्द राजा संभाजी आपके साम्ने हाजीर है.

[ ज्याला संभाजीराव असें म्हणतात त्या मराठ्यांच्या राजाच्या वाड्यांत तुला पाहुणचार होत आहे, व तो करणारा संभाजीराजाच तुझ्या पुढें उभा आहे. ]

**शहाजादी**—मैं देहेलीके बादषाहकी साहबजादी आपने वालिद्की तरफ् जातीथी, और रहामेसे इस् जगहपर मुझे रोककर किस्लिये ले आये, और इस् बलाय नागाहानीमें गिरफ्तार करके रखनेका बाइस् क्या है.

[ पण ही दिल्लीच्या बादशहाची मुलगी आपल्या बापाकडे जात असतां तिला ह्या ठिकाणीं अडवून आणण्याचें कारण काय? आणि तिला येथें एकांतवासांत ठेविण्याचा उद्देश कोणता? ]

**पुरुष**—आपको ले आके कैद करनेका बाइस् यह है के, मरह्टोमें और बादषाहोमें हमेषः इत्तेफाक रहे और वह इत्ते-

फाक बादषाहकी लडकीसे षादीके बाईस्से होवे, ऐशी हमारी खाईष है.

[ उद्देश मिळून इतकाच कीं, मराठ्यांचा व बादशहाचा नेहमीं सलोखा रहावा, आणि तो सलोखा त्याच्या मुलीबरोबर शरीरसंबंध होऊन व्हावा, अशी त्या राजाची इच्छा आहे. ]

**शहाजादी**—यह क्या बात् है? यह बात क्यौकर होगी? मुसलमान और मरठोमें षादी कभी हुई है? तिस्परभी पाहाडमें रहनेवाले जंगलीलोगोके राजाके साथ षादी करनेको मैं बिलकुल् कबूल न करूंगी.

[ भलतेंच नाहीं तर. ही गोष्ट घडेल कशी? मुसलमान आणि मराठे ह्यांचा शरीरसंबंध कधीं झाला आहे का? त्यांतून पहाडांत राहणाऱ्या जंगलीलोकांच्या राजाबरोबर लग्न करून घेण्यास मी कधीं कबूल व्हावयाची नाहीं. ]

**पुरुष**—शाहजादी, यह आपकी बिलकूल गैर समज है. मैं मुल्क् दख्खन्का खास राजा हूं. और मेरे वालिदकां नाम इस् मुल्क् महशूर है. आपके वालीद अवरंगजेब बादषाहकोभी इस्की अगाही है. अभी आप मेरे ताबेमें हो तोभी आपको फरेक्ता करनेमें बादषाही हुकमत् न चलाऊंगा. ऐसा तहकीक समझीये. जरासा आप ख्याल करोगे तो मरठोके राजाके साथ षादी करना कुच हलकी बात नहीं है, ऐशी आपकी खात्री होगी. अब यह् महल् छोडके कहीभी जानेकी आपको परवानगी नहीं. दुसरी जो कुच् आप खाईष करोगे वह मैं बहूत खुषीसे कबूल करूंगा. मेरे हालसे आप बराबर वाकीफ् हुवे बाद खुद्बखुद् आपकी खातरी होगी कि, आप जैसा समजते हो तैसा मैं

जंगलीलोगोका राजा नहुं. बहुत अछा, मैं अब् जाताहूं. कल् फिर फुरसद्के साथ आपसे मिलुंगा.

[ शहाजादी, हा तुझा अगदीं गैर समज आहे. मी दक्षिणदेशांतला एक स्वतंत्र राजा आहें. माझ्या बापाचें नांव इकडे लोकविख्यात आहे. खुद्द तुझा बाप अवरंगजेब बादशहा ह्याला सुद्धां त्याची माहिती आहे. आतां तूं जरी येथें माझ्या ताब्यांत आहेस, तरी तुला वश करण्यासाठीं मी आपली राजसत्ता तुझ्यावर चालविणार नाहीं. हें खचीत समज. तूं थोडा विचार केलास तर मराठ्यांच्या राजाबरोबर लग्न करून घेण्यांत कांहीं हलकेपणा नाहीं अशी तुझी खातरी होईल. हा राजवाडा सोडून बाहेर जाण्यास मात्र तुला परवानगी मिळणार नाहीं. दुसरें कोणतेंही तुझें मागणें असेल तर तें मी मोठ्या खुषीनें कबूल करीन. माझी तुला पुरी माहिती झाल्यावर तुझी आपोआप खातरी होईल कीं, तूं समजतेस तसा मी जंगलीं लोकांचा राजा नाहीं. ठीक आहे, आतां मी जातों, उद्यां आणखी फुरसतीनें तुला येऊन भेटेन. ]

ह्याप्रमाणें भाषण करून, थोडीशी मान हालविल्यासारखें करून, संभाजीराव निघून गेला. तिच्या खाण्यापिण्याची वगैरे त्यानें उत्तम बरदास्त ठेविली होती. शिवाय बापाच्या जनानखान्याइतका तिला येथें प्रतिबंधही नव्हता, ह्यामुळें जनानखान्याच्या कैदेपेक्षां ही कैद तिला दसपटीनें बरी वाटूं लागली. तिला येथील प्रतिबंधाचा कंटाळा वाटेनासा झाला. उलटें दिवसानुदिवस तेथेंच तिला सुखावह वाटूं लागलें. राजाची साधी वृत्ति पाहून तिला समाधान होत असे. तो दररोज नेमानें तिच्याकडे एक वेळ येऊन, भेटून, बोलून जाई. त्याला

पाहिलें ह्मणजे तिच्या मनाला फार आनंद होई. त्याची रोजची येण्याची वेळ झाली म्हणजे ती त्याच्या वाटेकडे नजर लावून बसे.

राजे लोकांच्या मुलींना मुख्यत्वेंकरून पुरुषांच्या आंगचा शौर्यगुण फार आवडता असतो. तो संभाजीरावामध्यें पूर्णपणें वसत होता. शिवाय, रोषनार भरज्वानींत आली होती, व तोही ऐन उमेदींत असून रूपानें देखणा व बोलण्याचालण्यांत चतुर असल्यामुळें तिचें मन त्याच्याविषयीं हळू हळू पाघळत चाललें. तिचा दिल त्याजकडे पुरा गुंतत चालला आहे, असें तिच्या दासींच्याही मनांत पुरें येऊन चुकलें. त्यांच्यापाशीं ती त्याच्या गुणांविषयीं उघडपणें बोलूं लागली. आणि त्याजविषयींचें त्यांचें मतही काढून घेण्याचा ती प्रयत्न करूं लागली. केव्हां केव्हां तिच्या मनांत असें येई कीं, मी मराठ्यांचे कुलांत किंवा हा पुरुष आमच्या मुसलमान कुलांत उत्पन्न झाला असता तर किती छानदार झालें असतें. सारांश, त्याच्याविषयीं तिचा गुप्तपणाचा विचार कांहीं राहिला नाहीं. पुन्हां तिला वाटे कीं, तसें नसलें ह्मणून काय झालें. हा राजपुत्र आहे आणि मी राजकन्या आहें, इतकें बस नाहीं का ? मग ह्याजबरोबर लग्न करण्यास हरकत कोणती ? इकडे त्याचें मनही तिच्याविषयीं अधिकच उल्लू झालें. त्याच्या मनांत कांहीं निराळेच तरंग उठूं लागले. मुसलमानाच्या मुलीबरोबर मराठ्यानें लग्न करण्यास हजारों विघ्नें आहेत. इच्याबरोबर आपल्या धर्माप्रमाणें लग्न होणें अशक्य आहे. ह्यासाठीं हिला आपल्याजवळ फक्त उपभोगार्थ बाळगावी म्हणजे झालें. मराठ्यांचा मुसलमानांबरोबर शरीरसंबंध होण्याला किती अडचणी आहेत त्या तिलाही माहीत आहेत. तेव्हां तीही मजपाशीं तशा नात्यानें रहाण्यास आढेवेढे घेणार

नाहींच. असे तो मनांत मांडे खाऊं लागला. खुणामुद्रांवरून परस्परांच्या प्रीतीची खात्री जरी झाली होती, तरी त्याच्या डोक्यांत हा जो विपरीत विचार शिरला तो तिच्यापुढें काढण्यास त्याची एकाएकीं छाती होईना. शेवटीं एक दिवस बोलतां बोलतां तशा घांटावर त्यानें आपलें बोलणें नेलें; तें असें:—

**संभाजी**—क्या षाहजादी ? अखेर अपने दिलमें क्या सोचा है, वह मुझे कहीये. मैं तो आज अपनेको बहुत साहेबे अक्बाल् समजता हूं.

[कां शहाजादी, तुझा शेवटीं काय निश्चय झाला, बोल. मी तर आपल्याला आज धन्य आहें असें समजतों.]

**शहाजादी**—( लज्जेनें किंचित् खालीं पाहून ) सोच किस् बात्का और आप आपनेको किस् लिये साहेबे अक्बाल् समजते हो ? यह कुच् मैं जानती नहि.

[ ( लज्जेनें किंचित् मान खालीं करून ) निश्चय कसला, आणि आपल्याला एवढी धन्यता कशासाठीं वाटली तें मला कळत नाहीं. ]

**संभाजी**—सोच यह कि, मरठोंके राजाके पास रहना. और देहेलीके बादषाहकी लडकी मेरेसाथ रहेनेको चाहती है, इस् लिये साहेबे अक्बाल् मैं आपनेको समजता हूं.

[ निश्चय मराठ्यांच्या राजापाशीं रहाण्याचा, आणि दिल्लीपती पादशहाची मुलगी त्या राजाजवळ रहाण्यास खुषी आहे ह्मणून मला धन्यता वाटते. ]

**शहाजादी**—पर आप मुझको आपने नजदीक कौन्सी शर्तपर रखनेका इरादा करते है, वह शर्त जब् तक् मुझको मालूम नही है तब् तक् मैं आपको जबाब दे सकती नहि.

[ पण आपण मला आपल्याजवळ कोणत्या शर्तीवर ठे-

वून घेणार ती शर्त अगोदर कळल्याखेरीज माझ्यानें कांहींच जबाब देववत नाहीं. ]

**संभाजी**–षाहजादी, आपका दिल मेरे उप्पर बहुत् मुब्तिला है, ऐसा मुझे पक्का भरोसा है. और मैं आपके उप्पर कितनी प्यार मोहबत रखताहूं, यह भी आप समज गयेहो. मगर जांहां मोहबतके डोरीसे दोनोंके दिल् बंधे हुवे है वहां शर्त बगैरकी क्या जरूरत है ?

[ शहाजादी, तुझें मन माझ्यावर पूर्ण बसलें आहे, असा माझा दिलाचा पक्का भरंवसा आहे. आणि मीही तुजवर किती प्रेम करीत आहें हेंही तुला समजून चुकलें आहे. मग जेथें अशा अन्योन्य प्रेमरज्जूनें आपलीं उभयतांचीं अंतःकरणें बद्ध झालीं आहेत तेथें शर्तीबिर्तीचें काय कारण आहे ? ]

**शहाजादी**–महाराज, वह कुच् भी हो. इस् काममें मेरी येक बडी शर्त है. वह आपकी तरफ्से पूरी होगी तो मैं आपीकी हूं. वह शर्त यह है कि, हमारे पैगंबरका मझब् आप कबूल करके मेरे साथ षादी करो.

[ महाराज, तें कांहीं असो. माझी ह्या कामांत एक शर्त मोठी आहे. ती आपल्याकडून पुरी होण्यासारखी असल्यास मी आपली आहें. ती शर्त हीच कीं, आपण आमच्या पैगंबराचा धर्म स्वीकारून मग माझें पाणिग्रहण करावें. ]

**संभाजी**–आपके कहनेके अव्वलही मेरे ख्यालमें यह बात गुजरीथी, पर वैसा करनेको कितनी हरकतें हैं उस्का आपही सोच करो. मैं अगर मुसलमान हुवा ऐसा लोगोको जाहीर होगा तो मेरी हिंदू रय्यत येक पलमें मुझे दुनियासे निकाल डालेगी.

[ तूं म्हणतेस तें प्रथम माझ्याही मनांत आलें, पण तसें

करण्यास किती अडचणी आहेत ह्यांचा तूंच विचार कर. मी मुसलमान झालों असें समजतांच माझी हिंदु प्रजा एका क्षणांत मला नाहींसा करील. ]

**शहाजादी**—महाराज, आप मुसलमान होके मुझको हमरा लेकर मेरे वालिदसे अजीज हो जाना तो ये सब् हरकतें दूर होंगी. यह मेरी खूब खात्री है कि, मैं आपने वालिदको आपके लिये कहूंगी तो आपके येक वाल्को आल् न आकर आपके रय्यत्के तरफ्से आपको कोई तरहकी इजा न हो ऐसा वे बंदोबस्त करेंगे, और आपनी षादीके बाबमेंभी हरकत न ल्यावेंगे.

[ महाराज, आपण मुसलमान होऊन मला घेऊन माझ्या बापाला शरण जावें, म्हणजे सर्वच विघ्नें टळलीं. माझी खातरी आहे कीं, मी रदबदली केली असतां तो आपल्या एका केसासही धक्का न लावितां आपणांस आपल्या प्रजेपासून पीडा होणार नाहीं अशा प्रकारचें साह्य करील, व आपला संबंधही घडण्यास हरकत करणार नाहीं. ]

**संभाजी**—आप कहतेहो यह सच् है. मगर कैसा भी हो पर मैं मरठोका राजा हूं, और आप देहिलीकी षाहाजादी हो, इस् लिये आप ही ख्याल करो कि, ऐसा लोगोके बरखिलाफ बुरा काम करूंगा तो मेरे बाहदूरीकी बदलामी होगी, और वह आपको भी क्योंकर अछा मालूम होगा.

[तूं म्हणतेस तें खरें. पण किती झालें तरी मी मराठ्यांचा राजा आहें व तूं दिल्लीपतीची कन्या आहेस. तेव्हां तूंच विचार करून सांग कीं, अशा प्रकारच्या लोकविरुद्ध कर्मास मी प्रवृत्त व्हावें कसें ? तेणेंकरून माझ्या शौर्यास जें लांछन लागणार आहे तें तुला तरी कसें आवडेल ? ]

**शहाजादी**—महाराज, आप कहते हो वहभी दुरस्त है, लेकिन् आपके दिलूमें जो उमेद है वो किस् तऱ्हसे बर आवेगी ? आप और हम् येक मझब्के हुवेबगैर षादीकी बात किस् तरह जमेगी ? हां ! हां ! और येक वेहत्तर बात मेरे ख्यालमें आई है. यह सब तस्किरा रहने दो. मुझकोहि मुसलमानकी हिंदू क्यौं नही बनालेते ?

[ महाराज, आपण म्हणतां तेंही कांहीं अंशीं खरें आहे. पण मग आपल्या मनाप्रमाणें गोष्टी कशा घडून याव्या ? आपण उभयतां एकधर्मी असल्यावांचून हा संबंध कसा जुळून येणार ? हो ! हो ! बरें सुचलें. सगळेंच राहूं द्या. मलाच आपण हिंदू करून टाकानात ? ]

**संभाजी**—यह कैशी पागलूपन्की बात है ! ऐसा होने मुवाफिक् होता तो मेरे ऐसा इस् दुनियामें बुलन् येकबाल् कोई न था. पर क्या करूं ? हमारे मझब्में ऐसा करनेका हुकम् नही है. हिंदूका मुसलमान होगा, लेकिन् मुसलमानका हिंदू कभी न होगा.

[ हा वेडे, तसें होण्यासारखें असतें तर माझ्यासारखा ह्या पृथ्वीवर धन्य कोणीच नसता. पण काय करूं ? आमच्या शास्त्राला तसें करणें संमत नाहीं. हिंदूचा मुसलमान होईल, पण मुसलमानाचा हिंदू होत नाहीं. ]

**शहाजादी**—महाराज, यह तो मोहब्बतका सौदा है. वह सौदा बनानेको हमने दो रास्ते आपको दिखलादिये. इन्मेंसे येक भी न होगा तो खुदाकी मर्जी. मैंतो दिल्से आपके साथ शादी कर चुकी हुं. और अगर अपने दोनोंकी बाहम सोबत नहोगी तो मैं जिंदगी भरतक् ऐशीही कूंवारी रहूंगी. ऐसा मेरा मुस्तकिम इरादा है.

[ महाराज, हा तर प्रेमाचा सौदा आहे, व तो करण्यासाठीं मी आपल्याला दोन उपाय सुचविले. त्यांतून कोणताही एक घडून येण्यासारखा नसल्यास खुदाची मर्जी. मी तर आपणांस मनानें वरलेंच आहे, व जर आपला उभयतांचा शरीरसंबंध कोणत्याच उपायानें घडून येणार नाहीं तर मी जन्मपर्यंत अशीच कुमारी रहाणार असा माझा निश्चय झाला आहे. ]

**संभाजी**–इस् बातके लिये रास्ता न निकलेगा ऐसा नही है. आप जब् अहिस्तगीसे और ख्याल करके हमारी बात सुनीयेगा तो अपना मझब् न बदलकर अपना दोनोंका इत्तिफाक् होनेकी येक वजेह् मेरे ख्यालमें आती है. वह वजेह यह है कि, षादी न करके हं दोनो इसी तरहसे येखठे रहेंगे तो बस् है. षादीमेंही क्या ज्यादे है ?

[ ह्याला उपाय नाहीं असें नाहीं. तूं जर शांतपणानें आणि विचारानें ऐकून घेशील तर धर्मांतर न करितां आपला उभयतांचा संबंध घडण्यास मला एक चांगला उपाय सुचला आहे. ( असें ह्मणून कांहीं वेळ स्तब्ध राहून भीत भीत शहाजादीस ह्मणतो ) उपाय ह्मणून एवढाच कीं लग्न न लावितां आपण तशींच एकत्र राहूं ह्मणजे झालें. लग्नांतच काय विशेष आहे ? ]

**शहाजादी**–( जरा क्रुद्ध मुद्रेनें ) आपका कहना बिलकुल् बे फायदे है. ऐसा गैर मुनासिब् काम करनेको आप मुझे कहोगे, यह बिल्कुल् मुझको मालुम न था. तोबा ! तोबा !

[ ( जरा क्रुद्ध मुद्रेनें ) हें तुमचें बोलणें अगदीं निष्फळ आहे. असें अनुचित कर्म करण्याविषयीं तुह्मी अनुमोदन द्याल असें मला बिल्कुल वाटलें नव्हतें. तोबा ! तोबा ! ]

**संभाजी**–शाहाजादी, ऐसा गुस्सा न कीजिये. जरा अहिस्तगी रखीये. सही पूछिये तो वैसा रहेनेमें जो मजा है वह शादी किये हुवे खाविंद और औरतोंमें नही है.

[ शहाजादी, अशी रागावूं नको, जरा शांत हो. खरें पुसशील तर तसें रहाण्यांत जी मजा आहे ती लग्न झालेल्या नवराबायकोंत नसते. ]

**शहाजादी**–उसमे मजा हो या नहो. उसका ख्याल् मुझको करनेकी जरूरत नहीं. जिस् गावको जाना नही उस् गावका रास्ता पुछनेकी क्या जरूर है ? आप कहतेहो उस् तरह रहनेको मैं कभी न चाहुंगी. आप आपने दिल्में यह खूब समझीये कि, मेरे मझब्का शख्स्, अगर कंगालभी होगा तो, उस्के साथ शादी करके उस्की औरत बन्के रहुंगी. पर गैर मझब्का शख्स्, अगर बडा राजाभी होगा तो, उस्की कनीजक् बन्के कभी न रहूंगी.

[ त्यांत मजा असो कीं नसो. त्याचा मला विचार कर्तव्य नाहीं. ज्या गांवाला आपल्याला जाणें नाहीं त्या गांवाची वाट कशाला पुसा ! तुह्मी ह्मणतां तसें रहाण्यास मी कधीं चाहणार नाहीं. मी आपणांस खचीत सांगतें कीं, एकाद्या कंगाल पण स्वधर्मी मुसलमानाशीं लग्न लावून त्याची बायको होऊन राहीन. पण परधर्मी पुरुष मग तो सार्वभौम राजा कां असेना, त्याची बटीक होऊन कधींही रहाणार नाहीं. हें पक्कें लक्षांत असूंद्या. ]

**संभाजी**–शाहाजादी, सच् कहता हूं कि, मेरी आपके उप्पर कितनी मोहब्त है वह मैं खोलके कह सकता नहीं. वैसाही आप मेरे उप्पर आशिक हो या नहीं ! यह अव्वल मुझको कहिये.

[ शहाजादी, वास्तविक सांगतों, माझें प्रेम तुजवर किती जडलें आहे तें मला उघड करून सांगतां येत नाहीं. तशीच तूंही मजवर खरी फिदा आहेस कीं नाहीं ? हें अगोदर सांग. ]

**शहाजादी**–महाराज, आप कम् अक्कलमंद है ऐसा नहीं. मैं अभीतक् नालायक लडकी हूं. मुझको इस् दुनियाके दाव-पेंचकी खबर नहीं है, आपके उप्पर मेरा दिल् इतना क्यौ फिदा हुवा है, यह मैं कह सकती नही. तौभी मेरे उप्पर आपकी मोहवत् सच्चे दिलसे नही है, ऐसी मुझकों बराबर तसल्ली होगई है. इस्लिये आपके वास्ते मेराभी दिल् बि-गडे बगैर क्यौंकर रहेगा. औरत्के मोहबतको खाविंदकी मेहरबानीकी नजरका जोर रहेगा तो वह बहुत खुलती है. नही तो येक बहुत् आबदार हिरेको खराब कुंदनमें बैठाये मुवाफिक होता है. ऐसे खराब कुंदनमें बैठाये हुवे हिरे-की किंमत घट्कर पेहेरनेवालेकोभी जेबायष् देती नही.

[ महाराज, आपण अजाण पुरुष आहां असें नाहीं. मी अजून अज्ञान मुलगी आहें. मला ह्या दुनयेंतले डावपेंच माहित नाहींत. तुमच्यावर माझें मन इतकें कां फिदा झालें हें मला सांगवत नाहीं, तरी तुमचें मजविषयींचें प्रेम शुद्ध नाहीं, अशी माझ्या दिलाची खातरी झाली आहे. तर तुमच्याविषयींही माझें मन गढूळ झाल्याशिवाय कसें राहील ! स्त्रीच्या प्रीतीला पुरुषाच्या पूज्यबुद्धीचें पाठबळ असलें तर ती शोभते. नाहीं तर एखादा उत्तम पाणीदार हिरा वाईट कोंदनांत बसविल्यासारखें होतें. अशा कोंद-णांतल्या हिऱ्याची किंमतची किंमत उतरून घालणाराच्या बोटासही ती आंगठी शोभा देत नाहीं. ]

**संभाजीराव**—जिस् औरत्नें मेरा तन्मन् खींचलिया है उस्के लिये मेरे दिल्में सच्ची खाईश न होगी ऐशी बात आपके दिल्में कभी न लाना चाहिये. मेरी मोहबत् आपके उप्पर जो लगी है वह इस् जिंदगीभरतक् कम् होनेवाली नहीं. लेकिन् क्या करूं? हमारी जातकी और हमारे घरकी कईएक हरकतें—

[ जिनें माझें तनमन इतकें आकर्षून घेतलें आहे तिच्याविषयीं माझ्या मनांत पूज्यबुद्धि नसेल अशी गोष्ट तुझ्या स्वप्नांतही येऊं नये. माझें प्रेम जें तुझ्यावर जडलें आहे तें ह्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत ढळण्यासारखें नाहीं. पण काय करूं? आमच्या जातीच्या आणि कांहीं घरच्या अडचणी ( हे शब्द तोंडांतून निघत असतांना शहाजादी त्याच्याकडे तिरस्कारबुद्धीनें पाहूं लागली. पुढें राजाच्या तोंडांतून वाक्य पुरें होण्याचे अगोदरच तो गुटमळल्यासारखा झाला. असें पाहून ती ह्मणते. ) ]

**शहाजादी**—कहीये, महाराज कहीये. क्या कहना चाहतेहो सो खतन कीजीये. बीचमेंही क्यौं खामुष होगये हो. इस् वक्त अपने दोनोंमें साफ दिल्से बात चीत होनी चाहिये. यहां परदा रखनेकी कुछ् जरूरत नही है.

[ बोला, महाराज, बोला. काय ह्मणत होतां तें पुरें होऊं द्या. असे मध्येंच कां थांबलां. आतां दोघांनींही मन मोकळें करूनच बोलावें. ह्यांत पडद्याविडद्याचें कांहीं कारण नाहीं.]

**संभाजीराव**—ऐ शाहाजादी, आपके जैसी एक्कलमंद शाहाजादीको जिद्द करना यह मुनासिब् नही है. कोईभी किसीके फायदेकी बात् कहेगा तो उस्को ख्यालमें लाना चाहिये. जहा दोनोंके दिल एक है वहा कोई किसीका अंदेशा

रखनेकी जरूर नही, आपके जैसे अक्कलमंद औरत्को यह कहना लाजिम् नहीं है. आप मुसलमान हो, इस्लिये मैं हिंदूमझब्में रहकर आपके साथ षादी कर सक्ता नही. षादी करूं तो मेरे जातके लोग मुझे बाहेर करेंगे, और मुझको प्यार न करेंगे, और मेरेसाथ आपकीभी बदनामी और बेइजती हुवे बगैर न रहेगी. अगर ये सब् बातेभी कभी कबूल रखूं तौभी बहुत करके मेरे जान्पर बीतेगी. इस्लिये आप षादी न करके इसी तरहसे मेरे पास रहिये तो किसीके तरफ्से हरकत् न होगी. जात, मझब्, और रिस्तेदारोकीभी शिकायत् न रहेगी. इस् हालतमेंभी हम् येक दिलसे रहेंगे. यह आपनी बनी हुई उल्फत् कभी तूटनेकी नही. हम् दोनो येक दिल् और येक जान् होके रहेंगे. और तरफेन्से मोहबत् कभी किसी तरहसे कम् न होगी. कैसाभी मुष्किल्का वक्त आवेगा तो वह मोहबत्को नुकसान् न होगा. षादीको मझब्की हरकत् है. इस्लिये दोनोंका मझब् कायम रख्कर खाविंद और औरत्के तौरसे रहना मुझको मुनासिब् मालुम होती है.

[ शहाजादी, तुझ्यासारख्या शहाण्या राजकन्येनें असा दुराग्रह धरून बसणें योग्य नाहीं. युक्तीची गोष्ट कोणी सांगितली असतां ती कोणीही अवश्यं घ्यावी. जेथें दोघांचें एक चित्त आहे तेथें कोणी कोणाचा संशय धरण्याचें कारण नाहीं. तुझ्यासारख्या धूर्त बायकोला हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. तूं जातीची मुसलमान असल्यामुळें मी हिंदु धर्मांत राहून तुजबरोबर मला लग्न करितां येणार नाहीं. लग्न केलें तर माझे लोक मला जातीबाहेर टाकतील, माझा तिरस्कार करतील, आणि त्याबरोबर तुझाही उपहास व उप-

मर्द झाल्याधांचून रहाणार नाहीं. इतक्याही गोष्टी आपण कदाचित् सहन करूं, पण ह्या योगानें बहुधा माझ्या जिवावरही येऊन बेतेल. ह्यासाठीं तूं लग्न न करितां तशीच जर मजपाशीं राहिलीस तर कोणाकडूनच हरकत होण्यासारखी नाहीं. जातीची, धर्माची, किंवा सोयऱ्याधायऱ्यांची कोणाचीही नड नाहीं. तसे राहिलों तरी आपण एकचित्तानें राहूं. हा आपला जडलेला संबंध कधीं तुटावयाचा नाहीं. आपण एकमेकांवर जीव कीं प्राण करूं, आणि परस्परांवरचें प्रेम कदाकाळीं कमी व्हावयाचें नाहीं. कसलेही दुर्धर प्रसंग आले तरी त्या प्रेमाचा भंग व्हावयाचा नाहीं. लग्नाला धर्माची आडकाठी आहे, ह्याकरितां आपआपले धर्म कायम राखून आपण नवराबायकोप्रमाणें राहूं असें माझ्या विचारास येतें. ]

हें राजाचें बोलणें संपेपर्यंत तिनें तें मोठ्या कष्टानें ऐकून घेतलें, तरी ती आंतल्या आंत संतापानें जळत होती. तिच्या तोंडावरची लाली उतरून तें निस्तेज झालें. ओंठ फिक्के पडून थरथरा कांपत होते. तरी तिनें शांतपणें उत्तर दिलें, तें असें:—

**शहाजादी**—महाराज, मैं आज आपके यहा गिरफ्तार हूं. इस्लिये आप कुछभी कहनेको मुकत्यार हो. मेरे जैसे बेवसीले कमनसीब औरत्को गैर सबब् हरकोई षख्स् सख्त् कलाम् सुनावे, यह बे मुनासिब् है. जो कोई षख्स् औरत्जातकी आब्रूकी परवा नहि रखता ऐसे नालायकपर फिदा होके आपनी जातको और अपने खानदानको ये थोडे दिनकी मुलाकत्में मेरा ऐसा कौन्सा काम जाहिर हुवा, यह मुझे फरमाईये. मेरा मझब् अलाहिदा है तोभी उस्से मैं कुछ् कमतरहूं ऐसा नही. इस् दुनियामें जो जो

चीज मुझे चाहिये वह पैदा करके देनेकी मेरे वालिदको ताकद है. आप ऐसा नहि समझना कि आप मरठोके बडे राजा हो, इस्लिये आपके दिल्की खाइष पुरी करनेके लिये मैं अपनी इज्जत् खोकर आपके नजदीक कनीजक् होके रहूंगी. जाव् जहनुंमें डालो तुमारी बुजरूगीको, और आग लगाव तुमारी मोहबत्को. तुम् अयंदे मेरेसाथ कोई तरहका वास्ता न रखना. इस् घडीतक् तुम् मुझसे वाकिफ् न थे, और मैं तुमसे वाकिफ् नथी, ऐसा समझो.

[ महाराज, मी आज तुमच्या कैदखान्यांत आहें म्हणून तुम्हांला या वेळेस पाहिजे तें बोलण्यास मुभा आहे. पण एखाद्या अनाथ अबलेला एखाद्या पुरुषानें उगीचच्या उगीच असले वाग्बाण मारावे हें उचीत नाहीं. जो पुरुष स्त्रीजातीच्या अब्रूची परवा बाळगीत नाहीं त्या अधमाच्या नादीं लागून, आपल्या नांवाला, जातीला व मोठ्या कुलाला कलंक लावून घेणारी मी बायको आहें असें तुम्हाला वाटण्याजोगें ह्या दोन दिवसांच्या ओळखीमध्यें मजकडून कोणतें वाईट कृत्य घडलें आहे तें तरी सांगा? माझा धर्म निराळा असला तरी मी तेवढ्यानें नीच झालें असें नाहीं. माझ्या बापाच्या घरीं मला कोणतेंही कमी नाहीं. ह्या पृथ्वीवरची जी जी वस्तु मला हवी असेल ती ती मला मिळवून देण्याची माझ्या बापामध्यें ताकद आहे. तुम्ही असें नका समजूं कीं, तुह्मी मोठे मराठ्यांचे राजे आहां म्हणून तुमची कामवासना तृप्त करण्यासाठीं मी आपल्या अब्रूला कलंक लावून घेऊन तुमची बटीक होऊन राहीन. जा, धिक्कार असो त्या तुमच्या मोठेपणाला, आणि आग लावा त्या प्रीतीला. तुह्मी अतःपर बिल्कुल माझ्याशीं

संबंध ठेवूं नका. ह्या घटिकेपासून तुह्मी मला ठाऊक नव्हतां व मी तुह्मांला ठाऊक नव्हतें असें समजा. ]

असें रागाचें बोलणें बोलून त्याच्या जबाबाची वाट न पहातां ती एकाएकीं तेथून घुश्शानें उठून दूर एका कोपऱ्यांत त्याच्याकडे पाठ करून उभी राहिली. तिच्या तळव्याची आग मस्तकास जाऊन पोहोंचली. प्रथम तिच्या प्रफुल्लित मुखारविंदावर मंदसुहास्यमकरंद होता तो नाहींसा झाला. तिच्या गालांवरची सुरखी नाहींशी झाली. तिची त्या दिवशीं अशी क्रोधाविष्ट वृत्ति पाहून संभाजीराव मग तेथें न थांबतां लागलाच माघारा गेला. दुसऱ्या दिवशीं पुन्हां तो तिच्या भेटीस गेला. तेव्हांही तिची खिन्न मुद्रा दृष्टीस पडली. ती जों जों त्याच्याशीं बोलण्याचे आढेवेढे घेऊं लागली तों तों ह्या रावांची वृत्ति अधिकच कावरीबावरी होत चालली. ती बोलती होण्यासाठीं त्यानें पुष्कळ विनवणी करून पाहिली, पण ती त्याच्याकडे नुसतें पाहिना सुद्धां. तिच्या रुसण्याफुगण्यानें आणि रागानेंच तिचा चेहेरा त्या वेळेस इतका मनोहर दिसूं लागला कीं, तो पाहून संभाजीराव अगदीं वेडा झाला. तिचें आपल्या ठिकाणीं निष्कपट व एकनिष्ठ प्रेम आहे, तेव्हां ती जें जें ह्मणेल तें तें कबूल करावयाचें व तिच्या प्रीत्यर्थ जातीला व राज्याला मुकलों तरी बेहत्तर, पण हा अमूल्य वस्तुलाभ हातचा जाऊं द्यावयाचा नाहीं, असा त्याचा निश्चय झाला. मग तो तिच्या जवळ जाऊन तिच्या हनुवटीला हात लावून ह्मणालाः—

**संभाजी**—शाहाजादी, आप ऐसी अक्कलमंद औरत् होकर ऐसा गुस्सा करना अछा नहीं. क्या, आपका यही इरादा है कि, मैने अव्वल आपका मझब् कबूल करके आपके साथ शादीकी बात चित करना? अछा है. आपकी ऐसीही खुषी

१२

होगी तो आप्के लिये मैं अपना मज्हब् छोडनेकोभी राजी हूं. मुझे इन्कार नहीं. लेकिन् अपना मज्हब् न बदल्के अपनी ख्वाईष पूरी करनेके लिये एक षकल् मेरे ख्याल्में आई, वह मैंने बतलादी. इस् लिये आपको गुस्सा आया हो तो मआफ् कीजिये.

[ हें पहा, शहाजादी, तुझ्यासारख्या सुज्ञ बायकोनें असें रागवावें हें ठीक नाहीं. येऊन जाऊन तुझा आग्रह एवढाच कीं नाहीं, मी अगोदर तुझ्या धर्मांत शिरावें, नंतर तुझ्याशीं लग्न लावावयाची गोष्ट बोलावी ? ठीक आहे. तुझी तशी खुषी असेल तर तुझ्यासाठीं मी धर्मांतर करण्यासही तयार आहें. माझी ना नाहीं. तथापि धर्मांतर न करितां आपला संबंध व्हावा ह्यासाठीं जी एक शकल मला सुचली ती मी तुला कळविली. त्याबद्दल तुला राग आला असेल तर मला क्षमा कर. ]

हें भाषण ऐकून रोषनारेच्या चेहेऱ्यावर पुन्हां टवटवी येऊं लागली. तिनें नंतर त्याच्यावर वक्रदृष्टीनें हळुच कृपाकटाक्ष टाकिले. मग त्यानेंही तिच्या गळ्यांत हात घालून तिला दृढालिंगन दिलें. मग ती त्याच्याकडे प्रेमदृष्टीनें पाहूं लागली. तिच्या प्रीतीचा सगळा ओघ फिरून त्याजकडे वळल्यासारखा झाला. तिला वाटलें कीं, अशा गुलजार राजपुत्राची मी राणी होण्यास इच्छितें असें माझ्या बापाला कळलें म्हणजे तोही आमच्या लग्नाला संमती देईल. अशा आनंदसागरांत तें तरुण जोडपें निमग्न झालें आहे इतक्यांत बाहेर कांहीं गडबड झाली, ह्मणून तिला सोडून संभाजीराव लागलाच बाहेर पडला. तों जोत्याजी त्याच्या दृष्टीस पडला. त्याची बोबडी वळून गेली होती. हे पहा मोंगल; पळा; धांवा; असे घाईघाईनें तो कांहीं तुटके तु-

टके शब्द बोलला. त्याजवरून संभाजीरावाच्या ध्यानांत येऊन चुकलें कीं, पन्हाळगड शत्रूच्या हातीं लागला. कांहीं मोंगल शिपाई गडावर चढून त्यांनीं सांपडले तितके शिबंदीचे लोकही ठार केले. मग तो लगबगीनें पुन्हां रोपनारकडे आंत जाऊन तिला म्हणाला:—

**संभाजी**—अपने पर वक्त बहुत मुष्कील आया हुवा है. हम् दोनो आपके वालिद्के फौज्के काबूमे आगयेहै. आप अपने वालिद्के नजदीक जाओगे तो आपको तो कोई तरहकी दहशत् नहींहै. मगर मैं कभी उन्के हातमें गिरफ्तार हुंगा तो मुझे तमाम् उमरभर छूटनेकी बिलकुल् उमेद नही. अब् आपका इरादा क्या है सो कहिये ?

[ शहाजादी, आपल्यावर प्रसंग तर कठीण येऊन बेतला. आम्ही तुझ्या बापाच्या फौजेच्या कचाट्यांत सांपडलों. तूं आपल्या बापाकडे गेलीस तर तुला कांहीं भीति नाहीं, पण मी जर त्याच्या हातीं लागलों तर मला जिवंतपणीं सुटण्याची अगदीं अशा नाहीं, हें खचित. आतां तुझा विचार कसा आहे, बोल ? ]

**शहाजादी**—महाराज, यह सहीहै. मेरा बचाव मैं जिस्तरह चाहूंगी उस्तरह करूंगी. लेकिन् आपकी हालत् बहुत् मुष्कील है. इस् किलेको अगर कोई चोररास्ता हो तो उस् रहासे फिल् हाल् चले जाईये. शीर सलामत् तो पगडी पचीस्. अपने दोनोंके दरम्यान् मोहबत् जो हुई है उस्में कोईभी तरहकी हरकतें आवे, मगर फरक् न होगा. मेरे वालिद्का गुस्सा बहुत खराब है. हम् उन्के हात्से गिरफ्तार होंगे तो वे क्या सजा करेंगे कुछ् मुकर्रर नही. आपके जान्को हलाकान् करनेके लिये आपकेपास् दुष्मन्

बहुत है. तौभी आपके बचावके लिये मेरे ख्यालमें जो कुछ् तदबिरे है वे मैं करूंगी. सुलतान महंमद अकबर करके मेरा येक छोटा भाई है. वह मुझको मदत् देगा, ऐसी मेरी खात्री है. कोई वक्त ऐसाभी आ पडेगा तो उसको मैं आपनी मद्दके लिये भेज दुंगी. इसके सिवाय दूसरे लोगोकीभी आपके उप्पर पैरवी रखूंगी. आप अपने यहां बहूत होषयारी और हीफाजत्से रहिये.

[ महाराज, माझा बचाव मी पाहिजे तसा करून घेईन, पण आपली अवस्था फार कठीण आहे. गडाला एखादा चोररस्ता असला तर तेथून आपण आतांच्या आतां चालते व्हा. 'शीर सलामत तो पगडी पचीस.' आपलीं दोघांचीं मनें जमलीं आहेत तीं आतां मध्यें किती हरकती आल्या तरी फिरावयाचीं नाहींत. माझ्या बापाचा राग फार कठीण आहे. आपण त्याच्या हातीं सांपडलां तर तो आपल्याला काय करील ह्याचा नेम नाहीं. तुमच्या जिवाला अपाय करण्यासाठीं तुमच्या सभोंवतीं पुष्कळ शत्रु आहेत; तथापि मला तुमच्या बचावाचे उपाय जितके सुचतील तितके मी करीन. सुलतान महंमद अकबर म्हणून माझा धाकटा भाऊ आहे, तो मला साह्य करील अशी माझी खातरी आहे. वेळ पडल्यास त्याला मी तुमच्या मदतीलाही पाठवून देईन. ह्याशिवाय दुसऱ्या लोकांचीही तुमच्यावर पैरवी ठेवीन. तुम्ही मात्र फार सावधगिरीनें रहावें. ]

इतकें बोलणें झाल्यावर जातांना तिला पुन्हां आलिंगन देऊन हातांत नंगी तलवार घेऊन जोत्याजीसह संभाजीराव तेथून बाहेर पडला. गडाच्या मागच्या बाजूला एक मोठा कडा तुटला होता, तेथून जोत्याजीनें एक खचरट वाट काढली. ते-

थून जोत्याजी पुढें, आणि संभाजीराव मागें, अशा रीतीनें दोघेही गड उतरावयास लागले. कांहीं ठिकाणीं बकरें सुद्धां उभें राहूं शकणार नाहीं अशी अवघड व अरुंद वाट होती. तेथून खालीं उतरतांना पाय घसरून दोन, दोन, चार, चार, हातपर्यंत ते घरंगळत जात. ह्याप्रमाणें पडत, झडत व रांगत, जेम तेम करून खालीं एक ओढा वहात होता त्याच्या पलीकडल्या आंगाला ते जाऊन पोहोंचले, तेव्हां त्यांचा जीव जरा खालीं पडला.

इकडे मोंगलाच्या फौजेवरचा सरदार गडावर येऊन पोंचतांच वाड्यांत शिरून शहाजादीला प्रथम त्यानें कैद केलें. संभाजीरावाचा तपास करितांना तो कोठें सांपडला नाहीं. मग शहाजादीला मेण्यांत घालून तो दरकुच दरमुक्काम करीत औरंगजेबाच्या स्वारींत जाऊन दाखल झाला. रोषनारेवर बादशहाची प्रथम फार प्यार मर्जी होती. तिला एखाद्या नामांकित घराण्यांतल्या सरदाराला देण्याचा त्याचा विचार होता. पण ती संभाजीरावाच्या कैदेंत असतांना तिचें व त्याचें सूत जमलें होतें अशी त्याला खबर लागली, तेव्हां त्याची तिजवरून मर्जी उतरली. तिच्या वर्तनानें त्याच्या आंगाचा संताप झाला. तिची भेट घेण्याचेंही त्यानें वर्ज केलें. बापाचा असा घुस्सा झाला तेव्हां तिला तें माहेरघर एकांतवासाच्या कैदखान्यापेक्षांही भयंकर वाटलें. तिच्या खाण्यापिण्यांत व लत्त्याकपड्यांत कांहीं कमी पडलें असें नाहीं. पण बापाची खप्पा मर्जी व संभाजीरावाची ममता आणि त्याचें गोडभाषण हीं मनांत येऊन तिला आपल्या बापाच्या घरचें ऐश्वर्यसुख पन्हाळगडावरच्या स्वातंत्र्यसुखापुढें तुच्छ वाटूं लागलें. खुद्द अवरंगजेबाचाच तिच्यावर राग असल्यामुळें भीतीनें तिचें कोणी शांतवन करीना, कीं समा-

चार घेईना. दूर एका निराळ्या तंबूंत तिला कैदेंत बसविल्या-सारखें ठेविलें होतें.

---

## भाग ११.

"किं मर्दितोऽपि कस्तूर्या लशुनो याति सौरभम्."

आतां मागच्या भागांत सांगितल्याप्रमाणें संभाजीराव व त्याचा विश्वासू आणि इमानी हुजऱ्या जोत्याजी हे ओढ्याच्या कांठीं जाऊन पोहोंचल्यावर त्यांची तिकडे काय वाट झाली ती सांगतों.

मागें आठव्या भागांत आम्हीं सांगितलेंच आहे कीं, संभाजी-रावानें आपली सापत्न मातुश्री सोयराबाई इचा महाक्रूरतेनें वध केला. ती शिरक्यांच्या कुळांतली कन्या होती, म्हणून पुढें त्या कुळांतले जितके लोक हातीं लागले तितक्यांची त्यानें मागच्या मनुष्यसत्रांत कत्तल उडविली. ह्या कारणानें कोंक-णांतलें शिरक्यांचें कूळ संभाजीरावावर पराकाष्ठेचें खवळून गेलें होतें. त्याच्या नाशाविषयीं त्या कुळांतील राहिलेल्या लोकांचा उद्योग सक्त चालू होता. संभाजीरावाला पदभ्रष्ट करून त्याच्या गादीवर राजारामाची संस्थापना करण्याविषयीं शिरक्यांचीं कारस्थानें आंतून चालू होतीं. त्या मसलतींत सं-भाजीरावाचे घरचे सर्व शत्रु सामिल झाले. इकडून एसाजी व तुळशीबाई ह्यांचीही आंतून त्यांस फूस व मदत मिळाली. शिरक्यांची एक टोळी कोंकणांतून निघून पन्हाळगडच्या आ-सपास संभाजीरावाच्या पाळतीवर फिरत होती. तिला एसा-जीनें खबर दिली कीं संभाजीराव मोंगलांच्या हातीं न लागतां गडाखालीं पळून गेला आहे. त्याला आतां पकडण्याची जलदी करावी. त्याजवरून शिरक्यांचे स्वार डोंगरकठाडीला शोध

काढीत काढीत फिरत होते. इतक्यांत त्यांची व संभाजीरावाची ओढ्याच्या कांठीं अकस्मात् भेट झाली. पोटापाण्याची सोय बघण्यासाठीं मी जाऊन परत येईपर्यंत ओढ्याच्या कांठींच आपण बसा असें राजाला सांगून जोत्याजी जवळच्या एका खेड्यांत गेला होता. ह्यामुळें तो मात्र पार पडला. शिरक्यांनीं राजाला कैद करून लागलेंच रायगडावर नेलें. तो किल्ला चारी बाजूंनीं मुस्तकीम मजबूद होता. तेथील एका वाड्यांतल्या एका मजबूद कोठडींत त्याला कोंडून ठेवून बाहेर त्याजवर त्यांनीं सक्त पहारा बसविला. ह्या जगामध्यें कोणाची कोणत्या वेळेस कशी स्थिति होईल ह्याचा भरंवसा नाहीं! जन्म कोणाच्या पोटीं! वैभव केवढें! आणि हातीं केवढी सत्ता! पण विनाशकालाची झडप येऊन पडल्याबरोबर त्यांपैकीं एकही गोष्ट त्याच्या उपयोगास आली नाहीं! तेव्हां 'कालस्य कुटिला गतिः' असें एका प्रसिद्ध कवीनें म्हटलें आहे, तें सत्य आहे. त्या कोठडीमध्यें त्याच्या उपयोगासाठीं, एक जाडी सतरंजी, एक पासोडी, एक थाळा, आणि एक तांब्या, इतकेंच सामान ठेविलें होतें. मांडगिरद्या, गालगिरद्या, उशा, सोन्यारुप्यांचीं भांडीं वगैरे ख्यालीखुशालीचे सर्व श्रीमंती पदार्थ जाऊन बिचाऱ्याचे वांट्यास तेथें कैद्याचें ओंगळ सामान यावें, ही केवढी दुःखाची गोष्ट आहे! तुकारामबोवांची स्वानुभूत एक साधी उक्ती आहे कीं, 'कई भोज्य नानापरी। कई भोगणें त्या विपत्ती.' तिची सत्यता ह्या ठिकाणीं दिसून येते. असो.

ह्याप्रमाणें संभाजीरावाचे १५ दिवस त्या कारागृहवासांत गेले. सोळाव्या दिवशीं मध्यरात्रीच्या सुमारास तो सत्रंजीवर उताणा पडून आपल्या मनाशीं आपल्या स्थितीचा विचार करीत असतां बाहेर कोणीं बोलत आहे असें त्याच्या कानीं आलें.

म्हणून तो लागलाच उठून बसला, आणि खिडकीशीं कान देऊन ऐकूं लागला तों कोणी परका मनुष्य पहारेवाल्याशीं बोलत आहे, असें त्याला समजलें. त्या वेळेस बाहेर जिकडे तिकडे सामसूम झालें होतें. वाऱ्यानें झाडांचीं पानें मात्र सळसळा वाजत होतीं. चंद्रोदय होण्याला थोडा अवकाश होता. बाहेर नक्षत्रांचा अंधुक अंधुक प्रकाश पडला होता. असें खिडकीच्या फटींतून त्याला दिसलें. तो खिडकीशीं जाऊन उभा राहिल्यावर त्याच्या कानीं त्या दोघांचा संवाद आला तो असा:—

**पहारेवाला**–तूं कोण आहेस, एवढ्या रात्रीं येथें येण्याचें कारण काय, व विचारल्यापुसल्याशिवाय तूं पुढें चाललास कोठें ?

**परकामनुष्य**–मैं पैगंबरका ताबेदार हूं. अंदर एक कैदी है, उस्से मुझे कुछ् काम है. तुम् हमूसे सुलूक रखके मुलाकात् करवाओगे तो बेहेत्तर है. नही तो तुमारा अछा न होगा.

[ मी पैगंबराचा दूत आहें. आंत एक कैदी आहे त्याच्याशीं माझें कांहीं काम आहे. तूं मला बऱ्या गोष्टीनें त्याची भेट करविशील तर ठीक आहे. नाहीं तर तुझें बरें होणार नाहीं. ]

**पाहरेकरी**–तुमारा नाम क्या है, यह पहिले मुझे कहो ?

[ तुझें नांव काय हें मला अगोदर सांग ? ]

**परकामनुष्य**–तुम् जिस्का नाम पुछ्ते हो वह फकीर इस् जंगलमें ५० बरस बस्ता है. और वहा बारोमास नमाज रोजा करके तमाम वक्त् खुदाकी बंदगी किया करता है. इस्की वफ्फीयत् तुम्कोभी होगी.

[ तूं ज्याचें नांव विचारतोस त्या फकिराची वस्ती ह्या

जंगलांत अजमासें ५० वर्षें आहे. तो बारमाहा अल्लाच्या नांवानें रोजे करून आपला सर्व काल ईश्वरभजनांत घालवितो. ह्याची माहिती तुलाही असेलच. ]

**पाहरेकरी**—हां ! ऐसा एक फकीर किल्लेके नज्दीक रहता है. ऐसा मैने बहुत लोगोकी जबानी सुना है सही. आच्छा साईं साहब. तुम् अकेले अंदर जो कैदी है उस्की मुलाकात् करोगे तो मैं करवाउंगा. तुमारे साथ कोइ दुसरा षख्स् होगा तो उसको मैं अंदर जाने नदूंगा. किल्लेके अंदर कोई षख्स् आवे तो उस्की तलाषी किये बगैर अंदर जाने न देना ऐसा हम्को सख्त् हुकुम है. इसलिये तुमारी तलाषी लिये बगैर तुमको उप्पर चढने दूंगा नही.

[ होय, असा एक फकीर ह्या किल्ल्याजवळ रहात असतो, असें मी पुष्कळांच्या तोंडून ऐकिलें आहे खरें. आतां, फकीरसाहेब, तुम्हांला एवढेंच सांगणें आहे कीं, तुम्हीं आंतल्या बंदिवानाला एकटेंच जाऊन भेटाल तर मी त्याची भेट करवीन. दुसरा कोणी मनुष्य तुमच्या सांगाती असेल तर त्याला मात्र मी आंत जाऊं देणार नाहीं. किल्ल्यांत कोणी परका मनुष्य आला तर त्याची झडती घेतल्याखेरीज आंत सोडूं नये असा आम्हांला सक्त हुकूम आहे. ह्याकरितां तुम्ही कोणी असलां तरी झाडा घेतल्याखेरीज मी तुम्हांस वर चढूं देणार नाहीं. ]

**परकामनुष्य**—बस्, तलाषी सिरिफ् लेना है. हा, तलाषी लो. उसको कौन् नही कहता है. मेरा कहना इतनाही है के, उस् अंदरवाले कैदीकी मेरे साथ एक वक्त् मुलाकात् करवाव. उस्की मुलाकात् करनेका मुझको पैगंबरका हुकूम है. उन्होने मुझको इधर भेजा है. तुम् अगर उनकी

मर्जीके बरखिलाफ करोगे तो अल्ला तालाकी तुमारे उप्पर खप्पगी होगी. इस्को खूब अच्छी तरहसे सोचो.

[ झडती घ्यायाची इतकेंच ना ? खुशाल घे. त्याला कोण नको म्हणतो. माझें सांगणें इतकेंच आहे कीं, आंतल्या कैद्याची आणि माझी एकदां भेट करांव. त्याची भेट घेण्याविषयीं मला पैगंबराचा हुकूम झाला आहे. त्यानेंच मला इकडे पाठविलें आहे. त्याच्या इच्छेच्या आड येशील तर अल्लाची तुजवर इतराजी होईल. ह्याचा नीट विचार कर. ]

हा दोघांचा बाहेर संवाद झालेला ऐकून संभाजीरावाला आश्चर्य वाटलें. किंचित् मनांत विचार केल्यावर त्याला वाटलें कीं ह्या कारागृहांतून सोडविण्यासाठींच ह्या फकिराला कोणीं तरी खचीत मजकडे मुद्दाम पाठविलें आहे. फकिराचें नांव त्या प्रांतांत बहुत दिवसांपासून आबालवृद्धांत प्रसिद्ध होतें. ह्यामुळें शिपायानें त्याला राजाची भेट करविण्याचें कबूल केलें. फकीर महान अवलिया साधु आहे व तो किल्ल्याच्या माचीला कीं कोठेंसा एक दरा आहे तेथें फार वर्षांपासून रहातो असें त्यानें ऐकिलें होतें. त्याचा लोकांत दरारा मोठा होता. त्याचा कोणावर कोप झाला असतां त्याचा सत्यनाश होतो असें त्यानें ऐकिलें होतें. म्हणून भेणेंभावानें म्हणा कीं भक्तिभावानें म्हणा, पण फकिराच्या म्हणण्याला त्याला मान द्यावा लागला.

पहारेवाल्यानें बंदीखान्याचें कुलूप उघडून तो फकिरास राजाकडे घेऊन गेला. फकिराच्या आंगांत कफणीशिवाय दुसरा कांहीं कपडालत्ता नव्हता. ह्यामुळें शिपायाला त्याची विशेष झडतीही घ्यावी लागली नाहीं. वयपरत्वें त्याच्या आंगावर

सुरकुत्या पडल्या होत्या. तरी त्याचे डोळे पाणीदार होते. त्याची दाढी व मिशा पिकून त्या पांढऱ्या सफेत झाल्या होत्या. त्याच्या आंगाची काठी सडसडीत पण उंच होती. त्याचे हात पाय लांबलचक होते. आंगावर मांस नसल्यामुळें तो केवळ हाडांचा पिंजरा होता. संभाजीरावापुढें तो फकीर जाऊन उभा राहिला तेव्हां त्यानें त्याची अशी मूर्ति पाहिली.

प्रथम आंत शिरतांच तो ओळखीचा आहे कीं काय हें पहाण्यासाठीं संभाजीराव त्याजकडे निरखून पाहूं लागला. तोंडांतून त्यानें एकही शब्द काढिला नाहीं. फकीरही क्षण-भर त्याजकडेच पहात मुकाट्यानें उभा राहिला. मग त्यानें आपल्या मानेला एकाएकीं हिसडा दिल्यासारखें केलें. आणि तोंड उघडून, खांकरून, त्यानें राजापुढें तोंडांतून एक हिऱ्याची आंगठी टाकली. आंगठींत बसविलेला हिरा उत्तम पाणीदार असून अंधेरांतही चमकण्यासारखा होता. मग दिव्यापुढें तो चकचक करूं लागला तर ह्यांत नवल कसचें? पुन्हा मानेची खूण करून फकीर लागलाच माघारा निघून गेला. शिपाई मागेंच उभा होता. त्यानें आंगठी हातांत घेऊन राजास विचारिलें कीं, ही आंगठी फकीर टाकून गेला ह्यांतलें गूढ काय आहे तें मला समजलें पाहिजे.

**संभाजीराव**—साधु, संत, महंत, फकीर, ह्यांच्या कृत्यांचें गूढ कळण्याचें फार कठीण आहे. ह्या कामांत मी व तूं दोघेही सारखेच आहोंत. तुला यांतला कांहीं अर्थ कळला तर पहा.

**शिपाई**—ज्या पक्षीं हा फकीर अशा भलत्या वेळीं येथें येऊन त्यानें तुमची गांठ घेतली आणि तोंडांतून तुमच्यापुढें आं-गठी टाकली त्या पक्षीं ह्यांतलें इंगित काय आहे तें तुह्मां-लाच माहीत असलें पाहिजे. तुह्मी बऱ्या रीतीनें कळवाल

तर ठीकच आहे. नाहीं तर तुमची अवस्था ठीक नाहीं. ह्याहून कैद सक्त होऊन तुमचे हाल तुह्मीं आपल्या हातांनींच करून घ्याल.

**संभाजीराव**—खरोखर मी तुला सांगतों, ह्यांतलें मला कांहीं एक माहीत नाहीं. मजपेक्षां तुलाच त्याची माहिती अधिक असेल ह्मणून तूं त्याला आंत सोडलेंस. मी येथें त्याला पाहीपर्यंत तो काळा कीं गोरा हें सुद्धां मला माहीत नव्हतें. तुझ्या तो माहितीचा असून तुला सुद्धां त्याचा अर्थ कळला नाहीं तर तो मला कसा कळेल बरें ?

**शिपाई**—महाराज, तुम्ही अशी वडाची साल पिंपळाला लाविली तरी माझी खात्री होत नाहीं. तुमचें आणि त्याच अगोदर कांहीं तरी संगनमत असल्याखेरीज तो अशा ठिकाणीं तुह्मांस येऊन भेटला नाहीं. हें खचीत आहे.

**संभाजीराव**—त्याच्या येण्याचा कांहीं तरी उद्देश असेल खरा. पण तो मला माहित नाहीं. त्याला मी काय करूं ?

**शिपाई**—हा अवलिया फकीर मला पुष्कळ दिवसांपासून ऐकून माहीत आहे. तो मोठा धूर्त आहे. आधीं पुरा विचार केल्याखेरीज तो अशा जोखमीच्या कामांत कधीं पडावयाचा नाहीं.

**संभाजीराव**—तो अशा अवघड कामांत कां व कोणाच्या हिमायतीनें पडला असेल तें त्याचें त्यास माहीत असेल. तें दुसऱ्याला कसें कळेल ?

**शिपाई**—तर मग ह्या भेटीचा व ह्या आंगठीचा अर्थ तुम्हाला कळत नाहीं, असेंच तुम्ही धरून बसणार कीं काय ?

**संभाजीराव**—मी एकदां खरें होतें तें सांगितलें. ह्या उपर माझा नाइलाज आहे.

**शिपाई**—आपण कांहीं म्हणा, पण ज्याला ह्या आंगठीचा अर्थ कळणार नाहीं अशा मनुष्याकडे हा अवलिया इतक्या रात्रीं येऊन आंगठी टाकील असें संभवत नाहीं.

**संभाजीराव**—फकीर झाला तरी तो देव नव्हे. त्यालाही तुझ्या माझ्यासारखेच दोन डोळे, दोन कान, दोन हात, आणि दोन पाय आहेत. आम्ही चुकतों तसा तोही चुकण्याचा संभव आहे.

**शिपाई**—ठीक आहे, समजलों. आतां लवकरच येथून आपल्याला दुसऱ्या कोठडींत जावें लागेल, तयार असा.

इतकें बोलून शिपाई बाहेर पडला आणि पूर्वीप्रमाणें दाराला कुलूप ठोकून तो आपल्या पहाऱ्यावर जाऊन उभा राहिला. इकडे संभाजीराव आपल्या मनाशीं विचार करीत बसला, तो असा. ' हा अवलिया अकस्मात् येथें येऊन आंगठी टाकून गेला, ह्याचा उद्देश काय असावा बरें ? ह्या फकीराची लोकांत मानमान्यता मोठी आहे खरी. परमेश्वराचें त्याला प्रत्यक्ष दर्शन घडतें असा इकडे लौकिक आहे, म्हणून तो लोकांत इतका पूज्य आहे. ह्याच कारणानें किल्ल्यावरच्या शिबंदीनेंही त्याला मज्जाव न करितां मजपर्यंत येऊं दिलें. पण ह्या आंगठीचा काय अर्थ असेल ? ती मला खूण पटण्यासाठींच कोणी तरी फकिराच्या हस्तें मजकडे पाठविली असेल हें उघड आहे. ती आंगठी शिपायानें मला दुरून दाखविली. ती तो माझ्या हातांत देता तर कदाचित् तिची पक्की ओळख पटली असती. ती जरी थोडीशीच माझ्या नजरेस पडली आहे तरी ती मी कोणाच्या तरी हातांत पाहिली आहे असें मला खास स्मरतें. ती अमक्या ठिकाणीं, अमक्याच्या बोटांत, अमक्या वेळेस पाहिली असें मात्र लक्षांत येत नाहीं,

पण पूर्वी ती दोन तीनदां माझ्या पहाण्यांत आलेली आहे. ह्या आंगठीवरून माझ्या बऱ्याकरितां कोणी तरी माझा हितचिंतक गुप्तरीतीनें यत्न करीत आहे असें वाटतें. आंगठी घेऊन येणारा मनुष्य उगीच कोणी अलबत्या गलबत्या असता तर त्यांत कांहीं अर्थ नव्हता. पण ती अशा अवलिया फकिराबरोबर पाठविण्याचा हेतु हाच असेल कीं, माझा त्याजवर भरंवसा बसावा. असा थोर पुरुष एखाद्या वाईट कामांत तर पडावयाचाच नाहीं. अलबत, माझी येथून सुटका करण्यासाठींच कोणी तरी हरीचा लाल आंतून यत्न करीत आहे. पण ही सुटका होणार कशी ? मी बाहेर पडावें कसें ? आणि हें घडावें कसें ? किल्ल्यांतून गुप्तरीतीनें बाहेर पडण्यास हजारों विघ्नें आहेत. तीं निवारण होतात कशीं ? तेव्हां हा सर्व माझा वृथा मनोरथ आहे.' असा मनामध्यें विचार करून लागलाच तो थिजल्यासारखा झाला. त्याला मी सुटेन अशी आशा वाटली होती, तिचा अगदीं भंग झाला. मग आणखी कांहीं वेळानें फिरून त्याच्या उलट विचार त्याच्या मनांत उभे राहिले. त्याला वाटलें कीं, ज्यानें येथें येऊन आंगठी टाकण्याचें एवढें धारिष्ट केलें तोच मला कैदेंतून मुक्त करण्याचे उपाय योजित असेल. त्याच्या मनांत माझ्या बऱ्याची वासना नसती तर तो मला इतकें तरी आश्वासन कां देता ? तो हें काम आतां असेंच अर्धवट टाकून कधीं स्वस्थ बसणार नाहीं. असा भरंवसा धरून पुढें काय काय होतें तें पहात बसण्याचा त्यानें निश्चय केला.

दुसऱ्या दिवशीं बाहेरच्या पहाऱ्यावरील हवालदारानें संभाजीरावाला त्या खोलींतून काढून दुसऱ्या एका भक्कम बंदोबस्ताच्या खोलींत कोंडून ठेविलें. ती खोली अंधारासारखी जरा खोल होती. तींत हवा व उजेड विशेष नव्हता. अशा

अंधारकोठडींत त्यानें मोठ्या संकटानें ८ दिवस काढिले. पण ते आठ दिवस त्याला आठ वर्षांसारखे भासले. त्या खोलीच्या पश्चिम बाजूला एक मोठें विवर होतें. त्याच्या तोंडाशीं एक लांबोळी शिळा आंतल्या बाजूनें उभी केली होती. नवव्या दिवशीं मध्यरात्रीं घोंगड्या पांघरलेले तीन असामी ती शिळा बाहेरून आंतल्या बाजूस ढकलून त्या विवरांतून एकामागून एक आंत शिरले. त्यांपैकीं एक असामी राजाला हलक्या सुरानें म्हणाला, महाराज, आपण भिण्याचें कारण नाहीं. आम्ही आपल्यास येथून बाहेर घेऊन जाण्यासाठींच आलों आहों. आम्ही ज्या वाटेनें येथें येऊन पोंचलों त्याच वाटेनें आपल्यास बाहेर घेऊन जातों. असें ह्मणून त्याला त्यांनीं काळोखांतून त्या विवरांतून चालविलें. सूर्योदयाचे सुमारास ते त्या विवरांतून बाहेर पडले. बाहेर येऊन पोंचतात तों एक दाट जंगल त्यांच्या दृष्टीस पडलें. त्यांतून जातांना वाटेंत एका ठिकाणीं एक मोठी वानरचमू भेटली. तिनें मनुष्यांची चाउल ऐकतांच मोठा किलकिलाट करण्यास आरंभ केला. शेंकडों हजारों लहान मोठे वानर ह्या झाडावरून त्या झाडावर आणि त्या झाडावरून ह्या झाडावर टणाटण उड्या मारूं लागले. त्यांनीं आपल्या भूभुःकारानें आसपासचा प्रदेश अगदीं दणाणून टाकिला. त्या गलबल्यानें किल्ल्यावरच्या शिबंदीचे लोक सावध होऊन त्याच दिशेनें आपल्यास कदाचित् धरावयास येतील ह्मणून हे तेथें विश्रांति विश्रांति न घेतां नीट समूरचा रस्ता धरून चालले. ह्याप्रमाणें एक दोन कोस चालून गेल्यावर एका झाडाखालीं एक अवलिया फकीर हातांतल्या तसबीचे ( स्मरणीचे ) मणि ओढीत बसला होता. त्याच्याकडे राजाची पहिल्यानें दृष्टि गेली. त्याला पाहून राजाला

अति आनंद झाला. नंतर तो फकीर राजाला ह्मणालाः—

**फकीर**–राजासाहब, खुदातालाकी आपके उप्पर बडी मेहरबानी है. आपके दुस्मनोको गारद करके आपूको फीर तक्तनशीन करेगा. अब् मेरे मकान्पर चलीये. वहा आप्को तमाम हकिकत् कहूंगा.

[ राजा, खुदाची तुझ्यावर पूर्ण मेहेरबानी आहे. तुझ्या दुस्मानांचा फडशा पाडून पुन्हा तुझ्या राज्यावर तुला अल्ला बसवील. आतां माझ्या मकाणावर चल. तेथें तुला खुलासेवार हकीकत सांगेन. ]

इतकें बोलून डाव्या हातानें आपल्या दाढीचा लांब झुबका साफ करून तसबीचे मणि ओढीत ओढीत फकीर पुढें निघाला, त्याच्या मागून संभाजीराव आणि त्याच्या मागून ते तिघे असामी निघाले. कांहीं दूर गेल्यावर एका मोठ्या झाडाखालीं एक भुयार होतें तेथें ते जाऊन पोहोंचले. तें जमिनीपासून सुमारें ४ हात खोल होतें. त्यांत उतरण्यासाठीं एक बांबूची शिडी लाविली होती. तिजवरून ते खालीं उतरून गेले. पुढें त्यांत एक गुहा दृष्टीस पडली. ती औरस चौरस अजमासें ४ हात लांबीरुंदीची होती. तींत ते ५ ही असामी गेले. मग फकिरानें बोलण्यास आरंभ केला तो असाः—

**फकीर**–आईये, संभाजी राजासाहब. यहां बैठीयें. ह्यां आप अपनेको कैदी न समझो. आप खुला हुये हो. मेरी अंगुटीकी निशानीपरसे मालूम पडा होगा कि, आपको खुला करनेकी तदबीर किसीने चलाई है. उसमुजिब खुदाने मेरे हातसे आपको खुला करवाया है. इस् वक्त औरंगजेब बहूत तखलीफमें है. शाहाजादी रोषनारका अहंमद अकबर नामे छोटा भाई है. उसने उसकी तरफदारी करके

अपने वालिदका सामना किया है. आपके उप्पर जो जो मुष्किलात् आवे उस्की मुष्किलकुशाई करके आपका बचाव करनेके लिये उस्के कहनेपर वह जिम्मेदार हुवा है. कापके दुस्मनोको माकुल सजा दे कर आपको फिर गद्दीनशीन् करनेके लिये जुदी फौज लेके वालिद्से अलग् हुवा है. वह जल्दी इस् तरफ् आकर आपको तक्तनशीन करेगा.

[या संभाजीराजे, येथें बसा. ह्या ठिकाणीं तुह्मीं बंदिखान्यांत नसून मोकळे आहां असें समजा. माझ्या आंगठीच्या निशाणीवरून खात्री झालीच असेल कीं, तुमची सुटका करण्यासाठीं कोणी तरी झटत आहे. त्याप्रमाणें आज खुदानें माझ्या हातून तुह्मांस प्रतिबंधांतून सोडविलें आहे. आजच्या घटकेस अवरंगजेब बादशहा मोठ्या संकटांत आहे. अहंमद अकबरशहा ह्मणून शाहजादी रोषनार इचा एक धाकटा भाऊ आहे. तो तिचा पक्ष घेऊन बादशहावर उठला आहे. तुमच्यांवर जीं जीं संकटें येतील तीं तीं निवारण करून तुमचा बचाव करण्याची तिच्या सांगण्यावरून त्यानें हमी घेतली आहे. तुमच्या दुस्मानांचें पारिपत्य करून तुह्मांस पुन्हा गादीवर बसविण्यासाठीं तो वेगळी फौज जमा करून बापापासून अलग झाला आहे. तो लवकरच इकडे येऊन तुमच्या राज्यावर तुमची स्थापना करील. ]

**संभाजीराव**—अल्लाके फजल्से मैं दुसरे किसी दुस्मन्के गल्बेमें न आसकू तो बेहत्तर है. अगर अकबरशाहा फौज लेकर मेरी मदत्को आया तोभी बादशाही फौज बहूत हो-

नेके सबब्से उस्से कैसा मुकाबिला किया जावेगा, उस् बा-
त्का मुझको शक् है.

[ देव करो आणि पुन्हा दुसऱ्या एखाद्या शत्रूच्या ता-
वडींत मी न सांपडो ह्मणजे झालें. जरी अकबरशहा फौज
घेऊन माझ्या मदतीला आला तरी बादशाही फौज मोठी
असल्यामुळें त्याच्यानें कसा टिकाव धरवेल ह्याचा मला
संशय वाटतो. ]

फकीर—ऐ राजा, बादशाहाके सरदारोमे बेदिली पैदा हुवी है.
उस्से चंद सरदारोंसे नामुवाफिकत् हुवी है. उन्मेंसे कुछ्
लोग अकबरशाहाको षामील हुवे है. रजपूत सरदार और
शिपाहियोंकी जमीयत अकबरशाहके तरफ् जादा हुई है.
उन्होंने ऐसा इरादा किया है कि, बादशाहको तख्त्से
माजूल करके अकबरशाहको तक्तनशीन करना. पहिले
वह इधर आकर आपको तक्तनशीन करेगा. बाद तुम्
दोनोमें अपनी अपनी फौज लेकर बादशाहापर हमला क-
रना. बाद् उस्को कैद करके अकबरशाहाने बजाय उस्के
तक्तनशीन होना. अब् अकबरशाहा रजपूत लोगोंको हम-
राह लेकर फौरन् तुमसे आकर मिलेगा.

[ राजा, बादशहाच्या सरदार लोकांत फुटाफूट झाली
आहे. तो कांहीं सरदार लोकांस अलिकडे अप्रिय झाला
आहे. अकबरशहाला त्यापैकीं कांहीं लोक मिळाले आ-
हेत. रजपूत सरदार व शिपायांचा भरणा तर अकबरशहा-
कडे मोठाच झाला आहे. त्यांनीं बेलभंडार उचलून मदत
करूं असें आश्वासन दिलें आहे. शहाजादी रोपनार इच्या
मसलतीनें त्यांनीं असा बेत केला आहे कीं, बादशहाला
पदच्युत करून अकबरशहाला तक्तावर बसवावें. प्रथम

इकडे तो येऊन तुह्मांस तुमच्या गादीवर बसवील. नंतर तुह्मी दोघांनीं आपल्या फौजा घेऊन बादशहावर चाल करावी. मग त्याला कैद करून अकबरशहानें त्याच्या तक्तावर बसावें. आतां अकबरशहा रजपूत लोक बरोबर घेऊन तुह्मांस ह्या ठिकाणीं लवकरच येऊन भेटेल. ]

**संभाजीराव**–साईसाहब, आपका मकान् तो हमेषा सहरामें है. तो फिर ये दरबारशाही बातोंसे आप कैसे वाकीफ हुवे. इस्का मुझे ताजूब मालुम होता है.

[ पण फकीरसाहेब, तुमचें नेहेमीं जंगलांत राहणें. असें असतां ह्या राजदरबारच्या गोष्टी तुह्मांस ह्या अरण्यांत कळल्या कशा ? ह्याचें मला आश्चर्य वाटतें. ]

**फकीर**–( गंभीर मुद्रेनें ) अय राजा, मेरा मकान् गोके ऐसे सहरामें है. तोभी बहूत लोग इस्से वाकीफ है. यहांपर अमीर और गरीबका येक रुत्बा है. आपके ऐसे राजा, अमीर, उमराव कभी कभी इस् मकानका तलाश करते हुवे आतेहै. मैं नंगा फकीर हूं. यहांपर मुझको रहनेको न दर है, न घर हैं, और ओढने और बिछाने कपडाभी नहीं है. तोभी चारो तरफके मुत्सदी और गरीब इस् मकान्में सलामश्वरत् लेनेके लिये यहांपर छिप्के आते है. मैं अगर फकीर हूं. तोभी मखलूकमें मेरा रोआब् गालेब है. मेरेवास्ते आपके दिल्में जो कुछ् शक् होगा उस्की सफाई करलो. क्यौं कि, आपके दुस्मनोंके हात्से आपको छुडाकर आपका बचाव करूंगा ऐसा षाहाजादी रोषनौरसे मैंने कौल व एकरार किया है. उस्में अब् फरक् न होगा. मैं आपका दोस्त सादिक हूं. यह बात दुबारा फीर कहता हूं. तिस्परभी आपके दिल्का शक् दूर न होगा और आप मु-

झसे बरखिलाफ रहोंगे तो आपका अंजाम अछा न होगा. मेरे दोस्तीसे जितना आपको फायदा होगा वैसाही दुस्मनीसे आपको नुकसान पोहचेगा. मेरा गुस्सा बहूत सख्त् है. मैं अगर आपका दुष्मन् बना तो आप अगर सारी जहान्के बादशाहा होगे, और आपके हुकमत्में बेइन् त्याह फौज होगी, और आपके नज्दीक जीहोष्र और दाना सलाहकार होंगे, तोभी मेरे इताबके आगे एक घडीभरभी ठैर नसकोगे. यह खूब ख्यालमें रखीये.

[ ( गंभीर मुद्रेनें ) राजा, हें मकाण जरी अशा अरण्यांत आहे तरी तें पुष्कळ लोकांस माहित आहे. येथें राजे व रंक दोन्ही समान आहेत. तुझ्यासारखे राजे, अमीर, उमराव व सरदार आहेत, तेही ह्या मकाणाचा कधीं कधीं मुद्दाम शोध काढीत येतात. मी नंगा फकीर आहें; येथें मला रहावयास घर नाहीं; तसेंच, हातरापांघरावयाला वस्त्र नाहीं; तरी चारी मुलूखांतले मुत्सदी, तसेच गरीब लंगोटे, ह्या मकाणांत सल्ला मसलती घेण्यासाठीं वरचेवर गुप्त रीतीनें येत असतात. मी फकीर असलों तरी लोकांमध्यें माझा दरारा मोठा आहे. मजविषयीं तुझ्या पोटांत कांहीं अंदेशा असला तर तो निखालस टाकून दे. कारण तुझ्या शत्रूच्या हातून तुला सोडवून तुझा बचाव करीन असें मी शहाजादी रोषनार इजला वचन देऊन चुकलों आहें. तें आतां फिरावयाचें नाहीं. मी तुझा खरा खरा दोस्त आहें, असें पुन्हां आणखी एकदा सांगतों. या उपर मजविषयीं तुझें मन निःशंक न होईल आणि तूं माझा तिरस्कार करीत रहाशील तर तुझा परिणाम ठीक होणार नाहीं. माझ्या दोस्तीनें जसा तुझा फायदा होणार आहे तसें माझ्या दुस्मा-

नागिरीनें तुझें नुकसानही होणार आहे. माझा राग फार कठिण आहे. मी तुझा दुस्मान झालों तर तूं सगळ्या पृथ्वीचा राजा असलास किंवा तुझ्या पदरीं लाखो फौज असली आणि तुजपाशीं उत्तम उत्तम सल्लेगार असले तरी माझ्या रागापुढें तुझा एक घटिकाभरही टिकाव लागणार नाहीं. हें खूप लक्षांत ठेव. ]

**संभाजी**—साई साहब, आपीने मुझको कैदमेंसे छुडाया. अब मेरा राज्यका अखत्यार मुझको कहांसे है? इस्से बुरी हालत मेरी कौनसी होगी? किसी तरहसे मै इस कैदमेंसें छुट जाउं तो मैंने बहुत कुछ हाशील किया ऐसा मैं समजताहुं. आपके गुफ्तगूसे और जिस् वक्त मैंने आपको देखा तबसे मेरी यह तसल्ली होचुकी है कि, आपके इनायतसे और सलामसलतसे मेरी यह तखलीप जल्द मिट्जायगी. लेकिन् मैं आपकोयह पूछता हुं कि, रायगडकिलेकी तरफ्से फौज आकर आपको न पकडे ऐसा कुछ इंतिजाम अव्वल आपने किया है या नही?

[ फकीरसाहेब, मला कैदेंतून आपणच सोडविलें. तेव्हां माझा राजेपणा मजपाशीं आहे कोठें? आतां ह्याहून माझा परिणाम वाईट तो काय व्हावयाचा? कोणीकडून तरी ह्या कैदखान्यांतून मुक्त झालों ह्मणजे मोठी मिळविली असें मी समजतों. आपल्या भाषणावरून व प्रथम मी आपल्यास पाहिलें तेव्हांपासूनच माझी खात्री होऊन चुकली आहे कीं, आपल्या आशीर्वादानें व सल्लामसलतीनें मी ह्या दुःखसागरांतून लवकरच पार पडेन. पण रायगडच्या किल्ल्यावरून शिबंदीचे लोक येथें येऊन आह्मांस पकडणार नाहींत असा कांहीं बंदोबस्त आपण पूर्वीच करून ठेवला आहे का? ]

**फकीर**–राजा मैं इस् पहाडमें अंदाजन ५० वर्ससे रहता हूं. इधरके सब लोग मेरी बहुत अदब रखते हैं. इस लिये वे मेरे मकानपर फौरन हमला करेंगे ऐसा जान नहीं पडता है. न्यानवे हिस्से तो वे इस् बुजरूक फकीरकी छेडखानी न करेंगे. अगरच शायद बडे हियावसे यहांतक पहुंचभी गये, तौभी आपको पकडकर लेजानेमें वे कभी वर न आवेंगे. उनको शिकस्त देनेका भीतरी बंदोबस्त मैंने कर रक्खा है.

[ राजा, मी ह्या पहाडामध्यें सुमारें ५० वर्षें रहात आहें. मला इकडचे सर्व लोक चांगला मान देतात. ह्यामुळें ते एकाएकीं येऊन माझ्या मकाणावर हल्ला करतील असें वाटत नाहीं. ९९ हिशानें ते ह्या बुजरूक फकिराच्या वाटेस जाणार नाहींत. त्यांतूनही जरी यदाकदाचित् ते हिय्या करून येथपर्यंत आले तरी तुला पकडून नेण्याच्या कामांत त्यांस कधीं यश यावयाचें नाहीं. त्यांचा पाडाव होण्यासारखा मी आंतून पक्का बंदोबस्त करून ठेविला आहे. ]

**संभाजी**–साईजी, ऐसा मेरा बचाव करनेहारा कौन अदमी आपकेपास है, उसका नाम अगरच मुझको बतलाइयेगा तो मुझपर आपका बहुत एहसान होगा.

[ फकीरसाहेब, असा माझा बचाव करणारा मनुष्य आपणापाशीं कोण आहे, त्याचें मला नांव सांगाल तर मजवर बहुत उपकार होतील. ]

**फकीर**–राजा, जिसने आपके बचावके लिये बीडा उठाया है, वह घोडेपर सवार होके और हातमें हाथियार लेके जंगमें कभी शरीक न हुआ है. लेकिन जब कोई मुश्किल वक्त गुजरता है तब एक छोटी बिल्लीभी शेरका काम कर दिखलाती है. यह तो आपको मालुमही होगा.

[ राजा, ज्यानें तुझ्या वचावाचा विडा उचलला आहे, तो घोड्यावर बसून आणि हातांत हत्यार घेऊन कधीं रणांत शिरला नाहीं. पण तसाच बिकट प्रसंग येऊन गुदरला तर यःकश्चित् मांजर असतें त्याच्या आंगींही वाघाचें धैर्य येतें. हें तुला ठाऊक असेलच. ]

असें दोघांचें बोलणें होत आहे इतक्यांत बाहेर कांहीं लोकांचा गलबला ऐकूं आला. रायगडावरून संभाजीरावाचा शोध काढण्याकरितां ही टोळी निघाली होती. फकिराच्या मकाणाच्या भोंवतीं दाट जंगल होतें. त्यांतून जाण्यायेण्याचे मळलेले प्रसिद्ध रस्ते नव्हते. त्यांतही अवलियाच्या गुहेपाशीं तर फारच दाट जंगल वाढलें होतें. त्या ठिकाणीं येण्यास एक अरुंद वाट होती. ती फक्त त्या टोळींतील एकाच शिपायाला माहित होती. तो सगळ्यांचा मोहोरक्या होऊन बाकीच्या शिपायांना थेट फकिराच्या रहावयाच्या जागेपर्यंत घेऊन गेला. या टोळींतले लोक थोडेच होते. आपल्याला धरण्यासच हें धरणें आलें आहे असें समजून संभाजीराव जरा चपापला. पण त्या वेळेस अवलियानें त्याला बराच दम दिला. तो म्हणालाः—

राजा, यह पीछे हटनेका वक्त नहीं है. इस् वक्त छातीसे छाती भिडाकर दुष्मन्का सामना करना चाहिये. अल्लाकी मेहेर नजरसे आपका कुछ्भी नुकसान न होगा. मैंने सुना है कि, एक दो वखत् जंगी शेरोंसेभी आपने टकर खाई है. जिस रहमदिल खुदानें आपको उन् शेरोंके हमलेमेंसेभी छुडाया है तो ना ताकतदार अदमीयोंके तख्लीफसे आपको छुडानेमें उसको क्या मुष्किल है ? ख्यालातके बाहरके जो खुदाके कार हैं उन्पर जिस् राजाका यकीन् नहीं रहता है वह राजा राज्यके लायक नहीं है. जिस्का उस्पर भरोसा रहता है, उसीपर वह

रहम करता है. और उसके मेहरबानीके सिवाय किसी राजाको अपने राज्यका इंतिजाम करनेकी ल्याकत न होगी.

[ राजा, ही मागें सरण्याची वेळ नव्हे. ह्या समयीं छातीला छाती भिडवून शत्रूशीं सामना केला पाहिजे. अल्लाच्या मेहेर नजरेनें तुझें कांहीं वांकडें व्हावयाचें नाहीं. माझ्या ऐकण्यांत आहे कीं, तूं एक दोन वेळा पटाईत वाघाशींही टकरा दिल्या आहेस. तर ज्या कृपाळू खुदानें तुला त्या वाघाच्या जबड्यांतून सुद्धां सोडविलें त्याला निर्बळ मनुष्यांच्या त्रासांतून सोडविण्याचें कांहीं कठीण आहे कीं काय ? ज्या राजाचा परमेश्वराच्या अचिंत्य करणीवर भरंवसा नसतो तो राजा राज्याच्या उपयोगी नाहीं. ज्याचा भरंवसा त्याजवर असतो त्याजवरच तो कृपा करितो आणि त्याच्या कृपाबलाशिवाय कोणत्याही राजाला आपलें राज्य चांगलें चालवितां येत नाहीं. ]

ह्याप्रमाणें दोघांचा संवाद पुरा होत आहे तों तपास काढीत आलेल्या शिपायांचा त्या गुहेभोंवतीं गराडा पडला. त्या टोळीवरचा जमादार होता तो पुढें सरून फकिराला लवून सलाम करून म्हणालाः—

साईं साहब, किलेपरके हमारे पेहेरेमेंसे एक कैदी भाग गया है. उसका तलाष करते हुये हम् लोग यहां आये है. इसी जगाह वह छिपके बैठा होगा. ऐसी खबर हमने पाई है.

[ फकीरसाहेब, किल्ल्यावरून आमच्या पहाऱ्यांतून एक कैदी पळून गेला आहे. त्याचा शोध काढीत काढीत आह्मीं येथें आलों आहों. तो ह्याच ठिकाणीं दडून बसला असेल अशी आम्हांस खबर मिळाली आहे. ]

हें भाषण कानीं पडतांच शिडीनें वर येऊन आणि जरा रागिट मुद्रा करून फकीर म्हणालाः—

तुम लोग अपने कैदीकी तलाश्र बेफिकिर करो, लेकिन् उस् तलाश्के लिये किसके मकानपर आये हो इस्का अव्वल खूब ख्याल् करो. ऐसे कारसे तुमारा अंजाम् अच्छा न होगा, यह शुरुसे तुमको मैं जनाता हुं.

[ तुम्हीं आपल्या कैद्याचा तपास खुशाल करा. पण त्या तपासासाठीं तुम्हीं कोणाच्या मकाणावर आलां आहां ह्याचा आधीं नीट विचार करा. अशा कृतीनें तुमचा परिणाम नीट लागणार नाहीं. हें तुम्हांस पूर्वीच सांगून ठेवितों. ]

हें ऐकून जमादार म्हणतोः—

साई साहब, बस् करो. हमारा अंजाम् हम्को मालुम है.

[ फकीरसाहेब, बस करा; आमचा परिणाम आम्हांला ठाऊक आहे. ]

असें बोलून त्यानें लगेच भुयारांत उडी ठोकली. इकडे झाडाच्या फांदीला एक ढोलकें बांधलें होतें त्याजपाशीं तो अवलिया गेला, आणि 'अल्ला हो अकबर' असा मोठ्यानें घोष करून त्यानें त्या ढोलक्यावर दोन चार वेळां जोरानें टिपरें मारिलें. त्याचा आवाज त्या सगळ्या खोऱ्याभर दणाणून गेला जमादार खालीं गेला होता त्यानें तेथें संभाजीरावाला पाहून तो लागलाच शिडीनें वर चढून आला. त्यानें आपल्या सोबत्यांस ती खबर दिली आणि त्यांस भुयाराच्या सभोंवतीं तयार होऊन उभे रहाण्यास इशारा केला. ते लोक दहांहून जास्ती नव्हते. तितके सगळे लोक भुयाराला गराडा घालून उभे राहिले. इकडे सभोंवतीं जंगलांत तिरकमटेवाले लोक दाट झाडीमध्यें लपून बसले होते. त्यांना ढोलक्याचा इशारा मिळतांच त्यांनीं गराडा घालणारांच्या आंगांवर तिरांचा भडिमार चालविला. त्यानें सर्व लोक जागच्याजागीं घायाळ होऊन पडले.

नंतर कांहीं वेळानें सुमारें २० असामी मावळे लोक, हातांत तिरकमटे व तरवारा घेतलेले, चारी बाजूंनीं भुयाराजवळ आले आणि त्यांनीं घायाळ होऊन पडलेल्या शिपायांच्या हातांतलीं आधीं हत्यारें काढून घेतलीं. इतका प्रकार वरच्या बाजूस चालला असतां संभाजीरावही तेथें शिडीनें वर चढून आला. त्यास फकीर म्हणतोः—

क्या संभाजीराव, आपके बचावकी फिक्र बे फायदे आपको थी ऐसी अब आपकी खात्री हुई कि नही? जिन्होने आपको कैदमेंसे छुडाके ले जानेका सला किया उनको पहिलेसे जान पडाथा कि, शायद आपकी तलाषमें दौड होगी. इस लिये आपके बचावकी तरतूद अव्वल कर रक्खीथी. अब ये आपके साथी जिधर ले जायेंगे उधर वे फिकिर चले जाइये. आपको वे ऐसे ठिकाने ले जायेंगे जहां आपके बालकोभी धक्का न लगेगा.

[ कां संभाजीराव, तुझ्या बचावाची तुला व्यर्थ काळजी वाटत होती, अशी आतां खात्री झाली कीं नाहीं ? ज्यांनीं तुला कैदेंतून सोडवून नेण्याचा विचार केला, त्यांना आधींच वाटलें होतें कीं कदाचित् तुझ्या पाठीमागें धरणें येईल म्हणून तुझ्या बचावाची त्यांनीं आगाऊ तरतूद करून ठेविली होती. आतां हे तुझे सोबती तुला घेऊन जातील तिकडे खुशाल जा. तुला ते अशा ठिकाणीं नेतील कीं तेथें तुझ्या केंसालाही धक्का लागणार नाहीं. ]

हें ऐकून संभाजीराव म्हणतोः—

महाराज, मैं आपको यहां छोडकर कैसा चला जाउं ? आपका इस् जगह रहना मुझको मुनासिब नही मालुम होता है. फौजके लोग ऐसा समझेंगे कि आपही मुझको किलेमेंसे

भगायके लेगये, या आपीके सलेसे यह काम हुआ होगा. अगर आप यहां अकेले रहेंगे तो अदावत्के सबब्से वे आपको नुकसान पहुंचावेंगे.

[ महाराज, मी आपल्याला येथें सोडून कसा जाऊं ? आपण आतां ह्या ठिकाणीं रहाणें मला प्रशस्त वाटत नाहीं. शिवंदीचे लोक असें समजतील कीं आपणच मला किल्ल्यांतून पळवून नेलें, किंवा आपल्याच सल्ल्यानें ही गोष्ट झाली असावी. आपण येथें एकटे राहिल्यास ते आपला सूड घेतल्याशिवाय रहाणार नाहींत. ]

हें संभाजीचें भाषण ऐकून फकीर मोठ्यानें हांसून ह्मणाला:—

राजा, वे बिचारे मेरा क्या करेंगे ? बहुत हुआ तो मेरी जान लेंगे, इतनाही ना ? अः, उस्में कुछ् नही. अब यह अस्सी नब्वेवर्सका जईफ खप्पड बदन् इस् दुनियामें रहकर किस् काम आवेगा ? वे जैसा चाहे वैसा मेरा करडाले. उसकी फिक्र बिलकुल मुझको नही है. आपका भला चाहनेवालोने मुझ्को जो काम फर्मायाथा सो मैंने बजाया. अब् ये लोग मेरे बदन्का जो चाहे सो करडाले. औरभी जब्तक् मैं जिंदा हुं तब्तक् मेरे हातसे जितनी मदत् होनेलायक है उतनी किये बिना न रहुंगा. यह दिलमें पक्का समझीये.

[ राजा, ते बिचारे माझें काय करणार आहेत ? फार झालें तर मला ठार मारतील इतकेंच कीं नाहीं. उंः त्यांत कांहींच नाहीं. आतां हें ८०।९० वर्षांचें जरठ झालेलें खप्पड कलेवर ह्या जगांत राहून तरी ह्याचा काय उपयोग आहे ? ते माझी कशीही विल्हेवाट लावोत. त्याची मला बिलकुल भीति नाहीं. तुझ्या हितचिंतकांनीं मला जी कामगिरी सांगितली होती ती मी बजाविली. आतां हे लोक माझ्या देहाचें पाहिजे तें क-

रोत. अझून देखील माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत तुला माझ्या हातून जेवढें साह्य होण्यासारखें आहे तेवढें मी केल्याशिवाय रहाणार नाहीं. ही पक्की गांठ बांधून ठेव. ]

मग त्या अवलियाचा निरोप घेऊन संभाजीराव तेथून निघाला. मावळे लोक जंगलांत शिरले. त्यांच्या पाठोपाठ तोही चालला. त्यांना ती पायांखालचीच वाट होती ह्यामुळें ते भराभर जंगल तुडवीत चालले. त्यांना शहरचें कधींही वारें लागलें नव्हतें. त्यांपैकीं कित्येकांच्या पायांत वहाणाही नव्हत्या. ते शुद्ध पहाडी लोक होते. त्यांचा राकट बांधा पाहून राजधानीच्या ठिकाणीं राहून सुकुमार झालेले लोक ह्यांना अचंबा वाटल्याशिवाय रहावयाचा नाहीं. डोक्याला ८।१० हात पागोट्याची चिंधी, अंगावर एक कांबळ्याचें काळें रगटें, आणि इंद्रियें झांकण्यापुरती लंगोटी, हा काय तो त्यांचा पोषाख. प्रत्येकाच्या हातांत एकेक तिरकमटा, आणि कमरेला एक आंखूडशी तरवार, हीं दोन जीव बचाविण्याचीं त्यांचीं हत्यारें. तीर मारण्याच्या कामांत ते उत्कृष्ट पटाईत. उडत्या घारी वगैरे पाखरांस नेमका तीर मारून ते सहज खालीं पाडीत. जातां जातां वाटेनें ससा, डुकर, सांबर वगैरे जनावरांची ते सहज शिकार करीत.

ह्याप्रमाणें दुपारपासून संध्याकाळपर्यंत त्यांनीं मार्ग क्रमिला. कधीं पायांनीं चालण्याचा सराव नसल्यामुळें राजा अगदीं थकून गेला. इतक्यांत एक टेंकडी लागली. ती चढून गेल्यावर अस्तमानाच्या सुमारास एका खोलगट जाग्यांत एक खेडें लागलें. तेथें १५।२० भिकार झोंपडीं होतीं. तींही शहरासारखीं एकाला एक लागलेलीं नव्हतीं. येथें एक, तर तेथें एक, अशीं तीं अंतराअंतरावर पसरलेलीं होतीं. त्यांपैकीं एक चांगलेंसें

झोंपडें पाहून तेथें ते मावळे लोक राजाला घेऊन गेले. थंडी, वारा, ऊन, पाऊस न लागावा म्हणून त्या खोपटावर सागवानाचीं आणि फळसाचीं पानें हातरून बांधलीं होतीं. छपर उभें राहण्यासाठीं कळक फोडून सभोंवतीं भिंतीऐवजीं त्यांचे कूड घातले होते. त्यांच्या मधल्या फटी गवतानें भरून व शेणामातीनें लिंपून काढल्या होत्या. आंतल्या बाजूला स्वयंपाकापुरती कुडाचीच एक लहानशी खोली केलेली होती, व दुसऱ्या दालनांत कामटीच्या कुडाला लागून एक खाटलें ठेविलें होतें. त्याजवर एक कांबळें हातरलें होतें. स्वयंपाकघराच्या दालनांत एक वैलचूल, मडक्यांच्या एक दोन उतरंडी, लांकडी काथवट, लांकडी दोन तीन डाव (पळ्या), थाळा, पितळी, आणि तांब्या, इतकें सामान होतें. ह्याशिवाय दुसरें कांहीं एक नव्हतें. अशा भिकार खेड्यांत अशा घरांत शहरगांवीं रहाणाराला एक घटकाभरसुद्धां करमायाचें नाहीं. मग राजाला विश्रांति होण्यासारखें तर तेथें काय असणार? तरी मी कारागृहांतून सुटून आंतां मोकळ्या हवेवर आहें, मजवर कोणाचा पहारा नाहीं, व मी कोणाच्या ताब्यांत नाहीं, असा विचार मनांत येऊन त्याला तसल्या घाणेरड्या झोंपड्यांतही त्या वेळेस बराच आराम वाटला. ह्यावरून, मनाचें आणि शरीराचें स्वातंत्र्य ही एक अजब चीज आहे, तिला दुर्दैवानें जो मनुष्य, जें कुटुंब, किंवा जें राष्ट्र मुकतें, त्याला इतर सौख्यें कितीही असलीं तरी त्या स्थितींत त्याला नरककुंडांतल्या यातना होत असतात, हें उघड आहे! ह्याचा प्रत्यक्ष अनुभव परकीय राजाच्या ताब्यांत रहाणाऱ्या राष्ट्राला विशेष आलेला असतो! हात पाय मोकळे राहून भाजीभाकरीच्या साध्या जेवणांत जें सुख असतें तें बंदीखान्यांत पंचपक्वान्नी भोजनांतही नसतें! असो.

ही मंडळी तेथें जाऊन पोहोंचल्यावर दोन तीन घटकांपर्यंत जिकडेतिकडे सामसूम होतें. पुढें गांवांत एकाएकीं गडबड झाली. पुष्कळ मनुष्यांचा गलबला ऐकूं येऊं लागला. सुमारें २० असामी हत्यारबंद शिपाई आणि त्यांच्या बरोबर एक मेणा इतकें खटलें गांवांत शिरलें. अशी धामधूम त्या भिकार खेड्यांत कधींच पहाण्यांत आली नव्हती आणि रात्रीची वेळ, ह्यामुळें गांवांतल्या बायकापोरांची एकच धांदल उडाली. पण त्यांतच कांहीं लोक अगदीं स्वस्थ होते. ह्यावरून त्या लोकांना त्या गडबडीची आगाऊ थोडीशी सूचना होती असें दिसलें. एक मेणा आणि कांहीं असामी शिपाई असा खटला गांवांत येऊन पोंचल्याचें ऐकून संभाजीरावाला जरा विस्मय वाटला. तो वाटेनें श्रमला होता, म्हणून विश्रांतीसाठीं खाटल्यावर जरा आडवा पडला होता. मेणा व माणसें ह्यांतलें गूढ काय आहे तें त्याच्या ध्यानांत येईना. म्हणून चौकशी करण्यासाठीं लगबगीनें खाटल्यावरून उठून तो बाहेर आला. तों मेणा त्याच खोपटापुढें आणून भोयांनीं थोपविला. त्यांतून रोषनार बाहेर निघून खोपटाच्या दाराशीं जाऊन पोंचते इतक्यांत राजाची व तिची नजरानजर झाली. तिला पाहून राजाला विस्मयानंद झाला. असो.

त्या गांवापासून २०।२५ कोसांवर अवरंगजेब बादशाहाचा तळ पडला होता. तेथें त्याला खबर लागली कीं, अकबरशहा बंडाचा झेंडा उभा करून व कांहीं फौज जमा करून आपणावर चालून येत आहे. मग त्यानें आपला जनानखाना व अवजड अवजड सामान मागेंच ठेवून सड्या स्वारीनिशीं तो अकबरशहाच्या रोंखावर निघून गेला. इकडे रोषनारेचे चोहींकडे हेर हिंडत होतेच. त्यांपैकीं एकानें तिला

वर्तमान सांगितलें कीं, संभाजीराव अमक्या वेळेस, अमक्या खेड्यांत येऊन पोंचणार आहे. मग तिनेंही बादशहा छावणी सोडून गेल्याची संधि साधून संभाजीरावाची गांठ घेण्यासाठीं पिराच्या दर्शनाचें निमित्त करून कांहीं निवडक लोक बरोबर घेऊन ती मेण्यांत बसून निघाली.

संभाजीरावाचें व शहाजादीचें प्रेम जडल्याची कथा वाच-कांस पूर्वीं अवगत आहेच. तिच्या हृदयमंदिरांत त्याची श्यामसुंदर मूर्ति सदा उभी होती. तिचें पुन्हा प्रत्यक्ष दर्शन होण्याची तिला फारच उत्कंठा लागली होती.

महमद अकबरशहा बापाचा उघड उघड द्वेष करूं लागला. तेव्हां तो मोकळा राहिला तर बंडावा करून आपल्या नाशास कारण होईल असें समजून अवरंगजेबानें त्याला नजरकैदेंत ठेविलें होतें. कांहीं दिवसांनीं त्याजवरच्या पाहरेकऱ्यांला पैसा देऊन शहाजादीनें त्याला प्रतिबंधांतून मुक्त केलें. तेव्हां त्यानें आपल्या बापावर बंड उभें केलें. ह्याप्रमाणें बापलेक एकमेकांचे हाडवैरी झाले. तें बंड मोडण्यासाठीं आपला लवाजमा, सा-मानसुमान व जनानखाना मागें ठेवून बादशहा सड्या स्वारी-निशीं बंडावलेल्या पुत्रावर चालून गेला.

तिकडे संभाजीरावावर संकटें येतील त्यांचें निवारण करण्या-साठीं बादशहाच्या मुलीनें वर सांगितलेल्या अवलिया फकि-राची गुप्तरीतीनें योजना केली होती. त्या कामासाठीं तिनें त्याच्याजवळ कांहीं पैसा देऊन ठेविला होता. शिवाय, तिज-कडचाच हा मनुष्य आहे अशी राजाला खूण पटण्यासाठीं तिनें त्याच्या जवळ आपल्या बोटांतली एक हिऱ्याची आंगठी देऊन ठेविली होती. ती राजानें मागें तिच्या बोटांत पाहिली होती. त्या फकिराच्या मार्फतीनें तिला राजाची वरचेवर खबर

कळत असे. फकिरानें ह्या कामगिरीसाठीं कांहीं निवडक मावळे लोक आपल्या चाकरीस ठेविले. त्यांना त्यानें आपल्या मकाणापासून थोड्या अंतरावर झाडींत लपवून बसविले होतें. त्यांपैकीं तिघे मावळे भुयारांतून किल्ल्यांत पाठवून त्यानें राजाची मुक्तता करविली. पुढें फकिराच्या मकाणावर पोंचल्यावर किल्ल्यावरील शिबंदीचे लोक राजाचा तपास काढीत आले. त्यांच्या अंगावर झाडींतून तीर सुटले ते लागून, धरण्यास आलेले लोक घायाळ होऊन राजाची पुन्हा सुटका झाली. हें वर सांगितलेंच आहे. ही इत्थंभूत वार्ता राजकन्येला त्याच दिवशीं दोनप्रहरीं फकिराच्या एका हेरानें जाऊन कळविली. तिचा बाप अगोदरच अकबरशहावर चालून गेला होता. ही संधी साधून पिराच्या दर्शनाचें निमित्त करून ती लागलीच थोडे चाकर बरोबर घेऊन मेण्यांत बसून निघाली. ज्या खेड्यांत संभाजीराव उतरला होता त्या गांवीं फकिराचा हेर तिला दोन तीन घटिका रात्रीचे सुमारास घेऊन गेला. तेथें वर सांगितल्याप्रमाणें राजाची व तिची भेट झाली.

७

तिची व राजाची अशा ठिकाणीं भेट होण्याचा मुळींच संभव नव्हता. असें असून हा अलभ्य लाभ झाला तेव्हां त्याच्या आनंदास काय विचारवें. तो अत्यानंद पोटांत रहाण्यास जागा उरली नाहीं. तेव्हां त्याच्या उकळ्या जणूं सर्वांगांतून बाहेर फुटूं लागल्या. त्याचे बाहू फुरफुरूं लागले, छाती भरून आली, डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले, आणि तोंडावरची निस्तेज कळा नाहींशी झाली. त्याला वाटलें कीं, आतां दैन्यदशा जाऊन माझ्या शुभदशेस आरंभ झाला. फकिरानें केलेले महदुपकार त्याच्या डोळ्यांपुढें दिसूं लागले. त्याच्या भाषणाची आठवण होऊन खात्री झाली कीं, तो जें जें बोलला तें

तें सर्व खरें होत चालले मैं यहां आई हुं. मेरा भाई अकबर-
तिला खोपटांत घेऊन गेला. वह बादशाहसे अलग हो
वसून त्यांचा संवाद झाला तो येणेंप्र किनारेपर आपकी इंति-

**संभाजीराव**–जाहाजादी, आज यह कैसा है आपको किले आपकी और मेरी इस् जगह आज मुलाकात हुइ. अकब-किन नहीथा. खुदाके कार ख्यालमें नही आसकते हैं. के-दमेंसे मैं कैसा छुट गया इसका मुझको हरवक्त ताजूब मालुम होता है. यह इनायत मुझपर किसनेकी. यह जाननेकी मेरी बडी खाईष है.

[ शहाजादी, आज आपल्याला हा केवढा सुदिन प्राप्त झाला आहे. आज तुझी माझी अशा ठिकाणीं भेट होईल हें ध्यानीं मनींही नव्हतें. अल्लाची करणी अगाध आहे. माझी कारागृहांतून मुक्तता झाली कशी ह्याचें मला राहून राहून आश्चर्य वाटतें. हें कृपादान मजला कोणी दिलें, तें कळण्याची फार इच्छा आहे. ]

**रोषनार**–महाराज, जिस मोहबत्‌ने आपके और मेरे दिलको एक कर डाला, उसी मोहबत्‌ने आज आपको कैदमेंसे छुडाया है. जब् जब् मर्दको मुष्किलातकी रात आकर घेरती है तब् तब् औरतके मोहबतका आफताब अपनेको शीषके रोषनीसे मुष्किलातके अंधियारेको भगाता है.

[ महाराज, ज्या प्रीतीनें तुमचें माझें मन एक करून टाकलें त्याच प्रीतीनें आज तुह्मांस कारागृहांतून सोडविलें आहे. ज्या ज्या वेळेस पुरुषास संकटाची रात्र पडते त्या त्या वेळेस स्त्रीचा प्रीतिसूर्य आपल्या प्रयत्नरूप किरणांचा प्रकाश पाडून त्याच्या संकटतिमिराचा नाश करतो. ]

**संभाजीराव**–शहाजादी, आप अपने मोहबत्‌को आफताबकी

मिसाल देती हो, लेकिन् वह मुझ्को गैर मुनासिब मालुम पडती है. आफताबके तेजरोषनीसे बदनको गरमी होती. वैसा मोहबत्का नही है. आपका मोहबत्का ठंडा 'खुष-नुमा जितना जितना बढता है उतनी उतनी मुझको खुषी होती जाती है. इस्लिये आफताबके रोषनीसे आपका मोहबतका चाह मुझको ज्यादा है. आज हम दोनोकी मुलाकात ऐसे झोंपडीमें हुई, इसका मुझको निहायत अ-पसोस है.

[ शहाजादी, तूं आपल्या प्रीतीला सूर्याची उपमा दि-लीस, पण ती मला गौण दिसते. सूर्याच्या प्रखर किरणांनीं आंगाला संताप होतो तसें प्रीतीचें नाहीं. तुझ्या प्रीतीचे शीतळ किरण जसजसे वृद्धिंगत होत जाताहेत तसतसे ते मला अधिकाधिक सुखदायक होताहेत. ह्यासाठीं सूर्यकिर-णांपेक्षांही तुझ्या प्रीतीला मी अधिक चहातों. आज तुझी माझी अशा भिकार झोंपड्यांत भेट झाली ह्मणून फार वाईट वाटतें. ( असें ह्मणून तिला दृढालिंगन देतो. ) ]

शहाजादी–महाराज, इस झोपडीमें आपको बहुत वक्त का-टना न पडेगा. इस गांवके सब लोग मेरे तरफ्के हैं. तौभी ऐसे जंगली लोगोंमें बहुत बेर रहना न पडेगा. जिस् न्या-सतके आप मालिक है उसी न्यासतका अखत्यार आपको दिलानेके लिये मैने कईएक लोगोंको मुकरर किया है. वे लोग कल आपके पास हाजिर होंगे. एक तरफ् मेरे वालिदकी मोहबत् और दूसरी तरफ् आपकी मोहबत्, दोनो दो तरफ खींच रहें है. आखिर आपके मोहबत्ने आपके तरफ् खींच लिया है. मेरा दिल एकसा आपके तरफ् लगा हुआ है. इस् लिये वालीदका मकान छोडकर आपको

मिलनेके लिये आज मैं यहां आई हुं. मेरा भाई अकबरशहा मेरी तरफ़दारी करता है. वह बादशाहसे अलग हो कर कुछ फौजके साथ भीमानदीके किनारेपर आपकी इंतिजारी कर रहा है. फकीरके मारीफत् मैंने आपको किलेपरसे छुडानेकी मसलत की हुई उसको मालुम है. अकबरशहाको पकडकर ले जानेके लिये उधरसे बादशाह खुद फौजके साथ रवाना हुये हैं. उन् दोनोंका सामना होगा तो भीमाके किनारे पर बडा जंग मचेगा. आप अपने तयारीमें रहिये. मैं अब दूसरे झोपडीमें जाके मुकाम करती हुं.

[ महाराज, ह्या खोपटांतच आपल्याला फार वेळ काढावयाचा आहे असें नाहीं. ह्या गांवातले सर्व लोक मजकडचेच आहेत. तरी असल्या जंगली लोकांत तुह्मांस फार वेळ रहावें लागणार नाहीं. ज्या राज्याचे तुह्मी मालक आहां त्या राज्यावर तुमची पूर्ववत् स्थापना करण्यासाठीं मी कांहीं लोकांची योजना केली आहे. ते तुह्मांस उद्यां येऊन भेटतील. एकीकडे बापाचा ओढा, आणि एकीकडे तुमच्या वरचें प्रेम, अशी मला आड विहीर झाली होती. शेवटीं प्रेमानें तुह्मांकडेच मला ओढिलें. माझें तन, मन, धन, एकसारखें तुह्मांकडे लागून गेलें आहे. ह्यामुळें बापाचें घर सोडून तुमच्या दर्शनासाठीं आज मी येथें आलें. माझा भाऊ अकबरशहा ह्यानें माझा पक्ष स्वीकारला आहे. तो बादशहापासून वेगळा सरून तुमची वाट पहात फौजेनिशीं भीमादीच्या कांठीं तळ देऊन राहिला आहे. फकिराच्या मार्फतीनें मी तुह्मांस किल्ल्यावरून सोडविण्याची मसलत केलेली त्याला कळली आहे. अकबरशहाला धरून नेण्यासाठीं तिकडून बादशहाची स्वारी फौज घेऊन

रवाना झाली आहे. त्या दोघांची गांठ पडली तर भीमेच्या कांठीं मोठा युद्धसंग्राम माजणार आहे. तुम्ही आपल्या तयारींत असा. मी आतां दुसऱ्या झोंपड्यांत जाऊन उतरतें. ]

इतकें भाषण होऊन राजाचा निरोप घेऊन शहाजादी सुमारें २०० कदमांवर दुसरें एक झोंपडें होतें त्यांत जाऊन उतरली. तिच्याबरोबर शिपाई प्यादे होते ते आपआपली सोय पाहून उतरले. कांहीं लोक त्या झोंपड्याच्या समोर एक मोठें वडाचें झाड होतें त्या खालीं कांबळीं टाकून त्यांजवर आडवे पसरले. पुढें काय चमत्कार झाला तो आतां पुढल्या भागांत कळेल.

---

## भाग १२.

"अपन्थानं तु गच्छन्तं सादरोऽपि विमुञ्चति"

संभाजीरावाला त्या वेळेस कोणाचीही भीति राहिली नाहीं. शिबंदीच्या लोकांचें त्याच्या पाठीशीं धरणें होतें तेंही सुटलें. आज आतां स्वस्थ झोंप येईल असा विचार करून त्यानें खाटल्यावर आंग टाकलें. मग कांहीं वेळ ह्या कुशीवर, कांहीं वेळ त्या कुशीवर, कांहीं वेळ उताणा, तर कांहीं वेळ पाताणा, अशा नाना तऱ्हा त्यानें करून पाहिल्या. तरी त्याला झोंप लागेना. अतिदुःख झालें असतां जशी झोंप लागत नाहीं तशी अतिहर्षांतही झोंप येत नाहीं. ह्याचा अनुभव अमच्या बहुतेक वाचकांस असेलच. दुःखाची दशा लयास जाऊन त्याला एकाएकीं सुखावस्था प्राप्त झाली तरी त्याला झोंप लागेना. मनांत नानातऱ्हेचे विचारतरंग उठून त्यांत तो गुंग झाला. भावीसुखावस्थेच्या परमावधीचे विचार त्याच्या मनांत घोळूं लागले. खुद्द बादशहाचा मुलगा अकबर ह्यानें आपल्या बहिणीच्या सांगण्यावरून माझा पक्ष उचलला आहे. बादश-

ह्याच्या फौजेंतले बहुतेक रजपूत शिपाई व सरदार मला अनुकूल झाले आहेत. त्यांच्या साह्यानें पुन्हा माझी गादी मला परत मिळण्याचा योग आला आहे. तसेंच, बादशहाची तरुण व रूपवती मुलगी मजवर अत्यंत फिदा आहे. तिचें मला आंतून भरपूर पाठबळ आहे. मी जातीनेंही, तरुण, निरोगी, शूर व वैभवसंपन्न राजपुत्र असून सर्वसुखांचा उपभोग घेण्याचे माझे दिवस नजीक येऊन ठेपले आहेत, असें त्याला वाटलें.

ह्याप्रमाणें त्या खोपटांतल्या खाटल्यावर खरखरीत रगड्यावर उताणा पडून आपल्या भावी सुखदायक स्थितीमध्यें तो निमग्न झाला असतां मी एक मर्त्यलोकचा प्राणी आहें असें त्याला भान राहिलें नाहीं. तो वाणीला अगम्य अशा दुसऱ्याच एका जगतीतलावरच्या आनंदसमुद्रांत पोंहूं लागला. त्या वेळेस त्याच्या मनांत ज्या ज्या गोष्टी उभ्या राहिल्या त्या त्या त्याला अगदीं खऱ्या भासल्या. तेथें सर्वच खरें असून कांहीं खरें आणि कांहीं खोटें यांचें मिश्रण नव्हतें. त्याजवर आनंदाची भरती आली, तिला मिथ्यत्वाचा अवरोध मुळींच होत नव्हता. मी एका भिकार मावळ्याच्या घाणेरड्या खोपटांत एका तुटक्या बाजल्यावर पडलों आहें आणि माझ्या आंगाखालीं एक फाटकेंसें रगटें आहे, असें त्याला देहभानच राहिलें नाहीं. कल्पनासृष्टीच्या भरांत, मी इंद्रलोकच्या नंदनवनांतल्या क्रीडाभुवनांत देहासकट आहें असें त्यानें पाहिलें. मर्त्यलोकच्या ग्राम्य व क्षणभंगुर सुखांत त्याचा अंतरात्मा गुटमळून न रहातां काल्पनिक उच्चैःश्रव्यावर आरूढ होऊन एका अभिनव, अनिर्वचनीय व सदा आनंदमय अशा प्रदेशांत तो शिरला होता. ही जरी सगळी स्वप्नावस्था होती तरी केवळ निर्मल व निष्कलंक सत्यामध्यें जी चकाकी व जें प्रियत्व असतें तें सर्व

त्या जागेपणच्या स्वप्नामध्यें त्याच्या दृष्टीनें ओतप्रोत भरलें होतें. डोळे उघडे असूनही केव्हां केव्हां जीं अनेक स्वप्नें पडतात तसलें हें एक त्याचें स्वप्न होतें. असो. अशा आनंदजलाचें अंतःकरणावर हळुहळू सिंचन होत असतां त्याला तेथच्या तेथें गाढमूढ झोंप लागली. तींत तो घोरूंही लागला. त्याला दृश्यादृश्यसृष्टीचें कांहींच स्मरण राहिलें नाहीं. त्याचीं पंचज्ञानें- द्रियें आणि पंचकर्मेंद्रियें त्याच्या जड देहामध्यें अगदीं गोठल्यासा- रखीं झालीं. फक्त नाकांतून दीर्घ श्वासोच्छ्वास चालला होता. ही कायती त्याच्या देहांतल्या चित्कलेची एक खूण कायम होती.

ह्याप्रमाणें तो झोंपेच्या भरांत असतां बाहेर मोठा गलबला झाला. त्यानें तो दचकून जागा झाला. हत्यारांचा खडखडाटही कानावर आला. त्यांतच, धरा, मारा, हाणा, असे शब्द नि- घाले. ही गोष्ट अरुणोदयाच्या जरा अगोदर घडली. त्या वेळेस आभाळांत स्वच्छ नक्षत्रें होतीं. त्यांच्या उजेडानें जवळचे पदार्थ अंधुक अंधुक दिसत होते. संभाजीराव चट्दिशीं खाटल्यावर उठून बसला. त्या वेळेस तो समजला कीं, मला किल्ल्यावरचे लोक धरावयास आले आहेत. पुढें त्याला लागलीच रोषनारेची आठवण झाली. मग तिची अवस्था काय झाली ती पहावी ह्मणून तेथून उठून तो तिच्या खोपटांत गेला. पण तेथें ती व तिच्या बरोबरचे कोणी नाहीं असें पाहून तो चकित झाला. एकीकडे धर, पळ, चालली होती तिकडेच तो चालला, तों त्याच्या भोंवतीं शिपायांनीं गराडा घातला. तो अगदीं निःशस्त्र होता. त्याला हात उगारण्यास कांहींएक साधन नव्हतें. घटका दोन घटकांच्या अवधींत त्याचें सगळें मनोराज्य कसें भयाभंगास गेलें, पहा! लागलेच एक दोन असामी पुढें सरून त्यांनीं त्याला हातबिडी ठोकली, व मागें पुढें नागव्या

तरवारींचा पहारा बसविला. अशा थाटानें त्यांनीं कैदी राजाची स्वारी पुढें चालविली.

इतकें होत आहे तों पूर्वेस जरा जरा पांढुरकें दिसूं लागलें. कोणी तरी मला धरावयास आलें आहे असें संभाजीरावाला वाटलें होतें तेंच शेवटीं खरें ठरलें. तिकडे अवरंगजेब बादशहा अकबरशहावर चालून गेल्यावर त्याला वर्दी जाऊन पोंचली कीं, रोषनार कांहीं लोक बरोबर घेऊन पिराच्या दर्शनाच्या निमित्तानें आपला गोठ सोडून एकाएकीं निघून गेली. त्यानें लगेच तिच्या पाठोपाठ शिपायांची एक टोळी रवाना केली. रोषनारेनें जरी बाहेरून पिराच्या दर्शनाचें निमित्त पुढें केलें तरी तिचा जाण्याचा उद्देश अवरंगजेबाला समजून चुकला. त्यानें टोळीवरच्या जमादाराला हुकूम देऊन ठेवला कीं, तुह्मीं अशा बेतानें तिच्या पाठीवर चालावें कीं, ती कोणीकडे जात आहे हें तुह्मांस कळावें, पण तिच्या मात्र तुह्मी दृष्टीस पडूं नये. तिच्या मागोमाग कांहीं अंतरावर चालावें आणि ती अखेरच्या मुक्कामाला जाऊन पोंचली कीं, तेथें ती काय करिते हें पाहून, तिला वेढा देऊन लगेच मेण्यांत घालून घेऊन यावें. तिच्या बरोबर संभाजी राव सांपडला तर त्यालाही धरून आणावें. इतकें सांगून तो माघारा फिरला. कर्मधर्मसंयोग; वर सांगितल्याप्रमाणें राजा व राजकन्या हीं दोघेंही टोळीच्या हातीं लागलीं. मग अवरंगजेबाचे लोक त्यांना कैद करून घेऊन चालले.

तो रस्ता दाट जंगलांतून चालला होता. जसजसें उजाडूं लागलें तसतसें जंगलामध्यें निरनिराळ्या ठिकाणीं चार चार, पांच पांच, असामी मावळे छपून बसले होते त्यांनीं अवरंगजेबाच्या शिपायांच्या आंगावर आपलें तिरंदाजीचें सफाईदार काम

सुरू केलें. त्या समयीं शिपाईलोक उतरणीला लागले होते. तेथून तीर मारणारे कोण व कोठून मारतात हें नजरेस पडेना. इकडे अवरंगजेबाचे शिपाईलोक खालीं उतरतांना तीर लागून पटापट घायाळ होऊं लागले. तेव्हां त्यांच्या ध्यानांत आलें कीं, सभोंवतीं शत्रूचा भक्कम वेढा पडला आहे. मध्यभागीं राचकन्येचा मेणा व राजा ह्यांना चालविलें होतें. त्यांच्या पुढें व मागें शिपाईलोक जमावानें चालत होते. त्यांपैकीं कैक शिपाई तीरांच्या मारानें ठार होऊन पडले. हें त्यांजवर मोठेंच संकट येऊन गुजरलें. आडून तीर मारणाऱ्या लोकांना त्या जंगलांतले कोनेकोपरे इतके माहित होते कीं, जिकडून तीर येत त्या दिशेकडे धांवणें केलें कीं, ते लागलेच पलिकडच्या दाट जंगलांत शिरून नाहींसे होत. ह्यामुळें त्यांना पकडण्याचा सर्व इलाज खुंटला. त्या संकटांतून मुक्त होण्यास त्यांना कांहींएक उपाय सुचेना.

संभाजीरावावर सक्त पहारा होता. त्याच्या, पुढें, पाठिमागें, व बाजूला, तोंडे पेटविलेले शिपाईलोक चालत होते. असें करतां करतां एक दाट झाडी लागली. त्या ठिकाणीं तर त्यांच्यावर मागून पुढून तीरांचा, केवळ वर्षाव सुरू झाला. कानशिलांत, पोटांत पाठींत, दंडांत व तोंडावर तीर लागून मागचे पुढचे शिपाई पटापट खालीं पडले. कित्येकांना जबर जखमा झाल्या, पण जीव मात्र कायम होते. त्या समयीं तिरंदाजलोकांची एक टोळी झाडींतून बाहेर पडून तिनें संभाजीरावाला आपल्या कबजांत घेतलें. जखमी झालेले शिपाईही जिवावर उदार होऊन त्यांच्याशीं झगडा करूं लागले. इतक्यांत त्यांच्या साह्यास दुसरे कांहीं शिपाई आले. तेव्हां ते तीरवाले लोक राजाला तसाच सोडून पुन्हा जंगलांत नाहींसे झाले.

ह्या झगड्यांत संभाजीरावाच्या उजव्या हाताला कोंपराजवळ तारवारीची एक जखम झाली. शिपायांनीं पागोट्याचा एक तुकडा फाडून त्यानें ती जखम बांधली. ह्यामुळें रक्तस्राव बंद झाला. पुढें सुदैवानें जंगलांतला रस्ता थोडाच उरला होता. तो जर आणखी पाव अर्धा कोस तसाच लांबता तर अवरंगजेबाच्या टोळींतलें एकही मनुष्य जिवंत रहातेंना. असो.

उतरण उतरत खालीं गेल्यावर पुढें मैदान प्रदेश लागला. तो कांहीं वेळ तुडविल्यावर एक लहानसें खेडें लागलें. त्याच्या एका अंगाला गार व दाट आंबराई होती. तेथें ते विश्रांति घेण्यास एका विहिरीच्या कांठीं उतरले. जरा दम खाल्ल्यावर त्यांनीं आपल्या लोकांची मोजदाद केली. तों १०० असामींपैकीं २२ आसामी ठार, आणि ३४ असामी जखमी, असें आढळून आलें. जखमी माणसांपैकीं ९ असामींना जबर जखमा झाल्या होत्या. ते वांचतील अशी आशा दिसेना, ह्मणून त्यांना त्याच गांवीं ठेवून पुढें जाण्याचा त्यांचा बेत झाला. मग संभाजीरावाचा त्यांनीं कोपुर सोडून पाहिला. त्याची जखम भीति बाळगण्यासारखी नव्हती. हाड शाबूद असून मासाला मात्र इजा झाली होती. ती आठ चार दिवसांत बरी होईल असें त्यांस दिसलें. मग पुन्हा ती जखम त्यांनीं फडक्यानें बांधून ठेविली. नंतर त्याला व रोषनारेला कांहीं खाण्यापिण्यास देऊन व आपणही थोडीशी न्याहारी करून शिपायांनीं तेथून कूच केलें. दोन तीन कोस मजल चालून गेल्यावर प्रहर दीड प्रहर दिवस चढला नाहीं तों वाटेंत दुसरें एक खेडें लागलें. तेथेंच त्यांनीं त्या दिवशीं मुक्काम केला.

त्या मुक्कामीं संभाजीरावाच्या जखमेला फार ठणका लागला. त्या वेदनेनें त्याला ताप भरून तो अगदीं मलूल होऊन प-

डला. रोषनारेची व माझी एकदां तरी कृपा करून भेट करवा अशी त्यानें शिपायांची पुष्कळ वेळां विनवणी केली, पण त्याच्या त्या ह्मणण्याकडे कोणीही लक्ष देईना. ह्यामुळें त्याचा ताप अधिकच वाढत चालला. माझी आनंदाची पाळी सरून गेली, आतां ही दुःखाची पाळी आहे, असें त्यास वाटलें. त्याच्या सर्व आशांची निराशा झाली ह्मणून त्याला अल्प-धीर बायकोप्रमाणें क्षणभर रडेंही कोसळलें. अशा विपत्ति भो-गून जगण्यापेक्षां एकदम मृत्यूच्या हातून आपला निकाल झालेला बरा, असें त्यास वाटूं लागलें. त्याच्या दरज्याकडे किंवा पेठे-पणाकडे लक्ष न देतां शिपाई त्याला साधारण कैद्यासारखे पायीनें चालवीत होते. पण शेवटीं तापानें त्याच्या आंगांत चालण्याची शक्तिच राहिली नाहीं, तेव्हां गांवांतले ४ वांसे जमा करून, ते एके ठिकाणीं बांधून, त्यांचें डोलीसारखें एक वाहन तयार करून त्याजवर त्यांनीं त्याला आडवा निजविलें, आणि ऊन लागूं नये ह्मणून वर एक कांबळ्याचें पट्टें बांधलें. मग ६ अस-मींनीं खांदे देऊन ती डोली पुढें चालविली. तेथून निघतांना-ही त्यानें जमादाराची पुष्कळ विनवणी केली कीं, एकदां शहा-जादीची व माझी नजरभेट तरी करवा. पण त्याचें ह्मणणें त्यांनीं ऐकिलें न ऐकिल्यासारखेंच केलें. शहाजादीवरचा पहा-राही मजबूद होता. पण तिला त्याच्या इतकी कांचणी नव्हती. त्याच्यापेक्षां तिचा खाण्यापिण्याचा बंदोबस्त चांगला ठेविला होता. व तिची अदबीही पुष्कळ राखीत. तिनें कांहीं मागि-तलें कीं, लागलेंच पुढें करीत. इकडे संभाजीरावाकडचा प्रकार अगदीं त्याच्या उलट होता. त्यानें कांहीं मागितलें तर त्याची टवाळी करीत. त्याला भूक, तान लागली तर अन्न, पाणी दे-ण्यास अळंटळं करीत. त्याच्या इभ्रतीला कमीपणा आणणारें

असें त्याला वाक्‌ताडण करीत. राजा अशा दुःखदायक स्थितींत असेल असें शहाजादीला अगदीं कळलें नव्हतें. तिचा इतर गोष्टींविषयीं त्यांनीं चांगला बंदोबस्त ठेविला होता, व तिचे हुकूमही मानीत, तरी त्याची भेट करवा असें तिनें ह्मटलें ह्मणजे तिकडे ते दुर्लक्ष्य करीत, ह्यामुळें सोनेरी पिंजऱ्यांत बसवून ठेविलेली मी एक हतभाग्य मैनाच आहें असें तिला वाटून ती डोळ्यांतून वारंवार आसवें गाळी.

संभाजीरावाला जखम लागून तापानें तो हैराण असल्याचें तिला त्यांनीं अगदीं कळूं दिलें नव्हतें. शेवटीं, शेवटच्या मुक्कामाजवळ गेल्यावर तो जखमी झाल्याचें तिला कळविलें. वर सांगितल्याप्रमाणें अवरंगजेब त्या वेळेस अकबरावर पुढें चालून न जातां पुन्हा आपल्या छावणींत परत येऊन, तेथून मुक्काम हालवून, जनानखान्यासुद्धां तो भीमेच्या कांठीं तळ देऊन राहिला होता. तेथें तो रोषनारेची खबर मिळण्याची वाट पहात असतां, राजा व आपली कन्या छावणींत येऊन दाखल झाल्याचें त्याला वर्तमान कळलें. तेव्हां संभाजीरावाला एका अलग तंबूंत नेववून त्याजवर त्यानें सक्त पहारा ठेविला, आणि रोषनारेची समक्ष भेट न घेतां लष्करच्या मागच्या अंगाला जनानखान्याजवळ एक निराळाच तंबू मारला होता त्यांत तिला वेगळी ठेविली. तिच्या जवळ पहिले चाकर होते ते दूर करून तिच्या तंबूवर बायकांचा एक मुस्तकीम पहारा ठेविला.

'संभाजीरावको तंबूके बाहर किसी सबबके बाईस किसी वख्त् मत् निकालो' असा बादशहानें पहारेवाल्यांस सक्त हुकूम दिला. त्याचा ताप वाढत चालला व प्रकृति असाध्य होत चालली, तरी त्याच्या जवळ बसून रहाण्यास नोकरांना परवानगी न-

व्हती. त्याची प्रकृति अधिकाधिक क्षीण होत चालली. तरी त्यानें कोणाला जवळ बोलाविलें तर पहारेवाले त्याला सरळ जबाब न देतां त्याची उलटी थट्टा करीत तो तापाच्या भरांत भलभलतें बरळत असे, पण त्याची कोणासही कींव आली नाहीं. पुढें दोन तीन दिवसांनीं त्याच्या तापाचा भर आपोआप कमी झाला, आणि जखमही भराभर भरत चालली.

मग त्या मुक्कामीं अवरंगजेबाला खबर लागली कीं, सुलतान अकबर आपल्यावर लवकरच चाल करून येणार आहे. त्याच्यापाशीं फौज बरीच मोठी असून तींत कांहीं मुसलमान शिपाई व सरदारही आहेत. तसाच रजपूतशिपायांचा भरणा मोठा असून कांहीं रजपूत सरदारही त्यास मिळाले आहेत. त्या समयीं त्यानें विचार केला कीं, अशा प्रसंगीं मराठ्यांचा राजा संभाजीराव ह्याला विशेष इजा दिली तर हिंदूलोक फार नाखूष होऊन आपला पक्ष कमजोर होईल, ह्मणून त्यानें संभाजीरावावरची सक्ती जरा ढिली केली.

अवरंगजेबाची छावणी भीमेच्या कांठीं एका उंच जाग्यावर होती. त्याच्या तळाजवळ भीमेचें पात्र फारसें रुंद नव्हतें, पण तेथें बऱ्याच लांबीचा एक खोल डोह होता. तेथून शत्रूला पायउताऱ्यानें आलिकडे येण्यासारखें नव्हतें. डोहाच्या पलिकडच्या अंगास अजमासें दोन कोसांवर महमद अकबराची छावणी येऊन पडली. अवरंगजेबाच्या एका अंगाला भीमानदी आणि दुसऱ्या अंगाला एक सखल जागा असून तेथें दाट झाडी होती. त्याच्या छावणीच्या खालच्या बाजूला कोस दीड कोसावर नदीला एक गचक्या उतार होता. तेथून रात्रीच्या वेळेस नदी पार होऊन अकबरशहा फौजेसह आलिकडे आला, आणि सर्व फौज सिद्ध करून मोठ्या पहाटेस अवरंगजेबाच्या छावणी-

वर दुसऱ्या बाजूनें त्यानें चाल केली. त्यानें आपल्या फौजेच्या तीन टोळ्या केल्या. उजव्या टोळीवरचें आधिपत्य मोहबतखानीं ह्यास दिलें, आणि डाव्या बाजूच्या टोळीवर राजा सवाई जयसिंग ह्मणून एक रजपूत सरदार होता त्याला नेमिलें. ह्या सवाई जयसिंगानें पूर्वी दक्षिणेंत मोठमोठीं शौर्याचीं कामें केलीं होतीं. मध्यभागची टोळी अकबरशहानें आपल्याच ताब्यांत ठेवून तो स्वतः तेथें सज्ज होऊन उभा राहिला.

अवरंगजेबाची छावणी उंच जाग्यावर असल्यामुळें वर चालून जाऊन हल्ला करावयाचें काम जरा बिकट होतें. शिवाय, त्याच्या फौजेपेक्षां अकबरशहाची फौजही संख्येनें कमीच होती. ह्मणून, आपण आपल्या जाग्यावरच नेट धरून तयारीनें उभें रहावें, आणि त्यांनाच आपल्या आंगावर आधीं येऊं द्यावें, त्यांची फौज मोठी असल्यामुळें ते छावणी सोडून आलिकडे येतीलच, आणि ते नजीक येऊन भिडले कीं, आपण त्यांजवर एकदम हल्ला करावा, अशी त्याची व त्याच्या सरदारांची मसलत ठरली. शेवटीं हीच मसलत त्यांच्या कामास आली, अवरंगजेबानें आपल्या सरदारांस हुकूम केला कीं, 'अकबरके फौजपर फौरन् जाकर हमला करो.'

या हुकूमाप्रमाणें त्याची फौज उंच जाग्यावरून पाण्याच्या लोटासारखी एकदम खालीं उतरण्याबरोबर अकबराच्या टोळींतले लोक अगदीं घाबरून गेले. ते आपलीं तोंडें फिरवून माघारे निघाले सुद्धां. इतक्यांत मोहबतखान आपली टोळी घेऊन पुढें सरला. त्यानें अवरंगजेबाच्या डाव्या बाजूवर मोठ्या निकरानें हल्ला केला. तेव्हां अवरंगजेबाच्या लोकांची पहिली उमेद होती ती खचली. कांहीं वेळ दोहींकडे एकसारख्या ईर्ष्येनें

तरवारींची खणाखणी चालली. तींत कोण हरतो, आणि कोण जिंकतो, ह्याचा अजमास लागेना.

अकबराच्या हाडे रजपुतांच्या माऱ्यापुढें अवरंगजेबाचे मुसलमान शिपाई हटण्याचा रंग दिसूं लागला. तेव्हां अवरंगजेबानें आपल्या छावणींतून नव्या उमेदीच्या लोकांची कुमक पाठविली. मग पुन्हां त्यांचें यांचें मोठ्या जोरानें युद्ध चाललें. अखेरीस, बापलेकांमध्यें विजयश्रीची कोणाच्या गळ्यांत माळ पडते ह्याचा निश्चय करितां येईना. एकदां ह्या पक्षाची सरशी होई, आणि एकदां त्या पक्षाची सरशी होई. असें प्रहर दीड प्रहरपर्यंत एकसारखें तुमुल युद्ध झालें. अकबरशहा हौद्याच्या हत्तीवर बसून युद्धचमत्कार पहात उभा राहिला होता. पुढें त्याच्या हत्तीला जखमा लागून तो ठार झाला. त्या प्रसंगीं अकबरानें हौद्यांतून खालीं उडी टाकून लढाईंत शिरून मोठ्या ईर्ष्येनें त्यानें आपली तरवार चालविली. त्याचें असें शौर्य पाहून त्याच्या लोकांस नवा दम आला. त्यांनीं पुन्हा मोठ्या नेटानें युद्धाचें काम चालविलें. शत्रु एकेक दोन दोन कदम मागें हटत चालला. ह्याप्रमाणें उजवी बाजू आणि मधली बाजू मोहबतखान व खुद्द अकबरशहा ह्यांनीं संभाळून अवरंगजेबाची फौज त्यांच्या फौजेपेक्षां मोठी होती तरी तिची सरशी होऊं दिली नाहीं. सवाई जयसिंग डाव्याबाजूच्या टोळीवर होता. त्याचा मात्र अगदीं मोड होऊन तो माघारा फिरण्याच्या बेतांत होता. इतक्यांत एक चमत्कारिक गोष्ट घडून आली; ती अशी. एक स्वार लढाईंत पडून त्याचा घोडा मोकळा सुटून तो रणांगण सोडून नीट अवरंगजेबाच्या छावणीकडे माघारा भरधांव धांवत गेला. तो संभाजीरावाला आयताच मिळाला. त्याजवर संभाजीराव स्वार होऊन जिकडे सवाई जयसिंग लढत होता तिकडे तो

त्याच्या टोळींत जाऊन मिळाला. त्या टोळींतले शिपाईलोक घाबरून आपल्या छावणीकडे माघारे फिरत होते. इतक्यांत त्यांच्यापुढें उभा राहून त्यांना तो ओरडून ह्मणाला, 'वीरहो, लढाईचें काम टाकून तुह्मी चालला कोणीकडे? तुमच्या सरदाराला तुह्मी शत्रूच्या हातीं देणार कीं काय? असा भागुबाईपणा रजपुतांच्या कुळांला कधीं ठाऊक नाहीं. पुन्हा दम धरून आपल्या सरदाराला मदत करा.' हा वीर आमच्याच छावणीकडून आला असून शत्रूला कसा मिळाला, असा अचंबा करीत लढण्याचें काम क्षणभर तहकूब ठेवून अवरंगजेबाकडचे लोक तटस्थ उभे राहिले. त्या अवधींत अकबराची फौज पुन्हा दम सांवरून तयार झाली. सवाई जयसिंगाला मागें टाकून संभाजीराव खुद्द आपणच त्याच्या टोळीचें आधिपत्य स्वीकारून उभा राहिला, आणि हर हर महादेव, असा जयघोष करून एकदम शत्रूच्या आंगावर तुटून पडला. हल्ला अकस्मात् त्यांच्यावर उलटल्यामुळें अवरंगजेबाचे लोक नाउमेद झाले, व घाबरून मागें सरले. इकडे उजवी बाजू आणि मधली बाजू पूर्ववत् मोहबतखान व अकबरशहा ह्यांनीं मोठ्या शौर्यानें संभाळून ठेविली होतीच. तिकडे शत्रूची उजवी बाजूही घसरण्याबरोबर लढाईचा निकाल लागला. अवरंगजेबाचा मोड झाला, आणि बराच रक्तपात होऊन शेवटीं विजयश्रीनें तरुण अकबराच्याच गळ्यांत माळ घातली.

ह्याप्रमाणें लढाईचा शेवट झाल्यावर संभाजीराव व सुलतान अकबरशहा ह्यांच्या भेटी झाल्या. संभाजीरावाचें शौर्य पाहून रजपूतशिपायांना व अकबरशहाला बहुत आनंद झाला. मग जयघोष करीत मोठ्या हर्षानें विजयी झालेले लोक अवरंगजेबाच्या छावणींत शिरले. प्रथम ज्या तंबूंत रोषनार होती

तेथें तिच्या भेटीकरितां संभाजीराव गेला. त्याला पाहून तिला जो आनंद झाला तो सांगतां येत नाहीं. संभाजीरावाची मुक्तता झाल्याबद्दल तिला हर्ष झालाच झाला, पण बापाची अवस्था पुढें काय होणार, हें मनांत येऊन ती जरा चिंताक्रांत झाली. संभाजीरावाला पाहून तिला आनंदाचें केवळ भरतें आलें. तिच्या चेहऱ्यावर टवटवी येऊन तो नेहमींपेक्षां अधिकच खुलला. त्या वेळेस तिनें त्याच्या गळ्याला घट्ट मिठी मारून त्याच्या छातीवर टपटप आनंदाश्रु गाळले. त्यानेंही एक हात तिच्या गळ्यांत घालून दुसऱ्या हातानें तिची हनुवटी धरून ह्मटलें:—

रोषनार, आज खुदाने अपनेको कैसा खुषीका दिन दिखलाया है. आज अपने कुल तखलिपका खातिमा हुआ, ऐसा समझना चाहिये. आपके मेहरबानीके बाईससे आज मैं कैदमेंसे खुला हुआ. मेरी जान् आपकी बसबब बचगई है. आपकी खबरदारी मुझपर न होती तो कैदखानेमें मेरी मौत हो जाती, क्यौं कि, जब् कोई कम्नसीबी राजा दुष्मन्के हाथ पडता है तब् कैदमेंही उसकी जान निकल जाती है. वह जिंदा बाहर निकलनेकी उमेद नहीं पाई जाती है. हमारी कम्नसीबकी रात गुजर गई, और अच्छा नसीबका सूरज निकला है. वह जलद उप्पर चढेगा ऐसा दिखाता है. मैं अपने राज्यमें पहुंचनेपर उधर आपको ले जाऊंगा, और करारके बमोजिब आप्से शादी करूंगा. आपको मैं अपनी प्यारी और सब्से बडी रानी बनाऊंगा. तब् अपने जिंदगी भरतक् हम दोनो खुषीसे एष करेंगे. अब् कोई आफत् न आवेगी.

[ रोषनार, आज खुदानें आपल्याला हा केवढा आनंदाचा दिवस दाखविला आहे. आज आपल्या सगळ्या दुःखांचा शेवट झाला असें समज. तुझ्या मेहरबानीनें आज मला बंदखु-

लास झाला, किंबहुना माझे प्राण वांचविण्याला तूंच कारण आहेस. तुझें मला पाठबळ नसतें तर बंदीखान्यांतच माझीं १०० वर्षें भरलीं असतीं. कारण, एखादा दुर्दैवी राजा शत्रूच्या हातीं सांपडून कैदेंत पडला ह्मणजे त्याचा त्यांतच अंत होत असतो. मग तो जिवंतपणीं बाहेर पडण्याची आशा फारच थोडी असते. पण आमच्या दुर्दैवाची रात्र सरून आतां आपल्या भाग्यसूर्याचा उदय झाला आहे, तो लवकरच वर चढेल असें सुचिन्ह दिसूं लागलें आहे. मी आपल्या राज्यांत गेलों कीं तुला तिकडे घेऊन जाऊन आपला संकेत ठरल्याप्रमाणें तुझ्याशीं मी लग्न लावीन. तुला मी आपली प्रिय पट्टराणी करीन. मग आपल्या जीवमानपर्यंत आपण उभयतां आनंदोत्सव करून सौख्य भोगूं. आतां कोणतींही विघ्नें येणार नाहींत. ]

हें भाषण ऐकतांच रोपनारेच्या डोळ्यांतून टपाटप आनंदाश्रु पडले, ओंठ थरथरां कांपूं लागले, आणि कांपऱ्या कांपऱ्यानेंच ती आपल्या प्रियवल्लभास ह्मणाली:—

महाराज, मेरे वालिदको क्या सजा आप करेंगे ? सो मुझको पहिले मालुम होना चाहिये. उसके लिये मुझको बहुत अप्सोस होता है.

[ महाराज, पण माझ्या बापाचें आपण काय करणार ? तें मला अगोदर समजलें पाहिजे. त्याच्यासाठीं माझ्या जिवाला फार काळजी लागली आहे. ]

संभाजीराव ह्मणाला:—

आपके वालिदके नसीबमें अब् कैदही है. वह बादशाहीके धुंदसे मस्त हुआ है. उस्को अपना और पराया देख नहीं पडता है. मैं उस्केसरीखा एक राजा हो, करके उसने मेरी

कितनी बेअदबी की, यह आपको माल्रुम नही क्या ? अकबरशहा उस्का खास लडका होकर उस्को वह दुष्मन्सेभी जादा देख्ता है. आप उसकी लडकी, आपपर इतना प्यार करकेभी आपको इतनी तख्लिप देना क्या मुनासिब् है ? ऐसे संगदिल् और नालायक वालिदपर आप इतनी रहम कैसी करती हो. इस्का मुझको ताजुब होता है. ऐसे बदमाषकी तो फौरन् कतल करना चाहिये.

[ तुझ्या बापाच्या कपाळीं आतां कैदखानाच आहे. तो राज्यमदानें धुंद झाला आहे. त्याला स्वकीय परकीय कोणी दिसेनासें झालें आहे. मी त्याच्यासारखाच एक स्वतंत्र राजा असून त्यानें माझा किती अपमान केला हें तुला माहीत नाहीं का ? अकबरशहा त्याचा प्रत्यक्ष पुत्र असून त्याला तो दुस्मानाच्याही पलिकडे लेखितो. तूं त्याची मुलगी व तुझ्यावर इतकी प्यार मर्जी असून त्यानें तुझे असे हाल करावे का ? अशा दुष्ट आणि चांडाळ बापाची तुला दया कशी येते ह्याचें मला आश्चर्य वाटतें. अशा दुष्टाला तर एकदम जिवें मारून टाकावें. ]

तिची व त्याची भेट होतांच परस्परांचें किती प्रेमाचें भाषण झालें, आणि बापाचें नांव काढल्याबरोबर दांत ओंठ खाऊन तो किती त्वेषानें बोलला, हें पाहून आपल्या बापाविषयीं त्याच्या मनांत पुरा द्वेषभाव बाणून गेला आहे अशी रोषनारेची खात्री झाली. त्याच्या डोळ्यांच्या आविर्भावावरूनच त्याचा पुढचा काय विचार आहे तो दिसून आला. ह्मणून तिला फार वाईट वाटलें. माझ्यामुळें बापाची अशी अवस्था होणार असें मनांत येऊन ती डोळ्यांला पदर लावून मुळूमुळू रडूं लागली. बापाच्या कळवळ्यानें तिला गहिंवर आला असें पाहून त्यालाही जरा वाईट वाटलें. ‘ जाळावांचून कढ नाहीं,

आणि मायेवांचून रड नाहीं ' असें ह्मणतात तें सत्य आहे. मग तो ह्मणाला:—

यहॅ क्या भला, शहाजादी? पागलके मानिंद क्यौं कर रोती हो? दोनोंमेंसे किसका गुन्हा जबर इसका ज़रा ख्याल करो तो आपकेभी दिलमें आवेगा कि, आपका वालिदही ज्यादे सजाके लायक है. तिस्परभी आपके वास्ते उसके जानपर आफत् न आवेगी, ऐसी मैं अपनी जबान् देता हुं. आप अपने वालिदको इतना मानती हो इस्लिये मैं उसको कैदसेभी छुडाऊंगा. लेकिन् उस्ने मेरी एक बात कबूल करनी चाहिये.

[ हें काय बरें शहाजादी? असें वेड्यासारखें रडावें काय? दोघांतून अपराध मोठा कोणाचा ह्याचा थोडा विचार कर, ह्मणजे तुझ्यासुद्धां ध्यानांत येईल कीं, तुझा बापच शिक्षेस अधिक पात्र आहे. तथापि तुझ्याकडे पाहून त्याच्या जिवाला धक्का लागणार नाहीं असें मी तुला खास वचन देतों. तुझ्या पितृभक्तीकडे लक्ष देऊन त्याला मी कैदेंतूनही सोडवीन पण त्यानें माझी एक गोष्ट कबूल केली पाहिजे. ]

हें त्याचें कृपाभरित वचन ऐकतांच रोपनारेला अनिवार्य हुंदका येऊन तिनें त्याच्या गळ्याला मोठ्या प्रेमयुक्त अंतःकरणानें पुन्हा घट्ट मिठी मारिली, आणि स्फुंदस्फुंदून पुन्हा त्याच्या अंगावर तिनें मंदोष्ण आनंदाश्रूंचें सिंचन केलें. ते तिचे अश्रुच केवळ आभारदर्शक होते. कारण तिचा कंठ दाटून आल्यामुळें त्याचे उपकार तिच्यानें तोंडावाटे वदवेनांत सुद्धां. त्याच्या आश्वासनानें ती दुःखविमुक्त झाली. मग तिनें आपल्या प्राणप्रियाकडे सुहास्यवदनानें नजर टाकली. तेव्हां तिच्या सुकुमार व गौरवर्ण गालांवर नेत्राश्रूंचे ताजे ओघळ चाललेले सुकले सुद्धां नव्हते, तोंच त्यांजवर सुहास्याची प्रभा पसरली. त्या समयीं गुलाबाच्या

नुकत्याच फुललेल्या टवटवीत झाडावर पावसाची लहानशी सर पडून पुढें लागलेंच अभ्रपटल नाहींसें होऊन त्याजवर बालार्कांचें कोवळें ऊन पडून अवर्णनीय बहार दिसते, तशी तिची दिव्यमुखश्री चमकूं लागली. तिचा त्या वेळचा प्रफुल्लित मुखचंद्रमा पाहून राजाला परमाल्हाद झाला. तरी त्याच्या मनांत अवरंगजेबाविषयीं पुढचा विचार काय आहे हें अजून स्पष्ट झालें नव्हतें तिजविषयीं मात्र त्याचें अकृत्रिम प्रेम खरें. ह्यांत किमपि संदेह नव्हता. तिच्या बापानें त्याचा छळ केला तो त्याच्या मनांतून जाण्यासारखा नव्हता. इकडे तिजवरचें प्रेम कायम असून तिकडे तिच्या बापाविषयींचा द्वेषभावही कायम होता. तो जखमी असून अवरंगजेबाच्या छावणीकडे त्याला नेतांना त्याच्या लोकांनीं वाटेंत त्याचे फार हाल केले, व तो छावणींत जाऊन पोहोंचल्यावरही त्याचे नाहक छळ केले, ते त्याच्या काळजाच्या अंतरगाभ्याला कुसळासारखे सलत होते. त्यांत, संभाजीरावासारख्या महास्वच्छंदी, महानिर्दय व महानिष्ठुर राजाविषयीं तर दयेचें नांवच घ्यावयास नको. शेवटीं, तिच्या तंबूंतून बाहेर निघतांना घाईघाईनें त्यानें तिला इतकेंच सांगितलें कीं:—

'आपके भाईके रायसे मैं आपके वालिदका फैसल जल्द करूंगा.'

[ तुझ्या भावाच्या विचारानें तुझ्या बापाबद्दल मी लवकरच निकाल करीन. ]

हें ऐकून तिच्या मनाची इतकी खात्री झाली कीं, निदान बापाच्या जिवाला तरी धक्का नाहीं. मजवर त्याचें अत्यंत प्रेम आहे, तेव्हां मजकडे पाहून तरी त्याजविषयीं त्याच्या पोटांत दया येईल.

मग संभाजीराव व अकबरशहा ह्यांची भेट झाली. त्या भे-

टींत दोघांनीं असें ठरविलें कीं, नर्मदेच्या उत्तरेकडचा सर्व प्रदेश अवरंगजेबाच्या ताब्यांत राहूं द्यावा, आणि बादशहाला कैदेंत न ठेवितां तिकडच्या राज्याची पूर्ण मुकत्यारी त्याजकडे ठेवावी. नर्मदेच्या दक्षिणेस जो प्रदेश आहे त्याचे दोन समभाग करून एका भागावर संभाजीरावानें आणि दुसऱ्या भागावर अकबरशहानें पूर्ण स्वातंत्र्यानें राज्य करावें. दोघांपैकीं एकावर कोणी शत्रु चालून आल्यास त्याला दुसऱ्यानें साह्य करावें. ह्याप्रमाणें आपसांत करारमदार होऊन अवरंगजेबाला त्याच्याविषयीं दोघांनीं ठरविलेला विचार कळविला. तेव्हां ती गोष्ट त्यानें मुकाट्यानें कबूल केली. कारण, कबूल करण्यावांचून त्याला दुसरा इलाजच नव्हता. कबूल न करावी तर जन्मभर एखाद्या किल्ल्यावर कुजत पडावें लागेल, म्हणून कोणतेही आढेवेढे न घेतां त्यानें लागलेंच हूं म्हटलें. 'नाक धरून बुक्यांचा मार' अशा प्रकारची दुसरी एक अट त्यांनीं त्याजकडून कबूल करविली. ती ही कीं, संभाजीराव आपलें राज्य सुयंत्र करूं लागला म्हणजे त्यानें रोषनारेला तिकडे न्यावें. ही अट कबूल करण्याचें तर त्याच्या अतिशय जिवावर आलें. पण करतो काय विचारा! 'वखत पडे बांका तो गद्धेकूं कहना काका' ही म्हण लक्षांत आणून त्या गोष्टीलाही त्यानें रुकार दिला. मग त्याजकडून स्वदस्तूरचे करार लिहून घेऊन थोडीशी फौज बरोबर देऊन त्यांनीं त्याला नर्मदापार जाण्याची परवानगी दिली. आणि आपण दोघेजण सर्व फौज बरोबर घेऊन रायगडाकडे निघून आले. निघण्याचे आधीं संभाजीरावानें रोषनारेची गांठ घेऊन तिला सर्व वृत्तांत कळविला. तिकडे जाऊन मी पूर्ववत् आपल्या राज्यावर बसल्यानंतर तुला तेथें नेऊन तुझे मनोरथ पूर्ण करीन असें वचन देऊन, तिचा निरोप घेऊन, तो

निघाला. तिकडे राजारामाच्या पक्षाचे लोक होते त्यांना ही सार्यंत खबर कळली. तेव्हां ते लोक संभाजीरावाच्या क्रूर स्वभावाला व अकबरशहाच्या फौजेला भिऊन चौघे चोंहींकडे पळून गेले. ते दोघे रायगडाकडे पोहोंचल्यावर राजाराम हातीं लागला. त्याला पुन्हा प्रतिबंधांत ठेवून संभाजीराव पूर्ववत् राज्यारूढ झाला.

इतक्या सर्व गोष्टी घडून आल्या, तोंपर्यंत संभाजीराव बराच स्थितीवर होता. पण राज्यलक्ष्मीचा व त्याचा पुन्हा संयोग होतांच 'कमलाविलासमदिरोन्मीलन्मदाघूर्णित' ह्या पंडितराज जगन्नाथरायांच्या उक्तीप्रमाणें ऐश्वर्यरूप मद्याच्या मदानें त्याचे पुन्हा डोळे फिरले. प्रथम प्रथम हरएक महत्त्वाच्या कामीं तो अकबरशहाची सल्ला मसलत घेत असे. कांहीं दिवस दोघांच्या विचारानें राज्यकारभार चालला. पण मग त्याचा महामूर्ख प्रधान कलुषा ह्याच्या तंत्रानें तो वागूं लागला. एसाजी फर्जंदाची व त्याची पुन्हा गट्टी जमली. तुळशीच्या व त्याच्या वारंवार भेटी होऊं लागल्या. प्रतिबंधांत असतांना दारू पिण्याचें काम बंद होतें तें पुन्हा सुरू झालें. त्याच्या नाशार्थ भावाबहिणींच्या आंतून मसलती चालू झाल्या. अकबरशहाचा पूर्वी तो चांगला मानमरातब ठेवीत असे. त्याच्या आगतस्वागतांत तो एक रतीभर देखील कमी नव्हता. त्याच्या फौजेच्या खर्चावेंचाची त्यानें चांगली व्यवस्था ठेविली होती. पुढें असेच एका जुटीनें दोघे आपआपला राज्यभार ठाकठिकीनें करतील अशी आशा दिसली. त्यानें अकबरशहास रहाण्यासाठीं एक गांव दिला, त्याला त्यानें 'पाछापूर' असें नांव दिलें. पण पुढें, कलुषा, एसाजी व तुळशी ह्या बदमाषमंडळीच्या जों जों तो नादीं लागत चालला तों तों त्यानें आपल्या मुसलमान मित्रावरचें लक्ष कमी कमी

होत चाललें. त्यानें त्याच्याबरोबर करारमदार केले होते ते तो विसरला. दक्षिणेकडचें अर्धें राज्य काबिज करून देण्याचें त्यानें वंचन दिलें होतें तें पुरें करण्याचें त्याला भान राहिलें नाहीं.

तिकडे अवरंगजेबाचे हात पाय मोकळे होण्याबरोबर त्यानें कबूल केलेले चट सारे करारमदार गाशांत गुंडाळून ठेविले, आणि संभाजीराव व महंमदअकबर ह्यांजवर स्वारी करण्याची त्यानें कडेकोट तयारी चालविली. तो जैयत फौज घेऊन नर्मदा उतरून आलिकडे आल्याच्या बातम्यांवर बातम्या येऊं लागल्या. अवरंगजेबासारखा महाअभिमानी व पराक्रमशाली पुरुष उगीच माशा मारीत बसेल, ही गोष्ट कशाला पाहिजे? सांपळ्यांत सांपडलेल्या वाघास जसें एखाद्या भागुबाईनें सुद्धां डवचावें, आणि त्या वेळेस निरुपायास्तव झालेला त्रास तो मुकाट्यानें सोसून घेतो, तशी त्याची अवस्था झाली होती. प्रतिबंधांतून कशीतरी एकदां मुक्तता होवो असें त्याला झालें होतें. ह्मणून त्यानें त्याचें जें जें ह्मणणें पडलें तें तें कबूल केलें. पण सुटका मात्र होण्याचा अवकाश, मग ते करार कोण आणि आपण कोण? लागलेंच त्यानें फौज देऊन एक दोन सरदार त्यांच्या तोंडावर पुढें रवाना केले. इकडे अकबरशहाला संभाजीरावाची मदत न मिळाल्यामुळें तो एकटा पडून फसल्यासारखा झाला होता. अशी संधि पाहून, अण्णाजी दत्तो, शिरके, एसाजी व तुळशीबाई, ही राजारामाच्या पक्षाची मंडळी होती, तिनें त्याला आपल्याकडे वळवून घेण्याचा प्रयत्न चालविला. संभाजीरावाचा पक्ष सोडून आमच्या पक्षास मिळाल तर आह्मी तुह्मांस बादशाही फौजेवर चालून जाण्यास मदत करूं असें त्यांनीं अकबराशीं आंतून बोलणें लाविलें. ही बातमी महाडचा देशपांड्या दादोजी रघुनाथ ह्याच्या मार्फतीनें संभाजीरावाच्या कानावर गेली. तरी तो शु-

द्धीवर आला नाहीं. दिवसानुदिवस तो बेहोषच होत चालला. अकबराची सल्लामसलत ऐकण्याचें एकीकडेच राहिलें. त्याची तो नुसती भेट सुद्धां घेईनासा झाला. अशी त्याची छाँदिष्ट वर्तणूक पाहून अकबरशहा अगदीं त्रासून गेला. संभाजीरावाला एकदां मारण्याचा कट झाला होता. ही खबर त्यानें त्याला मित्रभावानें कळविली. तरी एसाजी इत्यादि लोकांकडून अशी गोष्ट कदापि होणार नाहीं असें समजून तें त्यानें ऐकिल्या न ऐकिल्यासारखें केलें. तो बहुतकरून नेहमीं दारूच्या धुंदींत असे. कलुपाप्रधानाशिवाय दुसऱ्या कोणाची तो भेट घेत नसे. कोणी आग्रहानें भेट घेतल्यास त्याचा तो तिरस्कार करी. राज्यांतले खऱ्या दिलाचे लोक ह्याची छाकटेबाजी पाहून दिलगीर झाले. अवरंगजेबाची स्वारी अगदीं नजीक येऊन भिडली तरी या वेड्या पिराला ती बातमी खरी वाटेना. सुलतान अकबरशहा व त्याचे मोहबतखान, जयसिंग वगैरे सरदार माझे मित्र आहेत, ते कधीं अवरंगजेबाला नजीक येऊं देणार नाहींत, अशा घमंडींत तो होता. संभाजीरावाची स्थिति अशी झाल्याचें ऐकून ज्या फकिरानें शहाजादीच्या हितार्थ त्याची किल्ल्यावरून सुटका केली होती तो मोठ्या त्वेपानें रायगडावर जाऊन राजापुढें उभा राहिला. त्यानेंही त्याची छाकटेपणाची स्थिति पाहून यथास्थित वाक्पुष्पांनीं पूजा केली ती अशी:—

**फकीर**—राजा, मैं कौन हुं ? मुझको पहिछाना क्या ? तेरे राज्यकी घमंडी तूं छोड दे. तेरा राज्य कीडोने पोला किया हुआ पलंगके माफिक हुआ है. उसको जरा छु जानेसे टूट जायगा. जुलमी, कैफी, और मस्त राजाने अपने राज्यका कित्नाभी इंतिजाम दुरस्त रक्खा तौभी बिगडनेको देर नहीं

लगती है. जो राजा ऐपअराममें चूर रहता है, और राज्यका कारोबार दिल्से नही करता है, उसका राज्य बहुत दिन न रहेगा. अबे तू कहा था ? तेरी हालत क्या थी ? तुजको किलेपरसे किस्ने छुडाया ? बल्की, तेरी जान बचाई किस्ने ? इस्की कुछभी तुजको याद है ? यह एहसान् उस् बादशहाके लडकीका और उस्के भाईका तेरे सिरपर है. इतनेमें भूल गये हो. अय जाहिल, उस पाक शहाजादीको हारी हुई जबान् तू कब पूरी करेगा ? बदमाप, उसके बद्दुवासे तै खाक् हो जायगा. एहसान् न माननेवालोंको खुदा प्यार नही करता है. इस् दगाबाजीके बदले तुजको नसीहत हुये बगैर न रहेगी. अब तोभी हुशियार हो जा. फौज तयार करके उस्के भाईकी मदत कर, और अवरंगजेबको पीछे हटायके उस्को हारे हुये जबानको पूरा कर. ऐसा और एकदफ तुजको कहता हुं. नही तो आखिरको सब् जानकार खुदा उस्के वालिदके हातसे तेरी सजा जल्द करावेगा.

[ राजा, मी कोण आहें ओळखलेंस का ? तुझ्या राज्याची तूं घमंडी टाकून दे. तुझें राज्य भुंग्यांनीं कोरलेल्या मंचकासारखें पोकळ झालें आहे. त्याला जरा फुः केलें कीं तें उडून जाईल. जुलमी, दुर्व्यसनी व मदांध राजानें आपल्या राज्याचीं सूत्रें खेंचून धरलीं कीं तीं तुटण्यास उशीर लागत नाहीं. जो राजा ऐपआरामांत निमग्न राहून राज्यकारभाराकडे दुर्लक्ष करितो त्याचें राज्य फार दिवस टिकत नाहीं. अरे, तूं होतास कोठें, तुझी दशा काय झाली होती, तुला किल्ल्यावरून सोडविलें कोणीं, किंबहुना तुला जीवदान दिलें कोणीं, ह्याचें किंचित् तरी तुला भान

आहे का ? हे सर्व उपकार त्या बादशहाच्या कन्येचे आणि तिच्या भावाचे तुझ्या डोक्यावर आहेत. ते इतक्यांतच विसरलास कीं काय ? मूर्खा, त्या पवित्र राजकन्येला दिलेलें वचन तूं कधीं पुरें करणार ? अधमा, तिच्या शापानें तूं भस्म होऊन जाशील. कृतघ्न राजे खुदाला कधीं आवडत नाहींत. ह्या विश्वासघाताबद्दल तुला शासन झाल्याविना रहाणार नाहीं. अजून तरी सावध हो, फौजफांटा तयार करून तिच्या भावाच्या मदतीस जा आणि अवरंगजेबाला मागें हटवून तिला दिलेलें वचन पुरें कर. असें आणखी एकदां सांगतों. नाहीं तर शेवटीं तिच्याच बापाच्या हातून तो सर्वसाक्षी खुदा तुझें लवकरच पारिपत्य करवील. ]

ह्याप्रमाणें क्रोधाविष्ट मुद्रेनें भाषण करून फकीर जमिनीवर दणादण पाय हापटीतच माघारा गेला. त्याचें तें कडक भाषण ऐकून संभाजीराव अगदीं घाबरून गेला. त्याच्या अंगाला हींव भरल्यासारखें कांपरें भरलें. त्या समयीं संभाजीरावापाशीं कांहीं हुजरे व पहाऱ्यावर हत्यारबंद शिपाईही होते. पण त्या फकिराला रागें भरण्याला किंवा हांकून देण्याला कोणाचीही माय व्यायली नाहीं. असा त्या फकिराचा त्या प्रांतांत दरारा होता. मी रायगडच्या किल्ल्यावर कैदी असतांना मला जो अवलिया फकीर भेटला तो हाच होय, अशी त्याला ओळख पटली. ज्यानें शहाजादीच्या सांगण्यावरून मला किल्ल्यांतील कैदखान्यांतून सोडविलें तो हाच मनुष्य, खास हाच मनुष्य, अशी त्याची खात्री झाली. तथापि त्यानें त्या फकिराचें कांहीं आगतस्वागत न करितां तो जसा आला तसा माघारा जाऊं दिला. त्याचें तें कर्णकटु भाषण त्याच्या काळजाशीं जाऊन झोंबलें. विस्तवानें पोळल्यासारख्या तेथें वेदना झाल्या, तें वा-

विष त्याच्या हृदयाला एकसारखें जाळीत गेलें. लाल डागणीनें डाग दिल्यासारखा तेथें चरका बसला. तरी येथें काय ? त्या गोष्टीला मध्यें एक घटिकाही गेली नाहीं तों पालथ्या घागरीवर पाणी, असा त्याचा परिणाम झाला! एक दोन दिवसांनीं तर त्या डागांचा मागमूसही राहिला नाहीं. तुळशीच्या रंगमहालांत तो तिच्या मकरंदस्वादाला भ्रमरासारखा लोलुप झाल्यावर त्याला अशा गोष्टीची आठवण कशानें होणार ?

संभाजीरावाचा असा स्वच्छंदी, हेकड, उल्लू व छाकटा स्वभाव पाहून महंमद अकबर अगदीं कंटाळून गेला. तिकडून बादशहाची स्वारी दर कुच दर मुक्काम करीत अलिकडे अलिकडे येत चालली. इकडे राजाची कांस धरून येथेंच बसून राहिलों तर त्याचा व माझा दोघांचाही बरोबरच चुराडा होणार. आतां इकडे रहातां येत नाहीं, व तिकडे बापाकडेही जाण्यास तोंड नाहीं. पुढें शहाजादीचें व त्याचें कांहीं होवो, आपण देशांतर करावें, ह्यासारखें सुख नाहीं, असा विचार करून, संभाजीरावाचा निरोप घेऊन अकबरशहा हिंदुस्थान देशाला अखेरचा सलाम करून निघाला तो थेट इराण देशांत जाऊन शिरला.

ह्याप्रमाणें अवरंगजेबाला प्रत्यक्ष पोटचा मुलगाच शत्रू झाला होता त्याचा आपोआप निकाल लागल्यावर त्यानें संभाजीरावाला धरून नेण्याचा पुढें उद्योग चालविला. त्या कामावर त्यानें तकरीबखान व इकलासखान ह्या दोन बापलेंक सरदारांची पुन्हा योजना केली. ते एसाजी व तुळशीबाई ह्यांना पूर्वी कसे मिलाफी झाले होते, हा वृत्तांत आह्मी भाग ६ पृ० ६५।६६।६७ येथें सांगितल्याचें वाचकांचे ध्यानांत असेलच. त्यांनीं पुढें संभाजीरावाला जिवंत पकडून कसें अवरंगजेबाच्या स्वाधीन

केलें, आणि त्या हिंदुराजाचा शेवटीं कसा भयंकर परिणाम झाला, हें वर्तमान पुढें क्रमशः पाहण्यांत येईल.

---

## भाग १३.

"किं किं करोति न निरर्गलतां गता स्त्री."

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें महमद अकबर इराण देशांत निघून गेल्यावर औरंगजेबानें पुनः आपलें उग्ररूप धारण केलें, आणि मराठी राज्याचा उच्छेद करण्यासाठीं कडेकोट तयारीस तो लागला. आतां मला कोणी साह्यकर्ता राहिला नाहीं असें मनांत येऊन संभाजीराव मोठ्या संकटांत पडला. शहाजाद्याशीं मीं विनाकारण कपटाची वर्तणूक ठेविली, व अखेरीस फकिरानें जागें केलें असतांही सावध झालों नाहीं, हा माझ्या हातून मोठा मूर्खपणा झाला असा त्याला पश्चात्ताप झाला. पण तो पश्चात्तापच. त्याचा मग उपयोग काय ! 'आधीं बुद्धि जाते आणि मग भांडवल जातें' अशी त्याची अवस्था होऊन तो फार घाबरून गेला.

इकडे त्याचा प्राण घेण्याविषयीं एसाजी आणि तुळशीबाई ह्यांच्या चोरमसलती चालल्याच होत्या. त्यांचे घांट दोन चार वेळां अगदीं सिद्धीस जाण्याच्या रंगास आले होते, परंतु मध्यंतरीं अकस्मात् कांहीं विघ्नें येऊन त्यांचे ते बेत फसले गेले. मग त्यांनीं असा विचार केला कीं, आपला इच्छित हेतु रायगडासारख्या राजधानींत राहून शेवटास जावयाचा नाहीं. राजाला कोठें तरी दूर घेऊन जाण्याची शक्कल काढली पाहिजे. तिकडे नेऊन आपला कार्यभाग उरकून घ्यावा. राजाला काय तो शिकारीचा मोठा छंद. त्या निमित्तानें ह्या खेपेस संगमेश्वरीं त्याला घेऊन जाण्याचा त्यांचा बेत ठरला. त्याच्याजवळ ती गोष्ट काढतांच

तो निघण्यास कबूल झाला. संगमेश्वरीं आपले दोन तीन हवाशिर वाडे आहेत, तेथील हवापाणी चांगलें आहे, तेथें तुळशीलाही बरोबर न्यावें, व उन्हाळ्याचे दोन तीन महिने तिकडेच चैनींमध्यें काढावे, असें संभाजीरावाच्या मनांत आलें. त्याला त्या दोघांचा रुकार पडला. लवाजमा फारसा बरोबर नेण्याचें कारण नाहीं, फक्त शेलकीं २५।३० माणसें बस आहेत, असें एसाजीनें सुचविलें. तेंही राजाला पसंत पडलें. ह्याप्रमाणें निघण्याची तयारी झाल्यावर राणीला पुसल्याशिवाय गेलें तर वाईट दिसतें, ह्मणून संभाजीराव येसूबाईच्या रंगमहालांत गेला.

तिचें त्याच्यावर अत्यंत प्रेम होतें व असणें हें साहजिकच आहे, पण त्याची प्रीति मात्र पुष्कळ ठिकाणीं वांटली गेल्यामुळें तिच्या एकतर्फी प्रेमाचा कांहीं उपयोग होत नव्हता. तथापि ज्या ज्या वेळेस प्रसंग येई त्या त्या वेळेस ती आपलें कर्तव्यकर्म बजाविल्याशिवाय रहात नसे. जेथें नवऱ्याचें बायकोवर अत्यंत प्रेम असतें तेथें तिचीं रुसणीं, फुगणीं, आणि रागावणीं चालतात व एकमेकांची थट्टामस्करी वगैरे बरोबरीचे प्रकार होतात, पण ह्याच्या उलट जेथें प्रकार असतो, ह्मणजे बायकोचें नवऱ्यावर निष्कपट प्रेम असतें, पण नवऱ्याची तिच्यावर प्रीति नसून ती त्याला नावडती असते, तेथें तिलाच उलट त्याचे आर्जव करावे लागतात. त्यानें तिला लाथेनें झिडकारून दिलें तरी तिलाच त्याच्या पाया पडावें लागतें. त्याच्या पुढें तिला वरचेवर नाक घांसून पदर पसरावा लागतो. तिच्याकडून चूक नसली तरी तिलाच चुकीची माफी करा असें खोटें ह्मणावें लागतें. सारांश, कसें तरी एकदां माझें सौभाग्य माझ्याशीं गोडशब्दांनीं बोलो व वर्तो, असें तिला होतें. अशी स्थिति दुर्दैवानें येसूबाईच्या वांट्यास आली होती.

तिचें चित्त त्याच्यावर आणि त्याचें भलतीचवर होतें. ह्यामुळें सुखोपभोगी दंपत्यामध्यें एकांतीं जे गोडीगुलाबीचे विलास व प्रकार होतात ते तिच्या अंतर्गृहांत वर्ज होते.

आतां दुसऱ्या पक्षीं नवरा कितीही द्वड, उल्लू, दुर्व्यसनी, बदख्याली आणि मूर्खशिरोमणि असला तरी बायको जर सुशील, सत्कुलोत्पन्न, शहाणी, सद्गुणी, मर्यादशील आणि शांतवृत्तीची असली तर तिच्या गंभीर स्वभावाचें त्याच्यावर आपोआप तेज व वजन पडतें, व तें झांकलें जात नाहीं. तिच्या सद्गुण वर्चस्वाखालीं तो दबल्यासारखा होतो. तिची सद्बुद्धि, सुविचार आणि भारदस्तपणा पाहून आपल्या मूर्खपणाची त्याची त्यालाच शरम वाटते. तिकडे तुळशीचें कापट्याचरण आणि इकडे येसूबाईचें शुद्धाचरण यांत जमीन अस्मानायेवढें महदंतर होतें. तिकडचा तो दिमाक, तो थाट, तो डौल, ती ऐट, तो नखरा, तो कुर्रा, तें कापट्य, तो भपका, ती साखरेची सुरी, तें कृत्रिम सौंदर्य, तो पोपाख, आणि तें मायावी लाघव, इकडे येसूबाईकडे मुळींच नव्हतें. येथें निष्कलंक प्रेम, साधी रीत, स्वाभाविक सौंदर्य, सरळ आणि मधुर भाषण, नम्रता, व बुद्धिप्रागल्भ्य, हे उत्तम गुण वास करीत होते. ह्या दोहोंचें तारतम्य पाहिलें असतां सोनापितळ आणि बावनकशी सोनें ह्यांच्या इतकें त्यांत अंतर होतें. सोनपितळ आपल्या रंगानें व चकाकीनें मूर्ख मनुष्याला क्षणभर चंकवितें खरें, पण खरें सोनें आणि सोनपितळ हीं तराजूंत टाकून तोलून पाहिलीं ह्मणजे वजनदारी अधिक कोणाची, हें लागलेंच दिसून येतें. सांगण्याचें तात्पर्य काय कीं, संभाजीरावाबरोबर येसूबाईचें थोडें भाषण झालें कीं, तुळशीबाईकडच्या भपक्याचा धूर नाहींसा होऊन तो शुद्धीवर येत असे; पण पुन्हा इकडून तिकडे उठून गेला कीं, कुत्र्याच्या शेपटीसारखा पूर्वस्थितीला जाऊन पोहोंचे. असो.

वर कळविल्याप्रमाणें संभाजीराव येसूबाईच्या विलासमंदिरांत गेला, त्या समयीं ती आपल्या मुलाला मांडीवर आडवा घेऊन पाजीत होती. मुलगा लहान एक वर्षाचा असून त्याला त्याच्या आजोबाचें नांव **शिवाजी** ठेविलें होतें. मुलाची मुखचर्या मोठी गुलजार होती. तिच्या आनंदाचा गड्डा कायतो तोच होता. तिच्या उदास मनाला विश्रांति देणारा तो एक विसावाच होता. खरोखर, मूल हा एक आईबापांचा अजब मेवा आहे. त्यांतूनही तो नवऱ्याच्या नावडत्या स्त्रीला तर फारच प्रियकर असतो. कारण त्याच्याकडे पाहूनच तिला आपल्या मनाची करमणूक करून दिवस कंठावे लागतात.

संभाजीरावाचें आंत आगमन होतांच आईला पिण्याचें सोडून, तोंड पाठीमागें वळवून, राजकुमार आपल्या पित्याकडे पाहूं लागला. बायकोकडे नवऱ्याचें लक्ष कमी असलें तरी त्याचें पुत्रप्रेम कमी नसतें. त्या सुकुमार बाळाचें गोजिरवाणें तोंड पाहतांच राजाला अति आनंद झाला, व त्या आनंदभरांत तें बालक तिच्या मांडिवर होतें तोंच तिच्याजवळ जाऊन त्याचें तोंड कुरवाळून तो ह्मणाला," बाळा, मला एक खडीसाखरेचा गोड पापा दे, पाहूं. "असें बोलून त्यानें त्याच्या गालांचे, तोंडाचे, व चिमुकल्या हातांचे मटामट मुके घेतले, आणि तो पलिकडच्या पलंगावर बसून बोलला:—

**संभाजीराव**—जरा इकडे ऐकिलें का ? आह्मी कांहीं दिवस शिकारीसाठीं संगमेश्वराकडे जाण्याचा बेत केला आहे. मागें आपले कामगार लोक आहेतच. त्यांजकडून कामाकाजाचा नीट बंदोबस्त ठेवा, मुलाला जपत जा. दुसरें काय सांगायाचें आहे ? शिक्का मोर्तब तुमच्याकडेच ठेवितों.

**येसूबाई**—काय बाई ? जसें काहीं अगदीं माझ्याच. ओंजळीनें

पाणी प्यायाचें. पण मनांतले बेत अगदीं निराळेच असायाचे. मी कांहीं बोल्यानें दूध पीत नसतें. मला हीं बोलणीं सर्व समजतात. शिकारीचें उगीच निमित्त, त्या पण तुळशीला नेऊन तिकडे हव्या तशा मौजा मारायाच्या असतील, नी दुसरें काय ?

**संभाजीराव**—छे, छे, असें भलतेंच मनांत काय आणावें ? शिकारीस जाणें हा आमचा राजेलोकांचा धर्मच आहे. पुष्कळ दिवस झाले, शिकार नाहीं, एके ठिकाणीं बसून बसून कंटाळा आला, ह्मणून जिवाला कांहीं कर्मणूक करावी असें मनांत आलें. तशांत तुमच्यासारखी शहाणी बायको मागें बंदोबस्त ठेवायाला आहेच. तेव्हां थोडे दिवस बाहेर फिरायास गेलों ह्मणून काय झालें ?

**येसूबाई**—पुरे मलें. हीं हरभऱ्याच्या झाडावर चढविणीं मला सगळीं समजतात. आह्मां बायकांच्या शहाणपणाला जवरा पुसतो आहे कोण ? पुरुष ह्मणतील तेंच प्रमाण. त्या मेल्या सवतीनें कसली इतकी भुरळ घातली आहे कोण जाणे. तिचीं एकेक कौटाळें ऐकून माझ्या आंगावर, बाई, कांटाच उभा राहातो, नी असें वाटतें कीं, ह्या वेळेस विष खाऊन डोळे मिटावे. पण ह्या तान्हुल्याकडे पाहून पाय मागें ओढतात. तिला आपण इतके भाळलां आहां, पण ती मोठी कपटी, मानभावी बायको आहे. तिचा भाऊ येशाही कानकाप्या आहे. त्यांचा बाप जामदार कुस्तीच्या वेळेस पडून मेला. त्या दिवसापासून ह्या दोघांचा आपल्यावर दांत आहे. एकीकडे नेऊन आपल्या जिवाला घात करण्याचा त्यांचा मनसुबा आहे, अशा एकदां नाहीं दहादां माझ्या कानावर गोष्टी आल्या. त्या ऐकिल्यापासून माझ्या जिवाला, बाई, रात्रंदिवस

चैन नाहीं. रोज तिळतिळ काळीज तुटतें. ( रडूं लागते. ) ह्यासाठीं माझें ऐकायाचें असल्यास आपण जाऊं नये हें चांगलें. पण नसलेंच ऐकायाचें तर पदर पसरून एक मागणें मागतें तेवढें तरी द्यावें. आपल्याला जाणेंच असेल तर त्या चांडाळांना बरोबर तरी नेऊं नका. एवढी मला भीक घाला. मी त्यांचें कृत्रिम ऐकिलें तेव्हांपासून प्रतापगडच्या आईजवळ अनुष्ठानास ब्राह्मण बसविले, तसेंच सप्तशितीचे रोज पाठ चालविले आहेत. आई, मागें मामांजीचें रक्षण केलेंस, तशी माझ्या महाराजांनाही पाठ-राखी तूंच आहेस. तुझ्याशिवाय आह्मांला दुसरा कोण त्राता आहे ? तूंच आतां सांभाळ.

**संभाजीराव**—बायकांना समजूत नसते ती हीच. उगीच एखाद्यानें कांहीं सांगितलें कीं तेंच घेऊन बसावयाचें. त्या जोत्याजीनें हें सारें भलभलतें तुझ्या मनांत भरवून दिलें आहेसें वाटतें. पण तो बेवकूब, गाढवाचा लेंक, उगीचच्या उगीच एखाद्याचा अंदेशा घेतो. त्याचें माझें ह्याजबद्दल पुष्कळ वेळां बोलणें झालें आहे, पण त्यांत कांहीं मला अर्थ दिसला नाहीं. तो येसाजी झाला, तशीच त्याची बहीण झाली, हीं तशा प्रकारचीं वाईट मनुष्यें नाहींत. त्यांचा बाप मीं मुद्दाम आकसानें मारला असें त्यांच्या मनांत थोडें तरी काळें बेरें असतें तर कधीं तरी त्यांनीं माझ्या पुढें त्या गोष्टीचा उच्चार केला असता. पण आज इतक्या दिवसांत त्यांच्या तोंडांतून एक अवाक्षर निघालें नाहीं. उगीच एखाद्याला नसता बोल लावावा हें चांगलें का ! तीं दोघें बहीणभावंडें मला केवळ पंचप्राण करितात. त्यांच्या हातून

माझ्या जिवाला अपायाची गोष्ट काळत्रयीं घडायाची नाहीं. हें तुह्मीं पक्कें ध्यानांत ठेवा.

येसूबाई—येऊन जाऊन जुन्या माणसांतला आतां एक जोत्याजी मात्र उरला आहे. त्याचींही शंभर वर्षें भरलींसें वाटतें. राज्याची मुकत्यारी इकडे आल्यापासून मामंजीच्या वेळचीं ह्यातारीं कोतारीं माणसें आतां राहिलीं आहेत कोठें? चट साऱ्यांची आपण चटणी करून टाकली. कोणाचीं डोकीं उडविलीं; कोणाचे कडेलोट केले; कोणाला चुन्याच्या भट्टींत फेंकून दिलें; कोणाला भिंतींत चिणून टाकलें; कोणाला हत्तीच्या पायीं चिरडिविलें; आणि कोणाला घालवून दिलें. अशी साऱ्यांची विल्हेवाट लागली. आतां तेवढें जोत्याजीचें एक जुनें टक्कल उरलें आहे. त्यालाही उचलून एखाद्या अंबारांत फेंकून द्या, आणि मीहि मामंजींच्या वेळची आहें, ह्मणून मलाही आपल्या हातांनींच तरवारीनें छाटून टाका. ह्मणजे जितके कांटे होते तितके नाहींसे झाले. मग त्या तुळशीला, त्या येसाजीला, नी त्या कबजीला पोटाशीं कवटाळून धरून सुखानें राज्य करा. कुठला तो एक हिंदुस्थानांतला कनोजा राक्षस जवळ आणून ठेविला आहे. त्या मेल्यानें राज्याचा सत्यनास करून टाकला. मोरोपंत पिंगळे, बाळाजीबोवा परभू, अण्णाजी दत्तो, हीं मामंजींच्या पदरीं केवळ रत्नें होतीं. त्यांच्यावर त्यांचा केवढा इतबार. त्यांचें सर्व अंतरंग त्यांजपाशीं ठेविलेलें असे. ते नेहमीं बाहेर बोलून दाखवीत कीं, हे माझ्या राज्याचे आणि माझे पंचप्राण आहेत. अशीं थोर थोर उपयोगीं पडलेलीं माणसें अपराधाविणें आपण मारून टाकलीं. आतां एखादी सल्ला मसलत विचारण्याला जवळ एक तरी

पोक्त मनुष्य उरलें आहे का ? सगळा बारभाईचा बाजार. त्या लोकांच्या नादीं लागून अशा अघोर गोष्टी करायाच्या नव्हत्या. अशानें पुढें राज्य कसें चालेल? आणि वडिलांनीं एवढा नांवलौकिक मिळविला तो कसा राहील?

**संभाजीराव**–हें पहा, माझ्याही मनांत तशा गोष्टी करायाच्या नव्हत्या, पण रागाच्या त्वेषांत बोलून चुकलों, भान राहिलें नाहीं, आणि होऊन गेलें. ही वाईट गोष्ट झाली खरी. ती कांहीं माघारी फिरवितां येत नाहीं. आतां असें करा कीं, जुन्या मंडळीचे मुलगे कर्ते सवरते असतील त्यांना कामावर घेऊन तुह्मींच कारभार पहा. चिटी चपाटी लिहिणें ती त्यांजकडून लिहवून कागदपत्रावर शिक्कामोर्तबें तुह्मींच करीत जा. आमच्या प्रधानजीला सुद्धां आह्मीं आपल्या बरोबरच संगमेश्वरीं घेऊन जातों. तुह्मी या ह्मटल्याखेरीज आह्मीं परत येत नाहीं. तिकडेच निरंतर राहा असें सांगाल तर त्यालाही आमची ना नाहीं. राज्यकारभाराची सर्व मुकुत्यारी तुह्मांकडे सोंपवून जातों, मग तर झालें ना ?

**येसूबाई**–अशीं बायकांच्या हातून राज्यें चालतीं तर पुरुष कशाला पाहिजे होते ? पण सांगायाचें इतकेंच कीं, बायकांनीं एखादी चांगली सल्ला मसलत दिली तर पुरुषांनीं ऐकावी. त्यांत पुरुषांना कांहीं बाट लागतो असें नाहीं. आमच्या सासूबाईनीं एकदां मामंजींना विजापुरवाल्याकडे जाऊं नका, जिवाला दगाफटका करतील, असें सांगितलें होतें. ती त्यांची बरी गोष्ट त्यांनीं ऐकिली नाहीं का ? आतां जायचेंच ह्मटल्यावर राहवून घेईन एवढी माझ्या पदरीं पुण्याई कोठें आहे ? आह्मीं लग्नाच्या बायका ह्मणजे कोण्या

झाडाचा पाला. तशीच एखादी प्रीतीची अप्सरा असेल ती पदर धरून खालीं बसवील. आतां शेवटीं सांगायाचें इतकेंच कीं, प्रकृतीला जपायाचें, पिण्याविण्याचें मान कमी असायाचें. मीही स्वारीबरोबर यायला तयार आहें. पण आपल्या दोघांच्या प्रीतीमध्यें माझा तिसरीचा खोकला कोठचा खपायाला ?

ह्याप्रमाणें दोघांच्या गांठी पडून भाषणें झाल्यावर दुसऱ्या दिवशीं संभाजीराव सर्व मंडळीसह संगमेश्वराकडे निघून गेला. तिकडे गेल्यावर, शिकार, मद्यपान, आणि विषयसुख ह्यांत तो दंग होऊन राहिला. तुळशीबाईला राहण्यासाठीं त्यानें एक स्वतंत्र वाडा नेमून दिला. तेथें तिचा त्यानें सर्व प्रकारचा इतमाम यथास्थित ठेविला होता. ह्याप्रमाणें दोन महिने लोटले. मद्याच्या अतिशय प्राशनानें राजा अगदीं बेहोष झाला. त्याच्या शरीरांत तकवा बिलकूल राहिली नाहीं. लौकिकव्यवहाराचें भान मुळींच नाहींसें झालें आणि पूर्वी त्याच्या अंगांत जी थोडीशी शौर्यश्री होती तिचा अगदीं लोप झाला.

वाचकहो, सुरापानापासून पुष्कळ फायदे आहेत असें कित्येक सुराभक्तांचें ह्मणणें पडतें, पण तें केवळ असत्य आहे, असें आधारपूर्वक दाखवून देतों. त्याच्या योगानें शरीर आणि मन ह्या दोहोंची खराबी होते. त्यानें शरीरांत मदकारी विषाप्रमाणें विकृति होऊन मज्जा अतिशय उत्तेजित होते. त्यानें मनुष्य बेशुद्ध होऊन कधीं कधीं त्यांतच तो मृत्युही पावतो. मद्यप्राशन रोज थोडथोडें केलें तरी त्यापासून मदात्यय ह्मणून एक रोग आहे तो पुढें जडतो. त्या रोगाचा हळु हळू मज्जातंतूच्या रचनेंत प्रवेश होऊन तेथें बिघाड होतो. डाक्टर प्रौट ह्यांनीं असें लिहून ठेविलें आहे कीं, सुरापानापासून शरीराचा पोषणव्यापार नीट चालत नाहीं. रक्तांतला आक्सिजन् वायु कमी

होऊन त्यांतून वाईट पदार्थ बाहेर निघून जाण्यास प्रतिबंध होतो, स्नायूंची शक्ति कमी होत जाते, आणि आंगांत शक्ति वाढत नाहीं. फ्रांक्लिन् ह्मणून एक डाक्टर होता तो दारूला कधीं शिवला नाहीं, तरी तो दारू पिणारे लोकांपेक्षां बळकट होता. ह्या हिंदुस्थानांतही मद्यपान न करणाऱ्या लोकांमध्यें धडधाकट लोक पुष्कळ आढळतात. मद्यानें पोटांतील मांसादि घटकावयवांस आणि इंद्रियांस बाधा होते. त्यानें रक्ताला इजा होते, पक्वाशयांत अन्नाचा रस लौकर होत नाहीं, रक्ताभिसरण नीट चालत नाहीं, फुप्फुसांतील रक्ताची गति मंद पडते, मलावष्टंभ होतो, जठरामध्यें अव्यवस्था होते, मूत्रपिंडाचा व रक्ताचा अनियमित व्यापार वाढतो, आणि फुप्फुसांतील अति सूक्ष्म वाहिन्यांत रक्ताचा संचय होऊन श्वासोच्छ्वासनक्रियेस प्रतिबंध होतो. मग पुढें त्यापासून खोकल्याची कोरडी ढांस लागते. मद्यपानापासून नुसतें शरीराचेंच नव्हे पण पैशाचें आणि अब्रूचेंही नुकसान होतें. कित्येकांची अशी खोटी समजूत आहे कीं, मद्यप्राशनापासून चांगले चांगले विचार सुचतात, पण ही शुद्ध भ्रांति आहे. इंग्लंडांतील प्रख्यात बायरन् कवीनें लिहून ठेविलें आहे कीं, मी मद्यप्राशन करून कविता करण्यास बसलों तर मला कांहीं सुचेनासें होतें. हजारों कल्पना आणि संशय मनांत उभे राहून तें गोंधळून गेल्यासारखें होतें. ड्रायडन् कवीनेंही ह्याचप्रमाणें आपला अनुभव लिहून ठेविला आहे. राज्यांत दारू पिणारे लोक फार झाले ह्मणजे तीं राज्यें लयास जातात, असे इतिहासांत शेंकडो दाखले मिळतात. शिकंदर बादशहानें दारूच्या निशेंत एक आपला परम मित्र ठार मारला. त्याच व्यसनांत शेवटीं त्याचाही अंत झाला. कार्थेजीनियन् लोक जोंपर्यंत दारू पीत नव्हते

तोंपर्यंत त्यांच्या अंगीं शौर्य कायम होतें. पुढें ते दारूबाज झाले तेव्हां त्यांस रोमनलोकांनीं सहज जिंकिलें. पुढें तेंच व्यसन रोमनलोकांत बोकाळलें तेव्हां उत्तरेकडचे निर्व्यसनी दांडगे लोक येऊन त्यांनीं त्यांचें राज्य सहज हिरावून घेतलें. आमच्या ह्या लेखाचा विषयनायक जो संभाजीराव ह्याच्याही गळ्यांत सुराबाईनें माळ घातली, आणि तो तिच्या गळीं पडला. ह्यामुळें त्याचा शेवटीं कसा भयंकर परिणाम झाला, हें तुह्मांस आतां लवकरच कळून येईल. सारांश, ज्यांना ज्यांना आपल्या देशाच्या उन्नतीची यत्किंचित् तरी चाड असेल त्यांनीं त्यांनीं या सुरापानाच्या दुष्ट मोहजालापासून दूर राहिलें पाहिजे. अस्तु.

संगमेश्वरास गेल्यावर राजा व प्रधान हे दोघेही, नाच, रंग, तमाशे आणि मद्यपान ह्यांत निमग्न झाले. तिकडे तुळशी, एसाजी, तकरीबखान आणि इखलासखान ह्यांचे राजाचा जीव घेण्याबद्दलचे बेत व मसलती चालल्या. त्यांची त्यास गंधवार्ताही नव्हती. तकरीबखानानें पांच असामी मुसलमान मारेकरी तयार करून ठेविले होते. फक्त योग्य प्रसंगाची तो वाट पहात होता, पुढें एक दिवस तुळशीबाईचें व एसाजीचें भाषण झालें तें असें:—

**तुळशीबाई**—दादा, आजच्या रात्रीं आपला भरलेला बार उडवून टाकावयाचा सबब तुझे साथीदार आणि तूं तयारीनें असा. राजा झोंपीं गेला ह्मणजे हें काम उरकून घेऊं. कां, कसें ?

**एसाजी**—ताई, ह्या कानाचें ह्या कानाला कळूं नये अशा गुपचुप रीतीनें त्याला नाहींसा करण्याची एखादी युक्ति मात्र काढ. आह्मां सर्वांकडून तयारी आहेच.

**तुळशीबाई**—दादा, तुझे मुसलमान साथीदार आहेत त्यांना फुटक्या तिनसांजा वाड्याच्या एका खोलींत लपवून ठेव.

सर्वांची निजानीज झाल्यावर राजाला गाढ झोंप लागली आहे असें पाहून मध्यरात्रीच्या पुढें हळूच दार उघडून मी तुह्मा सर्वांना दिवाणखान्यांत घेईन. मग एकजण पुढें सरून त्यानें राजाच्या उरांत जंबिया भोंसकावा, ह्मणजे आपलें काम आटपलें. मनुष्य झोंपेंत असतांना हें काम सहज होईल. गुलगलबा कांहीं व्हावयाचा नाहीं.

**एसाजी**—पण ताई, तो लुच्चा जोत्याजी दिवाणखान्याच्या समोरासमोर खोली आहे तींत निजत असतोना ? तो लांडगा महा मात्रागमनी आहे तो एकाएकीं जागा होऊन त्याच वेळेस आमच्या पुढें येऊन उभा राहिला तर कसें करावें ?

**तुळशीबाई**—त्याचा बंदोबस्त माझ्याकडे लागला. आज रात्रीं त्याला मीं माझ्या मुदपाकखान्यांतूनच पान वाढवून देईन. त्यांत एकादा अमली पदार्थ घातला ह्मणजे तो मेल्यासारखा पडून राहील. मग राजा इकडे किती जरी रडला, ओरडला तरी त्याला कळावयाचें नाहीं.

**एसाजी**—ताई, त्याच्याजवळ नेहमीं तिरकमठा, तरवार, व जंबिया हीं हत्यारें असतात. तीं एकाद्या युक्तीनें अगोदर काढून घेशील तर नामी बेत जमेल. पहा खटपट करून. साधलें तर साधलें.

**तुळशीबाई**—दादा, कसलारे तूं भित्रा. तुझा मला मोठा चमत्कार वाटतो. अरे तो एकदां मढ्यासारखा पडून राहिला, नी हत्यार उचलण्याचें त्याला भानच राहिलें नाहीं, तर त्याच्याजवळ आणखी दाहा हत्यारें असलीं तरी करणार काय तो ? हत्यारेंच तर उठून तुह्मांला मारीत नाहींत ना ? तूं असा दळूबाईसारखा भितोस काय ? तूं पुरुषासारखा पुरुष, नी माझ्यासारख्या बायकोनें तुला लाजवावें. ह्याची तुला

शरम कशी नाहीं वाटत ? अशी सोन्यासारखी चांगली वेळ आणूं ह्मटल्यानें पुन्हा येणार नाहीं. ही साधून घे, नाहीं तर फुकट घालीव. जसें तुझ्या मर्जीस येईल तसें कर. पण एक गोष्ट मीं तुला सांगतें. ह्या वेळेस तूं भिऊन भागूबाईसारखा मागें हटलास तर तुझी माझी भेट हीच. मग तूं माझा भाऊ नव्हेस, आणि मीं तुझी बहीण नव्हे. तुला ठाऊकच असेल कीं, दूरची दावेदारी पतकरते, पण घरांतल्या घरांत कलह जुंपला ह्मणजे फार कठिण जातें.

असें तुळशीबाईनें निक्षून सांगितलें तेव्हां एसाजीनें कमर बांधली. सूर्यास्त झाल्यावर तकरीबखान वगैरे पांच असामी मारेकरी एसाजीनें वाड्यांत आणून ठेविले. रात्रीं तुळशीबाईनें शिजलेल्या अन्नाचें जोत्याजीला पान वाढून देवविलें. पण त्या दिवशीं दुपारपासून त्याच्या तब्येतीस ठीक वाटत नव्हतें. मनाला हुरहुर लागून त्याला कसेंसेंच होत होतें. असें कां होतें तें त्याचें त्यालाच कळेना. त्याला सकाळपासून त्या बहिणभावंडांच्या वृत्तीमध्यें मात्र कांहीं विशेष प्रकारची चलबिचल दिसली होती. कांहीं असो. आपल्याकडून रोजच्यापेक्षां आज हुशारीनें असावें, असा त्याचा संकेत झाला होता. तुळशीबाईनें ताट वाढून दिलें, त्याचाही त्याला अंदेशा आला. त्यानें त्यांतले एक दोन घांस खाल्ल्यासारखे करून तें पान तसेंचे तसेंच झांकून ठेविलें. मग रोजच्यासारखा आपल्या जाग्यावर जाऊन पडला, पण त्याला चैन पडेना. त्याच्या अंगाची तळमळ होत होती.

इकडे दोन तास रात्र झाली न झाली, इतक्यांत संभाजीराव तुळशीबाईच्या रंगमहालांत रोजच्यासारखा गेलेला जोत्याजीनें पाहिला. नंतर जिकडे तिकडे सामसूम झालें. मध्या-

न्हरात्र उलटून गेली. पुढें एक घटकाभरानें पलिकडच्या खोलींत कांहीं मोठ्यानें खडबडल्यासारखें झालें. तें काय आहे ह्मणून पहाण्यासाठीं जोत्याजी चटदिशीं उठून बसला. कांहीं माणसें आंतल्या बाजूला कुजबुजत आहेत असें त्याला दिसलें. पण त्यांचें बोलणें मात्र त्याला स्पष्ट ऐकूं येईना. पुढें उठून पहातो तों रंगमहालाच्या बाहेरच्या दरवाज्यापाशीं सहा माणसें उभीं. त्यांचे चेहरेमोहरे अंधुक अंधुक दिसण्यापुरता दिव्याचा उजेड होता. हे कोण असावे? इतक्या रात्रीं येथें कां? ह्यांचा उद्देश काय असावा? असा तो आपल्या मनाशीं विचार करीत होता. इतक्यांत आंतून तुळशीबाईनें हळूच दार उघडलें, आणि त्या सहा असामींना तिनें आंत घेतले. तेवढ्यावरून खचीत दगा आहे असें त्यानें ओळखलें. लागलीच त्यानें आपली तरवार उपसून हातीं घेतली, आणि त्यांच्या पाटोपाठ तोही आंत शिरला. आंत पाय टेवितो तों सहा असामींच्या हातांत जंबिये आहेत, राजाला पलंगावर गाढ निद्रा लागली आहे, आणि तुळशीबाई पेटविलेली मेणबत्ती हातीं धरून राजाच्या उशाशीं उभी आहे, असा भयंकर देखावा त्याच्या नजरेस पडला. महाराज, उठा, लवकर उठा; दगा हो दगा; हे सभोंवतीं सगळे दुस्मान लोक जमले आहेत; असा इशारा देतांदेतांच त्यानें आपल्या तरवारीनें त्यांपैकीं एकाचें डोकें उडविलें, गोंगाट होण्याबरोबर राजा जागा होऊन वर उठूं लागला. त्याच वेळेस एसाजीनें त्याच्या उरांत जंबिया भोंसकण्यासाठीं वर हात उगारला. हें पाहून राजानें तो वार आपल्या हातावर झेलला. दुसऱ्या हातानें लागलेंच त्याचें मणगट धरून त्याच्या हातांतलें त्यानें हत्यार काढून घेतलें, आणि तोच जंबिया त्यानें एसाजीच्या उरांत जोरानें मारला. त्याबरोबर एसाजी प्रेतंगत होऊन जमिनीवर

उताणा पडला. आणखी चौघे असामी आंत होते त्यांनीं पुढच्या दोघांची काय अवस्था झाली ती पाहून ते खोलींतून मागच्यामार्गें बाहेर पळाले. त्यांच्या पाठोपाठ जोत्याजीही बाहेर पडला, आणि बगलेला तिरकमटा होता तो एकाच्या गळ्यांत अडकवून, त्याला त्यानें तोंडघशीं जमिनीवर पाडिलें. मग त्याला उताणा करून त्याच्या उरावर आपण गुडघा टेंकून बसला. तो मात्र एक जिवंत हातीं लागला. बाकीचे तिघे असामी जीव घेऊन सूं पळाले. जोत्याजीनें मग त्या मारेकऱ्याच्या आपल्या पागोट्यानें मुसक्या आंवळल्या. अशा रीतीनें चतुर्भुज बनवून तो त्याला राजापुढें आंत घेऊन गेला.

ह्या भागाची येथें मजल संपली. आतां ह्या मारेकऱ्याचा निकाल कसा झाला तो पुढच्या भागांत सांगूं.

---

## भाग १४.

"भाग्येनैव हि लभ्यते पुनरसौ सर्वोत्तमः सेवकः'

मुसक्या बांधून मारेकऱ्याला जोत्याजी राजापुढें घेऊन गेला तेव्हां राजा ह्मणलाः—

**संभाजीराव**—क्योंरे मिय्या, मुझको मार डालनेके लिये तुजको किसने हुकुम दिया? यह काम करनेके लिये तुजको किस्ने सला दिया? सच् कहो, तेरी जान् बचाउंगा.

[काय रे मिय्या, ही मला मारण्याची कामगिरी तूं कोणाची पतकरली होतीस? हें काम करण्याला तुला कोणीं शिकविलें? खरें सांग, ह्मणजे तुला मीं जीवदान देतों.]

**मारेकरी**—दूसरेके सलेसे हमलोग ऐसा काम नहीं करते है. मेरी जहनमें जैसा आया वैसा मैंने किया. अब् मैं आपके हाथ पडा हुं. अब् चाहिये मारो, या चाहिये रखो. इसूके मालिक आप हैं.

[ ( उद्धटपणानें ) दुसऱ्याच्या शिकविण्यानें आह्मीं लोक अशीं कामें करीत नसतों. माझ्याच बुद्धीला जसें वाटलें तसें र्मी केलें. मी तुमच्या हातीं सांपडलों खरा. आतां मारा किंवा ठेवा. पाहिजे तें करण्यास तुह्मीं मालक आहां.]

**संभाजीराव**–मुझको मार डालनेमें तेरा क्या इरादा था ? मैं मारा जाता तो तुज्को क्या फायदा था, सो कहो ?

[ मला मारून टाकण्यांत तुझा इरादा काय होता ? मी मेलों असतों तर तुला काय मिळणार होतें तें सांग ? ]

**मारेकरी**–महाराज, इस्बातको आप मत् पूछिये. क्यौं कि मेरी जान लिजिये तौभी मैं न कहुंगा.

[ महाराज, ही गोष्ट मला तुह्मीं विचारूं नये हें बरें. कारण, माझा प्राण घेतलात तरीही ती मी तुह्मांस सांगणार नाहीं. ]

**संभाजीराव**–अच्छा, वह जानें दो, मिय्या. और एक बात् पूछता हुं, सो कहो. वह एक औरत वहां खडी है उस्ने कुछ रुपवत् देके तुजसे यह काम करवाया है ?

[ बरें तें असो, मिय्या, आणखी एक तुला विचारितों तें सांग. ती एक तेथें औरत उभी आहे, तिनें कांहीं लालुच दाखवून ही कामगिरी तुला सांगितली होती कीं काय ? ]

**मारेकरी**–नहीं साहब, हम मुसलमीन, वह हिंदु औरत. उस्से हमसे क्या वास्ता ? उस्की मेरी पहिछान्भी नहीं.

[ नाहीं साहेब, आह्मीं मुसलमान, ती हिंदु औरत. तिचा आमचा संबंध काय ? तिची मला पछीनहीं नाहीं. ]

इतकीं अक्षरें मारेकऱ्याच्या तोंडून निघेपर्यंत तुळशीबाईचा जीव थारीं नव्हता. तिचें तोंड काळें ठिक्कर पडून राजापुढें शरमल्यासारखी उभी होती.

उस्के तरफ् कुछ् नही, जो कुछ् किया सो मैंने किया.

[ हिच्याकडे कांहीं नाहीं. जें काय केलें तें मीं केलें. ]

असें त्याच्या तोंडून निघतांच तिचा जीव खालीं पडला. आणि माझा राजानें विनाकारण अंदेशा घेतला असें दाखविण्याकरितां कपाळाला आंठ्या घालून तिनें राजाकडे जरा वक्रदृष्टीनें पाहिल्यासारखें केलें.

तिच्या भावाच्या साथीदारानें तिचें नांव सांगितलें नाहीं इतकेंच नाहीं, पण त्यानें एसाजीचा संबंध सुद्धां कळूं दिला नाहीं. मारेकरी लोक जिवंत हातीं सांपडले ह्मणजे त्यांची चालच असते कीं, त्यांना सुळावर चढविलें तरी ते कोणाचें नांव घ्यावयाचे नाहींत, आणि झालेला कट बाहेर फुटूं द्यावयाचे नाहींत. त्यानें जो प्रथम नन्नाचा पाढा धरला तो शेवटपर्यंत सोडला नाहीं. मग राजानें दोन असामी मांग बोलावून त्याला त्यांचे स्वाधीन केलें, आणि सांगितलें कीं, वाड्यापुढच्या मैदानांत ह्या हरामखोराला नेऊन आतांच्या आतां याचा शिरच्छेद करा, आणि त्याचें धड व शीर कड्याखालीं फेंकून द्या. मांगहृदयच तें ! त्यांनीं राजाचा हुकूम लागलाच अमलांत आणिला, आणि एका उंच जाग्यावर उभें राहून त्याचें धड व शीर कड्याखालीं त्यांनीं फेंकून दिलें. इतकें झाल्यावर तुळशीबाई फारच खुष झाली. कारण, आपलें नांव बाहेर पडण्याची तिला धास्ती होती ती अगदींच नाहींशी झाली, मग सकाळपर्यंत संभाजीराव तुळशीबाईच्या रंगमहालांतून बाहेर पडलो नाहीं त्याच्या हाताला जखम झाली होती ती बांधून सकाळीं उठल्यावर अगोदर मारेकऱ्याचें प्रेत पाहाण्यासाठीं तो कड्याकडे गेला. खालीं वांकून पाहिलें तों त्याचा मुडदा कोल्ह्यांनीं छिन्नभिन्न करून टाकिला होता.

त्याच्या नुसत्या हाडांचा सांपळा अवशिष्ट राहिला होता.

राजावरचा हा एक अपमृत्यु टळल्यावरही जोत्याजी उगीच बसून राहिला असें नाहीं. त्या अवदसेचा आतां तरी नाद सोडा अशी त्या विश्वासू सेवकानें राजाची एकीकडे पुष्कळ विनवणी केली, पण ती व्यर्थ झाली. तिनें राजाला पक्कें भुरळ घातलें होतें. तिनें त्याला मारण्याचा बेत केला होता तें खरें मानण्यास त्याचें मन अझूनही घेईना. प्रत्यक्ष मरिकऱ्यानेंच निखालस सांगितलें कीं, तिचें आंग ह्या कामांत मुळींच नव्हतें, ह्यामुळें त्या कटांत ती सामील होती असें तो मानीना. इतका तिचा त्याच्यावर पूर्ण पगडा बसला होता. ह्या दुष्ट कृत्यांत माझें आंग मुळींच नव्हतें असा बाहाणा करण्यासाठीं भावाचें नांव निघालें कीं, ती त्याचा तिरस्कार करी, कपाळाला आठ्या चढवी, आणि ह्मणे, ‘ मेला चांडाळ, आपण आपलें काळीज उरफाटें करून महाराजांचा जीव घेण्यासाठीं तयार झाला तो झाला, आणि आपल्या बरोबर माझाही वहीम महाराजांच्या मनांत भरवून आपण उलथला. मेल्या दुष्टा ! घातक्या ! आदल्या जन्मीं कोणी वैरी होतास ह्मणून ह्या जन्मीं भावाच्या नात्यानें आपलें वैर साधून घेतलेंस. पण चांडाळा, देव कांहीं दूर नाहीं, जवळ आहे. आह्मां दोघांच्या प्रीतीमध्यें तूं वितुष्ट पाडणार होतास. त्याचें तुला येथें फळ मिळालें, आणि वर यमाच्या घरींही झाडे घ्यावे लागतील.’ हे अवघे तिचे कांगावे आणि शिव्या शाप आपल्यावरचा वहीम दूर करण्यासाठीं होते, पण संभाजीराव केवढा अकलेचा खंदक ! त्याला तें सर्व खरें वाटून तिला त्यानें आपल्या मनांत निर्दोष ठरविलें आणि ह्मणतो:—

**संभाजीराव**—हें काय ? जरा धीर धर. असल शांत हो.

असा उगीचच्या उगीच आपल्या जिवाला त्रास कां करून घेतेस ? ( तिच्या गळ्यावर हात ठेवून ) मी तुझ्या गळ्याची शपथ वाहून सांगतों कीं, तुझी माझ्यावर खरी प्रीति आहे, असा मला पक्का भरंवसा आहे. तो कधीं उडावयाचा नाहीं. एकदां एखादीनें आपलें तन मन एखाद्या पुरुषाच्या स्वाधीन केलें आणि फिदा असली ह्मणजे ती कांहीं मोठ्या कारणाशिवाय त्याच्याशीं वांकडें धरीत नाहीं. बायकोची खरी खरी प्रीति एखाद्यावर जडल्याखेरीज ती त्याला आपला गुप्त ठेवा आणि रात्रंदिवस उराशीं घट्ट बाळगून ठेविलेला आपला खजिना लुटूं देत नाहीं. तो खजिना तूं मजकडून लुटविलास, हा मजवर तुझा केवढा उपकार आहे ? तूं मजवर येवढें उदार मन केलेंस आणि आपल्या जन्माची इतकी खराबी करून घेतलीस, तेव्हां अशा थोर आणि उदार मनाच्या स्त्रीचा मी व्यर्थ अंदेशा घेईन असें तुला वाटतें का ? लग्नाचे दिवस आले कीं, मी तुझ्याबरोबर लग्न सुद्धां लावण्यास तयार आहें. ह्यावरून माझें मन तुझ्या-विषयीं किती स्वच्छ आहे, पहा. आतां आमचें कूळ तुझ्या कुळापेक्षां उंच आहे, ही एक लग्नाला आडकाठी आहे खरी. तरी त्याची मी फिकीर करीत नाहीं. जातकुळीपेक्षां शील चांगलें पाहिजे. कूळ चांगलें आहे आणि शील नाहीं तर नुसतें कूळ घेऊन काय करावयाचें ? कुळापेक्षां शीलच चांगलें पाहिजे, तें तुजपाशीं आहे. मग आणखी तें मला काय पाहिजे ?

**तुळशीबाई**—महाराजांचें मन मजविषयीं धुतल्या तांदळांसारखें निर्मळ असल्याची मला खातरी आहेच. पण आपल्या खिजमतींत तो एक लुवरा हुजऱ्या आहे, त्यानें माझ्याशीं

सर्पासारखा उभा दावा धरला आहे. तो मेला मांग, एखादे वेळीं माझी केंसानें मान कापील, असें मला भय वाटतें. आह्मां दोघांच्या प्रीतीमध्यें तो ताडातोड करील असा मला रात्रंदिवस हृदोग लागला आहे. खरें पाहिलें तर ह्या जोत्याजीचें मी कधीं काडीइतकें वांकडें केलें नाहीं. तरी मेला काळासारखा माझ्या पाठीस लागला आहे. ह्या चांडाळाला आह्मा दोघांमध्यें चांगलें असलेलें देखूं सकत नाहीं, ह्मणून मजवर नाहीं नाहीं तीं कुभांडें रचून महाराजांच्या कानाला लागतो. लहानाच्या हातीं थोरांचे कान लागले ह्मणजे ते पाहिजे तसे त्यांस वांकवितात. हलकीं माणसें जें जें सांगतात तें तें सर्व त्यांस खरें वाटतें. (बोटें मोडून) ह्या मेल्या चांडाळाचा जेव्हां सत्यनास होईल त्या दिवशीं मी निसूर होईन.

हा त्या भटक भवानीचा मानभावी गौरव त्या भोळ्या शंभूला अवघा खरा भासला. तिच्या त्या भापणाच्या शिताफीवरून तिच्याकडे कांहीं एक बोल नाहीं असा त्याच्या मनाचा पक्का ग्रह झाला. जोत्याजीनें तिच्याशीं निष्कारण द्वेषभाव धरला आहे असा त्यानें निकाल केला. त्याच्या जिवाच्या बचावासाठीं जोत्याजीनें नुकतीच केवढी तरवारबहादुरी केली आणि किती स्वराजनिष्ठा दर्शविली, पण ती त्या कामांध अधमाला काय होय ! एका महाराष्ट्रकवीनें ह्मटलें आहे कीं:—

**षट्शास्त्रवेत्ता पंडित । अजारक्षक त्यासीं निंदित ।**
**परी सुज्ञ तयासीं वंदित । कायावाचामनेंसीं ॥ १ ॥**

धनी चतुर असल्याखेरीज चाकराच्या इमानदारीचें चीज होत नाहीं. उलट तीच इमानदारी चाकराच्या कधीं कधीं नाशालाही कारण होते. कांच व पाच ह्यांचा निर्णय करण्याला परीक्षक

चांगला पाहिजे, नाहीं तर उत्तम खरी पाच भिकार कांचेच्या मोलानें मागितली जाते. तशी जोत्याजीची गोष्ट झाली. त्याच्यावर राजाची विनाकारण इतराजी असे. तो कांहीं त्याला हिताचें सांगायाला गेला तर वसकर त्याच्या अंगावर यावें, त्याच्याशीं नीट बोलूंच नये, त्याला शिवीगाळ करावी, अशा रीतीनें त्याची राजा पायमल्ली करी.

राजाला जिवें मारण्याचा योजिलेला बेत फसल्यावर पुढें एक दोन महिने, कांहीं हालचाल न करितां, तुळशीबाईनें तसेंच जाऊं दिले. तकरीबखान आणि इखलासखान हे दोघे बापलेक मागच्या दंग्याच्या दिवशीं जीव घेऊन पळाल्याचें पूर्वीं आह्मी सांगितलेंच आहे. ते दोन महिन्यांनंतर वेषांतर करून तुळशीबाईला पुनः चोरून चोरून भेटूं लागले. त्या त्रिकुटाच्या पुन्हा एकांतीं मसलती होऊं लागल्या. इकडे संभाजीराव तुळशीच्या प्रीतिरंगांत दंग असल्यामुळें तिच्या हातून आपल्याला कधीं दगाफटका होईल, ही कल्पना त्याच्या स्वप्नींही आली नाहीं. तरी जोत्याजीला आंतून गुणगुण होती कीं, दोन मारेकऱ्यांच्या व ह्या सटवीच्या गांठी पडून पुन्हा त्यांचीं खलबतें होऊं लागलीं आहेत. राजा दारूच्या व विषयसुखाच्या अमलांत गुंग झाल्यामुळें जोत्याजी दृष्टीस पडला कीं, त्याच्या कपाळाला पित्त चढे. तरी पुन्हा आणखी एकदां राजाला शेवटचा इशारा देण्यासाठीं तो थोर मनाचा चाकर त्याच्या पुढें गेला आणि ह्मणाला, "महाराज, मला आपण लतकोडगा ह्मणाल हें खरें, तरी ह्या निर्लज्ज लतकोडग्याचा एक अर्ज आहे तो एकवार ऐकावा. औरंगजेब बादशहाचे कांहीं टेहेळेलोक आलिकडे आपल्या गोटाच्या भोंवतीं फिरूं लागले आहेत, आणि तुळशीबाईबरोबर त्यांच्या चोरमसलती

होऊं लागल्या आहेत. यावरून महाराजांच्या जिवाला खचित दगा आहे. तिच्या रंगमहालांत जाणें ह्यापुढें बंद करावें. एवढी ह्या गरीब चाकराला भिक्षा घालावी. दुसरें मी कांहीं महाराजांपाशीं मागत नाहीं." पण महाराजांची स्वारी काय? त्या वेळेस तीन मजली हवेलींत सुरापानांत तर्र झाली होती. त्या समयीं सुरेंद्र एकीकडे आणि मी एकीकडे असें त्यास झालें होतें. जोत्याजीचें बोलणें संपतांच त्याला तो मोठ्यानें ओरडून ह्मणाला, "गाढवाच्या लेंका, असल्या भलभलत्या गप्पा ह्या संभाजीरावापुढें सांगाण्याला तुला लाजरे कशी वाटत नाहीं? बेटे मुसलडे ह्मणजे विशाद काय? येथें येण्याला एकाची सुद्धां माय व्याली नाहीं. पुन्हा माझ्या समोर अशी बडबड केलीस तर तुझें नाकच चिरीन." हें बोलणें ऐकून जोत्याजी हिरमुसलें तोंड करून ह्मणाला, "महाराज, माझ्या नाकाची मला इतकी फिकीर नाहीं. माझें नाक कापलें तर एका माणसाचेंच नाक जाईल. पण, महाराज, आपण सगळ्या राज्याचें नाक आहां. हें नाक कायम राहिलें तर आमच्या नाकांची शोभा. नाहीं तर बाकीचीं नाकें असूनही कापल्यासारखींच होत. ह्या उपर सरकारची मर्जी. आमचेंच नशीब फुटकें, त्याला महाराज काय करतील?" इतकें बोलून जोत्याजी रागारागानें निघून गेला. ह्या गोष्टीलाही कांहीं दिवस लोटले. मागचे सर्व प्रकार बहुतकरून विसरल्यासारखे झाले. राजाच्या मनांत कदाचित् तुळशीबाईविषयीं किंचित् किंतू असल्यास तोही निघून गेला. मग पुन्हा तिच्या व तकरीबखानाच्या वाटाघाटी चालू झाल्या. त्यांत असें ठरलें कीं, जोत्याजी हा एक वाटेंत मोठा कांटा आहे, तो काढून टाकल्याखेरीज आपली मसलत सिद्धीस जाणार नाहीं. ह्याकरितां त्याला राजापासून

दूर करण्याची त्यांनीं एक युक्ति काढली, ती अशी. एक त्याच्या नांवाचें त्यांनीं बनावट पत्र तयार करविलें. तें त्याच्या नेहमींच्या बसण्या उठण्याच्या जागीं टाकविलें. त्याजवर, जरूर, जरूर, जरूर, असें तीनदां लिहिलें होतें. तो लखोटा त्याच्या हातीं पडला तेव्हां त्यानें तो एकाकडून फोडवून वाचून पाहिला. त्यांत मजकूर होता तो येणेंप्रमाणें:—

## श्री.

तीर्थरूप राजश्री जोत्याजीबाबा केसकर वडिलांचे शेवेशीं. बाळकें गणोजी केसकर ह्याचे शिरसाष्टांग दंडवत विज्ञापना ऐसीजे,—लिहावयास कारण कीं, आज आठ दिवस झाले, तीर्थरूप मातोश्री आई अगदीं निजून राहिली आहे. आंगांत ताप भरलेला निघत नाहीं. घाम सुटत नाहीं. अन्न पाणी जात नाहीं. रात्रंदिवस वरळ, वरळ, वरळते. झोंप नाहीं. ती वरचेवर तुमची आठवण काढते. ह्यासाठीं भाकर तिकडे खात असलां तर हात धुवायाला इकडे या. मातोश्रीचा घडीचा भरंवसा नाहीं. टाकोटाक आलां तर भेट होईल. जाजती काय लिहूं. हे विज्ञापना. मिति ज्येष्ठ वद्य ८ शके १६१०, विभवनाम संवत्सरे.

पत्रांतला मजकूर ऐकून जोत्याजी घाबरा झाला. त्याच्या मुलाला स्वतः लिहितां वाचतां येत नव्हतें. दुसऱ्याकडून नेहमीसारखें पत्र लिहविलेलें, तेव्हां तें खरें कीं खोटें ह्याचा त्याला अंदेशा आला नाहीं. शिवाय, असलें वाईट पत्र कोण कोणाला लिहितो. अशा समजुतीनें पत्राच्या खरेखोटेपणाचा कांहींच तपास न करितां तें हातीं धरून तो तसाच राजाकडे गेला. तोंडानें त्याची हकीकत ऐकून घेऊन राजानें त्याला घरीं जाण्यास परवानगी दिली. त्याचें घर कोल्हापुरच्या

रस्त्यावर जाधवाच्या वाड्यांत होतें. तिकडे तो लागलाच रात्रीं-च्या दिवस करून निघून गेला.

इंकडे तुळशीबाईकडे काय वर्तमान झालें तें ऐका. जोत्याजी राजाचा निरोप घेऊन जातांच तिच्या भावाच्या हातून जें काम तडीस गेलें नाहीं तें खून करण्याचें काम तिनें स्वतः करण्याचें पतकरलें. अमक्या अमक्या दिवशीं, रात्रीं, हें काम करावयाचेंच, असा तिचा दृढ निश्चय झाला. तो बेत तिनें अगोदर तकरीबखान आणि इखलासखान ह्यांस कळवून ठेविला त्यांचा असा संकेत ठरला,— त्या रात्रीं त्या दोघां बापलेकांनीं दिवाणखान्याच्या बाहेरच्या बाजूस दडून बसावें. दिवाणखान्याची आंतल्या बाजूची कडी तिनें लावू नये. नुसतें दार ओढून घ्यावें. राजाला चांगली दाराढूर झोंप लागली आहे असें पाहून तिनें आपल्या हातानें त्याच्या उरांत जंबिया मारावा. त्यानें राजाचा लागलाच प्राण गेल्यास ठीकच झालें. तसें न होतां तो जागा होऊन तिच्याबरोबर दंगामस्ती करीत असल्याचें आढळल्यास बाहेरच्या दोघां पठाणांनीं तत्काल दार उघडून आंत शिरावें. ह्या कटांत तीं तिघेंच होतीं असें नाहीं. संभाजीरावाच्या नजीक रहाणारे कित्येक चाकरही तिनें पैसा देऊन वश करून घेतले होते. सारांश, त्याच्या पापाचा घडा भरत आला तेव्हां त्याच्या सभोंवतीं चोंहीकडून वादळ जमत चाललें. ज्या अनुकूल गोष्टी होत्या त्या सुद्धां भराभर प्रतिकूल होत चालल्या.

तुळशीबाई त्या दिवशीं सतींचें वाण घेतल्याप्रमाणें तयार झाली. ती अंगाला सुवासिक उटणें करून न्हाली, कर्वतकांठी पांढरें शुभ्र पातळ नेसली, आणि आंगांत पिवळ्या तापत्याची तंग चोळी ल्याली. तिनें त्या दिवशीं वेणीफणी केली नाहीं. न्हा-

लेले आंबट ओले केंस, विंचरून, साफ करून व भांग काढून, तसेंच पाठीवर मोकळे सोडले. दागिन्यांपैकीं गळ्यांत नुसतें मोत्यांचें पेंडें व हिऱ्याचा तनमणी, आणि हातांत गोट, पाटल्या व तोडे इतकेंच, अंगावर दागिने घातले. आपण मनांत बेत योजिला आहे ह्याचें कसें होईल काय होईल ह्या भीतीनें तिच्या अंतःकरणांत क्षणोक्षणीं हजारों तरंग उठत आणि पुन्हा नाहींसे होत. ह्यामुळें तिच्या तोंडावर रोजच्यासारखी टवटवी नसून तिची मुखचर्या कावरीबावरी झाली होती. तरी राजाच्या मनांत कांहीं शंका येऊं नये ह्मणून वरून चांगलें दिसण्यासाठीं तिला ओढून चंद्रबळ बरेंच आणावें लागलें.

राजा रात्रीं रोजच्याप्रमाणें तिच्या रंगमहालांत गेला. त्या वेळेस तुळशीबाई झोंपाळ्यावर बसून नंदकिशोर गोपालकृष्ण ह्याचीं मंजूळ मंजूळ गाणीं सुस्वर गळ्यावर ह्मणत होती. तिच्या कंठमाधुर्यानें राजाची मर्जी सुप्रसन्न झाली. कांहीं वेळानें तिनें त्याला एक वारुणीचा पेला प्रीतीनें भरून दिला. तो पोटांत झोंकून दिल्यावर संभाजीराजाची स्वारी तिचीं गाणीं ऐकून नागराजासारखी डुलत बसली. ह्याप्रमाणें दोघांची पूर्वरात्र ख्यालीखुशालींत व कर्मणुकेंत निघून गेली. मध्यरात्र उलटली. राजाला गाढ मूढ झोंप लागली. त्याच्या इंद्रियांचे सर्व व्यापार बंद पडले. आणि तो उताणा घोरत पडला. मग तुळशीबाई त्याला धका न लावितां हळूच पलंगाखालीं उतरली. तिनें खांद्याखालीं पातळाचा आडवा पदर खोंवून पाठीमागें बळकट कांचा मारला. मग बिछान्याखालीं एक लखलखीत जंबिया लपवून ठेविला होता तो तिनें हळूच काढून घेतला. किती धैर्य आणिलें तरी दुष्ट कृत्यच तें, त्या वेळेस भीतीनें तिचा हात थरथरां कांपूं लागला. पुढें राजाच्या आंगावर वस्त्र होतें

तें डाव्या हातानें हळूच एका बाजूला सारून त्याची विशाल छाती तिनें मोकळी केली, दांतांखालीं ओंठ बळकट आंवळून धरले; आणि त्याच्या आंगावर जरा ओणवी होऊन उजवा हात वर करून जंबियाचा एक तडाका मोठ्या जोरानें त्याच्या उरांत मारला. त्याबरोबर राजा जागा होऊन धडपडून उठला, आणि काय आहे ह्मणून डोळे उघडून वर पाहूं लागला, तों ही त्राटिका तुळशी जवळ उभी. तिच्या उजव्या हातांत जंबिया आहे, खांद्याखालीं आडवा पदर घेऊन कांचा कसली आहे, नेसलेल्या पातळावर रंगपंचमीसारखा रक्ताचा लाल शिडकाव झाला आहे, आणि पाठीवर केंस मोकळे सुटले आहेत, असें तिचें कडक लक्ष्मीसारखें उग्र ध्यान पाहून, त्याला जरीं उरांत ओझरती जखम लागली होती तरी त्यानें त्यांतले त्यांत आवेश आणून तिची मानगोटी घट्ट दाबून धरली, आणि तिला जमिनीवर मागच्यामागें आदळलें. त्या झटक्यासरसे तिनें डोळे गरगरां फिरवून आपला प्राण सोडला. इकडे राजाला जखमेच्या वेदनेनें जरा झीट येऊन तोही एका बाजूला बेशुद्ध होऊन पडला.

वाचकहो, स्त्रियांच्या अंगमार्दवाविषयीं कवींनीं किती खुलवून लिहिलें आहे ! त्यांच्या मृदु अंगाप्रमाणेंच त्यांचें अंतःकरणही कमलदलासारखें कोमल आहे असें त्यांनीं वर्णन केलें आहे ! अशा ‘ नवनीतकोमलांगी ’ स्त्रियांपैकींच एका स्त्रीच्या हातून हें अत्यंत साहसाचें कर्म घडलें ! ! अशीं उदाहरणें नजरेस पडलीं ह्मणजे कवींचे काव्यालाप त्यांच्या काव्यांतच पाहून घ्यावे असें ह्मणावें लागतें ! ! ! असो.

आंतल्या बाजूला थोडासा धांगडधिंगा चालून तो लागलाच बंद पडला. पुढें कांहीं हालचाल दिसेना. ह्मणून तकरीबखान

च इखलासखान हे हातीं नंग्या तरवारी घेऊन दुसऱ्या पांच असामी साथीदारांसह दार उघडून एकदम आंत शिरले, तों बिछाना सोडून तीं दोघें दोहोंकडे अस्ताव्यस्त पडलीं होतीं. तुळशीचा श्वासोच्छ्वासही बंद पडून ती प्रेतंगत झाली होती. राजाच्या उरांत मात्र जरा धुगधुगी होती, पण त्याला देहभान नव्हतें. मग इकडे राजाला तसाच टाकून, कलुषा प्रधान ज्या हवेलींत होता त्या हवेलींत ते दोघे गेले. तेथें तो निजला असतां त्याला उठवून त्यांनीं त्याच्या मुसक्या आंवळल्या, आणि राजा जेथें मूर्छना येऊन पडला होता तेथें त्याला घेऊन गेले. त्या वेळेस अवरंगजेब बादशाहाची स्वारी तुळापुरास येऊन दाखल झाली होती.

'राजा और वजीर दोनों पकडे गये हैं. उनको बंदोबस्तके साथ फौरन् खाविंदके कदमके पास हाजिर करता हूं.'

[ राजा व प्रधान दोघे जिवंत हातीं सांपडले आहेत. त्यांना लौकरच बंदोबस्तानें खावंदचरणापाशीं घेऊन येतों. ]

अशी तकरीबखानानें बादशहाकडे लागलीच डांक सोडली.

आतां राजाकडची हकीकत इतकीच येथें ठेवून अगोदर जोत्याजीकडची हवाल तिकडे काय झाली ती सांगतों, म्हणजे चालू गोष्टीचा पुढचा संदर्भ बरोबर ध्यानांत येईल.

आपल्या बायकोची शेवटीं भेट होते कीं नाहीं अशी काळजी करीत करीत जोत्याजी आपल्या घरीं जाऊन पोहोंचला, तों त्याची बायको नेहमींसारखी धट्टीकट्टी असून ओढ्यावरून घागरीनें डोक्यावर पाणी आणीत होती. तिला ताप बीप कांहीं नव्हता. त्याचा मुलगाही शेतकाम करण्यास शेतांत गेला होता. असें पाहून आपल्या कपाळावर हाणून घेऊन तो चिंताक्रांत होऊन बसला. बायकोपाशीं कांहीं बोलेना सुद्धां. मुलगा शे-

तांतून आल्यावर त्यानें बापाला विचारलें, 'बाबा, तूं आज एकाएकीं घरीं कां आलास? तुझें तोंड बी लई उतरल्यावाणी दिसतें. महाराजांचा तुझ्यावर राग बीग तर झाला नाहीं ना?' मग त्यानें गणोजीला विचारिलें, 'तूं माझ्या नांवानें आलिकडे एखादा कागद पाठविला होतास कीं काय?' तो ह्मणाला, 'नाहीं.' मग तो समजला कीं, त्या लुच्चांनीं मला तेथून दूर काढण्यासाठीं ही हिकमत केली. तेव्हां तो बायकोला म्हणाला, कारभारणी, तिकडे माझ्या धन्याच्या जिवाला खचीत मोठा दगा आहे, मी आतां येथें पाणी सुद्धां पिणार नाहीं. हा मी आल्या पावलींच माघारा निघालों. बघ, मला दोन भाकरी, दोन कांदे, आणि कसली तरी एक चटणी, इतकें आधीं बांधून दे. मग तिनें घाईघाईनें चूल पेटवून दोन दामट्या भाजून आपल्या नवऱ्याला शिदोरी बांधून दिली. ती घेऊन तो लागलाच संगमेश्वरचा रस्ता धरून निघाला. दुसऱ्या दिवशीं त्याला वाटेंत तकरीबखानाचे डांकवाले भेटले. त्यांनीं त्याला संगमेश्वरची कच्ची हकीकत सांगितली. राजाला मेण्यांत घालून ह्याच रस्त्यानें तुळापुराकडे घेऊन जाणार आहेत, व आज उद्यां येथें येतील, अशी त्यांनीं खबर दिली. नंतर तो त्याच रानांत एक झोंपडें होतें तेथें मेण्याची वाट पहात बसला, पुढें गेला नाहीं. त्या दिवशीं ज्येष्ठ वद्य ३० होती, बाहेर झिमझिम पाऊस पडत होता, आणि काळोख किट्ट पडला होता. तो त्या रात्रीं तेथें हत्यारबंद होऊन जागत बसला.

इकडे तकरीबखानानें राजाला कैद केल्यावर त्याच्या उरांत जखम झाली होती यामुळें राजा दोन दिवस अगदीं बेशुद्ध होता. अन्नपाणी पोटांत गेलें नव्हतें. तिसऱ्या दिवशीं जरा सावध होऊन तो थोडथोडें बोलूं लागला. मेण्यांत निजवून

नेण्यापुरतें त्याच्या आंगीं सामर्थ्य आलें. मग त्याला मेण्यांत घालून तकरीबखान बंदोबस्तानें तुळापुराकडे निघाला. अशा रीतीनें चार दिवसपर्यंत त्यानें मार्ग क्रमिला. वाटेंत कोठेंही हल्ला हरकत झाली नाहीं. पुढें आतां रस्त्यांत भीति नाहीं असें समजून, अमावास्येच्या काळोख्या रात्रीं जेवणखाण आटपून ते बेफामपणानें चालले. अगोदर ती अमावास्येची रात्र, त्यांत आभाळ भरून आलेलें, आणि तशांत दाट झाडींतून रस्ता गेलेला, ह्यामुळें सभोवतीं काळोख किट्ट पडला होता. डोळ्यांत बोट घातलें तरी दिसत नव्हतें. अशा वेळेस तकरीबखानाची टोळी चालली होती. त्याच्या टोळींत एकंदर १६ मनुष्यांची शिरगणती होती. त्यांचा क्रम असा होता. सर्वांच्या पुढें एक मशालजी, त्याच्या मागें पांच असामी हत्यारबंद शिपाई, त्यांच्या मागोमाग राजाचा मेणा, व मेण्याचे सहा असामी भोई, मेण्याच्या पाठीमागें मुसक्या बांधलेला कलुशा प्रधान, आणि सर्वांच्या मागें तकरीबखान व इखलासखान. ते दोघे बापलेक कंबरेला तरवारा व हातांत भाले घेऊन घोड्यावर स्वार होऊन कांहीं अंतरावर चालत होते. चालतां चालतां एका दाट जंगलांतून वाट निघाली. मशालीच्या उजेडानें लोक हळुहळु चालले होते. मेणा वाहणारे भोईलोकांचा मोठ्यानें हूं हूं शब्द चालला होता. अशा रीतीनें मध्यरात्र ऊलटून गेल्यावर जोत्याजीच्या झोंपड्याशीं ही टोळी येऊन ठेपली. मशालीच्या उजेडानें मेणा त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां ह्याच टोळींत आपले महाराज आहेत अशी त्याची खात्री झाली. मग त्यानें प्रथमतः मशालजीवर नेमकी शिस्त धरून एक तीर सोडला. तो त्याला मर्मस्थानीं लागून मशालजी घायाळ होऊन खालीं पडला. त्याबरोबर त्याच्या हातांतली मशाल खालीं पडून ती विझाली. टोळी-

मध्यें फारशी गडबड झाली नाहीं तोंच आपण पुढें सरून त्यानें आपल्या सख्त तरवारीनें पांच असामी हत्यारबंद शिपाई एकामागून एक लंबे केले. त्यांच्या मागून मेण्याच्या पुढच्या बाजूला दोन असामी भोई राहिले त्यांचे त्यानें खटारे पाडले. बाकी चार असामी भोई होते ते मेणा टाकून सूं रानोमाळ पळत सुटले. जोत्याजीचा बहुतेक जन्म जंगलांत आणि पहाडांत गेला होता. ह्यामुळें त्याला अडचणीच्या जाग्यांतून काळोख्या रात्रींसुद्धां चालण्याचा सराव होता. अंधारांत कोठें काय आहे हें त्याला लागलेंच कळलें. त्याला दुसरे लोक दिसले पण, मशालीचा उजेड एकाएकीं नाहींसा होतांच त्या टोळींतल्या लोकांची आंधळ्यासारखी अवस्था झाली. कोण कोणीकडून येऊन कसा वार करतो, हें त्यांच्या ध्यानांत येत आहे नाहीं, तोंच एक, दोन, चार, सहा, आठ, अशा आठ असामींना त्यानें धारातीर्थ दाखविलें. आघाडीचे लोक एकाएकीं थबकले आणि त्यांच्यातले कांहीं लोक कण्हतकुथत पडले. तेव्हां हा गोंधळ कसला आहे ह्मणून पहाण्यासाठीं इखलासखान चट्दिशीं घोड्याखालीं उतरून तरवार हातीं घेऊन पुढें सरला. त्याच्याही आंगावर जोत्याजी मोठ्या आवेशानें धांवून गेला, आणि त्याच्या हातांत तरवार होती ती काढून घेऊन त्यानें ती दूर फेंकून दिली. पण त्या घाईत जोत्याजीची स्वतःची तरवार हातांतून निसटून खालीं पडली. मग त्या दोघां निःशस्त्र वीरांमध्यें दंडादंडी युद्ध जुंपलें. पठाणाची आणि मावळ्याची झटापट लागली. पठाण, धिप्पाड, उंच आणि बलवान शिपाई होता. त्याचा सामनेवाला मावळा, अंगानें सडपातळ व ठेंगणाच होता, तरी पठाणापेक्षां त्याच्या आंगीं चपळता अधिक होती. मावळ्यानें पठाणाला एकाएकीं

युक्तीनें फेंकून देण्याचा इरादा केला होता, पण तो साधला नाहीं. तो सपशेल जमिनीवर पडला, तरी त्यानें मावळ्याला मगरमिठी मारली ती सोडली नाहीं. मग मावळ्यानें त्याचें गर्दन घट्ट दाबून धरिलें, तेव्हां पठाण घाबरून आवेशानें उभा राहिला, आणि मावळ्याला त्यानें चेंडूसारखें सहज पलिकडे फेंकून दिलें. हें सर्व कृत्य कीचक आणि भीमसेन ह्यांच्या युद्धासारखें अंधारांतच चाललें होतें. इतकेंच कीं, त्या युद्धाचें मूळ द्रौपदी आणि ह्या युद्धाचें मूळ संभाजीराव होता. तिकडे भीमसेनाची स्वभार्यानिष्ठा आणि इकडे जोत्याजीची स्वराजनिष्ठा कारणभूत होती. मावळा एक दो हातांवर उताणा पडला. पुन्हा तो पालथा वळून उठत होता इतक्यांत पठाणाची तरवार खालीं पडलेली त्याच्या हाताला लागली. मग तो उशीर कशाला करील? त्यानें लागलाच पठाणाच्या आंगावर तरवारीचा सपाटून एक तिर्पा वार केला. त्या वारानें त्याच्या उजव्या मांडीला मोठी जखम होऊन, 'या अल्ला, या खुदा, कैसा वखत लाया,' असे दुःखाचे शब्द इखलासखानाच्या तोंडांतून निघतांच तकरीबखानानें आपला घोडा पुढें काढला, आणि साधारण अजमासानें जोत्याजीचे पाठींत त्यानें खूप जोरानें आपला भाला मारला. तो त्याला वर्मी लागला. त्या समयीं तो गहिंवरून ह्मणाला, 'अरे गलिमा, हा जोत्याजी तर आतां मेलाच, पण त्याची शिपाईगिरी पाहून त्याला कांहीं इनाम द्यावें असें तुला वाटलें तर त्याच्या धन्याला तूं जीवदान दे, आणि ह्या चाकराचा त्याला अखेरचा मुजरा सांग.' इतकें बोलून त्या निमकहलाल चाकरानें आपला प्राण सोडला. जोत्याजीचें हें अखेरचें कळवळ्याचें मागणें मेण्यांतून ऐकून संभाजीरावाच्या डोळ्यांला खळखळा पाणी आलें. अशा निःसीम राजनिष्ठ चाकरावरून मी

आपलें सर्व राज्य ओंवाळून टाकिलें तरी थोडेंच आहे, असें त्याला वाटलें. पण हा विचार मागून काय उपयोग ? ज्या ज्या वेळेस त्यानें जागें करावें त्या त्या वेळेस त्याला कुंभकर्णी झोंप लागली होती. त्याचें फळ आतां त्याला भोगावें लागलें. मोरोपंतांनीं ह्मटलें आहे कीं, 'हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं,' असो. ह्या भागाची मर्यादा सोडून बरेच पुढें गेलों, सबब कैदीराजाचा पुढचा विधि आतां पुढच्या भागावर ठेवणें प्राप्त आहे.

---

# भाग १५.

"अतिशुक्तिरतीवोक्तिः सद्यः प्राणापहारिणी."

जोत्याजी केसकर मरण पावला. नंतर कत्तलीचें काम बंद पडलें. तरी काळोख अतिशय होता. पुढचा रस्ता ओळखीचा नव्हता. सोळांपैकीं आठ असामी ठार झाले. बाकी राजासुद्धां आठ असामी उरले. त्यांतलेही चार असामी भोई त्या गडबडींत कोठें पळून गेले त्यांचा पत्ता नव्हता. इखलासखान घायाळ होऊन जमिनीवर पडला होता. मशाल धरण्याससुद्धां जास्ती माणूस उरलें नव्हतें. पुढें काळोखांतून तसेंच चालावें तर न जाणो आणखी एकादें विघ्न येईल. आतां उजाडेपर्यंत येथेंच काय होईल तें होवो, असा विचार करून तकरीबखान तेथेंच तळ देऊन राहिला. अरुणोदयाच्या सुमारास त्यानें आठ माणसांचीं प्रेतें जिकडे तिकडे अस्ताव्यस्त पडलेलीं पाहिलीं. मेणा उचलण्यास भोईलोक जाग्यावर नव्हते. पुढें काय विचार करावा, अशा विवंचनेंत तो पडला. इतक्यांत भोई पळून गेले होते ते माघारे आले. मग इखलासखानाची जखम बांधून त्याला तकरीबखानानें घोड्यावर बसविलें, आणि राजा-

ला मेण्यांत घालून तो तुळापुराकडे निघाला. तुळापुरास पोहोंचण्यास सुमारें १५ दिवस लागले. तोंपर्यंत संभाजीरावाच्या छातीची जखम बरी होत आली होती. तो जरा हिंडूं फिरूंही लागला होता. त्याला दिवसांतून पांच चार वेळां जोत्याजी केसकराची आठवण झाल्याखेरीज एकही दिवस गेला नाहीं.

तकरीबखान औरंगजेबाच्या स्वारींत येऊन पोहोंचल्यावर त्यानें राजा व कलुषा प्रधान ह्यांना कैद करून आणल्याची बादशहाला वर्दी दिली आणि खुरनिसा करून त्याला अर्ज केला कीं:—

खुदावंतके काफिर दुष्मनोंको मै जिंदा ले आया हुं.

[ खुदावंतांचे काफर दुस्मान मीं जिवंत धरून आणिले आहेत. ]

हें ऐकून बादशाहा फारच खूष झाला, आणि त्यास ह्मणाला:—

तुम दोनोंकी कामयाबी देखकर मुझको निहायत् खुषी हुई, क्यौंकि भागानगर और विजापूर ये दोनों रियासते तो मेरे ताबेमें आईथी. वैसा खुदाने मुझको मरठ्ठोंका राज्य भी आज मेरे सुपुर्द किया. इस्से दखिन्का दरवाजा खुल्गया. आज मेरे ऐसा एकबालमंद कौन् है. परवरदिगारकी बडी मेहेरबानी है. इस् लिये आज खुषीका दिन् मैने देखा. अब् सबकी एक जात करडालुंगा.

[ तुमची दोघांची कामगिरी पाहून मी फार खुष झालों. कारण, भागानगर आणि विजापूर हीं दोन्ही राज्यें माझ्या हस्तगत झालीं, तसेंच खुदानें मला मराठ्यांचेंही राज्य आज दिलें. ह्यामुळें मला दक्षणचा दरवाजा खुला झाला. आज मी कृतकृत्य आहें. मजवर परवरदिगार खुदाची पूर्ण मेहेरबानी आहे, ह्मणूनच मी हा आजचा सुदिन पाहिला. ह्या उपर सर्व देशभर एक हमजात करावयाची. ]

असें बोलून त्यानें आपल्या सेनापतीला हुकूम दिला कीं:—

आजसे मुसलमानके हातका पकाहुआ खाना हिंदुओंके वास्ते बिके. जो हिंदु न खारि देगा उसका सिर काटा जायगा. इन् दोनों कैदीयोंका बंदोबस्त अच्छा रक्खो, और कल सुब-दरबारमें हाजिर करो तो उनका इन्साफ किया जायगा.

[ आजपासून हिंदुलोकांना मुसलमानांचे हातचें ओलें अन्न विकावें. जो न घेईल त्याचा शिरच्छेद करावा. ह्या दोघां कैद्यांना सक्त बंदोबस्तांत ठेवावें. उद्यां भरदरबारांत त्यांना आमच्या पुढें आणावे ह्मणजे त्यांचा इनसाफ करूं. ]

दुसऱ्या दिवशीं हुकुमाप्रमाणें संभाजीराव व कलुषा ह्यांना बादशाहीतक्तापुढें कोतवाल घेऊन गेला. त्या वेळेस बाद-शहानें पाहिलें तों संभाजीरावाचें सुमारें ३५ वर्षांचें पूर्ववय होतें. तो ऐन तारुण्याच्या भरांत असून रूपानें फार देखणा होता. तक्ताच्या पिछाडीस जनानखाना बसण्याकरितां जागा तयार केली होती. तेथें बादशहाच्या खुद्द राण्या व मुली चिकाच्या पडद्यांआड बसल्या होत्या. त्या राजाच्या सुंदर मूर्तीकडे ट-कमकां पाहूं लागल्या. त्याला पाहून त्यांच्या डोळ्यांना फार समाधान वाटलें. त्या स्त्रियांमध्यें रोषनारही होती. संभाजीरावाला पहातांच सर्वांगाला डवडवून घाम सुटून तिला कांपरें भरलें, व एकाएकीं चक्कर येऊन ती खालीं पडली. तिची आई वगैरे स्त्रिया जवळ होत्या, त्यांना एकाएकीं हिचा असा प्रकार होण्याचें कारण कांहीं कळेना. पित्तक्षोभानें घेरी आली असेल अशी कल्पना करून त्यांनीं तिला तेथून उचलून जनानखान्यांत निजविलें, आणि शुद्धीवर येण्यासाठीं कांहीं औषधोपचार सुरू केले. इकडे अवरंगजेब आणि संभाजीराव ह्यांचें संभाषण झालें तें येणेंप्रमाणें:—

अवरंगजेब --संभाजी, तू अच्छे खानदानका अदमी हो. तेरी जान लेना हमारा इरादा नही. लेकिन् तुजको एक बात कहता हूं, सो कबूल करनी चाहिये. तू अपना खास हिंदु मझब छोडकर मुसलमीन होजा, तो तेरी जान् बचेगी. और हमारे दरबारकी एक मनसबदारी देकर तुजको अमीर बनाऊंगा. सिवाय, तेरे वालिदकी सब् दौलत तेरे सुपुर्द करुंगा. कहो, यह तुजको कबूल है या नही ?

[ संभाजी, तू चांगला खानदान मनुष्य आहेस. तुला जिवें मारावें असा आमचा इरादा नाहीं. पण एक गोष्ट सांगतों ती तूं कबूल केली पाहिजे. तूं आपला मूळचा हिंदु धर्म सोडून आमचा महंमदी धर्म स्वीकारून मुसलमान हो. ह्मणजे तुला जीवदान देऊन आमच्या दरबारांत एक मनसबदारी देऊन तुला उमराव करून ठेवितों. तुझ्या बापाची सगळी दौलतही तुझ्या स्वाधीन करितों. या गोष्टीस तुझी कबुली आहे कीं नाहीं, बोल. ]

संभाजी–इस वख्त आप तख्तनशीन हो और मैं अपने कम बखतीसे गुलामसरिखा खडा हुं. तौभी मैं अपना खास हिंदु मझब छोडकर मुसलमीन कभी न हुंगा. हमारे मझबके आगे आपका मझब कुछ् नही है. इस्लामके मुवाफिक खराब मझब दूसरा कोई नही. आपके पैगंबरोको और आपके मझबको मैं नही चाहता हुं. जबसे आपके हात पडा हुं तबसे अपने जिंदगीकी उमेद छोड दिया हुं. अब मुझको चाहिये मारो, चाहिये छोडदो. मरना किसीको छुटा नही. एक दिन मरना है. कल मरना है सो आज मरेंगे. लेकिन् आपने दिया हुआ खाना खाकर– ‘ अल्ला बिसमिला रहिमान रहिम ’ ऐसा चिल्लाते हुआ

आपके देवढीपर कुत्तेसरिखा न रहुंगा. सुनिये, एक मिसल है कि, " झूटा खाना मीठेके वास्ते." अगर आप अपनी लडकी रोषनारसे मेरी षादी कर दोंगे तो मैं मुसलमान हो जाऊं क्योंकि रोषनार अपने भर जवानीमें है, मेराभी दिल उस्पर बहुत लगा हुआ है.

[ ह्या वेळेस तुह्मी बादशाही तक्तावर आहां आणि मी कमनशीबानें तुमच्या पुढें गुलामासारखा उभा आहें. ह्मणून मी आपला मूळचा हिंदु धर्म सोडून उगीचच्या उगीच बाटेन असें समजूं नका. आमच्या हिंदुधर्मापुढें तुमचा म्लेंच्छ धर्म तुच्छ आहे. मुसलमानीधर्मासारखा खराब धर्म कोणताच नाहीं. थुः तुमच्या पैरंबराला आणि तुमच्या धर्माला. तुमच्या हातीं जिवंत सांपडलों त्याच वेळेस मी आपल्या जिवाची आशा सोडिली आहे. आतां मला मारा कीं तारा, पाहिजे तें करा. मरण तुह्मांला सुटलें नाहीं आणि मलाही सुटलें नाहीं. एक दिवस मरावयाचें तर खरेंच. उद्यां मरावयाचें तें आजच मरून जाईन, पण तुह्मी धर्माचा तुकडा टाकाल तो खाऊन तुमच्या दाराशीं—'महम्मद रसूलल्ला बिस्मिल्ला रहिमान रहीम' असें कुत्र्यासारखें भोंकत हा संभाजीराव कधीं बसणार नाहीं. तुमचा मुसलमानी धर्म आमच्या हिंदुधर्मापेक्षां श्रेष्ठ असें समजून मी कधीं बाटणार नाहीं. पण माझी एक शर्त आहे, ती कबूल कराल तर 'तुपासाठीं उष्टें खावें' असें ह्मणतात तसें करीन. तुमची मुलगी रोषनार आतां भर उमेरींत आली असून तिचें अझून लग्न झालेलें नाहीं, तिच्या ठिकाणीं माझें मन गुंतलें आहे. तर तिजबरोबर माझा निक्का लावाल तर तिच्यासाठीं मात्र मी बाटण्यासही कबूल आहें. ]

हे शब्द कानीं पडतांच अवरंगजेबाच्या अंगाचा संताप होऊन त्यानें हिरण्याक्षासारखे तांबडे लाल डोळे केले. आणि त्याच्या डाव्या उजव्या बाजूस अमीर, उमराव रांगा धरून बसले होते, त्यांजकडे पाहून तो ह्मणाला:—

उमराव लोगों, कहिये इस् काफिरका क्या मैं करडालुं?

[ उमरावलोकहो, ह्या काफरराजाचें आतां काय करावें तें सांगा? ]

तेव्हां सर्व एकदम ह्मणाले कीं:—

यह बेवकुब और मस्त अदमी है. इसने हमारे महंमद पैगंबरकी और मझबकी शिकायत की है. इसवास्ते इसका सीर काटे वगैर इसकी माकुल सजा न होगी.

[ हा बेहोष, बेवकूब आणि उद्दाम अदमी आहे. ह्यानें आमच्या महंमद पैगंबराची आणि धर्माची निंदा केली आहे. ह्याकरितां ह्याचें एकदम शीर काटावें. याशिवाय दुसरी कोणतीही सजा बस् होणार नाहीं. ]

ह्याप्रमाणें सर्वांचा अभिप्राय पडल्यावर बादशहानें काय हुकूम केला तो लौकरच सांगूं, पण ह्या जगांतील धर्मवेडाच्या संबंधानें दोन अक्षरें बोलण्याची ही योग्य जागा आहे, सबब मुख्य विषय क्षणभर एकीकडे ठेवण्याविषयीं वाचकांची परवानगी घेतों.

वाचकहो, वास्तविक पाहिलें असतां धर्म आणि राज्यव्यवस्था ह्या दोन गोष्टी एकमेकांपासून अगदीं भिन्न आहेत. त्यांचा परस्परांशीं संबंध अगदीं अलग असावा. पण आपण सर्व देशांतील प्राचीन व अर्वाचीन इतिहासांकडे लक्ष पुरविलें असतां असें दिसून येतें कीं, एका देशच्या राजानें किंवा लोकांनीं दुसऱ्या देशच्या राजावर किंवा लोकांवर स्वारी करून नवीन देश

किंवा राज्य काबीज केलें, आणि तेथील राज्यसत्ता त्यांच्या हातीं आली कीं, ताब्यांत आलेल्या परधर्मी प्रजेनें आपला मूळचा धर्म टाकून देऊन त्यांचा धर्म स्वीकारावा, आणि जे लोक तो न स्वीकारतील त्यांस मारून मुटकून आपल्या धर्मांत आणावें, असें दुसऱ्या देशाहून आलेल्या परधर्मी राज्यकर्त्यांच्या डोक्यांत वेड शिरतें. ही गोष्ट मूळच्या पराजित लोकांस अर्थातच आवडत नाहीं. ह्यामुळें जिंकणारे आणि जिंकिले गेलेले लोक ह्यांमध्यें विरोधबुद्धि व द्वेषभाव उत्पन्न होऊन मोठमोठे रक्तपात होतात. ही किती भयंकर, दुःखप्रद आणि शोचनीय गोष्ट आहे बरें ! खरें पाहिलें असतां कोणी रामाला भजो, कीं, कोणी रहिमाला भजो; कोणाला कृष्ण बरा वाटो, कीं कोणाला ख्रिस्त बरा वाटो; कोणी पुराण वाचो, कीं कोणी कुराण वाचो; कोणी देवीची पूजा करो, कीं कोणी सेंटमेरीची आराधना करो. ज्याची ज्या धर्मावर श्रद्धा त्यानें तो धर्म खुशाल आचरावा. लोकांच्या पारमार्थिक आचारविचारांत किंवा भानगडींत राज्यकर्त्यापुरुषांनीं हात घालण्याचें कांहींच कारण नाहीं. तुम्ही अमुक धर्म स्वीकारा आणि अमुक धर्म टाका, नाहीं तर तुमचा जीव घेऊं असें म्हणण्याचा कोणालाच अधिकार पोंचत नाहीं. असें सांगण्याचें कारण इतकेंच कीं, ह्या मृत्युलोकीं लोकांच्या हातून जीं पापपुण्यें घडतात त्यांचीं बरीं वाईट फळें जीवात्म्याला मरणोत्तर परलोकीं भोगावीं लागतात, असा सर्व शास्त्रांचा व सर्व धर्मांचा सिद्धांत आहे. परंतु या सिद्धांताचा अनुभव अदृष्ट असल्यामुळें प्रत्येक मनुष्य ह्या लोकीं परंपरया चालत आलेल्या स्वधर्मावर श्रद्धा ठेवून वागत असतो. तेव्हां अमुक धर्म अमक्या धर्मापेक्षां चांगला किंवा वाईट असा निर्णय करण्याचा अधिकार कोणालाच नाहीं. व

तो कोणाला खरा करितांही येणार नाहीं. 'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां' असें वेदश्रुतीचें वचन आहे तें अगदीं सत्य आहे. या पृथ्वीवर, हिंदु, मुसलमान, पार्शी, आणि ख्रिस्ती, असे चार धर्मांचे लोक मुख्यत्वेंकरून आढळतात. या चार धर्मांतही आणखी शेंकडो पोटभेद आहेत. या सर्व धर्मांचे लोक आज हजारों वर्षांपासून एकमेकांशीं भांडत आले आहेत, पण खरें तत्त्व पाहिलें तर ह्या धर्ममहासागरांत हजारों वर्षें बुड्या मारून अखेरीस सर्वांच्या हातीं नुसत्या पोकळ शिंपाच लागल्या आहेत. मुक्ताफलाची भरींव शिंप कोणालाच सांपडली नाहीं. शिंपेचीं शकलें झाल्यावर तिचा जो तेजःपुंज शुभ्र अंतर्भाग दिसतो त्यालाच स्वधर्माच्या वृथा अभिमानानें मुक्ताफल ही संज्ञा देऊन एका धर्माचे लोक दुसऱ्या धर्माच्या लोकांस हिणावतात, आणि म्हणतात कीं, सर्व धर्मांमध्यें आमचा धर्म काय तो खरा, इतर धर्म खोटे; आम्ही निर्णय करूं तोच खरा, इतरांना निर्णायक शक्ति नाहीं; इतर लोक शुद्ध दोन पायांचीं मेंढरें; त्यांना अक्कल नाहीं, ज्ञान नाहीं, समजूत नाहीं, देव नाहीं, धर्म नाहीं, कांहीं नाहीं; आणि आम्हीं सांगूं तेंच त्यांनीं मुकाट्यानें प्रमाण मानावें. असा ज्यांचा स्वभाव हेकड बनून गेलेला त्यांच्या हातीं जर प्रजेच्या दुर्दैवानें राज्याधिकार आला, तर स्वतःच्या मनाला जो शुद्ध धर्म वाटतो त्याप्रमाणें आचरणाऱ्या लोकांच्या दुःखाला पारावार नाहींसा होतो. जेथें अधिकार तेथेंच संपूर्ण ज्ञान, आणि जेथें परिपूर्ण ज्ञान तेथेंच अधिकार असतो, असा कांहीं जगांत नियम नाहीं. ह्याकरितां ज्याला जो धर्म आणि जो पंथ बरा वाटतो तो त्यानें खुशाल स्वीकारावा आणि त्याप्रमाणें त्याला चालूं द्यावें, त्यांत 'बीचमें मेरा चांदभाई' असें राज्यकर्त्यानें करूं नये. धर्माच्या कामांत

राज्यकर्त्यांनीं औदासीन्य धरिलें असतां त्यापासून राजा आणि प्रजा ह्या दोघांचेंही हित असतें. पण अवरंगजेब बादशहाच्या मगजांत आपल्या धर्माच्या प्रसाराचें कांहीं विलक्षण वेड शिरलें होतें. ह्यामुळें एका हातांत कुराण आणि दुसऱ्या हातांत तरवार घेऊन कोणी हिंदु किंवा अन्यधर्मी भेटला कीं, त्यास काफर समजून—

'मुसलमीन होजा, नही तो मार डालता हुं.'

[ मुसलमान हो, नाहीं तर ठार करितों. ]

असा दाब दपटशा देऊन त्यानें महंमदी धर्माचा हिंदुस्थानांत प्रसार चालविला होता. पोर्तुगीज लोक हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांनींही असाच ख्रिस्ती धर्मप्रसाराचा प्रळय करून सोडला होता. सारांश, राज्य आणि धर्म हीं दोन्हीं आपल्या हातांत ठेविलीं तरच राजाला पुण्य आणि पुरुषार्थ ह्या दोहींचा लाभ होतो, अशी राज्यकर्त्यांची वेडी समजूत असली ह्मणजे ती इतर धर्माच्या प्रजेच्या पारलौकिक स्वातंत्र्याला फारच अनिष्टकारक व बाधक होते. अस्तु.

संभाजीरावानें भर दरबारांत अवरंगजेबाच्या धर्माची विटंबना केली व त्याच्या पैगंबराला हव्यातशा शिव्या हांसडल्या, इतकेंच नाहीं, पण तुझी मुलगी मला दे असें म्हटलें, तेव्हां बादशहास अतिशयच संताप आला असें वर सांगितलेंच आहे. प्रथम राजाचा जीव घेण्याचा बादशहाचा विचार नव्हता, पण तो विचार मग फिरला.

मैं शाहानशाह हो कर वह कंगाल काफिर हमारी बेटी मांगता है, और हमारे मझबकी शिकायत हमारे सामने करता है ये क्या है ?

[ मी सार्वभौम बादशहा असतां माझ्या बेटीचा ह्या कंगाल

काफरानें अभिलाष धरावा, आणखी माझ्या देखत माझ्या धर्माची निंदा करावी ह्मणजे काय ? ]

असें ह्मणून लागलेंच लष्करबाजारच्या कोतवालाला बोलावून पाठवून त्यानें हुकूम केला कीं:—

कैद किये हुवे काफिर राजा और उसके दिवाणको कलके रोज ऊंटपर बांधकर लष्करके बाजारमें लेआना. दोनोंके मूं ऊंटके पिछाडी तरफ् रखना. उनके सर और बदन् खुला करके आगे ढोल सनया ताशे मर्फे वगैरे बजनीये. बजाते हुवे, तमाम शहरभर घुमाते हुवे, ले आना. आसपासके तमाम् लोगोंमें और लष्करके लोगोंमें मुनादी करायके जाहिर करना कि, यह तमाशा देखनेलिये तमाम् लोग फलाने जगहपर फलाने वक्त आवें. हम् अमीर उमराव समेत वहां दाखल हुवेपर हमारा हुकूम होगा, उसमुजिब दोनों कैदियोंके सर काटे जायंगे.

[ ह्या धरून आणलेल्या काफर राजाला आणि त्याच्या दिवाणाला उद्यां उंटावर बांधून लष्करच्या बाजारांत आणावें. त्यांचीं तोंडें उंटाच्या पाठीकडे करावीं. त्यांच्या डोक्यांना पागोटीं घालूं नयेत. उघडे बोडके करून, पुढें ढोल, सनया, तासे, मर्फे, वगैरे वाजंत्री वाजवीत मिरवीत मिरवीत त्यांस आणावें. आसपास गांवच्या सर्व लोकांस व लष्करच्या लोकांस दंवडी पिटवून जाहीर करावें कीं, हा तमाशा पहाण्यास सर्वांनीं अमक्या ठिकाणीं अमक्या वेळेस यावें. आह्मी अमीर उमरावसुद्धां तेथें येऊन पोहोंचल्यावर आमच्या हुकमानें ह्या दोन्ही कैद्यांचा शिरच्छेद होईल. ]

ह्याप्रमाणें ताकीद देऊन बादशहा तक्तावरून उठला व संभाजीराव आणि कलुषा प्रधानजी या दोघांना कोतवाल कैदखान्यांत घेऊन गेला.

वाचकहो, विचार करून पाहिलें असतां अवरंगजेबाला संभाजीराजावर एवढें यमस्वरूप धारण करण्याला योग्य कारण नव्हतें. जसा अवरंगजेब आपल्या राज्यावरचा एक बादशहा होता, तसा संभाजीरावही आपल्या राज्यावरचा एक स्वतंत्र राजा होता. आतां कालविपर्यासानें एक राजा दुसऱ्या राजाच्या हातीं सांपडून कैदी झाला, ह्मणून तूं मुसलमान हो ह्मणजे तुला जीवदान देतों, असें ह्मणण्याचा दुसऱ्या राजाला अधिकार पोंचत नाहीं. तसाच, तुझी उपवर झालेली मुलगी मला दे, असें एका राजानें दुसऱ्या राजाला हक्कानें ह्मणण्याचाही अकत्यार पोंचत नाहीं. ह्यांत अवरंगजेब व संभाजी हे दोघेही आपआपल्या हद्दी सोडून बरेच पलिकडे गेले, ह्मणून दोघेही अपराधी ठरतात. एकानें चुकी केली तशीच दुसऱ्यानेंही केली, ह्मणून एकानें दुसऱ्यावर रागावण्याचें कांहींच कारण नाहीं. दोघांची बराबरी झाली सबब दोघांनीं चुका केल्या नाहींत असें समजावें, किंवा चुकीनें चुक उडून गेली असें समजून स्वस्थ बसावें, हेंच योग्य. परंतु हीं राज्यकारस्थानांचीं कामें पडलीं ! तीं अशीं धारवाडी कांट्यानें कोठें चालतात ? राजनीतीला एकच धरबंद नाहीं. तिला प्रसंगानुसर हवें तसें वळवितां येतें. एक राजा शिरजोर होऊन दुसरा राजा त्याच्या तावडींत आला ह्मणजे त्याला त्यानें हवें तसें कुंबलावें अशी चालच पडली आहे ! एका राजाला दुसऱ्या राजानें कैद केलें ह्मणजे कैदी झालेल्या राजाचा राजेपणा लागलाच नष्ट होतो ! त्याला कारागृहवास भोगावा लागतो ! पायमल्ली किती झाली तरी सोसावी लागते ! सांगतील तेथें चलावें लागतें ! रहा ह्मणतील तेथें रहावें लागतें ! खा ह्मणतील तें व तितकेंच खावें लागतें ! ठिगळें लावलेले कपडे आंगावर घाल ह्मटलें तरी दुःखाचा सुसकारा टाकून घालावे लागतात ! पाठी-

वर घोड्याचे चाबूक उडाले तरी डोळ्यांना पाणी न आणितां उलट ही तुमची मजवर मोठी दया आहे असें हांसत मुखानें ह्मणावें लागतें ! कधीं कधीं तर एखाद्या दीड दमडीच्या शिपुरड्याच्या हातून आपल्या नाजूक बरगड्या खिळखिळ्या करून घेऊन एखाद्या दुर्दैवी राजबिंड्याला या लबाड दुनयेला व पाजी राजनीतीला अखेरचा राम राम करून, 'राम' ह्मणावें लागतें !!! सांराश एखाद्या गरीब कंगाल कुणबटाला त्याच्या भिकार खोपटांत जें स्वातंत्र्यसुख असतें तें मुद्दां ह्याला दुर्मिळ असतें ! अस्तु.

अवरंगजेबाचा आदल्या दिवशीं कोतवालाला हुकूम झाला होता त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्रहर दिवसास लष्कराच्या बाजाराच्या मध्यभागीं एक मोठें पटांगण होतें तेथें संभाजीरावाच्या शिरच्छेदाची सर्व तयारी होऊन राहिली. गांवोगांवचे हजारों तमासगीर राजाचा शिरच्छेद कसा करितात हें पहाण्यासाठीं जमले. खुद्द अवरंगजेब बाहशहाची स्वारी हौद्यांत विराजमान होऊन पदरच्या अमीरउमरावांसह तेथें येऊन पोहोंचली. मध्यभागीं संभाजीराजा व त्याचा प्रधान कलुपा ह्या दोघांना दीनवाणी उघडे बोडके उभे केले. त्याच्या सभोंवतीं शंभर आरब लोक तोंडे पेटवून उभे केले. आतां आमच्या हीन दीन झालेल्या हिंदु राजाचा क्रुद्ध अवरंगजेबानें जो हृदयद्रावक वध करविला त्याचें वर्णन करण्याचें दुःखप्रद काम आमच्या कपाळीं आलें आहे. तें आतां खालीं मान घालून आणि मन दगडासारखें निष्ठुर करून जेम तेम तडीस नेतों. परंतु ह्या प्रसंगाची सविस्तर हकीकत खुलवून सांगण्यास एखाद्या मुसल्मान इतिहासकाराचें कलम जसें फुरफुरेल तशी

प्रकृत हिंदु ग्रंथकर्त्यांची दुःखाच्या भारानें भारावलेली लेखणी दिल खुलाशानें चालणार नाहीं, हें उघडच आहे. असो.

कोतवालानें, कैदी राजाच्या आणि त्याच्या दिवाणाच्या, त्यांच्याच पागोट्यांनीं, पुन्हां मुसक्या आंवळल्या. दोघेही दोन उंटांवर शेपटांकडे तोंडें करवून उघडे बोडके बसविले. मागें पुढें हत्यारबंद आरब उभे केले. आणि पुढें, ताशे, मर्फे, ढोलकीं, वगैरे वाजंत्री वाजवावयास लाविलीं. अशा रीतीनें त्यांची धिंड काढीत त्यांना बादशहापुढें आणून उभें केलें. तेव्हां त्यानें कोतवालाला हुकूम केला कीं:—

पहिले, राजाके साम्ने उस्के दिवानका सर काटो. बाद, लोहेकी सीखे अंगारसे लाल किये हुये उस् काफर राजाको चित्त गिराकर् उसके आखे भूनना. आगे, जिस् जबानसे उसने शाहाजादीको मांगा वो जबान जोरसे बाहर खीचकर छुरीसे काट डालना. इतना हुवे बाद थोडी देर तक उसको वैसाहि तडफडाता हूवा रखना. फेर जमीनपर बैठायकर तलवारके येकही वारसे उसका सर काटो.

[ प्रथम राजाच्या डोळ्यांदेखत त्याच्या दिवाणाचें डोकें छाटून टाकावें. नंतर तापवून लाल केलेल्या लोखंडाच्या डागण्यांनीं ह्या काफर राजाला उताणा पाडून त्याचे डोळे भाजावे. पुढें ज्या जिभेनें त्यानें शहाजादी मागितली ती जीभ बाहेर ओढून सुरीनें कापून टाकावी. इतकें झाल्यावर मध्यंतरीं कांहीं वेळ त्याला तसेंच तळमळत ठेवावें. मग जमिनीवर बसला करून तरवारीच्या एकाच झटक्यासरसें त्याचें शीर साफ छाटून टाकावें. ]

हा बादशहाचा कडक हुकूम ऐकून प्रेक्षक लोक डोळ्यांला हात लावून खळखळा रडूं लागले. इकडे संभाजीरावाचें धैर्य

ती भयंकर सजा ऐकून लवलेशही ढळलें नाहीं. दिवाणाचा शिरच्छेद होण्याबरोबर तो आपण होऊन, डोळे उघडे ठेवून, खालीं उताणा पडला, आणि ह्मणाला:—

चल् आ, अवरंगजेबकी बेटी अपने दिल्से जिस्से षादी कर चुंकी है, वह मैं मरठोका राजा यहां तयार हुं. उसको अब-तूं जो चाहे सो कर.

[ चल ये, अवरंगजेबाच्या बेटीनें ज्याला मनानें वरलें होतें तो हा मराठ्यांचा राजा येथें तयार आहे. त्याचें आतां तूं काय पाहिजे तें कर. ]

अशीं अक्षरें बोलतो आहे इतक्यांत डागणीवाल्यानें दोन हातांत दोन तापलेल्या डागण्या घेऊन त्याच्या डोळ्यांत खुपसल्या. त्या बरोबर त्याच्या डोळ्यांच्या खाचा झाल्या. तरी पण ह्या धैर्याच्या पर्वतानें ढीम ह्मटलें नाहीं, कीं हूं चूं देखील केलें नाहीं. डोळ्यांतून रक्ताच्या तांबड्या लाल धारा चालल्या होत्या तरी दुसरी शिक्षा भोगण्यास तयार होऊन त्यानें आपणच होऊन आपली जीभ कापण्यासाठीं बाहेर काढून दिली. तीही दुसऱ्या एका शिपायानें लगेच सुरीनें छाटून टाकली. मग दुसऱ्यानें ऊठ ह्मणण्याच्या अगोदर आपणच उठून पुढें मान करून तो उभा राहिला. त्या वेळेस त्याच्या डोळ्यांतून आणि तोंडांतून रक्ताचे पाट चाललें होते. त्याचा सगळा चेहरा व छाती हीं रक्तानें माखून गेलीं होतीं. अशी त्याची अवस्था पाहून शोकाकुल झालेल्या प्रेक्षकांस वाटलें कीं, आतां तरी बादशहा ह्या बिचाऱ्याला जीवदान देईल तर बरें होईल. खरोखर, प्रत्यक्ष यमराज त्या समयीं हजर असता तर त्याला सुद्धां त्याची दया आली असती. पण महाक्रूर अवरंगजेबाच्या पोटांत दयेचा लेशही उत्पन्न झाला नाहीं. मग

किंचित् अवकाशानें हुकूम होतांच त्याचें शीरही एकानें छाटून टाकिलें ! ! शिर सलामत तोंपर्यंत शरीराचे सर्व व्यापार शाबूद. ह्मणूनच शिराला ‘ उत्तमांग ’ असें ह्मटलें आहे. त्याचा आणि धडाचा वियोग होण्याबरोबर सर्वच ग्रंथ आटपला !

संभाजीचा शिरच्छेद होणार असें रोषनारेला समजलें तेव्हां तिनें अनेक प्रकारें बापाची विनवणी करून त्याला मुक्त करण्याविषयीं रदबदली केली. तिनें ह्या ऐन आणिबाणीच्या प्रसंगीं लज्जा सोडून आपल्या बापाजवळ इतकेंही सांगितलें कीं, या राजावर माझें मन बसलें आहे, व तो मुसलमान होऊन माझ्याशीं लग्न करण्यास कबूल असून आह्मां उभयतांचे करारही होऊन चुकले आहेत. ह्यासाठीं त्याला कृपा करून जीवदान दिलेंच पाहिजे. ही तिची रदबदली ऐकून त्या निर्दय बादशहाचें मन फिरलें तर नाहींच, पण उलट त्याच्या क्रोधाग्नीवर तेल ओतल्यासारखें होऊन तो अधिकच भडकला. अशा काफर व कंगाल हिंदु राजाबरोबर निक्का लावून घेण्याचा तिचा निश्चय प।१०। त्यानें तिची अत्यंत निर्भर्त्सना करून तिला नाहीं नाहीं तीं दूषणें दिलीं. किती झाली तरी अबलाच ती. त्यांतून बापाचा हट्टी व दुराग्रही स्वभाव तिला पूर्णपणें माहीत होता. जास्त बोलून कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं, असें समजून अल्लावर हवाला ठेवून ती बिचारी गुपचूप बसली. परंतु अंतर्यामीं तिचे पंचप्राण अगदीं कासावीस झाले होते. शेवटीं, बादशहानें संभाजीरावाचा महाक्रूरतेनें वध केल्याचें वर्तमान तिच्या जेव्हां कानीं आलें तेव्हां जवळ एक मोठा दगड होता, त्याजवर तिनें दोन तीन वेळां दणादण आपलें डोकें आपटलें. त्याबरोबर ती विकल होऊन मूर्च्छा येऊन पडली. जवळ दासी होत्या त्या धांवत येऊन तिला त्यांनीं सांवरून धरिलें. कपाळाला दोन-तीन खोंका

तीं डून त्यांतून रक्तस्राव चालला होता. तो त्यांनीं आपल्या वस्त्रांनीं पुष्कळदां टिपला, तरी बंद झाला नाहीं. वस्त्रें भिजून चिंब झालीं. मग तंबूच्या आंतल्या बाजूला छपरपलंग होता त्याजवर तिला त्यांनीं हलकेच नेऊन निजविलें. तिच्या आईला ही खबर लागतांच तीही जवळ येऊन शोक करीत बसली. कांहीं वेळानें मध्यें किंचित् शुद्धीवर येऊन डोळे किलकिले करून रोघनार खोल स्वरानें ह्मणाली:—

जाहापन्हा, मैं होषमें हुं. मेरी फिक्र न कीजीये. मेरे जानीक मुझको परवा नहि. आप अवल अपना बचाव कीजीये. जाईये, उठीये.

[ महाराज, मी सावध आहें. माझी फिकीर करूं नका. माझ्या जिवाची मला काळजी नाहीं. तुह्मी अगोदर आपला बचाव बघा, जा, उठा. ]

इतकें बोलून पुन्हा डोळे मिटून ती बेशुद्ध होऊन पडली. तिच्या उरामध्यें थोडी धुगधुगी होती. एवढ्यावरूनच ती जिवंत आहे असें समजत होतें. बाकी तिची सर्व स्थिति प्रेतासारखी झाली होती. रक्तानें भरलेलीं वस्त्रें तिच्या आईनें हळूच काढून तिच्या आंगावर दुसरे कपडे घातले, व तोंडावर आणि आंगावर रक्ताचे ओघळ गेले होते, ते तिनें ओल्या बोळ्यानें हळूच पुसून काढिले.

हकीमाला तिची प्रकृति पहाण्यासाठीं बोलावूं पाठविलें होतें. तोही तेथें आला. त्या वेळेस तिची हालचाल अगदीं बंद असून नाडी मात्र मंदमंद चालत होती. हकीमानें प्रथम ओल्या कपड्याच्या पट्टया तिच्या कपाळावर बांधल्या. या थंड उपचारानें ती जरा शुद्धीवर आली. तिनें डोळे उघडून

गरगरां आपल्या सभोंवतीं पाहिलें, पण तिला कोणाची ओ-ळख पटली नाहीं.

'मुझको पानी पिनेको दो.'

[ मला पाणी प्यावयास द्या. ]

इतकेंच ती कण्हत कण्हत बोलली. आईनें पाण्याचा पेला तिच्या तोंडाशीं धरिला. त्यांतलें ती घोट दोन घोट पाणी प्याली न प्याली तोंच ती पुनः बेशुद्ध होऊन बिछान्यावर पडली. अशी अवस्था पाहून तिची आई अगदीं घाबरून गेली आणि हकीमाला ह्मणाली:—

हकीमसाहब, मेरी बेटीको आराम होवेगा ना ?

[ हकीमसाहेब, माझी बाई बरी होईल ना ? ]

हकीम उत्तर न देतां स्तब्ध राहिला आणि मध्यें कांहीं वेळ गेल्यावर ह्मणाला:—

मलिकासाहेबा, मैंने इन् जखमोंसे और बडी बडी जखमे देखी है. और अछीभी की है. पर मुझको फिक्र यही है. शाहाजादीकी तबियत बहुत नाजूक है, और जखमे बडी है, तोभी, मलिकासाहेबा, मेरे तरफ्से कोशीस करनेमे कमतर न होगी. शफा देना खुदाके तरफ् है. अब् उसके पेटमें थोडा खुराक जायगा तो उनको जरा हूशियारि आवेगी. और थोडी कूवत् आनेपर जखमे कितनी गहिरी हैं यहभी मुझको मालूम होगा.

[ मासाहेब, मी ह्याहून सुद्धां मोठ्या जखमा पाहिल्या आहेत आणि बऱ्याही केल्या आहेत. पण मला फिकीर एवढीच आहे कीं, शाहाजादीची तब्बेत फार नाजूक आहे, आणि जखमा मोठ्या आहेत. तरी मासाहेब मजकडून प्रयत्न करण्यांत बिलकुल कसूर होणार नाहीं. यश देणें खुदाकडे आहे. आतां

त्यांना पोटांत थोडें अन्न जाईल तर जरा हुशारी येईल, आणि थोडी कुवत आली ह्मणजे जखमा किती खोल आहेत तें मला कळेल. ]

आई ह्मणाली, ठीक आहे, मी तिला थोडेंसें खाऊं घालतें. मग एका वाडग्यांत थोडी भाताची पातळ कांजी करून तिच्या तोंडाशीं नेऊन आई ह्मणाली:—

बेटा, यह दवा लाई है. जरा मूं खोल, उस्से तुजको आराम मालूम होगा. और पेटमें दम आवेगा. बजबरदस्ती थोडासा तोभी पी ले, बेटा, पी ले.

[ बेटा, हें औषध आणिलें आहे. जरा तोंड उघड. त्यानें तुला लवकर बरें वाटेल आणि पोटांत दम येईल. अळेंवळें एक दोन तरी घोट घे. घे, बेटा घे. ]

आई काय ह्मणाली तें तिच्या ध्यानांत आलें. तिला उठून बसविली. तिनें त्या वाडग्याला हात लावून दोन तीन घोटही घेतले. मग तें नकोसें झाल्यावर तिनें मान एकीकडे केली. तेव्हां हकीम ह्मणाला:—

अब ठीक हुवा.

मग तिला आडवी निजविल्यावर जरा झोंप लागली. हकीम वरचेवर तिची नाडी चांचपून पहात होता. नाडी चांगली चालली होती ह्यामुळें त्याला व जवळ बसलेल्या मंडळीला पुष्कळ धीर आला. तिला गडबड होईल ह्मणून सर्वजणें एकमेकांशीं हळू हळु बोलत. ती जागी झाल्यावर, कांहीं खातेस का ? ह्मणून विचारिलें. तेव्हां तिनें आपल्या आईकडे बोट केलें. मग आई ह्मणाली:—

बेटा मैं यहां बैठी हूं. तू घबराव मत. तुजको थोडासा खानेको मंगवाऊं क्या ?

[ बेटा मी जवळच आहें, तूं घाबरूं नको. तुला थोडेंसें खायाला देऊं का ? ]

हें ऐकून ती उठूं लागली, ह्मणून तिला मागें हात लावून उठून बसविलें. तेव्हां डोळे उघडून ती आपल्या सभोंवतीं पाहूं लागली. त्या वेळेस ती शुद्धीवर असून तिची प्रेमळ मुद्रा दिसली. मग आईनें कांजीचा पेला तिच्या तोंडाशीं नेला. त्यांतले दोन घोट घेऊन तिनें मोठ्यानें सुस्कारा टाकिला, आणि आईच्या हातांत हात घालून तिच्याकडेच ती एकसारखी टक लावून पाहूं लागली, आणि शेवटीं खदखदां हांसली. तिला असें वाटलें कीं, संभाजीरावाला ठार मारल्याचें पाहिलें हें केवळ स्वप्न होय. तो मारला गेला नसून जिवंत आहे, आणि आपल्या शेजारींच येऊन बसला आहे, असें वाटून तिला मोठा आनंद झाला; आणि त्या आनंदांत ती हंसली. तिचा शब्द खोल गेला होता, तरी तिनें उद्गार काढिले ते स्पष्ट कळले. ती ह्मणाली:—

महाराज, खुदाके फजल्से आप जीते हो. उस् परवरदिगार अल्लाहका मुझपर बडा शुक्र है.

[ महाराज, एकून खुदाच्या कृपेनें आपण जिवंत आहां. त्या परवरदिगार अल्लाचे हे मजवर बहुत उपकार आहेत. ]

बेटा, तूने क्या कहा? इधर देखो, ये हम् सब यहां अछी तरहसे मौजूद है. यह मैं तेरी मा, तैने पछानी क्या ? ये हकीम साहब, ये लवंडीया, तेरे पास बैठी है. तैने हमसे कुछ पूछा क्या ?

[ बेटा, तूं काय बोललीस ? हीं पहा आह्मीं सर्वजणें खुशाल आहों. ही मी तुझी मा, ओळखलीस का ? हे हकीम साहेब, ह्या दासी, तुजपाशीं बसल्या आहेत. तूं आह्मांला कांहीं विचारिलेंस कीं काय ? ]

असें आईचें बोलणें ऐकून तिनें डोळे उघडून आपल्या भोंवतीं नजर टाकली, आपला डावा हात उचलून आईच्या उजव्या हातावर ठेविला, पुन्हा सगळ्यांकडे नीट निरखून पाहिलें, आणि ह्मणाली:—

.बचगये, बचगये, ठीक हुवा. मेरे दिलके माफक हुवा. अब मैं खुषी और खुरमीकेसात अल्लाके तरफ जाती हुं. महाराज, इस् गरीब जनपर आपकी मेहेर निगा रहने दो. मेरे तरफ् येक वक्त शफकत्कि नजरसे देखो. मेरे मूंपर आप दस्त फिराव.

[ बचावलां, बचावलां, ठीक झालें. माझ्या मनासारखें झालें. आतां मी सुखासंतोषानें अल्लाकडे जातें. महाराज, ह्या-गरीब अबलेवर आपली कृपादृष्टी असूं द्या. मजकडे एकदां दयार्द्रदृष्टीनें पहा. माझ्या तोंडावरून हात फिरवा. ]

**आई**—मेरी प्यारी, तूं किस्से बात करती हो. यह मैं तेरे पास बैठी हुं. मुझको पैछाना क्या ?

[ माझे लाडके, तूं कोणाशीं बोलतेस ? ही तुझ्यापाशीं ब-सलेली आहें ती कोण आहें ओळखलीस का?

**रोषनार**—( थोडें भ्याल्यासारखें करून ) मैं जानचुकी, मैं जानचुकी. मेरे महाराजको मत मारो. उनकी जान बचाव. वह देखो, वह देखो, वे बदमाष तलवारे लेकर मारनेके लिये उनके पीछे दौडते है. उनको पकडो, गिरफतार करो.

[ ( थोडें भ्याल्यासारखें करून ) समजलें, समचलें. माझ्या महाराजांना मारूं नका. त्यांचे प्राण वांचवा. ते पहा, ते पहा, त्यांच्या आंगांवर ते चांडाळ तरवारा घेऊन धांवत आहेत. त्यांना धरा, पकडा, बसवून ठेवा. ]

**आई**—( डोळ्यांतून अश्रु गळत आहेत ) बेटा, ऐसी क्यौं बडबडाती हो. तुजको क्या देख पडता है. कहो, बेटा. यह मैं

तेरी मा, और तेरे अदमी बैठे हुवे है. बायबी अदमी कोई नहि. मत् डरो. हुशीयार हो.

[ ( डोळ्यांतून अश्रू गळत आहेत ) बेटा, अशी बरळतेस कां ? तुझ्या डोळ्यांपुढें काय दिसतें ? बोल बेटा, बोल ? ही मी जवळ तुझी आई आणि तुझींच मनुष्यें बसलों आहों. परकें कोणी नाहीं. भिऊं नकोस. बेटा, सावध हो. ]

हें बोलणें समजण्यासारखी ती शुद्धीवर नव्हती. आई काय ह्मणाली याचें तिला ज्ञान झालें नाहीं. पुन्हा आईचा हात आपल्या उराशीं धरून ती गप्प राहिली. पुन्हा तिला जरा डुलकी लागली. किंचित् विश्रांति घेऊन जागी झाल्यावर तिनें पिण्यास पाणी मागितलें. तेव्हां पलिकडे डाळिंबाचें सरबत होतें त्यांतून एक पेला भरून एक दासी तिला पाजण्यास आली. तिचा तिनें हात एकीकडे सारला, आणि आई-कडे बोट केलें. मग आईनें पेला तोंडाशीं नेल्यावर त्यांतून दोन घोट सरबताचे घेतले. नंतर तिला थोडीशी हुशारी ली, आणि ह्मणाली:—

मैंने देखा. आप सब लोग मेरे नजदिक बैठे हो, लेकिन् आज मेरे शीरमें दर्द क्यौं होती है ? हाय ! हाय ! ! क्यौं कर मेरा सिर दर्द करता है ? हा ! हा ! आब मेरे ख्यालमें अया. लेकिन्, महाराज, आपकी तो खैरयत् हयना ?

[ तुह्मी सर्वजणें मजपाशीं आहां हें मी पाहिलें. पण ( कपाळाला हात लावून ) आज माझें कपाळ कां दुखतें आहे ? हा, हा, हा, कपाळाला झालें तरी काय ? हो• हो, आतां माझ्या ध्यानांत आलें. पण महाराज तुह्मी तरी खुशाल आहां ना ? ]

. आई—बेटा, महाराज किस्को कहती हो ?. ऐसी क्यौं

बडबडाती हो ? हं सब अछे है. देख, तूने सबको पैछाना क्या ? तू आब जल्द हूशीयार होगी. कुछ फिक्र मत कर. तुजको अछी करानेके लिये हं रात्‌दिन्‌ तेरे नजदिक्‌ बैठे है. तेरी जखमें खुदा जल्द दुरस्त करावेगा.

[ बेटा, महाराज कोणाला ह्मणतेस ? अशी कां बरळतेस ? आह्मीं सर्वजणें खुशाल आहों, हीं पहा. तूं आह्मांला पुरतें ओळखिलेंस का ? तूं आतां लवकरच हुशार होशील. कांहीं काळजी करूं नको. तुला बरी करण्यासाठींच आह्मीं रात्रंदिवस तुझ्याजवळ बसलों आहों. तुझ्या जखमा खुदा लवकरच नीट करील. ]

**रोषनार**—सच है. खुदा मुझको जल्द आराम करेगा. मेरा उसपर यकीन है. मुझको वह आब अपनेपास जल्द ले जायगा तो बेहत्तर है. अब मेरी मौत बहुत दूर नही, ऐसा मुझको मालूम हुवा.

[ खरें आहे. अल्ला मला लवकरच बरी करील. माझा त्याच्यावर पूर्ण भरंवसा आहे. मला तो आतां आपल्याजवळ लवकर नेईल तर बरें. माझें मरण आतां फार दूर नाहीं, असें मला समजून आलें आहे. ]

पुन्हा **रोषनार**—महाराज, जरा इधर देखिये. आपके मूंपर ये जखमे कैसी नजर पडती है ! या खुदा ! या अल्ला ! खुदाने अपनेपर कैसा वक्त लाया ! जिस्‌ बदमाषने मेरे महाराजपर हात उठाया उस्‌की मुसुक बांध करके मेरे पास ले आव तोबा ! तोबा ! कैसा वक्त गुदरा ! !

[ महाराज, इकडे पहा जरा ! आपल्या तोंडावर ह्या जखमा कसल्या दिसतात ! अरे अल्ला, मजवर इतका इतराजी कां झालास. ज्या चांडाळानें माझ्या महाराजांवर हात उगारला

असेल त्याला मजजवळ मुसक्या वांधून आणा. तोबा ! तो
काय हा प्रसंग !! ]

असी पुन्हा ती वेड्यासारखी बरळूं लागली. तेव्हां ह
वगैरे सर्व माणसें घाबरून गेलीं. तिच्या आईच्या तोंडचें प
पळालें. पुन्हा जरा ती शुद्धीवर येऊन ह्मणाली:—

मासाहब, मेरे वास्ते खुदासे लतेजा कीजीये की, मुझको
अपने पास जलद लेजाय. मैं अपने महाराजके पास जाऊ
मुझको कोई मत् रोखो. या अल्ला ! क्या मेरा नसीब ! अ
मेरे प्यारे अश्राको दूर कर दिया ! मेरे महाराज अभी
जिंदे हो तो उनके लिये सिरिफ् मैं रहूंगी. छी, छी, मैं प
सरीखी क्या वडबडाती ! अब् मेरे महाराज मेरे नजर क्यौं
पडेंगे ! मासाहब, आप क्यौं अफ्सोस करती हो ! हकी
मैं उनके तरफ् जावूंगी ! महाराज, मेरे वालिदके यहां
तरफ्से मेहमानदारी अछी न हुई, या मेरी तरफ्से आ
खिजमत् अछी न हुइ, और लेकिन आपकी खाईषभि
पूरी नकी, ऐसी मैं कंबक्त काहेकु पैदा हुई ! लेकिन् महा
मेरे हातसे आपकी खिजमतका इत्तिफाक न हुवा तौभी,
नारको जानसेभी प्यारे आप थे. इस्लिये वडी अदब्से उ
यह मारुजा है की, उसको मत् भूलिये, उसकी याद र
और उसको अपने पास जल्द ले जाईये. आपकेसिवाय उ
यहा अछा न लगेगा.

[ मासाहेब, मजसाठीं अल्लाचा धांवा करा. मला ल
आपल्या जवळ घेऊन जा ह्मणून त्याला अर्ज करी. मी
ल्य

तर त्यांच्यासाठीं मात्र मी राहीन! छे, छे, मी अशी यासारखी काय वरळतें! आतां माझे महाराज माझ्या दृष्टीस चे पडतात! आई, तूं आतां कशाला दुःख करतेस? त्यांच्याकडे खचीत जाणार! महाराज, मजकडून माझ्या पाच्या घरीं आपली चांगली बडदास्त राहिली नाहीं, पली मजकडून कांहीं सेवाचाकरी घडली नाहीं, आणि आपले मनोरथ मी परिपूर्ण केले नाहींत! अशी मी चांडाळीण कशाला जन्मास आलें! पण महाराज, जरी माझ्या हातून आपली कांहीं सेवाचाकरी घडली नाहीं तरी, ह्या रोष्ननारेला आपण प्राणापेक्षांही प्रिय होतां. ह्मणून हात जोडून तिचा असा अर्ज आहे कीं, तिला विसरूं नका, तिची आठवण ठेवा, आणि तिला आपणापाशीं लवकर घेऊन जा. तिला आपल्या शिवाय येथें करमावयाचें नाहीं. ]

(पुन्हा थांबून) मासाहब! वे देखो मेरे महाराज मुझको बुलाय रहे है. मुझको उनकेपास पौहचादो. छोडो मुझको. यह देखो फूलका हार मेरे तरफ् महाराज फेक रहे है. उसको जान छोड देवूंगी तब मेरे कबरपर चढाव. मुझको एकबार नके गलेमें हात डालके खुब मिलनेदो. चलो, हटो, तुमा मे वे मुस्से न मिलेंगे.

!

[ मासाहेब, हे पहा माझे महाराज मला हाक मार हा- ! मला त्यांजकडे नेऊन पोंचवा! सोडा आ आव पहा फुलांचा हार मजकडे महाराज फेंकीत अ

[ महाराज, इकडे पहा जरा! आपल्या तोंड जखमा कसल्या दिसतात! अरे अल्ला, मजवर इतका इतराजी कां झालास. ज्या चांडाळानें माझ्या महाराजांवर हात उगारला